सन १९९१

दा. क्र.
१२१९६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... वि:
क्रमांक ... नों: दि:

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. १२१९६
ग्रंथ

REFBK-0012196

# पाश्चात्य-दर्शन

—लेखक—

प्रा. भाऊ मांडवकर

सेवा प्रकाशन: भेट ११ वी

*

प्रथमावृत्ति—
१९ ऑक्टोबर १९६१
विजयादशमी

प्रकाशक—
कु. सुशील मांडवकर
सेवा प्रकाशन,
रुक्मिणी नगर,
अमरावती [महाराष्ट्र]

मुद्रक—
का. वि. ओंगलेकर
राजहंस प्रिंटींग प्रेस,
अमरावती

छाया—श्री. मोहन के

किंमत ४ रुपये

ज्यांच्या

कृपेचा हा विस्तार आहे–

ते—

डॉ. पंजाबराव देशमुख

ह्यांना

सविनय समर्पण

कृतज्ञता—

सर्व साहाय्यकर्त्यांचे
हार्दिक आभार!

—लेखक

---

मुखपृष्ठावरील छायाचित्रे—

(१)


मदुरेच्या मीनाक्षीमंदिराचे हे दक्षिण—गोपुर म्हणजे
दक्षिणी शिल्पाचा उत्कृष्ट दाखला.

[ पृ. १२१ ]

(२)

स्वामी विवेकानंदांच्या पदस्पर्शाने पावन झालेली
कन्याकुमारीची श्रीपादशिला.

[ पृ. ११३-११४ ]



पल्लवराजांच्या महाबलीपुरम-बंदराच्या काठी काळाचे व समुद्री लाटांचे चपेटे खात उभे असलेले प्राचीन मंदिर [पृ. ४४]



केरळच्या सौंदर्यात्मक नीटसपणाचा नमुना
त्रिवेंद्रमचे वस्तुसंग्रहालय [पृ. १०८]

ग्रा. क्र. ९२१९६ मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... दि: ...
शाखा ... नों: दि: ...

श्रीशि ़जी लोकविद्यापीठातर्फे निघालेल्या काश्मीर-सहलीबद्दल बरेचसे चांगले ऐकले होते. त्यामुळे याच संस्थेने आयोजित केलेली सिलोन-सफर चुकवू नये असे मला बरेचदा मनातल्या मनात वाटत असे. अर्थात् हे वाटणे अमरावतीच्या श्रीशिवाजी महाविद्यालयात १९५९ च्या जूनमध्ये प्राध्यापक झाल्यानंतरच सुरू झाले.

या सहलीचे संयोजक डॉ. आ. पां. उर्फ अण्णासाहेब पडोळे यांची व माझी अमरावतीस येण्यापूर्वी ओळख नव्हती. नाही म्हणायला प्रा. गुणवंतराव काळे यांनी एप्रिल १९५९ मध्ये माझी व त्यांची उभ्या-उभ्या ओळख करून दिली होती. वस्तुत: ही ओळख रात्री झाल्यामुळे मला त्यांचा चेहराहि प्रथमप्रथम नीट आठवेना. पण नंतर रुळलो.

श्रीशिवाजी कॉलेजचे त्यावेळचे रजिस्ट्रार श्री. गोळे यांच्यामुळे मराठा विज्ञान-मंडळात 'सार्वजनिक संस्थांचे सांस्कृतिक कार्य' या विषयावर गणेशोत्सवाच्या वेळी छत्रपति-उत्सवात (१९५९) मी भाषण दिले. त्याचा काय परिणाम झाला कोण जाणे, पण श्री. गोळे नागपूरच्या नॅशनल कॉलेजमध्ये बदलून गेल्यानंतरहि १९६० च्या छत्रपति-उत्सवात 'तुकारामा'वर भाषण देण्याचा मला योग आला. डॉ. पडोळे यांची घनिष्टता वाढण्याला हा प्रसंग अधिक कारणीभूत झाला. वेळ नसूनहि ते पूर्ण वेळ भाषणाला थांबले व त्यांनी पितृतुल्य दृष्टीने माझे कौतुक केले.

त्यानंतर त्या भांडवलाच्या भरवशावरच मला डॉ. पडोळे यांनी चिखलदऱ्याच्या स्काऊटशिबिरात नेले. चिखलदऱ्याला जात असतांना अण्णासाहेबांनी मला सिलोनचे सांगितले व मी ते एकदम कबूलहि केले.

चांगल्या संबंधातून आदरपूर्ण आपुलकी निर्माण झाली की, संबंधित व्यक्तींनी सांगितलेल्या गोष्टी ऐकण्यास व करण्यास मी एकदम तयार होतो. तसेच आताहि झाले. पण नंतर माझेच मन डळमळू लागले. अंथरूण पाहून पाय पसरण्याची वृत्ती अंगात चांगलीच मुरल्या-मळे माझे मन कच खात होते. नागपूरला प्राथमिक शिक्षक असतांना केवळ ६४ रुपये पगारातहि परीक्षांसह गुजराण करण्याची नेटकी सवय लागल्यामुळे अण्णासाहेबाची सफर मला जड वाटू लागली. शिवाय कांचीपुरम्च्या सर्वोदय – समेलनाला जेव्हा मी गेलो होतो, तेव्हा मद्रास बघितले असल्यामुळे 'दक्षिण' पाहिल्याची फुशारकी मला मारता येत होती.

परंतु, ५ नोव्हेंबर १९६० ला गुरुकुंज–आश्रमात पुन: अण्णासाहेबानी जेव्हा आग्रह केला, तेव्हा मला नाही म्हणवेना. एवढे झाले तरी माझ्या मनाची का कोण जाणे, पूर्णत: तयारी होईना. दरम्यानच्या काळात सर्दी, पडसे, खोकला व फ्लयू यांनी मी चांग हबकलो. त्यामुळे अण्णासाहेबांना मी येत नसल्याचे कळविले. आमच्या डॉक्टरांनाहि माझ्या त्रासाची जाणीव असावी. मी तयारी रहित करावी असे त्यांचे मत पडले

एप्रील १९६१ मधल्या लंकेतील भाषिक चळवळींमुळे सहल रद्द होण्याची चिन्हे दिसू लागली. त्यामुळे मला एक नवे कारण मिळाले. सिलोन वगळून सहलीस जाऊ नये असे ठरवू लागलो, तरी मनात आंदोलन सुरू झाले. या आंदोलनाचे पडसाद चर्चेत उमटत तेव्हा मात्र [illegible]

दिनांक २ मे १९६१ रोजी मी नागपूरला गेलो असतांना संत तुकडोजी महाराजांची किसान–रेल–यात्रा सफरीवर गेल्याचे पाहिले होते. त्यामुळे माझे मन सहलीस जाण्यासाठी उद्युक्त होऊ लागले. प्रा. गुणवंतराव काळे तेथे होते ते म्हणाले, "भाऊ, तुम्ही अवश्य जा."

माझे महाविद्यालयीन सहकारी प्रा. चौव्हाण (राजपूत) यांनी सिलोन नसल्यामुळे वेळेवर तयारी रहित केली; तर एके दिवशी प्रा. तट्टे भल्या सकाळी आले व म्हणाले, " सिलोन असो-नसो, आपण जाणारच !"

त्यावेळी मी अभवितपणे उद्गारलो, " तट्टेसाहेब, तुम्ही असाल तर मी येतोच. सिलोन रहित झाले आहेच. दक्षिण भारतच बघूया."

आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. एन्. सी.देशमुख यांनीहि आम्हाला महलीसाठी मोकळीक दिली. कॉलेजची ४०-४२ मुले येणार असल्यामुळे त्यांनी आमच्या जाण्याचे स्वागत केले.

या सहलीला न जाता मी राष्ट्रभाषेच्या आसामात भरणाऱ्या संमेलनाला यावे असा आग्रह माझे मित्र श्री. रा. पां. वाईकर यांनी केला व त्यांनी कंसेशन मिळविण्याचाहि त्रास घेतला. मी आसामला जाऊ शक ो नाही. त्रास मात्र वाईकरांना झाला.

सहल दोन दिवसांवर येऊन ठेपली तेव्हा सहल-संबंधितांची आवकजावक आमचेकडे सुरू झाली आधल्या दिवशी तट्टे पति-पत्नींनी येऊन तयारीच्या सामानाची माहिनी दिली. मी आपला साध्या सतरंजीवर जाणार होतो. पण चाळीस दिवसांसाठी बाहेर जाणे म्हणजे गंमत नव्हे, ह्याची जाणीव प्रा. तट्टे यांनी दिली. माझ्या या गलथानपणावर बोट ठेवूनच कदाचित् त्यांनी सौ. सिधूला जातांना सुचविले असावे, " अहो वहिनी, तुम्ही आल्यावर आमच्या भाऊला तुम्ही पत्ते शिकविले, तसाच व्यवहार पण शिकवा " प्रा. तट्टयांनी गेल्या दोन वर्षांच्या सहवासात माझ्या स्वभावाचे जे निरीक्षण केले असेल, त्यावरून तर त्यांनी असे उद्गार काढले नसावेत ना ? बाकी त्या त्यांच्या बोलण्यात चूक असे काहीच नव्हते ! व्यवहारी म्हणून मी बरेचदा शेखी मिरवीत असतो, हे खरे असले तरी माझ्या अनेक व्यवहारांच्या व्यवहार्यतेबद्दल अनेकदा मी स्वत:च साशंक असतो.

एकदा एका वर्षाने मी कळंबला घरी गेलो होतो. घरची माणसे शेतावर गेल्यामुळे सायंकाळी गोठ्यात गुरे बांधण्याचे काम मजवर आले. मी ओळखीची गुरे बांधली व अनोळखी गुरे हाकलून लावली ! नंतर कळले की, हाकललेली गुरे आपलीच होती ! आणि, हेहि लक्षात आले की, हाकललेली गुरे मी त्यापूर्वी अनेकदा बघितली होती. पण त्यांची ओळख विसरायला आमच्यासारखे 'व्यवहारी' लोकच हवेत !

++ ++ ++--

९ मे १९६१. सहलीला निघण्याचा दिवस ! मंगळवार ! मंगलतेचा जणू सूचक दिवस ! अनेक आंदोलनांतून तयारी झाल्यावर सहलीला निघण्याच्या या दिवशी सकाळी मराठा विद्यालयाच्या स्टेशनब्रँचमध्ये सहलीची काय तयारी चालली हे बघण्यासाठी म्हणून मी निघालो, तेव्हा डॉ. पडोळे स्वत: घरी आले व तब्येतीची आणि तयारीची चौकशी करून गेले. आता माझ्या तयारीवर शिक्कामोर्तबच झाले. अण्णासाहेबांच्या आस्थेवाईकपणापुढे नाही म्हणायची छाती होईल कुणाची ?

दुपारी आमच्याकडे सहलीतील एक विद्यार्थिनी आल्या. त्यांच्या गळ्यात सोन्याची साखळी पाहून चि. सुशील म्हणाली, "अय्या, दागिने न्यायची परवानगी नसून तुम्ही चेन घेतली ?" त्या पटकन् उद्‌गारल्या, "पैसे कमी पडले तर मोडायला बरी, म्हणून घेतली !"

सायंकाळी ठीक ६ वाजता मी स्टेशनवर गेलो. आमची खास गाडी सायडींगला येऊन पडली होतीच. तिची पूजा श्रीशिवाजी शिक्षण-संस्थेचे सचिव डॉ. मामासाहेब लोंढे व सौ. लोंढे यांच्या शुभ हस्ते झाली. त्यावेळी मामांनी लहानसे आशीर्वादात्मक भाषण देऊन सहल-प्रवाशांना मार्गदर्शन केले.

सायंकाळची जेवणे लवकर आटोपून घराची आवरसावर केली व ११ ऐवजी ९ वाजताच स्टेशन गाठले. यात माझा अंतस्थ हेतू हाच होता की, आपल्याला चांगली जागा मिळावी. पण माझी ही अंतस्थ लबाडी (!) फळाला आली नाही. कारण माझ्यासारखेच एकजात सारे माझ्याहिपेक्षा आधीच येऊन जागा पटकावण्यात गुंतले होते. माझ्याअगोदरच अनेकांनी अक्षरश: गाडी ताब्यात घेतली होती.

आमची जी जागा ठरली होती, त्या जागेवर आधीच दोन व्यक्ति झोपल्या होत्या. मला वाटले, त्यांना त्रास नको. म्हणून दुसऱ्या डब्यात गेलो तो डबा बायकांचा म्हणून रिकामा ठेवण्यात आला होता. गाडी सुटल्यावर कळले की, बायकांच्या व आमच्या डब्यात आधीच झोपलेल्या व्यक्ति ह्या प्रवासी–व्यक्ति नसून ज्यांना जागा हव्या होत्या त्यांनी आपले नोकर आधीच तेथे झोपविले होते ! वस्तुत: गाडीत मिळणाऱ्या जागा बसावयासाठी होत्या; झोपावयाच्या नव्हत्या. तरीपण परस्परांनी परस्परांची सोय पाहावी हा अलिखित संकेत येथे पाळावयाचा असतो. त्याला धरून आमची जागा आम्ही मुक्रर केली.

ही बसण्याची घाईगडबड चालू असतांना सहलीचे संघटक डॉ. पडोळे हे एका जागी उभे राहून तक्रारी ऐकत होते व त्यांच्या निवारणार्थ आवश्यक तेव्हा तक्रारस्थळी जात होते. व्यवस्थेच्या कामी व्यवस्थापक मंडळी रतली होती.

मला या गर्दीत एका गोष्टीचे नवलपूर्ण महत्त्व वाटत होते. माझ्या कौतुकाचा विषय होणारी ही चीज म्हणजे स्वयंपाकाचे सामान ! लाकडे, धान्याची पोती, स्वयंपाकाचे मोठमोठे गंज–हंडे, लोणच्याच्या बरण्या, दुधपावडरीचे पीप इत्यादि सामान एका मालडब्यात खच्चून भरले जात होते. चाळीस दिवस आम्हाला अन्न पुरविणारी अन्नपूर्णाच म्हणाना तो डबा !

अण्णासाहेब गाडी सुटण्यापूर्वी आमच्या डब्यात आले. ते अगदी थकलेले होते. ते आम्हाला म्हणाले, "तुम्ही लोक आतापावेतो सुखाने बसलात. काम काही केले नाही. म्हणून मी झोपतो व तुम्ही जागत जा!" अण्णासाहेबांना आम्ही झोपायला सुचविले. पण ते कसचे ऐकतात? नतर मला कळले की, ते रात्रभर सामानाच्या डब्यातून प्रवास करीत होते. सामानाच्या मध्ये एक सतरंजी अंथरून ते स्वयंपाक्यांमध्ये पहुडले होते.

रात्री १२-१५ वा. गाडी प्लॅटफॉर्मला लागली, त्यावेळीं पोहचवणाऱ्यांची धमाल धांदल उडाली होती.

++++++–

रात्री ठीक १ वाजता, म्हणजे दिनांक १० जून ६१ च्या शुभागमनसमयी आमच्या गाडीने स्टेशन सोडले. त्यावेळी पोहच-विणाऱ्यानी व सहलीतील लोकांनी एका स्वरात गर्जना केल्या

श्रीशिवाजी महाराजकी जय !

डॉ. पंजाबराव देशमुखकी जय !!

अनेकांचे पालवते हात हळूहळू अंधुक झाले व अंधाराला कापीत आमची स्पेशल ट्रेन पंचवीस मिनिटांनी बडनेऱ्याला पोहचली.

अमरावती स्टेशनवर भेटलेले श्री. पवार हे आमच्या गाडीचे गार्ड होते. ते आमची गाडी घेऊन नागपूरपर्यंत येणार होते. वस्तुत: श्री. पवार व श्री. राव हे दोघेहि बडनेऱ्याहून अमरावतीला आम्हाला निरोप द्यावा म्हणून दुपारी मुद्दाम आमच्या घरी आले होते. पण, त्यावेळी त्यांनी ही बातमी मुद्दाम सांगितली नव्हती. एकदम आश्चर्याचा धक्का देण्यातहि एक विशेष मौज असते !

बडनेरा स्टेशनवरून गाडी विलंबाने सुटली. तरीपण वेळ भरून काढण्यात आला. मधल्या काही स्टेशनांवर विद्यार्थी व शिक्षक चढले. नागपूरला गाडी ठीक ६–४५ वाजता पोहचली. चहापाणी सुरू असतांना बऱ्याच लोकांच्या भेटीगाठी झाल्या. बरेच लोक पोहचवावयाला आले होते. चांद्याचे प्रा. जे. ई. पाटील, सौ. इंदिराबाई दोन्दे (मुर्तिजापूर), श्रीशिवाजी बी. टी. कॉलेजचे प्राध्यापक श्री. तात्याजी उर्फ के. ब. कदम इत्यादि मंडळी आमच्या ओळखीतली निघाली.

ठीक ७। वाजता आमच्या गाडीने नागपूर सोडले. नागपूरनंतर गाडी बरेचदा थांबतथांबत चालली. कळमना, कामठी, सालवा अशा लहानलहान स्थानकांवर ती अर्धाअर्धा तास थांबून येणाऱ्या वा जाणाऱ्या गाड्यांना वाट मोकळी करून देई.

गाडीच्या एका डब्यात सहलीचे कार्यालय होते. त्या डब्यात लाऊडस्पीकरची सोय होती. डब्याला दोन भोंगे होते. एकाने मागे आवाज जाई व एकाने पुढे. या सोयीमुळे कोणत्याहि सूचना प्रवाशांना लगेच कळत. त्या भोंग्यांमधून गाणी व बातम्या मधूनमधून ऐकविल्या-मुळे लोकानी शांत राहण्यास अप्रत्यक्षपणे मदत होई. गाणी व नकला बोंबल्यातून ऐकविल्यामुळे प्रवाशाचे मनोरंजन होई. गायक वा नकलाकार सहलीतीलच असत.

थारसा स्टेशनवर तयार बेसन–पुरी गाडीतील सुमारे तीनशे–पावणेतीनशे प्रवाशांना वाटली गेली. आम्ही घरूनच भाजीपोळी तयार करून आणली होती, तीवर ताव मारला. नंतर आम्ही पत्त्यांचे डाव मांडले. प्रवासात करमणुकीसाठी हे एक अगदीच आवश्यक साधन झाले.

प्रवासाचा पहिला दिवस मात्र तितकासा त्रासदायक न वाटण्याला उत्साहाबरोबरच थोडे वादळी वातावरण हेहि एक कारण होते. दिवसभरात ऊन असे फारसे दिसले नाही. उकाडा जाणवत असला तरी अंगाची काहिली मात्र करीत नव्हता.

आजूबाजूच्या निसर्गसौंदर्याचीहि प्रवाशांना सोबत होती. साधे डोळे असणारे फक्त पाहतात. दृष्टि असणारे निरीक्षण साधतात. म्हटले तर नागपूर ते द्रुग काहीच दिसणार नाही. पण दृष्टि वापरली तर बरेच दिसेल. नागपूर जिल्हा सुटत आला की ज्वारी–कापसाची शेती सुटून भातशेती सुरू होते व वऱ्हाडचे मोठमोठ्या शेतांचे वैशिष्टय मागे पडते. आता लहानलहान बांधांची वाफेवजा भातशेते सुरू झालीत. उन्हाळयामुळे ती विराण दिसत खरी; पण एकाच भारतमातेच्या कुशीत सामावणारी ही वैविध्यपूर्ण आणि वैपुल्ययुक्त विचित्रता पाहिली की, भारतीय म्हणविण्याऱ्याची छाती अभिमानाने फुलू लागते. विशाल भारतमातेचे दर्शन घेणे म्हणजे जगातील सौंदर्याचा बव्हंश हिस्सा आपल्या पदरी पाडून घेणे, असे म्हटल्यास अतिशयोक्ति व्हायची नाही ! खंडप्राय भारत देशाचे हे आगळे वैभव लक्षणीय आहे.

तुमसरनंतर एका लहान स्टेशनावर नळाची सोय नव्हती, म्हणून बाजूच्या विहिरीवर मुले गेली तेथे एक वयस्क बाई मुलांना पाणी काढून देऊ लागली. पण मुले वाढत गेली, तेव्हा ती कंटाळली. वेळ उन्हाची होती. अखेर मुलांच्या घोळक्यातून एकजण पुढे होऊन म्हणाला, "बाई, आम्ही रामेश्वरला धाम करायला चाललो. वाटलं तर माझं सारं पुण्य तू घे, पण पाणी दे !" यावर त्या बाईने पाणी देऊन पुण्याचा साठा साठविण्याची सोय केली !

डोंगरगड नावाप्रमाणेच डोंगरांच्या गडाचे गाव वाटले. थोडा वेळ गाडी स्टेशनात थांबल्यामुळे उत्तुंग उभट डोंगरांचे निरीक्षण सोपे झाले. लहानलहान तलावांनी युक्त असलेल्या या भातप्रदेशाच्या विराणपणाला आगळी लज्जत आणण्यासाठी अशा डोंगरकडयांची मनोवेधकता खात्रीने पूरक ठरते !

डोंगरगड स्टेशनवर श्री मेंढेकर भेटले. आमचे कनिष्ठ बंधु श्री. के एम्. मांडवकर यांचे ते मित्र ! ते या विभागात गार्ड आहेत.

ते म्हणाले, "तुमच्या गाडीवर ड्यूटी मिळावी म्हणून मी लाख धडपड केली. पण ती फळाला आली नाही. माझ्या मराठी मित्रांची गाडी या हिंदी भागातून नेताना आनंद वाटला असता." श्री. मेंढेकर आमच्या आधीच एक रेलगाडी घेऊन दुर्गला पोहचले व आम्ही नंतर पोहचलो. तेथे त्यांनी आम्हाला पाण्याबिण्याच्या सोयी उपलब्ध व्हाव्यात, म्हणून योग्य ती मदत केली.

द्रुग स्टेशनात आमची गाडी सायंकाळी सहाला मुक्कामासाठी आली. आम्ही काही जणांनी लगेच एक पाण्याचा पाट शोधला व त्यावर स्नान केले. पाणी घाणेरडे दिसले, पण ते तसे नव्हते. पाण्याला काहीसा पांढरा रंग मात्र आला होता. तसे पाहिले तर गेल्या कुंभमेळयात प्रत्यक्ष गंगेचे पाणी प्रयागला यापेक्षा अधिक घाण दिसत होते. या नहरामुळे अनेकांची एकदम सोय झाली. कपडे पण धुतले. गेल्या कित्येक दिवसात मी स्वतःचे कपडे प्रायः धुतले नव्हते. त्यामुळे कपडे थोडे मळकट राहिले खरे; पण स्वतःकडे तो दोष न घेता खराब पाण्याला दोष देत आम्ही आपले स्वतःचे समर्थन केले ! नाहीतरी, समर्थनाच्या सारथ्याशिवाय दोषी माणसाचा रथ चालतच नसतो !

द्रुगला असिस्टंट स्टेशनमास्तर श्री. साखरदांडे यांची ओळख झाली. ते मूळचे नागपूरकडले. आमच्या स्नानाची सोय त्यांनी करवून दिली. पहिल्या श्रेणीच्या स्नानघरांची मोकळीक दिल्यामुळे स्त्रियांच्या स्नानाची विशेष सोय झाली. पुरुषांचे स्नानगृहहि मोकळे होते. स्वच्छ पाणी पाहून पुन्हा स्नान करण्याचा मोह झाला. म्हणून आंघोळ आटोपली व थोडया वेळापूर्वी घाण पाण्याने आंघोळ केल्याची स्वमनाची खंत व रुखरुख कमी केली.

रात्री सामुदायिक भोजनानंतर स्वतःचा ताटपेला स्वतः घासावा लागला. कपडे धुण्याप्रमाणेच आताहि झाले. गेल्या कित्येक दिवसात अशी कामे करण्याची संवय सुटली होती. जेवतांना पिण्याचे पाणी

पंगतीत न मिळाल्यामुळे पाण्यासाठी दूरवर जावे लागले. थंड पाण्याची मारामार; म्हणून नळाचे साधारण गरम पाणीच प्यावे लागले.

रात्री स्टेशनात अलग पडलेल्या आमच्या खास गाडीच्या समोर पथाऱ्या पसरून आम्ही झोपलो. थोडी उशीरा का होईना, पण झोप मात्र चांगली लागली. प्रथम उकाडा व तापलेली जमीन याचा त्रास जाणवला.

++++++:—

गुरुवार, मे ११ ला पहाटे कावळ्यांच्या कलकलाटाने जाग आला. स्नानघरातील गर्दी पाहून गाडीच्या डब्यातील नळाचा उपयोग करून अंगावर पाणी घेतले. अंगावरून पाणी गेले की, प्रसन्न वाटते; नाहीतर दिवसभर गरम वाटते असा माझा नेहमीचा अनुभव ! म्हणून अशा काकस्नानाची बरेचदा मी धडपड करीत असे.

सकाळी ६॥ वाजता चहासाठी आपापले पेले घेऊन सर्वजण चहा-स्थानी गेले. चहापानानंतर दुपारसाठी पुरीभाजी देण्याचे अभिवचन होते. त्याला अर्धापाऊण तास लागला असता. परंतु आम्हाला भिलाईला कधी जातो नि कधी नाही असे होऊन गेल्यामुळे स्टेशनच्या बाजूस असलेल्या तिचाकी टॅक्सीगाड्यांजवळ गेलो. ह्या गाड्या प्रत्येकी १ रुपया आवकजावकीच्या हिशेबाने ठरवून ठेवल्या होत्या. भिलाईला जायची उत्सुकता म्हणून आम्ही कसलीच चौकशी न करता या तिचाकी 'टेम्पो'मध्ये बसलो. आमच्या मागाहून बहुतेक टेम्पो आले व जनसपर्काधिकाऱ्याच्या कार्यालयाजवळ सर्वजण थांबले. एका टेम्पोला मात्र उशीर झाला. एक विद्यार्थी सुमारे पाऊण तास बाथरुमामध्ये स्नान करीत बसला होता. टॅक्सीड्रायव्हर घाई करीत होता. मुद्दाम वेळ लावण्यात येत असल्याची त्याची कुरकूर होती. तेव्हा व्यवस्थापक

३१६६०.

वाथरूमजवळ गेले व घोर मर्जना करूनच त्या विद्यार्थ्याला त्यांनी बाहेर बोलावले ! वेळेचे भान न ठेवता घरासारखे स्वैर व संथ वागणारे असेहि महाभाग सहलीत होते !

जनसंपर्काधिकाऱ्याच्या कार्यालयात आम्ही चौकशी केली, तेव्हा कळले की, ते कार्यालयच मुळी १०॥ वाजता उघडते व तेथे प्रवेशपत्रे घेतल्यावाचून भिलाई-कारखाना पाहावयाला आत जाता येत नाही.

आमच्यानंतर आलेल्या सहलकऱ्यांनी आपापली पुरीभाजी आणली होती. आधी येण्याची शिक्षा म्हणून उपवास काढण्याची तयारी करण्याची मनाला धवसहि देऊ लागलो होतो. पण परत जाणाऱ्या रिकाम्या तिचाकी-चालकाने एकाजणाला परत नेण्याची तयारी दर्श-विल्यामुळे आमच्यावर तो प्रसंग आला नाही.

दरम्यानचा वेळ कुठे घालवावा हा प्रश्न होता. कर्मचारी-वस्तीत आमच्या ओळखीचे काही लोक होते. 'प्रॉजेक्ट' पाहण्यासाठी त्यांची मदत घ्यावी असे वाटले. म्हणून पायीच 'प्रोजेक्ट'पासून दूर अंतरावर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वस्तीकडे निघालो. जवळजवळ द्रुगपासूनच सुरू झालेल्या या कर्मचारी-वस्तीचे 'सेक्टर' या नावाने मोहल्ले पाडण्यात आले असून प्रत्येक सेक्टरमध्ये क्रमांकांच्या सडका आहेत. आम्ही प्रथम दुसऱ्या सेक्टरमधील तिसऱ्या सडकेवर राहणारे श्री. ए. के. दांडेकर यांच्या घरी गेलो. नागपूरला श्री. गजाननराव भिसेकर यांच्याकडे त्यांचा परिचय झाला होता. आम्ही श्री. दांडेकरांकडे गेलो तेव्हा ते घरी नसल्यामुळे परत फिरावे लागले. 'अर्ध्या तासाने येऊ' असा (उगीच) निरोप ठेवल्यामुळे श्री. दांडेकर वाट पाहत राहिले. आम्हाला नंतर त्याचेकडे जाता आले नाही. दुपारीसुद्धा श्री. दांडेकरांनी आम्हाला कारखान्यात शोधले. पण चुकामूक झाल्यामुळे अखेरपर्यंत भेट झालीच नाही. आमच्यामुळे त्यांना मात्र त्रास झाला.

दांडेकरांकडून आम्ही पायीच दवाखान्यापर्यंत आलो. तेथे सौ. सिंधूच्या ओळखीचे ऑक्यूपेशनल-थेरॅपिस्ट श्री. मदन वध्वा भेटतील हीहि कल्पना खोटी ठरली. नंतर पहिल्या सेक्टरमधील ७ वी सडक शोधताशोधता नाकी नऊ आले. अखेर ती सडक दिसली. बऱ्याच दूरवर जाऊन मुर्तिजापूरनिवासी श्री. वामन खरवडकर यांचे घर गाठले. ते कामावर गेले होते. म्हणून त्यांची भेट झाली नाही. सौ. खरवडकर घरी होत्या. चहापाण्याचा कार्यक्रम झाला. मराठी माणसे आल्यामुळे सौ. खरवडकरांना आनद झाला. निघतांना त्या म्हणाल्या, "एरवी घरी एकटी असते. करमत नाही. तुमच्यामुळे तेवढात्र वेळ चांगला गेला."

तेथून कारखान्याकडे पायी परत जात असतांना एका मालट्रक-मध्ये कुठल्याशा सहलीची मुले चालली होती. ती आम्हाला पाहून जोराने ओरडली. आमच्या सहलीतर्फे आम्हाला पट्टे विकत दिले होते. माझा स्कार्फ डोक्याला बांधून मी कमी केसाच्या डोक्याचे उन्हापासून संरक्षण करीत होतो. दुसऱ्या एकाने आपला पट्टा गळयात अडकवला होता. त्यामुळे त्या मुलांना आमचे पट्टे म्हणजे एक मौजेचा विषय झाला होता. आम्हालाहि गंमत वाटली. आम्ही त्यांना टाऽ टाऽ केला.

पी. आर. ओ. ( पब्लिकरिलेशन्स ऑफीसर ) च्या कार्यालया-जवळ आमचे विद्यार्थी 'लालसर-केसरी' पट्टयांनी उमटून दिसत होते. ९-९॥ ला तेथेच सर्वांनी आपापल्या पुरीभाजीवर ताव मारला.

सुमारे १० वाजता भिलाई टेक्नीकल इन्स्टीटयूट पाहण्यासाठी सर्वजण पुढे सरकले. या संस्थेत शिकणारी मुले पुढे भिलाई कारखान्यात कामाला लागतात असे समजले. २०-२० जणांच्या तुकडया करून ही संस्था आम्ही पाहिली. आमच्या तुकडीला माहिती देणार शीख युवक श्री. हरिकिशन सोईन हे फार उमदे व उत्साही वाटले. मॅट्रीक

विद्यार्थ्यांसाठी २–३ वर्षांचा अभ्यासक्रम येथे शिकविला जातो. येथे बोल्ट तयार करणे, छिद्रे पाडणे, लोखंड कापणे इत्यादिकांची यंत्रे होती. त्यात काही भारतीय पण होती. अर्थात् ही गोष्ट भारतीयांना अभिमान वाटावा अशीच आहे. फिटींग, वेल्डींगसारखे बरेच विभाग येथे आहेत. वेल्डींगमधील कामाचे नमुने पाहतांना डोळ्यांवर प्रकाशझोत येऊ नये, त्रास होऊ नये म्हणून सहलीमधील अनेकांना डोळ्यांवर घालावयाची 'टोपी' मिळाली. बायकांना त्या टोपीचेच कौतुक वाटले ! बाकीच्या जागी बऱ्याच बायका पाहतांना रमू शकत नसत व मार्गदर्शकहि त्यांना विशेष समजावण्याच्या भरीस पडत नसे. येथे धातूला झिलई देण्याची मशीन पाहण्यात विशेष गंमत वाटली; तर येथील विद्यार्थ्यांनी आपल्या पद्धतीने कमी खर्चात केलेले एक धुरांडे पाहतांना कौतुक वाटले ! या शाळेत सर्व विभागातील विजेचे नियंत्रण करणारे एक यंत्र आहे. त्यामुळे अपघात टळतात.

भिलाई–पोलाद–कारखान्यात परवान्याशिवाय प्रवेश मिळत नाही. प्रवेशपत्रे मिळविण्याच्या वेळी प्रथम तेथील अधिकाऱ्यांनी कॅमेरे डिपॉझिट करून ठेवले. पण कॅमेरे बरेच होते. हा व्यवसाय परवडणारा नसून जोखमीचा आहे असे अधिकाऱ्यांना वाटले असावे. त्यांनी लगेच कॅमेरे परत केले. फक्त आत फोटो न घेण्याची अट घातली.

कंटाळलेले चेहरे आत जाण्याची वाट पाहत होते. मिळेल त्या सावलीत रागा करून सर्वजण बसले होते. उन्ह मी म्हणत होते. पास आणण्याची भानगड सुमारे एक–दीड तास चालली. म्हणून आत जाण्यासाठी एक गोड (!) गंमत आमच्या एका सहकाऱ्याने केली. त्यांनी कारखाना आधी अनेकदा पाहिला होता. ते द्रुगला त्यांच्या नातेवाईकाकडे उतरले होते. ते गावातून सायकलने वेगाने आले व आत शिरले. आत गेल्यावर ते थांबले व माझ्याकडे बोट दाखवीत तेथील पहारेकऱ्यास रुबाबात म्हणाले, "उन साहबको ऊपरके अफसरने बुलाया

है।" या पहारेकऱ्यांशी सूटबूट व चश्मा घातलेल्या व्यक्तीने रुबाबात बोलून बऱ्याच गोष्टी करून घ्याव्या असा येथला एकप्रकारचा संकेतच दिसतो.

त्या माझ्या सहकाऱ्याला दारवानाने विचारले, "तुम कौन हो?"

"क्यों संतरी ? तुम मुझे पहचानते नही ? मैं यहाँ एल्. डी. सी. हूँ ! "

'लोअर डिव्हीजन क्लर्कचा' एल् डी सी. हा संक्षेप त्या संतऱ्याला (पहारेकऱ्यास) कळला की नाही कुणास ठाऊक ! पण इंग्रजी शद्बांना तो दबला असावा. तो म्हणाला, " हाँ हाँ, समझ गया बाबूजी ! आप यहाँके कारजकर्ता हो ! "

त्या पहारेकऱ्याने मला अदबीने आत सोडले. त्यामुळे इतरांसह कारखाना पाहायला मिळाला नसता, तितका तो मला चांगला पाहता आला. आम्ही आत सायकलने फिरून संपूर्ण कारखाना पाहिला. आमच्यानंतर लगेच अर्धाएक तासाने बाकीचे लोक आत आले. या कारखान्यात प्रत्येक विभाग अलग असल्यामुळे आत कोणी कोणाची चौकशी करीत नाही.

द्रुगपासून ११ मैलांवर भिलाई स्टेशन आहे. पण कारखाना द्रुगपासून ७ मैलांवर आहे. भिलाईचा पोलाद-प्रकल्प म्हणजे भारताच्या प्रगतीचे एक अजस्र उदाहरण आहे. या कारखान्याच्या भव्य लोखंडी भट्टया (ब्लास्ट फर्नेस) व चिमण्या कितीतरी दुरून दिसतात. या कारखान्याचे प्रवेशद्वारच फार मोठे आहे

भिलाई कारखान्याचे क्षेत्र ७ चौरस मैलांचे आहे. या एवढया मोठ्या जागेत सुस्थितीत वसलेल्या कारखान्याची भव्यता पाहून कुणीहि थक्क झालाच पाहिजे ! सुरुवातीलाच भव्य इमारतींच्या मधून एक उतरती व चढती सडक जाते. तीवर एक पूल आहे. ते दृश्य मनोहर दिसते. 'हम हिंदुस्तानी' या बोलपटात येथील ते दृश्य घेतल्याचे कळले.

कारखान्यात प्रथम आम्ही ‘ कोक ओव्हन बॅटरी ’ बघितली. या बॅटरीला असलेल्या एका भट्टीचे तोंड उघडताच आत लालबुंद कोळसा (कोक) दिसला. हा कोक दगडी कोळसा जाळून तयार केला जातो. दगडी कोळसा उष्णतेच्या मदतीने कित्येक तास जाळत ठेवल्यावर धगधगता कोक तयार होतो. तयार कोक स्वयंचलित यंत्राने रेल्वेवॅगनमध्ये पडतो. डिझेल इंजिनच्या मदतीने सदर्हू वॅगन स्प्रेवॉटर-टॉवरखाली नेली जाते व तेथे तो कोक विझविला जातो. कोक विझवल्यावर ते उकळचा घेणारे पाणी टाक्यात जमते. वाफेवर परावर्तित होणाऱ्या पाण्याच्या जलबिंदूंचा जणू पाऊस पडतो !

अशा तऱ्हेच्या तीन कोक ओव्हन बॅटऱ्यांची योजना या कारखान्यात आहे. एका बॅटरीत ६५ भट्टचा आहेत. आकाशाशी स्पर्धा करणाऱ्या उच चिमण्या कारखान्यात आहेत. एका चिमणीची उंची ३२७ फूट आहे. ‘ आशियातील सर्वात मोठी व उची चिमणी ’ म्हणून तिचा उल्लेख होतो. ह्या चिमण्या म्हणजे प्रचंड इमारतीच आहेत.

वरील बॅटरी–भट्ट्यांमध्ये तयार झालेला कोक लोखंड तयार करण्याच्या भट्टीकडे जातो. त्याला ब्लास्ट फर्नेस असे म्हणतात. ह्याचा तळभाग पाहण्यासाठीच मुळी कितीतरी शिडचा चढून वर जावे लागते. धगधगती उष्णता पाहता येत नाही. पाहावयाचे झाल्यास डोळचांना विशिष्ट काच–छिद्रांची टोपी लावावी लागते. आजूबाजूची गरम हवा पिटाळली जाते. मोठमोठचा पंख्यांनी ती खेळविली जाते. या अवाढव्य फर्नेसचे नियंत्रण करणारे बाजूला एक विशिष्ट ‘घर’ आहे. राक्षसी पोलादी सांगाडचात उभारलेली ही फर्नेस सुमारे १५० फूट उंच आहे.

येथे कल्पनातीत भव्य अशा ट्रॉलीज आहेत. अति उंच जागी फर्निसच्या तोंडावर त्या विजेच्या जोरावर कोक, चुनखडी व लोखंड मिसळलेली माती यांचे मिश्रण तयार करून भरतात. त्या लोहयुक्त मातीचा उष्णतेने रस होतो. तो लाललाल रस भट्टीच्या खालच्या

तोंडातून दीर्घाकार टाक्यात ओतला जातो. तो रस त्या टाक्यातून वाहत जाऊन रेल्वेडब्यात पडतो. त्या डब्याचा आकार कढईसारखा असतो. असे डबे डिझेलइंजिनच्या मदतीने दुसरीकडे पाठवितात. अशा तऱ्हेने येथे जे लोखंड तयार होते, त्याला 'पिग आयर्न' म्हणतात.

येथल्या ट्रालीज एकाच वेळी एकीने खाली यावे व दुसरीने वेगाने वर जावे अशा रचनेच्या आहेत. त्या तीनतीन मजले जातात. खाली त्या भुयारापर्यंतहि जातात. बरेचसे काम स्वयंचलित यंत्रांनी होत असले तरी कित्येक श्रमिक श्रमतांना दिसतात. त्यांच्या अंगमेहनती-वर, त्यांच्या रक्तावर आणि घामावर, कारखान्याचे बव्हंश यश योजनांच्या फलांच्या रूपाने जगासमोर येत आहे.

ब्लास्ट फर्नेसची रोजची उत्पादनशक्ति १ हजार टनांची आहे. अशा तीन फर्नेसची योजना या प्रकल्पात आहे. मे १९५७ मध्ये या कामाच्या बांधणीला सुरुवात झाली व १९५९ मध्ये पिग आयर्न निर्माण होऊ लागले. केवळ दोन वर्षांतील हा वेग लक्षात घेतल्यास आश्चर्य वाटल्यावाचून राहत नाही.

लोहमिश्रित माती, चुनखडी, दगडीकोळसा इत्यादि कच्चा माल बाहेरून रेल्वेने कारखान्यात येतो. लोहयुक्त माती ५५ मैलांवरील 'राजहरा' खाणीतून येथे येते. १३५ मैलांवरील कोरबा केंद्रातून विजेचा पुरवठा होतो. या कारखान्यातहि २४ हजार किलोवॅट शक्तीचे विद्युत्केंद्र आहे. या कारखान्याला प्रतिवर्षी लागणारे २॥ कोटी घनमीटर पाणी ३५ मैलांवरील गोंडाली व तंदुला तलावामधून आणले जाते.

कारखान्यात जागजागी सचित्र सूचना लिहिलेल्या आहेत– "धोका–थांबा–पाहा–ऐका !" यामुळे अपघात टळतात. ठिकठिकाणी काही सुंदर वाक्येहि लिहिली आहेत. उदाहरणार्थ– "प्रकल्प तुमच्यासाठी व तुम्ही प्रकल्पासाठी !" "उद्योगाची उन्नति तुमच्यावर व तुमची उन्नति उद्योगावर !"

ब्लास्ट फर्नेसनंतर पोलाद तयार करणारा विभाग 'ओपन हार्थ फर्नेस ' या नावाने ओळखला जातो. अशा सहा फर्नेस आहेत. १२-१०-१९५९ पासून पोलादाच्या उत्पादनाला सुरुवात झाली. प्रतिदिन २५० टनांची उत्पादनक्षमता या प्रत्येक फर्नेसची आहे. चार फर्नेसमधून उत्पादन सुरू झाले आहे.

ओपन हार्थ फर्नेसमध्ये अनावश्यक धातू उष्णतेने अलग फेकली जाते व कार्बनचे प्रमाण कमी करून पोलाद तयार केले जाते. पोलादाचा रस प्रथम साच्यातून ओतून काढतात व सातसात टनांचे ठोकळे बनवितात. या ठोकळयांना 'इंगोटस' असे म्हणतात. मोठ्या शेडमध्ये रेल्वेच्या उघड्या वॅगनवरील साच्यात उष्ण पोलाद ओतून ते थंड होऊ देतात. वरच्या बाजूला फिरत्या क्रेनने साचे ढिले करून वर उचलतात व तयार झालेले इंगोटस् वॅगनवर उभे करतात. या सहाहि ओपन हार्थ फर्नेसचे वार्षिक उत्पादन १० लाख टनांचे राहील.

या कारखान्यात असलेल्या अर्धा मैल लांबीच्या रेल आणि स्ट्रक्चरल मीलचे उद्घाटन पं. जवाहरलाल नेहरू यांनी १९६० च्या ऑक्टोबरात केले. चार रोलींग मिल्सची योजना येथे आहे. यात ३६५०००० पोलादाचे रोलींग प्रतिवर्ष केले जाईल. गर्डर्स, मयालों रेल्वेचे रूळ वगैरे गोष्टी त्यात राहतील. येथूनच देशाविदेशात माल पाठविण्याची व्यवस्था आहे.

भिलाई कारखाना म्हणजे सरकारी योजनांचा प्रचंड आणि अवाढव्य असा एक उत्कृष्ट नमुना आहे. रशियाची मदत असली तरी भारताचा तो आहे. भारतासाठी सरकारी योजना काय करीत आहेत, याचे दर्शन अशा कार्यांमधून घ्यावे व सरकारला शिव्या देणारांनी या दर्शनाला मुकू नये. सरकारची तरफदारी करण्याचा प्रश्न नाही. पण असे काही पाहिले म्हणजे देशासाठी जे काही चागले होत आहे, त्याची पूर्ण कल्पना येते व भारताची पावले प्रगतीच्या दिशेने निश्चितच पडत

असल्याची खात्री पटते. भावी भारताचे चित्र खात्रीनेच आशादायी आहे, असे का म्हणू नये ?

भिलाई कारखाना पाहिल्यावर आम्ही तेथील कँटीनमध्ये गेलो. हे कँटीन फार मोठे असले तरी त्याचा उपयोग प्राय: तेथले कर्मचारीच करतात. तेथे स्वयंसेवेला महत्त्व आहे. म्हणजे असे की, हवा तो पदार्थ किंवा चहा–कॉफी काऊंटरवर जाऊन पैसे मोजावे व आपल्या टेबलावर आणावा !

या कँटीनपेक्षा भिलाईनगरातील भिलाई-हॉटेल बादशाही थाटाचे आहे. ३५ चौ. मैल वसलेल्या अत्याधुनिक भिलाईनगराच्या एका बाजूस रशियन अधिकाऱ्यांच्या खास सोयीसाठी या हॉटेलाची योजना केलेली दिसते ! रशियनांची एक शानदार बस कारखान्यात जा–ये करते. भिलाई-हॉटेलकडे जातांना काही रशियन मुले पक्षी पकडण्यासाठी काट्यागोट्यात हिंडताना दिसली. या भागात येऊन इकडे रुळणारी ही माणसे वा मुले पाहिली म्हणजे परदेशांच्या प्रगतीच्या कारणांची कल्पना येऊ शकते. ती माणसेहि उन्हातान्हात अविश्रान्त श्रमतांना बघितली.

भिलाई-हॉटेलचे दर फार मोठे असल्यामुळे ते आमच्या खिशाला परवडणारे नव्हते. म्हणून मी व श्री. वसंतराव काळे यांनी युक्ति केली. 'आम्ही पाहायला आलो' असे सांगून एकदाचे हॉटेलात शिरलो व वाटेल त्या भागात धडाल भटकलो. कोणी विचारलेच तर, "हमको मालूम नहीं था" असे बावळट उत्तर द्यायचे ठरवून टाकले होते. या आमच्या युक्तीमुळे आम्ही रशियनांचे जेवण, त्यांची खेळण्याची जागा व खालच्या मजल्यावरील त्यांच्या बायका, त्यांची मुले व राहण्याची घरे मोकळे-पणाने पाहून घेतली. फक्त दोघेच असल्यामुळे हे शक्य झाले. इतरांसह हे जमले नसते. या हॉटेलात वरच्या मजल्यावर मोटर जाऊ शकेल अशी सडक आहे. कारखान्याप्रमाणेच येथेहि बर्फाप्रमाणे थंड असे कुलरचे पाणी

प्यायला मिळाले. ५–५ मिनिटांनी पाणी येई. दोन रशियन बिलियर्ड खेळत होते. आम्ही तो खेळ पाहत व वरची हवा खात बराच वेळ बसलो. येथली घरे एकाच साच्याची, उभट व साधी वाटली.

भिलाईला एक सुंदर तलाव आहे. नवेनवे बगीचे तयार होत आहेत. रात्रीची रोषणाई पाहून या नगराच्या सौंदर्याची नीट कल्पना येते.

सायकलने द्रुगला आल्यावर श्री. बोपापूरकर यांच्या घरी गेलो. ते भिलाई–कारखान्यात मोठ्या हुद्यावर आहेत. ड्यूटी संपल्यामुळे ते घरीच होते. बायकामंडळींनी त्यांच्या घरी स्नाने उरकली. सरबताचा कार्यक्रम झाला. थोडी झोपहि झाली ! गाडीपेक्षा घर केव्हाहि सुखद वाटणारच !

द्रुगहून सायं.६वा.गाडी सुटली त्यावेळी एक गंमत झाली.भिलाईला एक बाई आजारी झाल्या. त्यांची व्यवस्था दवाखान्यात करावी म्हणून डॉ. पडोळे हे टेम्पोतून आमची गाडी सुटताच भिलाईकडे निघाले. मोटाररस्ता रेल्वेरस्त्याला समांतर असल्यामुळे योगायोगाने डॉक्टरांची गाडी आमच्या रेलगाडीबरोबर धावू लागली. सहज आनंदाने टेम्पोतील कुणीतरी 'शिवाजी–स्कार्फ' उडवायला सुरुवात केली. आगगाडीतील लोकांना वाटले, 'एखादा माणूस चुकून राहिलेला असावा व तो धडपडत आपली गाडी गाठण्यासाठी येत असावा, असे ज्यांना वाटले त्यांना डॉ. पडोळे मागे राहिले, याची कल्पना नव्हती. म्हणून त्यांनी गाडीची साखळी ओढली. गाडी थांबली. टेम्पो मात्र आल्या वाटेने निघून गेला. त्यामुळे गार्डाच्या शिव्या खाण्याची पाळी आली. गाडीला उशीर होण्यासाठी एक कारण मिळाले.

कुठेतरी (आणि केव्हातरी एवढ्यातच) कुम्हारी नामक स्टेशन लागले. तेव्हा विनोदाने मी म्हणालो, " या स्टेशनच्या नावात ' एच् ' जास्तीचा आला आहे. ते नाव कुमारी असे हवे होते."

आमचे एक सहकारी यावर म्हणाले, "तो 'एच' हजबंडबद्दल आला आहे !"

भिलाईनंतर रायपूरला गाडी बराच वेळ थांबली. मुळातच आम्हाला मिळालेली गाडी रद्दी होती. अनेक तक्रारी तिच्याबाबतीत प्रत्यहि उपटत ! तसेच 'सेंट्रल'च्या या गाडीची व्यवस्था करण्यास रायपूरच्या झोनचे लोक नाखूष दिसले. खरे म्हणजे आता संपूर्ण भारताच्या रेल्वेचे केंद्रीकरण झाल्यामुळे असा भेद करावयास नको. तरीपण, जुन्या इग्रजी राज्याचे संस्कार सुटता सुटत नाहीत, हाच याचा अर्थ ! व्यवस्थेचा आव आणतील, करणार काहीच नाहीत ! येथल्या बाथरूम्स् मोकळ्या करून घेण्यासाठी बरीच कुरकूर ऐकावी लागली.

त्या रात्री आमची गाडी उशीर करीत करीत निघाली व विजगापट्टणच्या वाटेला लागली.

‡‡‡‡‡+—

दिनांक १२ मे ला सकाळी ६ वाजता आमची गाडी विशाखापट्टणला पोहचायला हवी होती. पण साराच कार्यक्रम लांबत गेला. १२ मेच्या सकाळी उजाडले ते स्टेशन होते डोईकालू ! तेथे १०–१५ मिनिटे गाडी थांबली तेव्हा मुलांनी तिथल्या लोकांना अनेक प्रश्न केले. पण भाषेची अडचण जाणवू लागली. मराठी तर दुर्गपूर्वीच कमी झाली होती. आता हिंदी सुटून तेलगूचे आगमन होऊ लागले. त्या स्टेशनाजवळील पहाडाचे नाव विचारले असता एका स्थानिक मुलाने उत्तर दिले, "पहाडका नाम पहाड !" लहान मुलाला आईचे नाव विचारले तर ते जसे 'आई' सांगते, तसलाच हा प्रकार होता.

सकाळी ७ वा. रायवडा स्टेशन आले. तेलगू संस्कृतीच्या दर्शनात भर पडू लागली. तेथील इडली व चहाच संपून गेला.

तसे पाहिले तर प्रत्येक स्टेशनवर आमची वानरसेना उतरली की खाद्य-पदार्थांचा अगदी फडशा उडायचा व त्यामुळे वस्तुंचे भाव वाढत जायचे ! एका स्टेशनावर तर चपलाचे भाव एका डब्याशी १॥ रुपया, दुसऱ्या डब्याची २ रुपये व तिसऱ्या डब्याशी ३ रुपये असे सांगण्यात आले. आमच्यापैकी काही जणांनी मद्रासी लुंग्या नेसून मद्रासी होण्याचा प्रयत्न केला. पण भाषा तेवढी जमेना. तरीपण भाषेवाचून व्यवहारहि अडत ना ! हिंदीचा अंदाजी वापर कामे निभावून नेई. वरच्या थरात इंग्रजीने कामे निभत.

सकाळी ९ वा. सीतानगरम् स्टेशनावर गाडीने पुन्हा विश्रांती घेतली. तेथे फलाटावर श्री. ए. पी. ताले यांनी तिकडील भिकाऱ्यांना तेलगू गाणी म्हणावयास लावली. श्री. ताले त्या लोकांशी तेलगूत बोलले. ते गुंटूर येथे पूर्वी काही दिवस राहिले होते. त्यामुळे त्यांना तसा सराव दिसला. तालेंनी आम्हालाहि काही जुजबी शद्ब शिकविले. त्यामुळे व्यवहार सोपे होण्यास मदत झाली. श्री. अनंत ताले यांनी इकडील भाग पाहण्यासाठीहि मदत केली कारण त्यांनी आधी बराच भाग पाहिलेला होता. कार्यालयाची टायपींगची कामे श्री. ताले यांनी बरेचदा करून दिली.

याच स्थानकावर आपल्या तुटक्या चपलांचे अभिनव प्रदर्शन करून फलाटावरील कार्यक्रमात श्री. राठी यांनी रंग भरला. चार तऱ्हेच्या चपलांचे चार रंगीबेरंगी पट्टे अडकवून श्री. राठी यांनी आपली चप्पल तयार केली होती. राठी अशा विनोदात फार पुढे होते. ते चालत्या गाडीत अनेक डब्यात शिरून निरनिराळ्या प्राण्यांचे हुबेहूब आवाज काढीत व हसण्या–रडण्याच्या अक्षरशः नकला करीत. त्यामुळे प्रवाशी पोट धरूधरून हसत. मनोरंजन होई व वेळ चांगला जाई. ते निरनिराळे कारखाने पाहणे व इतरांना दाखविणे यात अग्रेसर होते.

या विभागात दारिद्र्याचे दर्शन घडू लागले. धड लंगोटीहि

अंगावर न घातलेले भिकारी व महारोगी असंख्य आढळले.एकदम वरचा व एकदम खालचा असे दोनच वर्ग इकडच्या समाजात असावेत असा अंदाज अनुभवावरून दिसला. चोळयाशिवाय बऱ्याच बायका इकडे सर्रास आढळतात. आपल्याकडील गोंड–कोलाम इ. आदिवासी बायकाहि चोळया वापरीत नाहीत. गाडीच्या अवतीभवती भीक मागणारांचा फार त्रास होता. येथून सुरू झालेला हा त्रास पुढे फारच वाढला व तो बंगलोर-म्हैसूरपर्यंत कमी झालाच नाही.

सीतानगरमला एक नवीन गोल पदार्थ विकायला आला. त्याचे नाव विकणाराला विचारले तर तो भाषा समजेना म्हणून सांगू शकत नव्हता. शेवटी एक आण्याचे दोन नग घेऊन आलो, तेव्हा ते ताडगोळे असल्याचा खुलासा झाला. नंतर हे ताडगोळे काहींनी आवडीने खाल्ले. काहींना ते आवडलेच नाहीत. ताडगोळयांची साल काढून ते खावे लागतात हे मला माहीत नव्हते. विशेष हे की, पंधराच मिनिटात स्टेशनवरचे ताडगोळे विकून संपलेत !

आज पहाटेला पाऊस बराच पडला.पावसाळयाची सुरुवात झाल्या-सारखी वाटली नदीनाले पांढुरक्या पाण्याने भरलेले आढळले. उकाडा कमी झाला. पाटाच्या पाण्यावर काढलेला पिके दिसू लागली. धान व बोरूची उपज बरी होत असावी. बैल धष्टपुष्ट असे दिसले. हिरवे गवत वैपुल्याने आढळले. इकडील बैलबंडीच्या चाकांचा घेर फार मोठा असतो. ताडांच्या पानांनी विणलेल्या टोपल्या बऱ्याच आढळल्या. कित्येक जागी त्या फेकून दिलेल्या दिसल्या. एका मिनिटात तयार होऊ शकणारी एक टोपलीवजा पर्स एका खेड्यात आढळली. खेड्यापाड्यातील घरे अगदी झोपडीवजा असून ताडमाड यांच्या शाखा व बुंधे यांनी ती तयार केलेली होती.

दि. १२ मे च्या सकाळी आम्ही विजगापट्टणला पोहचणार होतो. पण पोहचणे राहिले बाजूला आणि आम्हाला तत्पूर्वीच्या उत्तरसिंहा–

चलम स्थानकावरच तो संपूर्ण दिवस घालवावा लागला. तेथे आमची गाडी २।। वाजता आली. तेथे दुसरी एक गाडी फलाटाच्या दुसऱ्या कडेला उभी होती. आकोला, अमरावती, बुलडाणा, नागपूर अशी मराठीतील नावे वाचून आमच्यापैकी कुणीतरी म्हणाले, "अरे, ही तर मराठी नावे ! वऱ्हाडच्या जिल्ह्यांची नावे लिहिली आहेत."

श्री तुकडोजीमहाराजांची भारत–दर्शनयात्रा ती हीच, हा माझा अंदाज एकाच मिनिटात खरा झाला. या सहलीत श्रीशिवाजी सहल व श्रीमहाराजांची रेलयात्रा एकत्र येण्याचा योग नसल्याबद्दल व्यवस्थापकांनी दोन दिवसापूर्वी खंत प्रगट केली होती. पण येथे तर योगायोगाने वऱ्हाडातील जवळजवळच्या दोन सहली एकत्र मिळाल्या ! आमचे सारे लोक एकदम धडपडत धावले व महाराजांच्या यात्रा–गाडीतील लोकांना भेटले ! महाराष्ट्रापासून दूरच्या प्रदेशात ओळखीच्या शेकडो लोकांची ही भेट प्रत्येकाच्या अंतःकरणाला भरते आणणारी ठरली ! एकमेकांचे कुशल विचारले जाऊ लागले. एकप्रकारचे प्रसन्न असे वातावरण तेथे पसरले.

मी महाराजांच्या डब्यात धावतच शिरलो. महाराजांशी धावते बोलणे झाले. त्यांनी आमची आस्थेने चौकशी केली. मी श्रीसंत दामोदरदास महाराज व योगीराज स्वामी श्रीसीतारामदास महाराज याना भेटून त्यांचे दर्शन घेतले. यावेळी श्री. वसंतराव वनाळकर, श्री. श्याम लोहबरे, श्री. दिगंबरराव हिरपूरकर, श्री. जी. डी. निकम, श्रीमती पुरीबाई, श्री. सेठ मदनगोपालजी भैय्या, श्री. लोहकरे इत्यादि लोकांच्या भेटीगाठी घेतल्या.

डॉ. पडोळे व श्रीमहाराज परस्परांना भेटले. महाराजांचे छोटेसे भाषण झाले. ते म्हणाले, " इकडील सृष्टिसौंदर्य पाहण्यासारखे आहे. वऱ्हाड–महाराष्ट्र पुढारलेला आहे. या काही भागातील लोक फारच गचाळ आहेत. ह्या निरीक्षणातून त्यामागची व येथल्या दारिद्ऱ्याची

कारणे शोधता येतील. प्रवासात येणाऱ्या अडचणींना मागे सारून ज्ञानात्मक वृत्ति ठेवावी. तुमचे विद्यार्थी शिकलेले आहेत. पण आमच्या गाडीत शेतकरी–गावकरी आहेत. काहींनी आयुष्यात आगगाडीचा केलेला हाच पहिला प्रवास आहे."

महाराजानी आमचा प्रवास सुखाचा होवो अशी सदिच्छा व्यक्त केल्यानंतर आमचे संघटक डॉ. पडोळे यांनी भाषण दिले. ते म्हणाले, " ह्या दोन्ही गाड्यांची भेट म्हणजे दोन विधायक व पूरक अशा समाजकार्यांचा सुरेख संगम होय. महाराष्ट्राला व विदर्भाला भूषणभूत व्हाव्यात अशाच ह्या सहली आहेत. श्रीमहाराजांचा आशीर्वाद आपल्या पाठीशी असल्यामुळे आपली सफर सुखाची होईल !"

नतर आमच्या गाडीचे इंजिन श्रीमहाराजांच्या गाडीला लागले. त्यांची गाडी इंजिनाच्या अभावी पडली होती. जेव्हा त्यांची गाडी पुढे निघाली तेव्हा 'श्रीसंत तुकडोजी महाराजकी जय' 'श्रीशिवाजी महाराजकी जय' अशा घोषणा करण्यात आल्या. श्रीमहाराजांच्या प्रयत्नामुळे सिंहाचलम स्टेशनावर पाण्याची सोय झाली.

येथे आमची गाडी किती वेळ थांबेल याचा अंदाज नव्हता. आजूबाजूला ताडाची व आंब्याची झाडे पाहून बरेच जण तिकडे विश्रांतीला गेले. सावली गार असली तरी जमीन मात्र गरम होती. नळाचे पिण्याचे पाणीहि बंबातील पाण्यासारखे गरम होते. त्यामुळे तहान भागेना व पाणी थंड होता होईना.

आमचे काही लोक विजगापट्टणचे उपस्थानक वाल्टेअर येथे आधीच व्यवस्थेला गेले होते. वाल्टेअरला गाडी थांबायला जागाच नव्हती म्हणे ! त्यामुळे विशाखापट्टण, तेथील जहाजांचा कारखाना व किल्ला पाहण्याचा बेत रहित झाला आणि सरळच मद्रासला जायचे ठरले.

सायंकाळी शेजारच्या टेकडीवरील नारसिंहाचे देऊळ पाहण्याचा

आमचा विचार रद्द झाला. रात्र व १॥–१॥ तास जाणेयेणे यामुळे आमचा हिय्या झाला नाही. आम्ही फक्त आजूबाजूच्या टेकड्यांकडे फिरायला गेलो.

सहलीतील एक शिक्षक काही मुलांसह नारसिंहाच्या टेकडीवर गेलेच ! ते दक्षिण टेकडीकडे प्रथम गेल्यामुळे बावचळले. मग उत्तर सिंहाचलमला ते गेले. १.१५० पायऱ्यांचा तो भाग चढून उतरतांना अंधार झाला. रस्ता गवसेना व टॉर्चचा उपयोग होईना. अखेर ही मंडळी एका झोपडीजवळ आली. तेथे भाषेची अडचण उभी राहिली. एका माणसाला त्यांनी स्टेशनाकडे हात दाखवून 'रेलबंडी' असे म्हटले. तेव्हा त्याने या लोकांना स्टेशनावर आणून सोडले. आमच्यातील काही लोकांनी इकडील व्यवहारी शब्द लक्षात घेतल्यामुळे हे शक्य झाले. इकडे कोणत्याहि वाहनाला 'बंडी' असे म्हणतात.

सायंकाळी ७ वाजता आम्ही दोघेतिघेजण एका बाईच्या घरी गेलो. खुणाखुणांनी थंड पाणी मागितले. काही मुलींनी खुणाखाणांनी आपल्या स्नानाची व्यवस्था करून घेतली. बरीचशी मंडळी सिंहाचलमच्या बाजाराला जाऊन आली. हे गाव समुद्रसपाटीपासून ६३ फूट उंच आहे.

रात्री ८ वाजता जेवण झाले. दुपारी पोहे वाटले होते. आता खिचडी केली होती. प्लॅटफॉर्मवरच स्वयंपाक केला होता.

जेवणानंतर निघालेली आमची रेलबंडी अगदी बंडीसारखीच हळूहळू चालत होती. वाल्टेअरला ती पुन्हा स्टेशनात १–१॥ तास थांबली. तेथून निघतांना विशाखापट्टण शहरातील व बंदरावरील दिवे सुंदर दिसत होते. यानंतर गाडी सरळच मद्रासला जायची होती. पण आमच्या जाण्यात जणू सरळपणा नव्हताच ! ती मध्येमध्ये विश्रांती घेत घेत रात्रभर चालत राहिली !

++++++—

दिनांक १३ रोजी गाडी राजमहेंद्रीला सकाळी आली. जाग आला. चहापानादि कार्यक्रम झाले. गाडी पाणी प्याली. तेथे दुरुस्तीच्या नावावर आमच्या डब्यातील टाकीच 'स-छिद्र' करण्यात आली. त्यामुळे टाकीत पाणीच राहिना. ती टाकी नंतर दुरुस्त करण्याचा उत्साहहि रेल्वेकर्मचाऱ्यांनी दाखविला नाही.

या गावात केळीच्या घडांची व काजूची खैरात दिसली. समुद्री वातावरणाची जाणीव होऊ लागली. गाडी सुटतांना दोन मुले आरामात राहिली. त्यामुळे त्या दोन मुलांना मागाहून यावे लागले. गाडीने वेग घेतल्याशिवाय गाडीत चढायचे नाही व चालत्या गाडीत चढायचे, अशी खोड बऱ्याच जणांना असते. त्यातलेच आमचे गडी ! अशी शिक्षा त्याना मिळाल्यास नवल नाही. राजमहेंद्री सोडतांना गोदावरीचे दर्शन झाले. गोदावरीचा फार मोठा विस्तार येथे आहे.

नंतर वेलोर(?)ला गाडी ४॥ तास पडून राहिली सकाळी १०.ला आम्ही तेथे आलो. स्टेशनमास्तर वेळाची माहिती देईना. पॅसेंजरगाड्याहि जेथे ३-३ तास लेट होतांना पाहत होतो, तेथे आमच्या गाडीची कोण पर्वा करतो ? समुद्रसपाटीवर १३ फूट उंच असलेल्या या गावानतर वाटर्लूला पुन्हा ही गाडी थांबली व काही वेळ आराम करून ३। वाजता महाराणीसारखी पुढे सरकली.

आजच्या दिवशी आमच्या डब्यात चार गोड मुले नेहमीसाठी आली त्यांना दुसऱ्या डब्यात कुणीच बरे पाहत ना. पण आमच्या डब्यात ही मुले फार छान राहिली. त्या दिवशी रात्री यांच्यापैकी एकजण वरच्या बर्थवर झोपला होता. तो मुलगा अर्ध्या रात्री बिछान्यासह खाली आदळला. खालच्या लोकांनी त्या मुलाला बिछान्यासह अलगद वर

उचलून ठेवले. तरी त्या मुलाची झोप उवडली नाही. प्रवासाचा त्रास सर्वांनाच होतो. थकून सुस्त झालेल्या त्या मुलांना तरी दोष कसा देता येईल ?

विजयवाडा ( वेजवाडा ) स्टेशन सायंकाळी आले. त्यापूर्वी बेजवाड्यालगतच एक आदर्श खेडे दिसले. त्याचे नाव मत्यालीपुरम् ! सर्व झोपड्या व रस्ते सरळ एका रेषेत आहेत. सर्वच झोपड्या आहेत. एकहि घर चुनासिमेंटचे नाही. आदर्शग्रामनिर्माणयोजनेत अशा ग्रामांचा अभ्यास व्हावा व इतरांनी त्याचे आदर्श ठेवावेत असे हे स्थळ वाटले. हे गाव आत जाऊन पाहता आले नाही, म्हणून वाईट वाटले.

बेजवाडा स्टेशनावर रेल्वे–कर्मचाऱ्यांकडून आम्हाला चांगली वागणूक मिळाली. वीज व पाणी यांची नीट व्यवस्था करण्यात आली. अर्धा तास गाडी थांबली. तेवढ्या वेळात बहुतेकांनी फराळपाणी आटोपले. येथे वाळ्याचे पंखे बरेच होते. स्वस्त म्हणून अनेकांनी विकत घेतले. येथे नागेलीचे लांबोळे तयार विडे ठेल्यांवर मिळ लागले. ते गोडगोड लागत. काथ त्यात नसायचा ! येथे बऱ्याच जणांनी स्वयंचलित यंत्रावर वजन केले. मी दोन पौंड वजन गमावले. ( ट्रीप संपल्यावर तो आकडा सातावर गेला ! )

मद्रासपासून २६८ मैल असलेले हे वेजवाडा गाव कृष्णेकाठी असून कृष्णेचा पूल येथे पाहण्यासारखा आहे. लाकडी खेळणी व सिमेंटसाठी हे गाव प्रसिद्ध आहे.

वेजवाड्याहून गाडी सुटली तेव्हा आमचे विद्यार्थी तेथील लांबलचक फलाटावर विखुरले होते. त्यामुळे त्यांनी हात दाखविताच गाडी थांबविली गेली व सर्वांना आत घेतले गेले. येथून गाडीला चांगले इंजिन लागले की काय कोण जाणे, गाडीचा वेग मात्र वाढलेला दिसला. रात्री ११॥ वा. बिट्रगुंटा स्टेशनवर पुन्हा गाडीत पाणी भरले गेले. गाडी उशीरा जाऊ नये याची काळजी हे दक्षिणरेल्वेचे लोक विशेष

घेतांना दिसले. वाल्टेअरपूर्वी गाडीवावत जे वाईट अनुभव आले ते दक्षिण–पूर्वरेल्वेच्या अधिकाऱ्यांच्या बेफिकीर वृत्तीमुळे आले असे आमच्यापैकी बहुतेकांचे मत झाले. आताच्या या भागातील दक्षिण रेल्वेचा एक कर्मचारी म्हणाला, "स्पेशल गाडीचा मान तत्त्वतः मेलपेक्षाहि अधिक आहे !"

++++ ++‐—

१४ मे ६१ हा दिवस गुडूर स्टेशनवर उगवला. मेदूवड्याची चव वऱ्हाडी उडदवड्यासारखी वाटली. इकडे दोशात खातो तशी चटणी तर दक्षिणेत सर्वच हॉटेलांमधून वैपुल्याने असायची ! आता पिण्याच्या पाण्याची नीट सोय होऊ लागली. झावल्यांची झाडे फार दिसू लागली. यानंतर दक्षिणेत झावल्याच्या झाडांची खास पैदासहि करण्यात येत असावी असे दिसले. कारण राखीव शेतांमध्ये ही झाडे ओळीत लावली असल्याचे अनेक जागी प्रत्ययाला आले. वेळवाएवढी उंची व जाडी असलेली कंच हिरव्या भाराची ही झाडे काही जागी मात्र अद्वातद्वा वाढलेली होती. माडांपेक्षा ताडांची संख्या इकडे जास्त दिसली; तर पुढेपुढे माडांचीच संख्या अधिक होत जाऊन ताडांना गौणत्व आले. कोकणापेक्षा इकडे धानपट्ट्या अधिक आहेत. मधूनमधून समुद्राच्या जवळून गाडी जात होती. लोक फक्त एक फडकी कमरेला लावतात. हे लोक दरिद्री की सवयीचे शिकार ते ठरविणे कठीण ! कदाचित् हवामानाचाहि परिणाम असावा. कालव्यांमुळे रेताड पिकाऊ जमिनीचा परिसर सर्वत्र आढळला.

आमची गाडी मद्रासच्या रायापुरम् स्टेशनावर दि. १४ च्या पहाटे ४ वाजता येऊन पोहचायला हवी होती. पण ती ५ तास लेट झाली संत तुकडोजी महाराजांचीहि गाडी येथे अशीच पडलेली होती.

रायापुरम् स्टेशन खास प्रवाशांसाठी असावे असे तेथील पाट्यां-वरून दिसले. दक्षिणेत प्रवासी फार येतात व त्यांच्यासाठी सोयीहि चांगल्या करण्याचा प्रयत्न होतो. प्लॅटफॉर्मवर श्रीतुकडोजी महाराजांची गाडी थांवल्यामुळे आमची गाडी मागील बाजूला वाकडी अशी लागली. ती त्या जागेवर थांबणेच आमच्या दृष्टीने इष्ट ठरले. गाडीच्या डब्यांमध्ये पाणी भरण्यासाठी जे नळ बाजूला बसविले होते, त्यांचा उपयोग कपडे धुणे व आंघोळी करणे यासाठी सर्रास करता आला. तेथे आम्ही आपले कपडे धुतले व आंघोळी केल्या. उघडया नळांचे पाणी हात दाबून वर उडवले की पिचकारीसारखा अंग भिजवण्यासाठीहि त्याचा उपयोग व्हायचा आणि बादली पण भरली जायची !

१० वा. आम्ही स्टेशनच्या बाहेर पडलो. कोठे जायचे हे कुणाचेच नक्की नसल्यामुळे काहीजण भलत्याच बसमध्ये शिरले. 'हे की ते' याचा निर्णय आमचे लोक घेईनात म्हणून अलग जायचे आम्ही दोघांनी ठरविले. वास्तविक मद्रास-किनारा उत्कृष्ट असल्यामुळे तेथे आमच्या लोकांना न्यावे असा माझा पहिला इरादा होता. पण तो कुणी न ऐकल्या-मुळे व अशा वेळी भलताच उत्साह प्रत्येकाला येत असल्यामुळे (शिवाय अशा वेळी प्रत्येकाला आपलेच खरे वाटत असते.) आमच्यापैकी सर्वजण ज्या बसमध्ये चढले ती बस मी व बाबा यांनी मुद्दाम चुकवली.

आम्ही पायदळ निघालो. मद्रास बंदराकाठून एकाकी सडक जाते. तिने बऱ्याच दूरवर गेलो. 'समुद्र-यात्रा' भरते त्या मैदानात आलो. हे मैदान म्हणजे सागरी वाळूचे लांबच लांब पटांगण असून तेथे निर-निराळी झाडे लावलेली आहेत.

येथूनच सुरुवात होते मरीना-बीचची ! नेपियर-ब्रिज अथवा मरीना-पूल ओलांडला की, नितान्तरमणीय मरीना-सागर-किनारा सुरू होता. जगातील दुसऱ्या क्रमांकाचा हा 'ब्रीज' आहे. येथून कॅथेड्रल-चर्चपर्यंत हा किनारा पसरला आहे. मद्रासचेच नव्हे तर

भारताचेहि भूषण ठरावे असे हे रमणीय स्थान आहे. दक्षिणेस वसलेले 'कॅथेड्रल' फार जुने आहे. मरीनाबीच एका लांबलचक बागेने सजविला असून किनाऱ्याशी समांतर जाणाऱ्या सडकेलगतच ही बाग आहे. निरनिराळ्या झाडांच्या सावलीत दुपारी उन्हाच्या वेळी बरेच लोक विसावतात. या किनाऱ्यावर महानगरपालिकेने मुलांसाठी एक क्रीडांगण तयार केले असून एका सुंदरशा पोहण्याच्या खंदकाचीहि योजना आहे. हा स्वीमिंग पूल सुमारे अर्धा फर्लांग लांब असून त्याच्या बाजूला ८ शेडस् व एक उडी टाकण्याची जागा आहे. सर्व आधुनिक सोयी या पोहण्याच्या जागी आहेत. सर्व ऋतूत अनेक लोक येथे पोहायला येतात. या लोकप्रिय पुष्करिणीत सुमारे ४०० लोक एकाचवेळी पोहताना आम्ही पाहिले. पोहणे व पाहणे यासाठी तिकिटे लागतात.

दक्षिणेकडल्या किनाऱ्यावर सायंकाळी असंख्य लोक अक्षरशः 'चौपाटी' फुलवतात. पाण्याच्या प्रसन्न लाटा व स्वच्छ निळे पाणी हे येथले वैशिष्टच आहे. एके ठिकाणी कोळयांचे भले मोठे व लांबलचक जाळे पसरलेले पाहिले. वाळूतून चपला घालून नीट चालता येईना म्हणून हातात चपला घेऊनच बराच वेळ चाललो. येथे सूर्यास्ताचे सुंदर दृश्य पाहत काही वेळ घालवावासा वाटतो.

कॅथेड्रलपासून उत्तरेकडे जाणाऱ्या किनारा–मार्गावर अनेक सुंदर इमारती आहेत. नभोवाणी व पोलीसखाते यांची कार्यालये अगदी प्रथमच आहेत. संध्याकाळी ही सडक अक्षरशः उभ्या मोटारींच्या कितीतरी लांब अशा रांगांनी भरलेली असते.

'चौपाटी'वर काहीजण पतंग खेळत होते. हे पतंग आकाशदिव्या-सारखे दिसत होते. त्यांचा आकार अगदीच वेगळा, काहीसा विमाना-सारखा होता.

महात्मा गांधींचा एक उंच पुतळा बीचगार्डनमध्ये आहे. एका चौकात चार माणसांनी एका विशाल शिलाखंडाला उलवण्याचा प्रयत्न

चालविलेल्या दृश्याचे शिल्पांकन अत्यंत आकर्षक आहे. कलाकाराने त्या चारहि व्यक्तींच्या स्नायूंना अगदी सूक्ष्म तऱ्हेने रेखाटित केल्यामुळे या पुतळ्याच्या भव्य आकर्षकतेत भर पडली आहे. पुतळ्यांजवळील कारंजी थुईथुई नाचत असतात.

पोहण्याच्या टँकच्या समोर विद्यापीठ–परीक्षाभवन, लेडी टीचर्स ट्रेनिंग कॉलेज आणि क्वीन मेरी कॉलेज यांच्या इमारती आहेत. 'चार माणसांच्या पुतळ्या'समोरच सीनेटहाऊस आहे. या सीनेटहाऊसमधल्या प्रांगणात पहिले भारतीय विद्यापीठकुलपति सर एस्. सुब्रह्मण्यम् अय्यर ( १·१०·१८४२–६·१२·१९२४ ) यांचा पुतळा असून एका बाजूला मद्रास एक्झीक्युटीव्ह कौंसिलचे मेंबर श्री व्ही. कृष्णस्वामी अय्यर ( १८६३–१९११ ) यांचा पुतळा आहे. दुसऱ्या बाजूला महाराष्ट्राचे प्रख्यात पुढारी व गांधींचे गुरु नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचा पुतळा असून मद्रासेतील त्यांच्या २५·७·१९०४ च्या भाषणातील एक बोधक उतारा पुतळ्याखाली कोरला आहे.

सिनेटहाऊसला लागूनच मद्रास युनिव्हर्सिटी व युनिव्हर्सिटी–लायब्ररी आहे. इमारतीवरील टॉवरला एक मोठे घड्याळ बसविलेले आहे. तशी तर इकडच्या बऱ्याच इमारतींची रचनाच मुळी घड्याळांच्या टॉवराची आहे. लोककर्मखात्याची इमारत तेथेच असून ती छान आहे.

नेपियर–ब्रिजच्या उत्तरेस सेंट जॉर्ज किल्ला आहे. ह्या जागेजवळ शहीदांचे भव्य स्मारक आहे. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धात मद्रास प्रांतातून शहीद झालेल्यांची ती स्मृति आहे. येथे पाचव्या जॉर्जचा पुतळा आहे.

सेंट जॉर्ज किल्ल्याच्या आत नेव्ही–ऑफीस आहे. बाजूस खंदक आहे. परकोटामुळे बोटीचा आकार या ऑफीससमोर तयार झाला आहे. त्या 'बोटी'वर 'नेव्ही'चा भव्य ध्वज आहे.

नेव्ही–ऑफीसच्या शेजारी राजाजी–हॉल आहे. राजाजी–हॉल

म्हणजे मद्रास–असेम्ब्ली ! ही पाहतांना चपराशाच्या 'चालबाजी'चे स्वरूप लक्षात आले. त्या दिवशी रविवार होता. असेम्ब्ली–हाऊस बंद होते. मुख्य दरवाजाच्या आत शिरताच आवारामध्ये आम्हाला एक चपराशी सामोरा आला व म्हणाला, "साब, उपर राजाजी हाल हय, उसको देको !" आम्हाला पाणी पाजण्यासाठी एक चपराशी समोर–समोर करीत होता.

आम्ही हॉलजवळ गेलो तेव्हा किल्ल्या लावून चपराशी दार उघडू लागला. मी त्याला म्हटले, " हे सरकारी आहे ना ?"

" होय. "

" रविवारी बंद असते ना ?"

" होय. "

" मग आज बंद का नाही ? पाहाणारांसाठी उघडे ठेवतात का ? "

" नाही. "

" मग आता तू कसा उघडतोस ? "

" साब, आपके लिये. सिर्फ आठबारा आने दो. "

" आमच्याकडून तुला काही मिळायचे नाही. "

" मग फुकटात पाहायला मिळणार नाही. "

त्याने दार उघडले नाही. एकंदरीत देवळातील पंड्याप्रमाणे सरकारी दर्शनीय इमारतींचाहि हे लोक व्यापार करतात तर ! या वृत्तीचा आढळ सरकारी कर्मचाऱ्यांतहि व्हावा हे देशाचे, राज्याचे, सरकारचे आणि जनतेचे फार मोठे दुर्दैव म्हटले पाहिजे.

राजाजी–हॉलच्या लगतच ( सेंट जॉर्ज फोर्टच्या आत ) फोर्ट म्युझियम आहे. ईस्ट इंडिया कंपनीचा इतिहास या म्युझियममधील वस्तूंवरून लक्षात येतो. येथे तत्कालीन शस्त्रांचा संग्रह आहे. लॉर्ड क्लाईव्हचा एक भव्य पुतळा आत पडला आहे. अर्काटच्या नबाबाकडील

३१६७०
२०६ २८-१०-६७

टोप, तस्ते, बशा इत्यादि वस्तु, त्यावेळची पदके व कागदपत्रे यांचा संग्रहहि या म्युझियममध्ये आहे. एकएक फूट लांबीरुंदीची जुनी कुलुपेहि येथे ठेवलेली दिसली. म्युझियमच्या वरच्या मजल्यावर इंग्लंडचे राजे व ई. इं. कंपनीचे प्रमुख यांची छायाचित्रे लावली आहेत. 'लाँग हॉल' हे त्या दिवाणखान्याचे नाव आहे. म्युझियमसमोर जुन्या तोफा ठेवलेल्या आहेत.

रिझर्व्ह–बँकेची भव्य इमारत याच रस्त्यावर आहे. ती नागपूर-च्या रि. बँ. च्या इमारतीसारखीच असून थोडी लहान आहे. हायकोर्ट व दीपगृह ही या नॉर्थमरीना रस्त्यावरची खास आकर्षणे आहेत. दीप-गृहांची आवड इकडे फार आहे. ठिकठिकाणी दीपगृहे आढळतात. मद्रासचे हे दीपगृह कमालीचे उंच असून तेथे लोक वर जातात व शहराचे दृश्य बघतात.

जवळच पॅरी-कॉर्नर आहे. तेथे निरनिराळ्या बँकांच्या इमारती, जनरल पोस्ट–ऑफीस व दारे–हाऊस आहे. पोस्टात अत्याधुनिक सोयी आहेत. नागपुरातहि असे व्यवस्थित डाकघर मी पाहिले नाही. अनेक विभाग या पोस्टात असून लोकांना लिहिण्यासाठी मोठमोठे मेज मधोमध ठेवले आहेत.

ह्या इमारती पाहत असतांना सीनेट–हाऊसजवळ आम्हाला पन्नाशीच्या घरातील एक माणूस भेटला. त्याला आम्ही विचारले, " ही बाजूची इमारत युनिव्हर्सिटीचीच का ?"

तो मिश्कीलपणे हसला. म्हणाला, " इमारती काय बघता ? इथले जीवन बघा–अनुभवा." आम्ही महाराष्ट्राचे आहोत, असे कळले तेव्हा तो म्हणाला, "शिवाजीने गोब्राह्मणांचे प्रतिपालन केले. आजच्या राज्यात दोन्हींची दुर्दशा आहे. आमच्या ब्राह्मणजातीला आज अस्तित्व नसून रिक्षेवाल्या शूद्रांचे राज्य आले आहे. आमच्या दुर्दशेला पारावार नाही आणि त्याला कारण म्हणजे गांधीजींचा खून हे आहे !"

त्या म्हाताऱ्याने आपली ही खंत प्रगट केली. व्याख्यान लांबत गेले. तेव्हा त्याला मी म्हटले, "आपले नाव काय ?"

"नावाशी तुम्हाला काय करावयाचे आहे ? तुम्ही माझा 'संदेश' (!) न्या. ब्राह्मणांचे हाल जगाला सांगा. निष्ठावंत, कर्मठ व निस्पृह चाणक्याच्या ब्राह्मणवंशातला मी आहे."

त्या 'नि:स्पृहा'ची ती 'उलटी खंत' पोटभरूपणातली होती हे लक्षात आले. 'मला मराठी येते' असे तो म्हणाला. पण त्याला ती येत नव्हती. त्याचे नातेवाईक यवतमाळ जिल्ह्यात आरणी गावाकडे असल्याचे त्याने सांगितले.

स्वीमींगपूलजवळ आम्ही एकएक पैशाच्या आंब्याच्या फोडी, सेंगदाणे व वाटाण्याचे फुटाणे घेऊन खाल्ले. नंतर पाणी पिण्याची सोय म्हणून सरबत घेतले. एकदा घेतलेले सरबत लिंबाचे व साखरेच्या पाण्याचे होते, तर दुसऱ्यांदा त्यात बर्फ टाकलेला होता. अशा सरबतवाल्यांचे ठेले जागजागी आढळले. हे ठेले बहुतेक मुसलमान लोक चालवितात. गनी, मुर्तझाखान अशी त्यांची नावे आहेत. त्यांना घरची उर्दू भाषाहि नीट येत नव्हती. इतरांपेक्षा ते हिंदी बरेच बोलतात. पण त्यांचीहि भाषा येथली तमीळच झाली आहे.

हातगाड्या, हातरिक्षे, पायरिक्षे, ऑटोरिक्षे, टांगे, एक्के यांचे प्रचलन असलेल्या या शहरात दारिद्र्य एकीकडे दिसत असले तरी लोकांची वृत्ति कमी कपड्यात राहण्याची आहे. रायापूरम् स्टेशनच्या बाजूला कित्येक लोक फूटपाथवर भितीला गोणपाट लावून सावली करतात व तेथे राहतात.

एका गाडीत एखाद्या ट्रकप्रमाणे जळण भरले होते व ती गाडी दोन माणसे ओढत होती. एवढी मेहनतीची कामे इकडील माणसे करतात. जीवनकलह कठीण असावा, हाच याचा अर्थ !

दुपारी ३–४ नंतर आम्ही मरीनाबीचचे सायंकालीन दृश्य पाहिले.

त्याआधी मैलापुरमवस्तीमधील कपिलेश्वराचे मंदिर पाहायला गेलो. बसमध्ये चढलो तर कंडक्टरजवळची तिकिटेच संपली म्हणून तो आणायला गेला. वेळ गेला त्याचे विशेष कुणाला वाटलेले दिसले नाही. ह्या बसेस राज्यसरकाराच्या आहेत. आमच्या बसमध्ये मेडिकल-बॉक्स दिसली नाही. जनतेच्या देणग्यावर बस-स्टॉप बांधून घेतल्याची अभिनव उधाहरणे येथे दिसली. येथील बसस्टॉपवर सायवाने आहेत. बसस्टॉपवर बसचे चित्र असते. कित्येक स्टॉप्सूवर मात्र पाटचा दिसल्या नाहीत. येथील पोलीस उंच लाल टोप्या वापरतात व वाहने थांबवण्यासाठी तकटावर STOP अशी अक्षरे लिहलेला फलक दाखवितात. या शहरात बरेचसे सायलेन्स-झोन्स आहेत. बसच्या रस्त्याने टेलिफोन हाऊस, ख्रिश्चन लिट्रेचर सोसायटी इत्यादि इमारती लागल्या. 'मद्रास-सेंट्रल हे रेल्वे स्टेशन याच रस्त्यावर आहे. ते फार मोठे आहे. शांति एअरकंडीशन्ड थिएटरहि याच मार्गावर दिसले.

मैलापूरमंदिराला दोन बाजूंनी दोन भव्य गोपुरे आहेत. ७ मजले त्या मंदिराला आहेत. मंदिरामागे एक तलाव असून त्यात मध्ये देऊळ आहे. मंदिरात एक मानस्तंभ असून तो सोन्याच्या पाण्याच्या पत्र्याचा आहे. शिल्प जुने असून दक्षिणी संस्कृतीचे ते द्योतक आहे. येथे शिवाची अनेक नावे देऊन निरनिराळ्या शिवमूर्ति मांडल्या आहेत. कोरलेले हत्ती व नंदी मोठमोठे असून अनेक लहान देवळयांमध्ये ठेवलेले देव कुलुपात बंद होते. देवळासमोर मोठा मंडप असून देवताचे अनेक नमुने मांडलेले दिसले. वेगवेगळ्या दिशाना तोंडे असलेल्या ९ मूर्तींना नवग्रह म्हणून आम्ही शांती(!)साठी प्रदक्षिणा घातल्या. येथे एक कार्यक्रममंडप होता. तो छान वाटला.

हे शिवमंदिर पाहून आम्ही समुद्रकिनाऱ्याला पायी गेलो व बसने पॅरीकॉर्नरला आलो. तेथे एका हॉटेलात शिरलो व या भागातील विशेष म्हणून दोसा मागविला तर तो मिळालाच नाही. सायकाळी

७ च्या पूर्वीच फक्त दोसा मिळतो असे सांगितले गेले. या 'अंबी' हॉटेलात खायला चमचे मिळाले नाहीत. हॉटेलाच्या मालकाजवळ पानांचे गोल उभट विडे पैशांची गड्डी ठेवावी तसे एका थाळीत ठेवलेले होते. हवे त्याने ते नवे ४ पैसे देऊन विकत घ्यावेत व साखरेसारखी त्याची गोड चव चाखावी. एरवी काही जागी निराळे विडे मिळत. विड्याचे सुटे पान घ्यावे व त्यावर थोडा चुना लावावा. दुकानदार तुम्हाला १ पैशाची वा २ पैशांची बारीक मसालेदार सुपारीची पुडी देईल. तिच्यासह तो विडा खावा. काताचे पान मिळायचे नाहीच.

‡‡‡‡ ‡‡+—

दि. १५ मे ६१ सोमवार रोजी सकाळी सहलीने आयोजिलेल्या कार्यक्रमानुसार ४ बसेस ७॥ ला आल्या त्यापूर्वी आम्ही तयार होऊन समुद्र-काठच्या भिंतीजवळ उभे राहिलो आणि नांगरलेल्या बोटींची व अंगाला तेल लावून काम करणाऱ्या कोळ्यांची मौज पाहत थांबलो.

बसेस आगगाडीच्या डब्यांच्या कारखान्याकडे जातांना कारंजांची पुष्करिणी दिसली. या स्प्रेपाँडमध्ये सर्वत्र कारंजी उडत होती.

मद्रासभागात जनसुविधेसाठी सार्वजनिक संडासांची योजना अनेक जागी आढळली. पाण्याच्या मुबलकतेमुळे बागा तयार करण्याचीहि आवड इकडील लोकात दिसली.

कोचफॅक्टरी (आगगाडीच्या डब्यांचा कारखाना) पाहण्यापूर्वी तेथील सायकल-स्टँड पाहत राहावेसे वाटले. एक सायकल सरळ व तीवर दुसरीकडून एक सायकल उलटी-उभी राहील अशी ती योजना होती. यामुळे जागा वाचण्यास मदत होते.

या कारखान्यासमोर एक बाग आहे. इमारतीवर बोगनवेली वाऱ्यावर लहरतांना दिसल्या. ही इमारत समोरून साधी दिसते.

आत मोठा कारखाना असेल याची कल्पनाहि तीवरून येत नाही. या इमारतीच्या खिडक्या–दारांना प्लॅस्टिकचे अभिनव पडदे लावलेले होते.

या कारखान्यात आम्हाला ३–३ जणांच्या रांगा करून प्रवेश करावा लागला. श्रीशिवाजींचा बिल्ला व स्काऊटचा स्कॉर्फ आवश्यक होता. वसवाल्यांनी ह्या खुणाशिवाय आम्हाला आत चढू दिले नव्हते.

पेरांबुरची ही भव्य कोचफॅक्टरी पाहण्याला सुरुवात केली तेव्हा तेथे चांगली वाक्ये इंग्रजीत वाचावयास मिळाली. उदा. "आजचे काम उद्यावर टाकू नका." प्रथम आम्ही लोखंड कापण्याचा विभाग पाहिला. यंत्रामध्ये लोखंडाचे भाग कापत असतांना आम्ही तेथे पोहचलो. वरचे व खालचे बर्थ्स् बरेचसे तयार झालेले पडले होते. मोठमोठ्या क्रेनचा उपयोग सामानाची आवकजावक करण्यासाठी होत होता. एके जागी गाडीची चाके तयार करतांना दाखविण्यात आली. चाकांची आसकुडे तर कितीतरी तयार झाली होती. प्रथम डब्यांचा सांगाडा तयार होतो व नंतर पूर्ण डबे तयार करण्यासाठी मेहनत घेतली जाते. ही सर्व कामे साधारणतः ८ विभागात या कारखान्याच्या भव्य अशा ८ दालनांनमध्ये होतात. टाटाकडून मागविलेल्या पोलादावर ही किमया येथे घडते. डबा तयार झाला की साधारण स्वरूपात पहिला रंग दिला जातो व घासून चक्क केल्यावर दुसरा रंग दिला जातो. हे काम हाताने करण्यात येते. ७८ हजार रुपयात एक डबा तयार होतो. एका दिवसात फक्त दोन डबे या कारखान्यात बनतात.त्यात पहिला, दुसरा, तिसरा असे दर्जे असू शकतात. एका डब्याचे काम सुरू झाल्यावर तो पूर्णपणे तयार होण्याला सुमारे १ महिना लागतो. तयार झालेले डबे येथे असलेल्या रुळांवर ठेवले जातात. आधुनिक प्रकारचे हे भारतीय डबे फार छान दिसतात. येथून ते आगगाड्यांसाठी बाहेर पाठविले जातात.

या कारखान्यात कामे करणारी मंडळी भारतीयच दिसली. भिलाईनंतरही दुसरी भव्य योजना पाहून आमच्या डोळ्यांचे पारणे फेडीत आम्ही तेथून बाहेर पडलो. या कारखान्याला फक्त दहाच वर्षे झाली असली तरी त्याची कमालीची प्रगति लक्षात घेण्याजोगी आहे. चित्तरंजन कारखान्यात आगगाडीची इंजिने होत असून तो कारखाना पेरांबूरच्या या कारखान्याच्या पूर्वीचा आहे.

पेरांबूरगेटमधून आमच्या मोटारी परतल्या. रस्त्यात ५ मजली अशोक हॉटेल दिसले. आमच्या मोटारी म्युझियमजवळ येऊन थांबल्या. आम्ही काहीजणांनी प्रथम कॉनेमॅरा [ Connemara ] पब्लिक लायब्ररी पाहिली. तेथे मराठीचाहि एक विभाग आहे. मात्र मराठीचा जाणकार त्या व्यवस्थेच्या मंडळीत कुणीच आढळला नाही.

जवळच म्युझियम आहे. ते फार मोठे आहे. जुन्या मूर्तिकलेच्या विभागात आम्ही बराच वेळ घालविला. इ. स. ६२५ ते ९००, ८५० ते १००० व १३०० या दरम्यानच्या चोल, पल्लव, विजयनगर इ. संस्कृतीच्या निदर्शक अशा मूर्ति पाहून हिंदी इतिहास व संस्कृतीची कल्पना येऊ शकते. प्रारंभीच्या मूर्तींचा रेखीवपणा इ. स. १६०० च्या पुढे तयार झालेल्या मूर्तींमधून गेलेला दिसला. वैषयिक शृंगाराची प्रतीके अशाच बेढब मूर्ति पुढेपुढे दिसल्या. त्यावेळच्या युनिफॉर्मची कल्पना देणारी एक मूर्ति चांगल्या अवस्थेत आढळली. उत्तर-भारताचे सूक्ष्म काम यापेक्षा अधिक असते, असे सांगण्यात आले. होयसाळ व काकातिया काळातील मूर्तींचे शिल्प सुंदर वाटले.

त्यावेळची नाणी व खेळणी उत्खनन-विभागाच्या दालनात ठेवली होती. पूर्वीच्या काळी भूमिगत नाल्या व रस्ते असल्याचे पुरावे येथे ठेवण्यात आले होते. त्यावेळच्या विटा, देवता, बैलासारखी जनावरे इत्यादि वस्तू पाहून आश्चर्य वाटले. त्यावेळची गहू पेरण्याची साधने, घाणीसारखे दगड उखळ इत्यादि जीवनसाधनेहि येथे मांडली होती.

बुद्धजीवन चित्रिणाऱ्या अनेक मूर्ति एका दालनात होत्या. सती, वीर, गायमुख इत्यादि बाबी चित्रित करणारे काही मजेदार दगड दिसले. 'देवदत्त हत्ती व बुद्ध' ही कथा एका दीर्घ-शिलेवर कोरली होती. तत्कालीन दागिने व वेषभूषा यांची कल्पना काही शिलाचित्रां-वरून येते.

एका भागात लांबलचक ( ६० फूट ) देवमाशाचा सांगाडा टांगून ठेवला होता. तो पाहून आम्ही आश्चर्यमुग्ध झालो. हत्ती, कासव, शहामृग यांचेहि सापळे ठेवलेले होते.

नंतर आम्ही 'चिल्ड्रेन गॅलरी'त गेलो. तेथे लहान मुलांच्या दृष्टीने प्रेक्षणीय व गमतीदार वस्तु ठेवलेल्या आहेत. भारतातील सर्व प्रांतांच्या लोकांची वेषभूषा दर्शविणाऱ्या बाहुल्या एका जागी ठेवल्या होत्या.

म्युझियमच्याच बाजूला नॅशनल आर्ट गॅलरी आहे. येथील चित्रे कलात्मक आहेत. जुनीनवी चित्रकला येथे अंकित असून 'बळी' हे चित्र मनोहर वाटले.

यानंतर आम्ही प्राणीसंग्रहालयाच्या बागेत आमच्या किरायाच्या खास बसमोटारींनी गेलो. या 'झू'चा विस्तार मोठा असून तेथे निर-निराळ्या रंगाचे राघू, विविध जातीचे तडस, वाघ, सिंह, लांडगे, कोल्हे, सारस, वानरे, हरणे, सांबरे, मोर इत्यादि प्राणी ठेवले होते. पांढरे उंदीर एके ठिकाणी खेळत होते; तर सर्पगृहात विविध प्रकारचे साप पहुडले होते. या संग्रहालयात आसामी 'गेंडा' हा हत्तीसारखा, लांबट पण ठेंगू प्राणी आढळला. लामा हाहि प्राणी येथे होता. या बागेत एक पाट असून तो पार करण्यासाठी पूल आहे. नावेतून विहार करण्याची सोय असून एका भागात 'स्त्री-बाग' आहे.

दुपारच्या जेवणासाठी आमच्या बसेस स्टेशनावर आल्या. काही जणांनी कॉर्पोरेशन स्टेडियम, मूरमार्केट, लाइफ-इंश्युरंस कंपनीची भव्य

इमारत, लेडीज गार्डन इत्यादि स्थळे निरनिराळ्या वेळी आपापल्या सवडीप्रमाणे पाहून घेतली.

दि. १५ च्या दुपारी जेवणे होताच आमच्या बसगाड्या मद्रास पाहण्यासाठी पुन्हा निघाल्या. रस्त्याने एक 'फिशपांड' लागले.

मद्रास संपतासंपता अड्यार नदी लागली. या नदीच्या काठी अड्यारची थिऑसफी–सोसायटी आहे. हे स्थान आंतर्राष्ट्रीय थिऑसाफी सोसायटयांचे हेडक्वार्टर आहे. हा आश्रम रमणीय व शांत आहे. फार मोठ्या बागवजा टेकडाळ नैसर्गिक जागेत हा वसला आहे. आत डामरी रस्ते केले आहेत. पाहण्याची वेळ ४ पर्यंतच असली तरी खास परवानगीने आम्हास अधिक वेळ देण्यात आला. अशा सद्धर्माच्या गोष्टी बघण्यासाठी वेळांची बंधने का टाकली जावीत, त्याचा उलगडा मनाला होत नव्हता. 'सबके लिये खुला है मंदिर यह हमारा' ही धार्मिक प्रचार-कार्यकर्त्यांची नेहमीसाठीच भावना असायला हवी. अडचणी असतील तर त्या डावलून काही मार्ग काढणे कठीण नाही. श्रीरामकृष्ण आश्रम, पांदेचरी आश्रम, थिऑसाफी आश्रम इत्यादि इकडील लोकप्रिय संस्थांनी तरी याबाबत आपली धोरणे बदलायला हवीत. नाहीतर इकडील देव जसे दुपारी वा वेळीअवेळी झोपतात, तशीच गत या आश्रमातील चांगल्या कामांचीहि व्हायची !

या आश्रमातून चालत असतांना रमणीय वनराजीतूनच आपण रस्ता काढीत आहोत असे वाटले. निरनिराळी फुलझाडे जागजागी लावलेली होती.

विसावास्थान वाटावे असे या आश्रमातील रमणीय स्थान म्हणजे 'वटवृक्ष–परिसर' ! एकाच वटवृक्षाच्या अंतरिक्ष मुळांनी व पारंब्यांनी अनेक वटवृक्ष तयार झालेला हा एक अलौकिक नमुना आहे. अनेक वटवृक्षांनी व्यापलेला हा एकाच वडाचा विस्तार ४० हजार चौरस फुटांचे क्षेत्र व्यापतो. या वटवृक्षांनी अशा तऱ्हेने व्यापलेली दक्षिणोत्तर

जागा २२० फूट व पूर्वपश्चिम २०५ फूट आहे. जगात एवढ्या मोठ्या विस्ताराची झाडे क्वचितच असतील ! या वृक्षाला जागतिक स्वरूपाची कीर्ति आहे. या वृक्षाजवळ फक्त एक दगडी द्वार आहे. ते १८ मे १९२५ साली बांधलेले आहे. या वृक्षच्छायेखाली अनेक साधुमहात्म्यांची भाषणे झाली आहेत व लाखो लोकांनी येथे बसून शांतीचा अनुभव घेतलेला आहे.

या आश्रमात परदेशातून आल्यावर स्वामी विवेकानंदांनी सर्वप्रथम भाषण दिले असल्यामुळे या स्थानाला विशेष महत्त्व आहे. स्वामी विवेकानंदांच्या भारतीय धर्मकार्याची सुरुवात येथे व्हावी हा एक सुयोगच म्हटला पाहिजे.

या आश्रमात वटवृक्षाच्या बाजूला एक प्रार्थना–भवन आहे. या भवनाची स्थापना दि. १७–११–१८७५ रोजी झालेली दिसते. निरनिराळ्या धर्ममूर्तींची मनोहर छायाचित्रे येथे आहेत. थिऑसफी सोसायटीच्या अध्यक्षा श्रीमती ॲनी बेझंट (१९०७–१९३३) व थिऑसफीचे अन्य उद्गाते यांचे भव्य फोटो तेथे लावलेले आहेत. सर्वधर्मसमन्वयाची दृष्टि ठेवणाऱ्या या प्रार्थनामंदिरात एक सुंदर वाक्य लिहिलेले आढळले. ते वाक्य असे– " सत्यापेक्षा दुसरा कोणताच धर्म जगात नाही. "

या भवनात एका संगमरवरी शुभ्र पुतळ्याने आम्हा सर्वांनाच वेड लावले. या पुतळ्यात एक लहान मुलगी छोट्या मुलाला (भावाला? ) कडेवर घेऊन उभी आहे. या मुलीच्या चेहऱ्यावरचे भाव वाचण्यात वेळ घालविता घालविता तर्काला अनेक फाटे फुटतात. वाटते, त्या मुलीचे आईवडील नसावेत. ती संकटात सापडलेली असावी व या अबोध वयात काय करावे हे न सुचून ती असहाय झालेली असावी ! करुणेचा कळस होऊन तिचे भावदग्ध मन एकदम स्थिर, अगदी अचल, चेतनाविहीन अवस्थेला, स्थितप्रज्ञ दशेला आले की काय असे वाटावे ! हा पुतळा

१९११ साली कोपनहेगनच्या मेले हेन्री डिड्रीत्सन [ Mele Henry Didrichsen ] नामक कलावंताने भटीदाखल दिलेला आहे.

आश्रमात पुस्तकभवन, वाचनालय, अभ्यासालय इत्यादि विभाग आहेत. स्वामी विवेकानंदांचे भाषण नक्की कोणत्या जागी झाले होते, त्याची माहिती कुणी समाधानकारक दिली नाही. अतिथीभवनात अतिथी थांबलेले दिसले. प्रार्थनामंदिरासमोर गवत कापण्याची 'बाबागाडी' पाहिली. हे एक यंत्रच आहे. गवत समांतर व व्यवस्थित कापण्यासाठी ही गाडी रोलरप्रमाणे ओढावी लागते. नीलकमलेहि या ठिकाणी आढळली. वटवृक्षाजवळ आहे, तसे एकूण ३ दरवाजे या आश्रमात बसविलेले आढळले.

या आश्रमानंतर आम्ही मद्रासच्या 'गांधीमंडपा'कडे गेलो. गांधीजींच्या स्मरणार्थ अगदी साधे पण आकर्षक असे हे स्थान उभारण्यात आले आहे. बुवाबाजीला वाव मिळणार नाही अशी खुली दीर्घ अर्धवर्तुळाकार, काहीशी इंद्रधनुष्कार रचना या मंदिराची आहे. या स्थानाच्या दर्शनी द्वारावर दोन हत्ती बसविलेले आहेत. या मंदिराच्या पाठीमागे बाग आहे. अगदी मागे उतरत्या क्रमाने पायऱ्या आहेत. समोरहि बाग आहे. अशोकवृक्षांची विपुलता हे येथले खास वैशिष्टच आहे. समोरच्या बाजूला लंबवर्तुळाकृति अशी एक पुष्करिणी असून तीत कमळे फुललेली असतात. हे स्थळ मनाची प्रसन्नता वाढविल्याशिवाय राहत नाही, इतके ते प्रशान्त व एकान्त आहे.

परततांना आम्ही जेमिनी स्टुडिओ पाहण्याच्या हेतूने तेथे गेलो. परंतु पूर्वानुमती नसल्यामुळे सर्वांना परतावे लागले. त्यातल्या त्यात काही जणांनी काही पावले आत जाऊन तेथील कृत्रिम बागा व झोपड्या बाहेरील कुंपणातून पाहण्याची धडपड केलीच. उकिरड्यावर पडलेल्या खराब सिनेफिल्मांचे तुकडेहि काहींनी जमा केले.

तेथून सर्वांना घेऊन गेलेल्या मोटारी कपिलेश्वरमंदिराजवळ

थांबल्या. आम्ही ते मंदिर कालच पाहिले असल्यामुळे मयलापूर वस्तीतील जवळच असलेल्या श्रीरामकृष्ण आश्रमात आम्ही गेलो. सायंकाळची प्रार्थना चालू होती. निळया मंद प्रकाशातील श्रीरामकृष्णांची भावसघन मूर्ति पाहून आम्ही तेथे बराच वेळ विसावलो.

आश्रमातून परतलो, तेव्हा आमच्या मोटारी मरीनाबीचमार्गे मुक्कामाकडे निघून गेल्या होत्या. आम्ही नंतर बसने पॅरीकॉर्नरजवळ आलो व तेथील बाजारात शिरलो. खरे म्हणजे घ्यायचे काही नव्हते. पण दुकाने पाहण्यातहि स्त्रीवर्गाला विशेष आनंद वाटतो ! पुरुषांसाठी वापरावयाचे कापड येथे चांगले मिळते. बुशकोट तर फारच स्वस्त मिळालेले पाहिले. पण भाव कसे वाढतात याचाहि नमुना येथून सुरू झाला. आमच्यापैकी कुणीतरी आधी एखाद्याच काय पण अनेक दुकानांमध्ये जाऊन म्हणायचा, "हे बघा, आम्हास अमुक वस्तु तुम्ही जरा स्वस्त द्या. आम्ही ३०० जण आहोत. स्वस्त दिल्यास तुमचा बराच खप होईल." नेमका या बोलण्याचा उलट परिणाम होई. दुकानदार नंतर भाव वाढवून ठेवीत व त्या दराने आमचे खरेदीबहाद्दर व खरेदीबहाद्दरणी मनमाने खरेदीहि करीत.

रात्री जेवणानंतर गाढ झोपा लागल्या. वस्तुतः त्या नेहमीच लागायच्या. कारण सकाळपासून सायंकाळपर्यंत खूप भटकणे, पायी फिरणे व पाहणे व्हायचे. उसंत मिळायची नाही. म्हणून थकवा यायचा. फलतः निद्रादेवीशी गट्टी जमायला वेळ लागायचा नाही.

++++ +++—

१६ मे ६१ ला पहाटे ४ लाच भोंग्यातून सर्वांना जागविले गेले. आवराआवर होण्यात बराच वेळ गेला. ६—६॥ च्या दरम्यान गाडीच्या डब्यांची कुलुपे लावली गेली. ७ ला कालच्याच स्पेशल बस—

मोटारी आल्या व त्या बसेस महाबलीपुरमच्या दिशेने धावू लागल्या.

महाबलीपुरम गावी जाण्यासाठी चिंगलपेट स्टेशनावर कुणी उतरतात व तेथून मोटारने जातात. हे अंतर १८ मैलांचे आहे. मद्रास-पासून महाबलीपुरमपर्यंतची डांबरी सडक ३६ मैलाची आहे.

महाबलीपुरम् गाव प्रामुख्याने विविध प्राचीन लेण्यांसाठी प्रसिद्ध आहे. प्राचीन वास्तुशास्त्राचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने ह्या लेण्या अत्यंत उपयुक्त आहेत. वेरूळच्या लेण्यांच्या मानाने ह्या लेण्या छोटचा-छोटचा असल्या तरी त्यातील जीर्ण शिल्प अभ्यासविषयासाठी पर्याप्त आहे.

पल्लव राजांचे प्रख्यात बंदर महाबलीपुरमला होते. येथून देशी-विदेशी समुद्री व्यापार चालत असे. आजहि बंगालच्या उपसागरावर वसलेल्या या खेडचाला जो किनारा लागला आहे, तेथे काही पडझड झालेल्या शिलाखंडांचे अवशेष दिसतात. या किनाऱ्यावर शेषशायी भगवानाचे जुने मंदिर काळाचे व समुद्री लाटांचे चपेटे खात उभे आहे. या मंदिरातील विष्णुमूर्ति मूळ दगडातच कोरलेली आहे.

या खेडचात ज्या लेण्या आहेत त्या एका उंच टेकडीमध्ये आहेत. सहा सिंहांच्या मुखाचा एक कोरीव भाग येथे आहे. लेणीवर हत्तीएवढा दगडी हत्ती कोरला आहे. तो पल्लवकालीन आहे. राजसिंहाचे शिल्प ६७४ ते ८०० च्या दरम्यानचे आहे. या लेणीवर अखंड दगड असलेली टेकडी आहे. किरातार्जुनाचे शिल्प असलेली लेणी इ. स. ६४० ते ६७४ या काळातील आहे. एका लेणीतील कृष्ण १५–१६ व्या शतकातील आहे. एके जागी वराह ( इ. स. ६४० ) व उजव्या सोंडेचा गणपति (इ.स.६५०) दिसला. दुसऱ्या एका जागी विमानांचे शिल्प असून ते ६७३ ते ८०० ई. या काळातील असल्याचे समजले. ह्या लेण्यांची पडझड होत आहे व वैराण जगात ती काळप्रवाहात विलीन होतील की काय ही भीति आहे.

महाबलीपुरमला 'लोण्याचा गोळा' म्हणून संबोधला जाणारा एक गोल दगड टेकडीवर अधांतरी ठेवल्यासारखा वाटतो. लेण्यांच्या टेकडीवर एक दीपगृह आहे. जवळच उंच अशी एक खोदीव इमारत असून तीवर गच्ची आहे. आता तिला कुंपण करून वर हवा खाण्याची सोय केली आहे. आतूनच एकेरी पायऱ्यांनी वर जावे लागते. वरून लेण्यांच्या टेकडीचे सौंदर्य उठून दिसते.

लेण्यांच्या टेकडीपासून समुद्रकिनारा व तेथील मंदिर जसे दूर आहे, तसेच पंचरथांचे मंदिरहि दूर आहे. शिल्पाच्या दृष्टीने हे मंदिर अभ्यासनीय आहे.

महाबलीपुरमचे संपूर्ण शिल्प पल्लवकालीन (६०० ते ७५०) असून एकाच जागी पल्लवांचे विविध शिल्प अन्यत्र सापडत नाही. म्हणून अशा तऱ्हेचे हे एकमेव उदाहरण आहे. ही शिल्पकार्ये खास पल्लव राजांच्या नेतृत्वाखाली तयार झाली आहेत. विशेषत: पल्लववंशीय महेंद्रवर्मन आणि नरसिंह् वर्मन या राजानी या बाबतीत फार मोठी मेहनत घेतली व आपली कलादृष्टि या कामी वापरली.

या स्थानीच्या शिल्पाचे प्रत्यक्ष दर्शन हे सूक्ष्मवर्णनाच्या अनेक प्रयत्नाहून श्रेष्ठ आहे. जुन्या शिल्पांचे आगर असे हे गाव आहे; म्हणूनच की काय येथे मद्रास सरकारने शिल्पशास्त्रशिक्षणाची एक शाळा उघडली आहे. मूर्तिकलेचे ज्ञान येथे प्रामुख्याने दिले जाते. या शाळेलाहि आम्ही भेट दिली.

महाबलीपुरमहून आमच्या मोटारी 'पक्षीतीर्था'ला गेल्या. महाबलीपुरमला 'सप्त–लेणी' हे जसे दुसरे नाव आहे, तद्वतच 'पक्षीतीर्थ' वा 'पक्षीतीर्थपुरम' हे लोकप्रिय नाव 'तिरुक्कालूकुंदरम' या गावाचे आहे. चिंगलपेट जंक्शनापासून हे गाव ९ मैल मोटारमार्गावर आहे. मद्रासपासून येणाऱ्या सडकेवर महाबलीपुरमच्या पुढे हे गाव ९ मैल आहे. म्हणजे मद्रास ते पक्षीतीर्थ हे अंतर ४४ मैलांचे आहे तिरुक्कालीकुन्दरम

हे गाव लहानसेच असून येथील ५०० फूट उंचीच्या टेकडीवरील पिंड-भक्षणाकरिता येणाऱ्या पक्ष्यांसाठी ते ख्यातित पावले आहे.

आम्ही १०–३० वा. या गावी पोहचलो. टेकडीच्या पायथ्याशी एक शिवमंदिर आहे. येथूनच पायऱ्यांची चढण सुरू होते. या चढणीच्या आरंभस्थानी एक दरवाजा आहे. तेथे तिकिटे काढून आत जावे लागते. खरे म्हणजे श्रद्धाळू वा दर्शक लोकांनी येथे यावे व येथल्या लोकांनी 'पक्षी दाखविण्याचे' पैसे घ्यावे हा प्रकार विचित्रच म्हणावा लागेल. काही का असेना, आम्हाला वर जाण्याची घाई झाल्यामुळे आम्ही भराभर तिकीटे काढून आत शिरलो व पायऱ्या चढू लागलो. या स्थानाची कीर्ती ऐकली होती की, दोन पक्षी पिंडभक्षणार्थ ११ ते ११-३० च्या दरम्यान रोज नियमितपणे येतात. अर्थात् ते पाहण्यासाठी आम्ही उत्सुक होतो. म्हणूनच उभट पायऱ्या चढताचढता दम लागला तरी सर्वजण घाईने वर चढलो. ज्यांना चढण्यास त्रास होत होता त्यांनी भोयांच्या पालखीसारखी डोली केली व तीमधून चढणे–उतरणे केले

घामाझोकळ होत असतांनाहि पाहण्याचा अदम्य उत्साह दुणावत होता. त्यामुळे आम्ही भराभर उंच चढून शिखरावर गेलो. प्रथम तेथील त्रिपुरासुंदरीचे दर्शन घेतले. एका देवळात त्रिपुरेची मूर्ति मांडलेली आहे. एके स्थळी खंदक आहे. त्यालाच 'तीर्थ' म्हणून संबोधले जाते. दुसराहि एक तलाव 'तीर्थ' म्हणविला जातो. येथील 'तीर्था'ने रोगराई नष्ट होते, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

सुमारे ११ वाजता शिखरतीर्थाच्या उंचवट्यावर एक पुजारी थाळीत पिंड घेऊन बसला. त्याच्या समोर पाट व पाण्याचा लोटा मांडलेला होता. पाहणारांची गर्दी झाली होती. खालच्या बाजूला लोक बसले होते. या ठिकाणी ११ ते ११॥ च्या दरम्यान अनादि काळापासून दोन पक्षी येतात. ! पितृश्राद्ध उरकणारांची येथे रीघ असते. पिंड उचलण्यासाठी जे दोन पक्षी येतात, ते भीत नाहीत. पुजारी

त्यांना पाटावर बसल्यावर पिंड देतो व तो घेऊन पक्षी निघून जातात. ह्या 'दैवी' (!) चमत्काराने लोक भारावून जातात व म्हणूनच हजारोंच्या संख्येत येथे रोज गर्दी होते.

आमच्या विद्यार्थ्यांचा उत्साह पक्षी पाहण्याचा असला तरी त्यांचा कल श्रद्धेकडे नव्हता. कारण हे 'थोतांड' आहे असे अनेकांना प्रामाणिकपणे वाटत होते. त्यामुळे पक्षी येण्यात काहीतरी गोम असावी असा त्यांचा कयास होता. ज्या टेकडीवर पक्षी येतात, तीवरच आमच्या मुलांनी जत्थे मांडले. त्या लोकांना खाली उतरण्यास पुजारी-कपू सांगू लागला. त्यामुळे संशयाला जागा झाली. मुलानी जवळजवळ जाऊन एकच गोंधळ करण्यास व गाणी म्हणण्यास आरंभ केला. त्यामुळे पक्षी आलेले दिसलेच नाहीत. १२॥ वाजून गेले तरी पक्ष्यांचा पत्ता नव्हता. मुख्य पुजारी रागावला होता. अखेर मुलांचा गोंगाट बंद झाला व मुले थोडी दूर उभी राहिली. तेव्हा मात्र दोन घारी उडतांना दिसल्या व एक खाली येऊन पाटावरचा पिंड उचलून पळाली. आमच्या काही शिक्षिका म्हणाल्या, " बोहाऱ्या पोरांनी पितरांना (पक्ष्यांना) आधी येऊ दिले नाही. पापी कुठली !" त्याच्या दृष्टीने पक्ष्यांचे येणे हा एक चमत्कार होता. आमच्या दृष्टीने ती एक वस्तुस्थिति होती. कोणत्याहि प्राण्याला नियमित वेळेवर अन्न देण्याची सवय लावून ठेवली की तो प्राणी नेमका त्या वेळी तेथे हजर होऊ शकतो. असाच प्रकार त्या घारींचा झालेला आहे. आणि हेच सत्याला धरून आहे. रोजच्या सवयीने ते पक्षी धीट झालेले आहेत. तसे पाहिले तर पुजारी अगदीच सराईत दिसले. विशेष चमत्कारी महात्मे वाटावेत असे त्यांच्यात काहीच नव्हते. एकंदरीत, कुणीतरी सुरू केलेल्या एका रूढीची परंपरा चालवून येथे लोकांच्या श्रद्धेला खाद्य पुरविले जाते व तीवर काही लोकांच्या पोटाची सोय होते, असे आमचे मत हे पक्षी–तीर्थ पाहून झाले. श्रद्धाळूंच्या श्रद्धेतून आमचे हे मत चूक असू शकेल. पण आमच्या

मताला पूरक असेच वातावरण आम्ही या ठिकाणी पाहिले. पक्षी पाहायला आलेले लोक आर्त भक्ताच्या भावनेने पक्ष्यांची वाट पाहत बसलेले होते; तर सुशिक्षित म्हणविणारे तिकडचे काही लोक श्रद्धा नसली तरी तेथील रूढीविरुद्ध स्पष्ट बोलू शकत नव्हते. तेहि एक 'गंमत' पाहण्याचा हेतू ठेवूनच तेथे आले होते.

खाली उतरल्यावर मोटारीत बसून आम्ही आपले डबे सोडले. पिण्याचे पाणी खारट होते.पाणी ओढायला बादली मिळण्याची मारामार, म्हणून पाणी विकणारी मुले वाढली. त्यातली काही मुले पक्षीतीर्थावर थोड्या वेळापूर्वी भीक मागतांना दिसली होती. पाणी विकणारी मुले म्हणत होती, "पानी देव, दो पैसे लेव." घेणे आणि देणे यातील फरक त्या तामिळी मुलांना समजत नव्हता !

मोटारीमध्ये बसून बसून उकाडा सहन करावा लागला. एकच्या दरम्यान आमच्या मोटारी कांचीवरमकडे निघाल्या. थकव्यामुळे मोटारीत डुलक्या देऊन एकमेकांच्या अंगावर आम्ही लवंडत होतो.

कांचीपुरमच्या हद्दीत शिरताच कांची-संबंधित साऱ्या स्मृतींनी उजळणी करण्याची प्रेरणा दिली. एकदा सर्वोदयसंमेलनाला मी येथे आलो होतो व येथील इतिहासाने प्रभावित झालो होतो.

कांची हे भारतातील सात पवित्र नगरींपैकी एक आहे. आचार्य वेदान्त-देशिकारांनी (१२६८-१३७०) या स्थानाला 'अद्वितीय' म्हटलेले आहे; तर कालिदासाने यथार्थ शद्बात या नगरीचा गौरव केला आहे—

पुष्पेषु जाति । पुरुषेषु विष्णु ।
नदीषु गंगा । नगरेषु कांची ।।

पातंजलीच्या महाभाष्यातहि या शहराचा उल्लेख आहे. कांची शहर प्रथमपासूनच कला, संस्कृति, तत्त्वज्ञान, संगीत, चित्रकारी इत्यादि विविध क्षेत्रात ख्यातनाम राहिले आहे. याच स्थानी चाणक्यमुनीचा जन्म झाला होता. कृष्णा-कावेरीच्या मधील भाग ३ ऱ्या शतकापासून ९ व्या

शतकापर्यंत पल्लवांच्या ताब्यात होता व त्यांची राजधानी कांचीवरमला होती. त्याहि काळात या राजधानीतून चीन, फिजी, सयाम इत्यादि देशात संदेश पाठविले जात. पल्लवांचे बंदर महाबलीपुरम् कांचीशी नहर आणि रस्ते यांनी जोडले होते. पल्लवकालीन स्मृत्यावशेष अजूनहि तत्कालीन वैभवाची साक्ष देत कांचीत स्थित आहेत. पल्लवांचा राजा पहिला महेन्द्रवर्मन (७ वे शतक) हा सौंदर्याचा भोक्ता होता. विद्वत्ता, संगीत, नाटय यात तो अग्रेसर होता. त्याच्याच कर्तृत्वाने खडकातील खोदकामाचे नमुने दक्षिणेत यत्रतत्र पसरलेले आजहि दिसून येतात.

कांचीला चोलराजांची ( १३ वे शतक ) उपराजधानी होती. दक्षिणेतील देवळांच्या शिखरद्वारांची कल्पना विजयनगरच्या राजांची असून (१४ ते १७ वे शतक) त्याच्या स्मृति कांचीत आहेत. कांचीला सर्व धर्मांची व्यासपीठे प्रथमपासून होती. यँगचँग हा चिनी प्रवासी बुद्धधर्माच्या अवलोकतार्थ कांचीला आला होता. कांचीच्या आचार्य दिग्गजांच्या ग्रंथांचा मान जपानी व चिनी जनांनी केला आहे. दिग्गज हे नालंदा विद्यापीठात कार्य करीत होते. जैनांची कांची म्हणून एक विभाग याच नगरीत होता. आज एक जैनमंदिर वेगवती नदीच्या काठी कांचीपुरमला आहे. वैष्णवांच्या तीन प्रमुख स्थानांपैकी कांची हे एक असून अनेक वैष्णव संतांची ही कर्मभूमि राहिली आहे. कांचीचा उल्लेख 'सत्यव्रतक्षेत्र' म्हणूनहि करण्यात आलेला आहे.

कांचीवरम हे गाव सुमारे १ लाख वस्तीचे असून मद्रासपासून मोटारमार्गे ते ४५ मैलांवर आहे. गावाकाठूनच वेगवती नदी वाहते. अनेक देवदेवळे येथे असली तरी प्रामुख्याने शिवकांची, विष्णुकांची व एकाम्बरनाथ या देवळांसाठी कांचीपुरम धार्मिकदृष्टया प्रसिद्ध आहे.

या कांचननगरीतील वैभवशाली मंदिर 'विष्णुकांची' म्हणविले जाते. वस्तुतः ते मंदिर वरदराजस्वामीचे (अर्थात् विष्णूचे) आहे. या मंदिराचे दर्शनी गोपुर अत्यंत सुंदर आहे. या पश्चिमी गोपुराहूनहि

सुंदर गोपुर पूर्वभागाचे आहे. ही दोन्ही गोपुरे विजयनगरराज्याच्या काळात बांधलेली आहेत. मंदिराभोवती परकोट असून सुमारे १३ चौरस एकरांचा भाग मंदिराने कापला आहे. या मंदिरात १०० स्तंभांचा विजयनगरकालीन मंडप आहे. या मंडपाच्या उत्तरेस 'अनंततीर्थ' नामक सुंदर सरोवर आहे. त्यात दोन मंदिरे आहेत. जवळच एक छानशी बाग आहे. अभिषेकमंडपाच्या समोरच उत्तुंग स्तंभ आश्चर्यचकित करून सोडतात. या मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ चतु:स्तंभी गोपुरवजा छत्री उभारली आहे. ती गोपुरसमांतर म्हणून अधिकच खुलून दिसते. 'हस्ती–गिरी' हाहि शिल्प–भाग नमुनेदार आहे.

'शिवकांची' म्हणून ख्यात असलेले मंदिर विष्णुकांचीहून लहान असले तरी तेहि भव्यतेत मुळीच मागे नाही. पुजाऱ्याने धावतधावत जाऊन किल्ल्या आणल्या व ते उघडून दिले इकडील देव दुपारी झोपतात, हा नेहमीचाच अनुभव ! या देवळात शिवपिंडेला महत्त्व आहे. येथे पल्लवकालीन शिल्प पाहावयास मिळते. या देवळातील हत्तीने आमच्यापैकी एका मुलाला उचलून फेकले. पण सुदैवाने त्याला मार वगैरे लागला नाही.

कांचीच्या अनेक देवळांमध्ये कामाक्षीदेवी व एकांबरनाथ यांची मंदिरे उल्लेखनीय आहेत. कामाक्षीमंदिरातील कल्याणमंडप शिवकांचीच्या 'याली–स्तंभ–मंडपा'इतकाच भव्य आणि शिल्पयुक्त आहे. एकांबरनाथ–मंदिरात एक हजार स्तंभांचा मंडप आहे. १९२ फुटांचे गोपुर आहे. पल्लव, चोल, विजयनगर इत्यादि राज्यांनी या मंदिराला वाढविले आहे. या मंदिराच्या परकोटावर सर्व संस्कृतीची मूर्तिकला चित्रिलेली आहे.

शिवकांचीत आडव्या गंधांची तर विष्णुकांचीत उभ्या गंधांची माणसे दिसली. शिव–विष्णु यांच्यात भेद करणारी भांडणे या दोन गटात पूर्वी होत असत असे कळले. म्हणूनच शिवकांची व विष्णुकांचीत बरेच अतर आहे की काय नकळे ! काही जरी असले तरी या मंदिरांचा

ग्रा. क्र. १२१८५



उपयोग परक्यांच्या आक्रमणाच्या वेळी किल्ल्यासारखा करण्यात आला, ही गोष्ट महत्त्वाची आहे. कांचीपुरमला ह्यूएन्त्संग आणि फाहियान यांनी भेटी दिल्या होत्या.

कांची येथे श्रीरामकृष्णांचा एक आश्रम असून तेथे चांगल्या अवस्थेतील एक वाचनालय चालविलेले आहे. येथे एक कॉलेज पण आहे.

कांचीची प्रसिद्धी रेशमी कापडासाठी आहे. कांजीवरमच्या साड्या आपल्या देशात जशा प्रसिद्ध आहेत; तसेच येथले कापड लंका, ब्रह्मदेश, इटाली, फ्रान्स, मलाया आदि देशात आवडीने खरीदले जाते. आमच्या मोटारगाड्या फक्त १० मिनिटांसाठीच चहापानाकरिता बाजाराजवळ थांबल्या, म्हणून बऱ्याच बायकांचा विरस झाला. नाहीतर कांजीवरमच्या खरेदीची भर निश्चितच पडली असती ! तरीपण काही हौशी आणि श्रीमंत बायांनी तेवढ्यातल्या तेवढ्यात जाऊन एकदोन का होईना, साड्या आणल्याच ! प्रत्येक गावची विविधता आणली नाही तर मग प्रवास करण्यात अर्थच काय ?– असाच त्यांच्या त्या खरेदीमधून अर्थ सूचित होत होता.

कांचीपुरमहून निघून मद्रासला जेव्हा आमच्या मोटारी पोहचल्या, तेव्हा बरेच जण बाजारात थांबले व त्यांनी आपापली खरेदी आटोपली. रात्री गाडी सुटली. तोवरचा वेळ बहुतेकांनी खरेदीतच घालविला.

मद्रासच्या रायापुरम् स्टेशनची रचना फारशी मोठी नसली तरी दोनमजली होती आणि काही भाग जमिनीखालीहि (Underground ) होता. त्यामुळे लिफ्टची व्यवस्था होती. दोनचार मुले उत्सुकतेने त्या लिफ्टभोवती रेंगाळत होती. कुणीतरी मोठ्या माणसाने 'लिफ्टमध्ये जाऊ नका हं; ती मुंबईसारखी नाही' असे सहज सुचविलेहि! पण लहान मुलेच ती ! त्या व्यक्तीस थोडेसे दूर गेलेले पाहून हळूच लिफ्टमध्ये शिरली. दोघांना थोडीशी भीति वाटली. म्हणून ती पटकन् बाहेर पडली नी "आपण नाही बा येत" असे म्हणू लागली. उतरलेल्यांपैकी

मोठा मुलगा ऐटीत सांगू लागला, " अरे चलो, मेरेको लिफ्ट चलाना आता है." शेवटी ती दोघेच आत राहिली. दार बंद करून एकाने बटन दाबले. लिफ्ट सुरू झाली. पण न जाणे का, मध्येच ती बंद पडली. मग मुलांना देव आठवले. त्या दोघांनी ओरडण्याचा गोंधळ घातला. शेवटी कुणीतरी रेल्वेकर्मचाऱ्याने येऊन त्यांची सुटका केली.

मुले रडकुंडी आली होती. पण तरीहि 'चांगली अद्दल घडली' म्हणून बहुतेकांनी त्यांची कानउघाडणीच केली.

दि. १७ मे ६१ ची सकाळ मद्रास ते त्रिचनापल्ली हा प्रवास सुरू असतांनाच झाली. फराळानंतर आमच्या डब्यात आम्ही 'बंबार्डींग' नावाचा कागदी खेळ दोघेच खेळत बसलो. हा खेळ दोघांनाच खेळावयाचा असतो. हा खेळ नंतर बरेच जण शिकले.

दुपारी २ च्या दरम्यान कोणत्याशा स्टेशनावर आमची गाडी उभी होती. दुसरी एक गाडी बाजूला येऊन उभी राहिली. आमची खास गाडी पाहून त्यातील बऱ्याच जणांना ती 'मॅरेजपार्टी' वाटली !

मद्रास ते त्रिची सुमारे २५० मैलांचे अंतर कापून सायंकाळी ४॥ वाजता त्रिचनापल्ली संदिप्पूवर आमची गाडी आली. संदिप्पु हा जंक्शनसाठी सुचविलेला हिंदी शद्ब असावा. अनेक जंक्शनांवर हा शद्ब हिंदीत लिहिलेला आढळला.

सायंकाळी जवळच्या सडकेलगत बसलेल्या दुकानांवरून केळी व बनियनी घेतल्या. त्यांचे दर स्वस्त वाटले. एका उपहारगृहात कॉफी घेतली. इकडे कॉफीत कमी साखर घालण्याची पद्धत आहे. त्यामुळे कॉफीत वरून साखर घ्यावी लागायची. आम्ही ज्या खोलीत कॉफी घेत बसलो होतो, तेथे एक काळी कुळकुळीत, बेसरवाली व अगदीच फाटके

कपडे घातलेली बाई 'भात–भाजी' खात होती. आम्हाला वाटले, असल्या भिकारणींचे हे हॉटेल असावे ! कुणीतरी इंग्रजीत म्हणाले, "असल्याहि बायका इकडे हॉटेलात येतात तर !" पण त्यावर ती म्हातारी न रागावता फक्कड इंग्रजीत बोलली, "मला हिंदी येत नाही, क्षमा करा. तुम्ही कोठून आलात ?"

तिच्या प्रश्नांची उत्तरे देतांना आता आम्हालाच लाजल्यासारखे झाले. तेथून आम्ही सटकता पाय घेतला हे सांगायला नकोच ! त्या बाईचे नाव मणिवेलअम्मा असे होते.

त्रिची स्टेशन मोठे आहे. येथे पुलाऐवजी जमिनीखालून रस्ते काढून दुसऱ्या फलाटांवर जाण्याची व्यवस्था आहे. हे स्टेशन स्वच्छतेच्या बाबतीत आघाडीवर आहे. या भागात डिझेलइंजिनच्या कमी डब्यांच्या आगगाड्या चालतात. त्या मुंबईलोकलप्रमाणे ताबडतोब वेग घेऊन धावतात.

त्रिचनापल्लीला आमची खास गाडी आम्हाला सोडून द्यावयाची होती. कारण लंकेचे कार्यक्रम रद्द झाल्यामुळे आता १० दिवस कोठे घालवावे हा प्रश्न होता. तो सुटणार होता. गाडी मात्र सोबत राहणार नव्हती. ती गाडी रेल्वे–अधिकाऱ्यांच्या ताब्यात रात्री द्यावयाची होती. त्यामुळे जेवण आटोपताच आम्ही आपले सर्व सामान एका ढकलगाडीवर लादले व टॅक्सी करून कार्पोरेशन छात्रालयाच्या ठरीव मुक्कामावर आलो. त्या ढकलगाडीवर आमच्या डब्यातील चार मुले स्वयंपाक्यांसह बसली. त्यांच्यामुळे सामानावर देखरेख झाली व त्यांचा खर्चहि वाचला.

कार्पोरेशन–छात्रालयाचे फक्त दोन दिवाणखाने नियत अवधीसाठी आम्हास मिळाले. कसेबसे सामान लावले व बिस्तरे काढून बाहेरच्या अंगणात झोपलो. जागा उबडखाबड म्हणून झोप लागण्याला वेळ लागला. संडास व पाणी यांचीहि गैरसोय या छात्रालयात

प्रामुख्याने जाणवली. एवढ्या मोठ्या आमच्या संख्येमुळेहि ह्या गैरसोयी झाल्या होत्या !

++ ++ ++-

दि. १८ मेची सकाळ उगवली, तेव्हा व्यवस्थापक रात्रभर जागून पुढील प्रवासाची आखणी करीत असलेले आढळले. टायपींगमशीनसमोर डुलक्या घेत का होईना, कामे चालली होती. सिलोन रहित झाल्यामुळे जवळची चांगली स्थळे पाहण्यासाठी ही धडपड होती.

रात्री उशीरा झोपल्यामुळे उशीरा जाग यायला हवा होता. पण तसे झाले नाही. कारण, अगोदर उकाडा व नंतर अति थंडी असा त्रास बाहेर झोपूनहि झाला होता. महापालिकेच्या छात्रालयाच्या त्या खडकाळ वाळूत कसची नीट झोप लागते ?

त्रिचीला पुन्हा एका आठवड्याने यायचे असल्यामुळे मळके कपडे धोब्याला देण्याची कल्पना निघाली. कल्पना निघताच गठ्ठा तयार झाला. तो एकाने डोक्यावर घेतला व आम्ही दुकान शोधत शोधत रॉकफोर्टच्या पायथ्याशी असलेल्या एका लाँड्रीत गेलो. अर्जंट डिलीव्हरी तो ३ दिवसात देणार आणि दर नगाचे चार आणे घेणार ! बनियनचे मात्र तीन आणे घ्यायला तो तयार झाला.

जातांना व परततांना एका बांधीव चौकोनी तलावाला वळसा घालून वाट काढली. हा 'टेप्पाकुलम'–तलाव आता आटलेला असल्यामुळे खालचे खडक दिसत होते. तलावाला मध्यभागी एक देऊळ असून आता ते अगदी उघडे दिसले. अशा तऱ्हेची तलाव–मध्य मंदिरे इकडे बरीच पाहिली. ह्या टेप्पाकुलमचा उपयोग एक सौंदर्यस्थान म्हणून महापालिका करणार आहे.

नंतर आम्ही कॉर्पोरेशन-होस्टेलजवळील भव्य व उंच चर्च-जवळून एक नंबरच्या बसने श्रीरंगमला गेलो. बसने जातांना ताडीची मडकी दिसली. इकडे ताडीमाडीचा प्रकार फार आहे. इकडच्या बसवर चढण्याची मोठी अडचण आहे. कारण, केवळ तामीळ लिपीतच बसवर लिहिलेले असते. हिंदी वा इंग्रजी मुळीच नाही. मातृभाषेचा हा अभिमान योग्य आहेच, यात शंका नाही. पण राष्ट्रभाषेचाहि आदर करणे आता नैतिकतेला व राष्ट्रीयतेला धरून आहे. इंग्रजी नाही, याची खंत नाही. इकडील लोकांना मद्रासच्या मानाने हिंदी कमी समजते. त्या दृष्टीने तामीळचा वापर सर्वस्वी योग्य असला तरी तामीळेतरांसाठी पाट्या देवनागरीत असणे योग्य वाटते. कमीतकमी तामीळ भाषेसाठी राष्ट्रलिपी देवनागरी नावागावांच्या बाबतीत वापरायला काहीच हरकत नाही.

जरी हिंदी वा इंग्रजीची अडचण असली तरी कामे अडतात असे नाही. काही तुरळक शब्दांनी (व कधी खाणाखुणांनी) कामे होतात. हिंदी-पेक्षा शिक्षितांना इंग्रजी समजते; तर इंग्रजी न जाणणारेच बहुसंख्य आढळतात. देवळातून वा व्यापारी स्थानी इंग्रजी चालते ती व्यापारी धोरणातून ! त्यामुळे ते इंग्रजीचे महात्म्य ठरत नाही. हिंदीहि अशा जागी चालू शकते.

तिरुचारीपल्लीपासून श्रीरंगम् ३ मैल आहे. त्रिची व श्रीरंगम् हे एकाच शहराचे दोन विभाग कावेरीने पडले, असे म्हटले असता चुकणार नाही. १३ नवे पैसे बससाठी द्यावे लागले. जातांना कावेरी नदीच्या पुलावरून बस गेली. बसमधून २८ तस्म्यांचा रेल्वेचा पूल दिसतो. पात्रात मधेमधे वाळूची बेटे दिसली. श्रीरंगमच्या वाटेने ताड, माड व झाडेझुडपे बरीच लागली. एके जागी वेळवांचे बनहि होते.

श्रीरंगमला बस थांबली, तेव्हा एक पंड्या मागे लागला. त्याने

विध्युक्त कावेरीस्नानाचा सल्ला दिला. आम्ही म्हटले, " अहंब्रह्मास्मि ! हम ही तो भगवान हैं । " पंड्या त्यावर म्हणाला, "तुम गुजराती हो !" पैसे न देणारे म्हणून आम्हाला पंड्याने तसे म्हटले असावे.

श्रीरंगमची प्रसिद्धी विष्णुमंदिरासाठी आहे. हे श्रीरंग–मंदिर दक्षिणभारतातील फार मोठ्या देवळांमध्ये गणले जाते. काहींनी त्याला सर्वांत मोठे ठरविले आहे. शेकडो दिवाणखाने असलेले हे देऊळ दक्षिणेतील एक मोठे श्रद्धाकेंद्र आहे.

श्रीरंगमच्या देवळात जाण्यासाठी प्रथम मोठे चार दरवाजे लागतात. नंतर परकोटाच्या आतील मंदिराला आरंभ होतो. चपला ठेवण्यासाठी दर्शनीद्वारावर चांगली व्यवस्था आहे. या किल्लेवजा मंदिराच्या ५ व्या दरवाज्यावर देवीदेवता असून त्याना धोतरे नेसविलेली आढळली. त्यामुळे मूर्तींचे मूळ सौंदर्य नष्ट झालेले होते.

परवाने असलेले माहिती देणारे लोक येथे मिळतात. या मंदिरात प्रथम २० फूट उंचीचा महाकाय गरुड दिसतो. काही दरवाजांच्या आत गेल्यावर बाजार भरलेला दिसतो. या बाजारात बिस्कीटपात्रांसारख्या दुर्मिळ वस्तु विक्रीस ठेवलेल्या होत्या.

काही दूर चालून गेल्यावर विष्णूच्या दर्शनाला जावे लागते. तेथे गेलो, तर देवाच्या खोलीला कुलूप दिसले. देवाला कुलुपात अडकवून ठेवण्याची रीत इकडील धर्मपंडितांना आवडते. देवाचे दागदागिने मूल्यवान असतात, हे कारण सांगितले जाते. पण ते तितकेसे पटणारे नाही. कदाचित् देवाच्या नावावर आपल्या सोयी पाहण्याचा वा देवाच्या भरवशावर पैसा मिळविण्याचा तो राजरोस प्रकार असावा. १०–११ नंतर कुलूप उघडले गेले. कुलुपाच्या दारातून आत गेल्यावर रांग लावून उभे राहावे व नंतर १–२ तासानंतर श्रीरंगमाचे क्रमाने जाऊन दर्शन घ्यावे ! श्रीरंगमाची पूजा करणारांनी ६ आण्यांचे तिकीट घेतले पाहिजे. बाकीच्यांना मात्र तिकीट नाही. तेथवर पोहचण्याचा गर्दीत त्रास घेतला

म्हणजे पुरे ! लांब अशी शेषशायी नारायणाची मूर्ति देवळात पहुडलेली दिसेल. इतक्या आत कोनट्याकानट्यात हे देव का जाऊन बसलेत ? मोगलकाळी शत्रूपासून संरक्षण म्हणून ही किल्लेकल्पना ठीक असली तरी परमेश्वराने आता आपले दर्शन सर्वांना द्यावे ! किंवा देवाची ही बंधनरूप दर्शन-योजना बंद होऊन त्यात सुटसुटीतपणा यावा !

-पण हे शक्यहि वाटत नाही.उत्तरेपेक्षा, विषेशतः मराठी लोकांपेक्षा दक्षिणी लोक अति श्रद्धावान आहेत. म्हणूनच सज्जनता हा त्यांचा एक अंगभूत गुण सांगता येऊ शकतो. हे एक बरीक चांगले असले तरी अति अंधश्रद्धा प्रगतीला मारकच म्हटली पाहिजे ! जेथेतेथे वेणीदान म्हणून टक्कल-चप्पी केलेल्या स्त्रिया पाहिल्या म्हणजे या धर्मभोळेपणाची कीव येते. रामेश्वराला हे वेणीदान विस्तृत प्रमाणावर होते. मराठी स्त्रियांना, वेणीदान करायचेच झाले तर वेणीदानाच्या नावाने १-२ बटा कापून देण्याची पद्धति स्वीकारल्यामुळे धर्महि घडतो व पळवाटहि निघते ! अर्थात, हे लक्षण प्रगतीचे आहे हे खरे असले तरी धर्माच्या नावाने केवळ २ बटा देऊन सोंग करण्यात येते, त्यात दांभिकता आहेच, हेहि नाकारता येत नाही.

देवळात सोन्याचे पाणी दिलेले स्तंभ आणि सोन्याचे पत्रे असलेले. दरवाजे आहेत. श्रीनारायणाच्या देवळामागे सोन्याच्या ९ कळसांचे एक मंदिर आहे नंतरचा भाग थोडा अंधाराचा आहे. चंद्रतलाव या मंदिराच्या मागच्या बाजूला आहे. या देवळात ठिकठिकाणी देणगीदारांच्या नावाचे दगड कोरलेले आहेत. ठिकठिकाणी दाराबिरांवर बऱ्याच घंट्या लटकलेल्या आढळल्या. छापील 'श्रीरंगममहात्म्य' येथे मिळते. त्यामुळे धार्मिक लोकांची सोय झाली आहे.

देवळातून परतल्यावर प्रवेशद्वाराजवळच्या 'सुंदरा लंच होम'मध्ये फराळ केला. सरबत कडू वाटले; तर कॉफीत साखरच नव्हती. वाटीपेल्यातून मिळणारी ही कॉफी चवीला मात्र चांगली असते. मेदुवडा येथे

मिळालाच; पण मद्रासला दोसा मिळण्याची जी अडचण, ती येथे जाणवली नाही. सर्व पदार्थ मात्र तांदळाच्या पिठाचे असतात.

श्रीरंगमच्या बसस्टॉपवर आम्ही उभे असतांना विंचू चावलेला एक तामीळी गृहस्थ तेथे दिसला. दोनतीन जणांनी तो विंचू मंत्रांच्या मदतीने उतरविण्याचा प्रयत्न केला. पण त्या माणसाच्या वेदना कमी झाल्या नाहीत. मंत्रतंत्रावर विश्वास फार, म्हणूनच तो माणूस शिक्षित असूनहि डॉक्टरवर विश्वास ठेवायला तयार नव्हता.

बसला वेळ होता. जवळच्या एका घरासमोर बाज पडली होती. तीवर आमच्यापैकी दोघेतिघे बसले. घरमालक हसला. बोलला नाही. त्या बाजेची गाते वेळवाची होती. दोरी नारळाची होती.

बसस्टॉपचे शेड ताडमाडांच्या स्वस्त पालापाचोळचांनी पण रेखीव पद्धतीने तयार केले होते. आर्थिकदृष्टचा परवडणारे हे काम ध्यानात ठेवण्याजोगे आहे. अशा छायागृहांचे नुकसान न करण्याची वृत्ति लोकांमध्ये निश्चितच असावी. म्हणूनच ती टिकतात. नागरिकत्वाच्या भावनेला लोक अधिक निष्ठावंत असावेत, हाच याचा निष्कर्ष !

आमचे मराठी–हिंदी बोलणे व निराळे वागणे हा या भागात एक कुतुहलविषय होता. श्रीरंगमला जातांना मी मुद्दाम धोतर, सदरा व टोपी या पोशाखात गेलो होतो; तर बाबाने वऱ्हाडी पद्धतीचा सोगा खांद्यावर टाकला होता.

एक नं. च्या बसने फोर्ट विभागात परत आल्यावर आम्ही रॉकफोर्ट बघण्यासाठी गेलो. हा उंच रॉकफोर्ट सुमारे १ हजार पायऱ्यांचा आहे. खडकात कोरलेल्या या किल्ल्याचे रूपांतर गणेशमंदिरात झाले आहे. बरेच 'विसावे' घेणारे दिवाणखाने ओलांडीत वर चढतांना थंड हवा चांगली वाटते. त्यामुळे चढतांना थकवा येत नाही. मनोवेधक अंतर्शिल्पासाठी हे स्थान प्रसिद्ध आहे. हा उभट किल्ला २७० फूट उंच आहे. तो पल्लवकालीन (इ. स. ६४०–७००) आहे. बऱ्याच उंच चढल्यावर एक

आडवा रस्ता लागतो. तेथे पार्वती व शिवमंदिर आहे. वस्तुतः जुन्या काळातील हे मोठमोठे दिवाणखाने आहेत. याच जागी एका खोलीतून त्रिचनापल्ली शहराचे सुंदर दृश्य दिसते. खिडक्यांमधूनहि त्रिची शहर पाहावेसे वाटते.

नंतर अत्युच्च शिखरावर चढण्यासाठी २ पैशांचे तिकीट काढून पुढे जावे लागते. हे 'पैसा–दान' या विभागातील अनेक देवळांत देव पाहण्यासाठी करावे लागते. वर जातांना पायऱ्या उघड्या असल्यामुळे उन्हाचा त्रास होत होता. रस्ता कोरीव खडकांमधून जातो. थोडे दूर गेल्यावर नळाचे पाणी पिण्याची सोय आहे. उन्हाळ्यात पाणी गरम असते. सर्वोच्च शिखरावर निरुंद जागेत गणेशमंदिर आहे. गणेशाची काळी मूर्ति कळंबच्या गणपतीपेक्षा लहान आहे. गणेशासमोर 'उंदीर–वाहन' मूर्तिरूपाने बसलेले आहे.

या जागेवरून संपूर्ण त्रिची शहर पाहावे. ती मनोवेधकता मनाला वेध लावते.अडीच लाख वस्तीचे हे संपूर्ण शहर येथून मोठे मनोहर दिसते. एका भागातून कावेरी नदीचे विशाल पात्र दिसते. मोटार–पूल व रेल्वे-पूल रेषांसारखे दिसतात. खालची लहान लहान माणसे व बुटकी बुटकी घरे झाडोळ्यात लपलेली दिसतात. गाडीच्या पुलावरून एक मालगाडी येताना मोठी मजेदार दिसत होती. या अत्युच्च शिखरावर एका उंच जागी ध्वज लावण्याची व्यवस्था आहे.

हा रॉकफोर्ट पाहून परतल्यावर मधल्या जागी नळाचे पाणी प्यावेसे वाटले. पण तेथे गजकर्णादि रोगाने पीडलेले लोकहि सर्रास पाणी पीत असल्यामुळे हिय्या झाला नाही.

फोर्टहून परतांना काही खरेदी झाली. कारण मुख्य बाजारपेठ त्याच भागात आहे. मुक्कामाला येताच जेवण तयार होते. अंगणातील झाडांच्या सावलीत पंगती बसल्या.


पुढील प्रवासासाठी रेल्वेच्या सवलती मिळाव्या म्हणून सकाळ-

पासून आज व्यवस्थापक प्रयत्नाला लागले होते. थकल्यामुळे ऑफीसच्या व्हरांड्यात ते झोपून गेले. जेव्हा साहेबांनी बोलावणे केले, तेव्हा ते जागे झाले. रेल्वे–अधिकाऱ्यांनी हेडमास्तरांचे व शाळेचे शिक्के आणायला सांगितले, तेव्हा आमचे गडी म्हणाले, "साहेब अमरावतीला जाऊन हवी ती माहिती आणता येईल. पण तोवर आमचे हे दहा दिवस संपूनहि जातील !"


सायंकाळी ५ वा. बसने कावेरीवर स्नानासाठी गेलो. कपडे धुण्यामुळे वेळ लागला. स्नान करतांना पाण्याजवळची पहिलीच पायरी सोडण्याची हिंमत झाली नाही. ओढाळ पाणी व भोवरे यांमुळे भीति वाटायची. कावेरीच्या पाण्याला नाहीतरी खळाळ व ओढ फार आहे. एक मुलगा येथेच गुडघाभर पाण्यात जाऊन डुंबला, तेव्हा न सावरून एकदम दूरवर वाहत गेला. श्री. टाकोडे गुरुजी तेथेच आंघोळ करीत होते. त्यांनी पोहत जाऊन त्याला पकडले. सर्वांना हायसे वाटले व एक घोर संकट श्री. टाकोडे गुरुजींच्या प्रयत्नांमुळे टळले.

अंधरायची वेळ झाली तेव्हा आम्ही कावेरी–पुलावरून पायी परतलो. सूर्यास्तवेळचे हृदयंगम दर्शन या पुलावरून घेणे प्रशस्त वाटते. फोर्टजवळ आल्यावर एका हॉटेलात दोसा–इडली झाली. दोसा खायला केळीची पाने टेबलावर देण्यात येतात. आपले खाऊन झाले की, ते पान हात धुण्याच्या जागी असलेल्या कचरापेटीत टाकावे, असा या भागात दंडक आहे. स्वच्छता व स्वयंसेवा या दृष्टीने ही पद्धति योग्य वाटली.

आमच्यातील छोटी छोटी मुले एकेकटयाने वा जोडीजोडीने भटकतांना दिसली. ही लहानलहान मुले अशीच शहरात फिरायची. मोडक्यातोडक्या हिंदीइंग्रजीत बोलून कामे करून यायची. त्यांच्या व्यवहारज्ञानात यामुळे भर पडायची. सहलींपासून असे अप्रत्यक्ष फायदे होतात, हे अशा वेळी पटते. घराबाहेर पडल्यामुळेच या अजाण मुलांना हे ज्ञान झाले, यात शंका नाही.



कन्याकुमारीचे गांधीस्मृतिमंदिर.
[पृ. ११७–११८]



बंगळोरचे विधानसभागृह. [पृ. १३४]
छाया– श्री. थूगावकर

‡‡‡‡ ‡‡-—

दि. १९ मेची सकाळ बहुतेकांनी बाजारात भटकण्यात घालविली. काही जणांनी सिगारेटी व चिरूट बनविण्याच्या लघु–उद्योग–वस्तीला भेट दिली.

या द्राविड–भागात घरे बांधत असतांना त्याला कंतान वा तट्टे बांधून लपवून ठेवतात. हा एकप्रकारचा आडोसाच असतो. त्यासमोर राक्षसासारखे एखादे बुजगावणे घराला टांगून ठेवतात. ते लटकते बुजागावणे मजेशीर दिसते. साधारणत: प्रत्येक घरबांधणीच्या जागी ही विशेष गोष्ट अनेक शहरी आढळली. कदाचित् दृष्ट लागण्याच्या कल्पनेतून हे खूळ निघाले असणे शक्य आहे.

सायंकाळी आम्ही जंबुकेश्वराच्या देवळात गेलो. या देवळाजवळ उपेक्षित अवस्थेतील एक कमळाचे तळे दिसले. जंबुकेश्वरमंदिरसुद्धा जुने असूनहि उपेक्षित वाटले. ते पडक्या अवस्थेत आहे. येथील शिल्प व श्रीरंगमाचे शिल्प तुलना करण्यासारखे आहे.

‘तिजोरी’साठी ‘गोलक’ हा शब्द इकडे हिंदी म्हणून बऱ्याच देवळांत लिहिला आहे. या देवळात महादेवाची पिंड असून ती पाहायला दक्षिणा देऊन बरेचदा क्रमांक लावावा लागतो अर्थात् देव कुलुपात नसेल तेव्हाच हे शक्य होते. या देवळाच्या प्रवेशद्वाराला समई-वजा दीपमाळ लावलेली आहे. तिचा तो मोठा आकार पाहून आम्ही स्तंभित झालो.

परत मुक्कामावर आम्ही आलो, तेव्हा त्रिचनापल्लीचें वैशिष्ट्ये म्हणून महिलांनी साड्या आणलेल्या होत्या. मुक्कामाच्या जागी अनेक बायकांच्या खरेदीच्या गप्पा चालल्या होत्या; तर विद्यार्थ्यांच्या गोष्टी कोणत्या बोलपटाला जायचे याबद्दलच्या होत्या ! जेवणानंतर ती मुले

हिंदी सिनेमाला गेली हे सांगायला नकोच ! एखादाच हिंदी खेळ शहरात चालू असायचा !

+++++++

शनिवार दि. २० मे ६१ रोजी आम्हाला तंजावरसाठी निघायचे होते. सकाळ होताच सामानाची बांधाबांध केली. ते सामान स्टेशनवर नेऊन आमच्या खास गाडीच्या सामानाच्या डब्यात ठेवायचे होते. 'सुषमा' नामक एक मालट्रक १० दिवसांसाठी किरायाने घेतला होता. इकडे मालवाहू लोकवाहक ठेल्यांना 'सुषमा', 'शांती' अशी काव्यमय नावे दिलेली होती. नाहीतर पब्लिक कॅरियरला दिलेली 'लोकवाहक' किंवा 'भाडोत्री वाहन' ही आपल्याकडची नावे कशी अगदी हीः वाटतात ! 'सुषमे'त आमचे सामान रचून झाल्यावर तिने ते सामान आमच्या खास गाडीच्या डब्यात भरण्यासाठी स्टेशनावर नेले.हो-स्टेशनावर म्हणजे चूकच; जंक्शन म्हणायला हवे. आपल्याकडे जंक्शन आणि स्टेशन हा भेद बोलण्यात आपण करीत नाही. तिकडचे लोक जंक्शन हा शद्ब प्रामुख्याने स्टेशनासाठी वापरतात. डब्यात सामान भरतांना सूटकेसेस, पेट्या, मोठे बिस्तरे अलग अलग ठेवण्याची काळजी घेतली. आम्ही आगामी प्रवासासाठी सोबत प्रत्येकी फक्त सतरंजी, शाल, खांद्याला अडकवावयाची एक थैली व एखाददुसरा पोशाख एवढेच हलके सामान घेतले. असे सामान बगलेत घेऊन कुठेहि जाणे सोयीचे असते व सामान कुठे ठेवावे आणि त्याची राखण कशी करावी याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

सवलतीची तिकिटे काढून आम्ही तंजावरला जाणाऱ्या पॅसेंजरगाडीत बसलो. त्या गाडीत आमच्याच विद्यार्थ्यांची गर्दी होती. जागा बऱ्या मिळाल्या, तरी कुरकूर होतीच. खास गाडीची सवय झाली होती. आता ती ताब्यात नसल्याची खंत होती.

मधल्या एका स्थानकावर भरदार मिशावाले व लांब शेंडीचे लुंगीवाले गृहस्थ आमच्या डब्यात शिरले. रिकामी जागा पाहून ते तीवर बसू लागले. तेव्हा आमच्यापैकी कुणीसे म्हणाले, "आमच्यापैकी एक मुलगी चहा घ्यायला गेली आहे. तिची ही जागा आहे."

तो गृहस्थ म्हणाला, "ती आल्यावर मी उठून उभा राहीन."

पण आमच्यातील काही जणांना ते न आवडून त्यांना उठायला ते सांगू लागले. त्यामुळे तो गृहस्थ चिडला व म्हणाला, "तुम्ही आमच्याच देशात येऊन असे चाळे करता हे ठीक नव्हे!"

'आमचा देश' या शद्बावर आमचा आक्षेप होता. मद्रास–विभागाला तो गृहस्थ'स्वदेश'समजून बोलत होता.आमच्यापैकी अनेकांनी आपला आक्षेप स्पष्टपणे मांडला. उभयपक्षात वादंग माजले.तो गृहस्थ भारतीयता विसरून स्वतःचे अभारतीयत्व सिद्ध करीत होता, असे आमचे म्हणणे होते. असा हा वाद करणारा गृहस्थ अखेर तंजावरच्या कॉलेजातील तामीळ भाषेचा प्राध्यापक निघाला. मीहि मराठी भाषेचा प्राध्यापक आहे हे कळताच तो शांत झाला. शेवटी त्याने हस्तांदोलन करून तंजावर दाखविण्याची तयारी दर्शविली. तो गृहस्थ चिडण्याला आणखी एक कारण असे की, आमच्या एका मुलाने त्याच्या शेंडीला व केसांना पाहून चिडवले आणि तो चिडला की 'आय ॲम् व्हेरी सॉरी सर' असे म्हणून आपलेच कान अनेकदा धरले. 'शिवशिव' असे त्या मुलाने म्हटले की तो आणखी चिडायचा. तो वैष्णव असावा. आपण महाराष्ट्रात हरिहरात भेद मानीत नसलो तरी इकडे तो भेद तीव्र आहे याचे प्रत्यंतर येथे आले. त्या प्राध्यापकाने शेवटी दाखविलेली सामोपचाराची वागणूक पाहून आम्हाला मद्रदेशीच्या सज्जन वृत्तीची पुन्हा एकदा जाणीव झाली.

तंजावर ( त्रिचीपासून ३५ मैल ) स्टेशनवर उतरताच 'राजवाड्या'ची चौकशी करीत आम्ही पैदल निघालो. बरेच जण

'बुलकबंडी'तून म्हणजे एक्कयातून गेले. राजवाडा मोठा असल्यामुळे त्याची भिंत सरता सरेना. खाजगी घरे व कार्यालये हीच त्या वाड्यात प्रथम आढळली. येथे 'मराठा कार्यालय' आढळले. मराठ्यांचे राज्य येथे बरीच वर्षे असल्यामुळे मराठी वातावरण व मराठी लोक यांचे दर्शन येथे घडले. एरवी हे दर्शन अशक्यच !

तंजावर शहराला इतिहासदृष्टया व संशोधनदृष्टया जागतिक महत्त्व आहे. येथील सरस्वतीमहाल हे ग्रंथसंशोधनाचे प्रचंड आगर आहे. सरस्वतीमहालाची जोपासना तंजावरच्या इतिहासाने केली आहे. म्हणून तो इतिहास पाहणे इष्ट ठरते.

तंजौरला प्रथम मुत्तरैयर राजे राज्य करीत होते जवळच्या 'शेंदलै' या आजच्या खेड्यात मुत्तरैयर राजांची राजधानी होती. ९ व्या शतकात मुत्तरैयर राजे पल्लवाचे मांडलीक झाले. चोळवंशीय विजयालन ह्याने (८५०–९०७ इसवी) तंजावर जिंकून आपल्या ताब्यात आणले. या काळात तमीळ वाङमय बहराला आले. चोळांची राजधानी तंजावरला होती. त्यावेळचे ते वाङमय अजूनहि सरस्वतीमहालात जपून ठेवलेले आहे. चोलानंतर विजयनगरची सत्ता आली. नायकांचे प्रतिनिधि तंजावरास राहू लागले. नायक हे सर्वकलांचे चाहाते होते. नायकांच्या राण्या विदुषी होत्या. राजदरबारात पंडित व विद्वान मंत्री असत. इ. स. १५३२ ते १६७३ पर्यंतच्या नायक राजांनी लिहिलेले व अपूर्व भाषाशैलीने नटलेले संस्कृत ग्रंथ सरस्वतीमहालात पाहावयास मिळतात.

विजापूरहून योगायोगाने शिवाजीचा सावत्र भाऊ व्यंकोजी तंजावरला आला व तेथील गादीवर तो इ.स.१६७६ साली बसला. या भागात मराठी राज्य स्थापण्याची अदम्य मनीषा व्यंकोजीने बाळगली होती. मदुरा व म्हैसूर येथील राजाचे हमले व्यंकोजीने परतवले. संस्कृत, मराठी व द्राविडी भाषांना व्यंकोजीने उत्तेजन देऊन वाढविले. शिवराम नामक ज्या कवीने लिहिलेल्या 'कामकलानिधि' नामक तेलगी ग्रंथात म्हैसूरच्या

आक्रमणापासून त्रिचनापल्ली किल्ल्याचा बचाव व्यंकोजीने ज्या धैर्याने केला, त्याचे सविस्तर वर्णन आहे.

व्यंकोजीचा पहिला मुलगा शहाजी (१६८४-१७१२) यांच्या कारकीर्दीत ग्रंथरचना फार झाली. शहाजी स्वत: कवि होते. त्यांच्या पदरी ४० विद्वान होते. शहाजींनी शास्त्रोक्त कर्नाटक संगीताचे ग्रंथ मिळवून जपून ठेवले होते.

सरस्वती महालासमोर दुसरे शरफोजी राजे यांचा पुतळा असून तो त्यांच्या हयातीतच उभारला आहे. सरस्वतीला नम्र अभिवादन करीत असलेली ही मूर्ति आहे. या नायककालीन पुतळ्याचा दगड १८॥ × १६।' इंच आहे. हा पुतळा ज्या मंडपात उभारला आहे तो मंडप १६ व्या शतकातील आहे. या मंडपाचे वैशिष्टच हे की, ९०० फूट लांबीवरील माणूसहि आपले बोलणे जसेच्या तसे या मंडपात ऐकू शकतो. जवळच नायक-दरबार व पूजागृह असून शस्त्रसामुग्री ठेवण्याची यंत्रचौकी आहे. म्हणूनच की काय, या राजवाड्यात हिंडतांना बिडी ओढण्याची वा अग्नि नेण्याची मनाई आहे. भुयारात अजूनहि बारुदीचे साठे असू शकतात.

नवागत राजांनी जुनी शिल्पे कायम ठेवल्यामुळे बहुतेक चांगल्या गोष्टी राजवाड्यात अजून जशाच्या तशा आहेत. जुनी बांधणी अजून कायम आहे. येथील राजदरबार म्हणजे एक अनोखे आश्चर्य असून हा राजवाडा मदुरेच्या राजवाड्यापेक्षाहि भव्य आहे. मराठेकालीन चित्रकारी वरील छपराच्या आत चितारलेली आहे. ती अजूनहि जिवंत अशी भासते. मराठे व इतर राजे यांच्या दरबाराची स्पष्ट कल्पना हा वाडा पाहून येते. राणीचा महाल, वरले झरोके, विशाल स्तंभ, भव्य सिंहासन याचे वर्णन येथे अशक्य आहे. राजवाड्याला अंगण व बाग यांनी शोभा आली आहे. या वाड्यात मराठेकालीन चित्रकारांनी काढलेली मराठे राजाची मोठमोठी चित्रे ठेवलेली आहेत.

जवळच सरस्वतीमहाल-ग्रंथालय आहे. येथील बरीचशी पुस्तके

दुसरे राजे शरफोजी यांनी प्रयासाने मिळवून ठेवली आहेत. त्यात बरी-चशी दुर्मिळ हस्तलिखिते आहेत. त्यावेळच्या जुन्या आलमाऱ्यासुद्धा अजून तशाच कायम ठेवल्या आहेत. तेथे ठेवलेल्या प्रत्येक पुस्तकात राजे शर-फोजींची सही आहे. बहुभाषी शरफोजींनी इंग्रजी, लॅटिन, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, इटालियन इत्यादि भाषेतील ग्रंथ मिळवून ते वाचले होते. त्यांनी विज्ञानाचीहि पुस्तके अभ्यासली होती. ती येथे अजून आहेत. विविध विषयांवरील पुस्तकांच्या संग्रहामुळे अभ्यासकांची चांगली सोय झाली आहे. एका फ्रेंच शास्त्रज्ञाचे सामुद्रिकशास्त्रावरचे सचित्र पुस्तक या ग्रंथा-लयात आहे. या ग्रंथात प्राण्यांची चित्रे काढून त्या चेहेऱ्याच्या माणसाचे गुणधर्म कसे ओळखावेत, ते सांगितले आहे. हे अभिनव पुस्तक पाहून अचंबा वाटतो. राजे शरफोजींनी जमविलेली अनेक छायाचित्रे या ग्रंथालयात पाहावयास मिळतात. इतकेच नव्हे तर इतर ठिकाणाहून आणलेली साधी चित्रे त्यांनी आपल्या चित्रकारांकडून सुंदर पद्धतीने रंगवून घेतली होती. तीहि येथील संग्रहात आहेत. एका चित्रात स्त्री-चित्राचा रति–अश्व तयार केलेला आहे.

सुंदर फडक्यात बांधून ठेवलेल्या अनेक पोथ्या येथे आहेत. महाभारत व भागवत यांवरील अप्रसिद्ध टीका येथे आहेत. माधवस्वामींची दुर्मिळ हस्तलिखिते येथे जपून ठेवली आहेत. या पोथ्यांमध्ये ससंदर्भ चित्रे आहेत. अडीचशे वर्षांपूर्वीची ती चित्रे आजहि नवीन वाटतात. मराठीप्रमाणेच तेलगू, तमीळ व संस्कृत पोथ्यासुद्धा येथे आहेत. तसेच मोडीचे बरेच नमुने ठेवलेले आहेत. शरफोजीकृत अठरा खंडांचा तामीळी भाषेतील एक वैद्यकग्रंथ या महालात आहे. राजे शरफोजींनी तंजावरला एक धन्वंतरी–महाल स्थापन केला होता. ताडपत्रावरील वाङमय येथे बरेच आहे. अतिसूक्ष्म अक्षरांचा एक नमुना या ग्रंथालयात आहे. एका अक्षरात अनेक अक्षरे गोवली आहेत. ही अक्षरे दुर्बिणीतून पाहावी लागतात.

सध्या हे ग्रंथालय सरकारजमा झाले असून ग्रंथप्रकाशनासाठी मद्रास सरकार बरीच मदत देते. हा सरस्वतीमहाल दाखविण्यासाठी श्री. गणपतिराव (आडनाव सरखेल) यांनी अगत्य दाखविले. ते मराठीभाषी असले तरी आता इकडचेच झाले आहेत. त्यांनी आम्हाला खूप माहिती दिली. संशोधनासाठी मदतीचे आश्वासन त्यांनी दिले. श्री. गणपतिराव लेखक आहेत. त्यांची हिंदी–मराठीत संशोधनात्मक पुस्तके आहेत. श्री. घाटगे हेहि मराठीभाषीच ! ते तेथे कर्मचारी आहेत. आम्ही सुमारे ३०० लोक महाराष्ट्रातून आल्यामुळे त्यांना आनंद झाला. श्री. घाटगे यांच्या मध्यस्थीने राजवंशातील हयात असलेले वृद्ध राजे भोसले यांची भेट झाली. ते व मा. डॉ. पंजाबराव देशमुख परस्परांना नेहमी भेटतात, असे राजेसाहेबांनी सांगितले. त्यांनी डॉ. भाऊसाहेब देशमुख ह्यांना नमस्कार सांगण्यासाठी सुचविले.

नंतर आम्ही 'झटका' उर्फ 'बुलकबंडी' करून बृहदेश्वरमंदिराकडे गेलो. या बुलकबंडीला एक बैल जुंपलेला होता व तिचे स्वरूप एक्क्यासारखे होते. बंडीवाल्याला भाषा समजत नव्हती. तो मोठा प्रेमळ पण हेंगाडी गावरान माणूस वाटला. माझ्या डोळयात गेलेला कचरा काढण्याचे उपाय त्याने खुणाखाणांनी सांगितले.

बृहदेश्वरमंदिर उघडे नव्हते. पण दक्षिणेच्या आशेने पुजाऱ्याने बाहेरचे मुख्य फाटक उघडले. या देवळाला परकोटाआत फार मोठा आवार आहे. इकडील इतर मंदिरांमध्ये प्राकारांनी व आच्छादनांनी जागा व्यापलेली असते. तसे येथे नाही. आवार स्वच्छ आहे. हे मंदिर चोलवंशीय राजाराज नामक राजाने ११ व्या शतकात बांधले. या मंदिराच्या पहिल्या प्राकारात चोलकालीन चित्रकला आहे. शैव, वैष्णव व बौद्ध यांच्या मूर्ति या एकाच देवळात आहेत. असे इकडे फारसे आढळत नाही. या देवळातील मुख्य मूर्ति बृहदेश्वराची उर्फ विश्वदेवाची आहे. सुमारे सव्वाशे शिवलिंगे परकोट–प्राकारांमध्ये मांडली आहेत.

येथील सर्वात मोठे आकर्षण म्हणजे आवारात मंदिरासमोर असलेला दगडी नंदी ! सुमारे दीड माणूस उंचीचा व २० फूट लांबीचा हा नंदी रामेश्वराच्या नंद्याला सौंदर्यात व रेखीवपणात मागे टाकील ! भारतात या नंद्याचा मोठेपणात २ रा क्रमांक लागतो. हा नंदी म्हणजेच या देवळाचे अनुपम सौंदर्य, असे म्हणणे सत्याला सोडून होणार नाही.

या मंदिराचे रेखीव शिल्प आणि हे मंदिर दाक्षिणात्य संस्कृतीचे एक मानचिन्ह असल्याचा उल्लेख होतो. चोलांच्या सर्व मंदिरात हे एक 'मोठे मंदिर' आहे, असे म्हटले जाते. पाश्चात्यांच्या मते हे मंदिर भारतात सर्वात मोठे आहे. त्याचे मुख्य गोपूर २१६ फूट उंच आहे. या मंदिराच्या प्रवेशद्वारावर ८० टनांचा दगड असून तो आणण्यासाठी ४ मैलांचा खास मार्ग तयार केला होता असे सांगतात.

हे मंदिर सर्वांना खुले असल्याचे महात्मा गांधींचे ( दि. २९–७–१९३९ चे ) प्रमाणपत्र येथे लावले आहे. या सनातन भागातील या मंदिरात हरिजनप्रवेश इतक्या पूर्वी व्हावा हे व्यवस्थापकांच्या दृष्टीने अभिनंदनास्पद आहे. म्हणूनच की काय, येथे आणा दोन आणे दक्षिणा मागणाऱ्या एखाद्या दारवानाशिवाय पोटभरू पंडेपुजारी फारसे दिसले नाहीत.

तंजावर गावात दक्षिणी धर्तीची एकूण ७४ मंदिरे आहेत. 'शिवगंगा बाग' नामक स्थान येथे पाहण्याजोगे आहे.

आम्ही झटक्यातून परत आलो, तेव्हा खिचडीची जेवणे आटोपत आली होती. 'सुषमा' मालट्रकमधून आमचे धान्य व स्वयंपाकी आले होते. भुका फार लागल्या होत्या. म्हणूनच की काय शेवटच्या लोकांना पहिली खिचडी पुरली नाही.

सायंकाळी ४–३० वा. कुंभकोणमकरिता आम्ही पॅसेंजर–ट्रेनने रवाना झालो. जेथे जागा मिळेल तेथे आमचे लोक चढले.

आमच्या शेजारी श्री. पद्मनाभम् नामक सुशिक्षित गृहस्थ बस-

लेले होते. ते त्रिचीचे होते. त्यांनी आमची चौकशी केली. सरलताईंनी चर्चेच्या भरात त्यांना म्हटले, "तुमच्या भागात काही ठिकाणी आम्हाला पाणी विकत घ्यावे लागले !"

त्यावर श्री. पद्मनाभम्, यांनी खेद प्रकट केला, "असे असेल तर आम्हा दक्षिणी लोकांना ते लांच्छन आहे. मी असे आजवर कधीच इकडे पाहिले नाही. पण तीर्थात तुम्हा नव्या लोकांना बनविणारे काही स्वयं-स्फूर्त व समयस्फूर्त धंदेवाले तयार झाले असावेत. वस्तुत: इकडे पाणी भरपूर आहे."

श्री. पद्मनाभम् यांनी वर्षातील तीन पिके काढण्याच्या इकडील रीतींची माहिती दिली. 'उत्तरेपेक्षा धार्मिकता व श्रद्धा यांच्यात आमचे लोक पुढे आहेत' हे त्यांनी आपले प्रामाणिक मत दिले. ते आणखी म्हणाले, "उत्तरेचे लोक दक्षिणी-संस्कृतीचे दर्शन घ्यायला नेहमीच येतात. असे असूनहि इकडचे देव दुपारी झोपतात व दर्शकांची गैरसोय करतात, हे वाईट आहे. निदान उत्तरेकडील प्रवाशांसाठी तरी ही देवळे उघडी ठेवण्याची व्यवस्था झाली पाहिजे. यात दक्षिणेला कमीपणा नसून उलट त्यांना ती गोष्ट भूषणावहच आहे !"

कुंभकोणमला आम्ही सायंकाळी ६॥ वा. पोहचलो व थकल्या-मुळे प्लॅटफॉर्मवर पथाऱ्या पसरून सुस्त झोपलो. संपूर्ण प्लॅटफॉर्म आमच्या वानरसेनेने व्यापला होता.

दि. २१ मे ६१ रोजी सकाळी आम्ही काही जणांनी सायकली भाड्याने घेतल्या व देवळांचे गाव कुंभकोणम पाहण्याचा कार्यक्रम दुपार-पर्यंत आटोपला. मद्रासपासून १९४ मैल अंतरावर हे गाव कावेरी आणि

अरसलर नदीच्या मधोमध वसले आहे. कांचीप्रमाणेच नाना देवळांचे हे गाव आहे.

येथे महामहम तलाव आहे. या ठिकाणी दर १२ वर्षांनी स्नान–पर्वणी म्हणून यात्रा भरते. नागेश्वर, चक्रपाणी, कुंभेश्वर, स्वामीनाथ, सारंगपाणी इत्यादि मंदिरांतील शिल्प दक्षिणी धर्तीचे आहे. एका मंदिरात मुख्य देवाला जातांना दक्षिणायनात एका रस्त्याचा व उत्तरायणात दुसऱ्या मार्गाचा वापर करावा लागतो. उपलीआप्पा नामक देऊळ म्हणजे तिरूपति बालाजीच्या देवळाची प्रतिकृति आहे. कुंभेश्वर-मंदिरातील दीपहार–समई छान आहे.

कुंभकोणम् दक्षिण भारताचे केंब्रिज म्हलेविले जाते. पहिल्या दर्जाचे एक कॉलेज कावेरी–तीरावर आहे.

कुंभकोणमला धानी व ग्रामोद्योगी रेशमी–सुती कापडाचा व्यापार फार मोठ्या प्रमाणात चालतो. पितळी व चांदीची भांडीहि येथे घडविली जातात. नेचियर-मंदिर नामक ६ मैलांवरील गावी राज्य सरकारने घंटचा करण्याचा उद्योगधंदा सुरू केला आहे.

दुपारी जेवण आटोपून आम्ही १–४० वा. च्या गाडीने पुढे जिदंबरमाठी रवाना झालो.

मायंकाळी ५।। वा. चिदंबरम् स्थानकावर आम्ही पोहचलो. चिदंबरम् हे स्थान धार्मिकांच्या मते 'पृथ्वीवरील स्वर्ग' आहे. येथील सर्वोत्कृष्ट मंदिर नटराजाचे असून ते पाहण्यासाठी आम्ही सायंकाळी पायीच गेलो. रबरी चपलांनी चालून चालून पाय सुजल्यामुळे सुशीलास त्रास होत होता. सुटसुटीत सौंदर्य, टापटीप व स्वच्छता यांबाबत नटराज-मंदिर आवडले. मन:प्रसन्नता घडविणारे अवडंबरहीन दक्षिणी धर्तीचे एवढे एकच मंदिर साऱ्या प्रवासात आढळले. हिरे, मोती, सोने यांची खैरात मंदिरात असली तरी तिने बेढबपणा कुठेच आणला नाही. नटराजमूर्ति मोहक आहे विष्णु व शिव या एकाच मंदिरात निवास करीत

असलेले पाहून बरे वाटले. येथे मोठमोठ्या चाकांवरून साखळ्या ओढून वाजविण्यात येणाऱ्या घंट्या होत्या. त्या फक्त पूजेच्या वेळी वाजवितात. आम्ही मंदिरात गेलो त्यावेळी आरती–पूजा झाली. विशिष्ट वेळी पूजा संपली की, तेथील पुजारी देवाचा टोप प्रत्येक भक्ताला घालतो. आम्हीहि या टोपात आपली डोकी अडकवून घेतली !

अन्मत्र दुर्मिळ असलेले चोल–शिल्प येथे आहे. त्यात भरत-नाटयाच्या काही शिल्पकृति आहेत. या स्थानी पंच ज्योतिर्लिंगांपैकी 'आकाशलिंगा'चा वास आहे !

नटराजमंदिरात एक पुष्करिणी आहे. कार्तिकेयस्वामींचे चंदेरी मंदिर लगतच असून त्यात स्कंदपुराणातील चित्रकथा छपरावर आतून चितारली आहे.

परत नटराज–मंदिराच्या गोपुराजवळ आलो, तर तेथे सौ. सिंधूच्या चपला नव्हत्या. एकावर एक अशा ढीग करून आम्ही ५–६ जणांनी चपला ठेवल्या होत्या. एरवी इकडील अनेक देवळांच्या दाराशी चपला राखण्यासाठी काही मुले बसतात. त्यांना दोनचार पैसे दिले की ती कुटुंबातील सर्वांच्याच जोडेचपलांची राखण करतात. यावेळी आम्ही तो संकेत न पाळल्यामुळे चपला गेल्या ! ती खंत मनात बाळगीतच आम्ही स्टेशनाकडे आलो. स्टेशनाकाठी एक साधेसे चपलांचे दुकान होते. तेथे चपला खरेदी करण्यासाठी गेलो व केवळ प्रवासापुरत्या चालतील अशाच, पण फॅशनेबल अशा चपलांचा एक जोड निवडला. भाव ५ रु. सांगण्यात आला. त्या २ रु. त मागितल्या. दुकानदार देईना. २॥ वर त्याने भाव उतरविला. अखेर आम्ही २ रु. त्याच्या हातात कोंबले व चपला न घेताच तेथून चालू लागलो. तरीपण, दुकानदार ऐकेना. ही गंमत पाहण्यासाठी बरेच लोक जमले. शेवटी आम्ही हार खाऊन २। रु. दिले व तो जोड विकत घेतला.

एका तासाने आमचा जुनाच जोड फेकलेल्या अवस्थेत देवळात

कुणालासा पडलासा व त्या १॥-२ रु.च्या चपलांसाठी २ रु.ची पार्टी द्यावी लागली.

चिदंबर स्थानकाच्या फलाटावर जागा कमी म्हणून, थंडीत व मातीत बऱ्याच लोकांना झापावे लागले.

卄卄卄-

२२ मे ६१ रोजी सकाळी पुन: मी नटराजमंदिराला गेलो. तेथे एक गंमत बघितली. गोपुराच्या आत देऊळ सुरू झाले की, चपला हातात घेऊन बऱ्याच दूरवर जाता येते; पण पायात मात्र त्या नकोत ! अर्थ हा की, देवाकडे जातांना अनवाणी जावे ! देवाला पाठ दाखवू नये म्हणून जसे इकडे लोक मंदिर संपेपर्यंत मागेमागे (कधीकधी दोन्ही हातांनी आपले दोन्ही कान पकडून ) येतात, तसाच हा जोडेचपलांचा प्रकार असावा ! सोवत्यांच्या चपलांचा रक्षक म्हणून मी द्वारावर बसलो तेव्हा या मंदिराचा एक प्राकार अपूर्ण वा ढासळलेला असल्याची शंका आली. कारण फक्त खांबच त्या भागात आढळले !

नटराजमंदिरातून परत आल्यावर अन्नमलाई युनिव्हर्सिटी पाहण्यासाठी गेलो. एका मोठ्या क्षेत्रात वसलेली ही युनिव्हर्सिटी या भागातील फार मोठे आकर्षण आहे. इ. स. ११२९ मध्ये स्थापन झालेल्या या विद्यापीठाला आशियाई महत्त्व आहे. विशिष्ट शिक्षणकेंद्र म्हणून या विद्यापीठाचा लौकिक आहे. या विद्यापीठात संगीताच्या मदतीने रोपटी वाढविण्याचे प्रयोग चालू आहेत. या विद्यापीठाच्या एका तरुण प्राध्यापकाने वाद घालून 'भारतापासून आम्ही अलग राहू इच्छितो' असे विचार पटविण्याचा प्रयत्न केला. हे विलगीकरणाचे अ-भारतीय जहर इकडील काही जागी तीव्रतेने जाणवले !

दुपारी १॥ वाजता चिदम्बरहून पॅसेंजर-गाडीने पांदेचरीसाठी निघालो. आमच्या डब्यात श्री. अरुण वसू व श्री. अशोक वसू हे लोक बसले होते..श्री. अशोकरावांनी हा विभाग पूर्वी पाहिला असल्यामुळे ते आम्हाला अगोदरच पाहावयाच्या स्थानाची माहिती देऊन ठेवीत असत. श्री. अरुण वसू हे नेहमी विनोदाने जोराने कोंबडीसारखा आवाज करीत. म्हणून त्यांचे 'कोंबडी' हे ट्रीपमधील सर्वांच्या आवडीचे नाव झाले होते. आद्याक्षरांनी हाका मारण्याची नवी पद्धत त्यांनी अंगिकारलेली होती. त्यांना अशोक म्हणावयाचे असल्यास ते 'अकार' म्हणत. 'विजू' म्हणावयाचे असल्यास ते 'विकार' म्हणतील किंवा 'उत्तम'साठी 'उकार' वापरतील !

मध्ये विल्पुपुरमला गाडी बदलावी लागली. पांदेचरीला जातांना उसाचे आक्रमण तांदळाच्या पिकावर होऊ लागल्याचे दिसू लागले. तंबाखू, मिरच्यांचे वाफे व पानवेली दिसू लागल्या. त्याशिवाय कालवे, बागा, पाणी, धान, पऱ्हाटी ही इकडली नेहमीची वैशिष्टये होतीच.

एका स्टेशनावर (बहुधा 'चिन्नबावूसमुद्रम्' हे त्याचे नाव असावे) त्या भागातील भटक्या जमातीच्या लहान लहान मुली २-२ पैशांसाठी बाहुल्यासारख्या नाचत होत्या. मुलांनी गोंधळ केला तेव्हा मात्र त्या पळाल्या.

पांदेचरी हे शेवटचे स्टेशन असल्यामुळे गाड्यांची आवकजावक रात्री नव्हती.म्हणून स्टेशनच्या बाहेरील आवारात अक्षरश: धुळीमध्ये आमचे सारे लोक झोपले. जेवणासाठीहि धुळीचीच जागा मिळाली. आम्ही समोरच्या 'बुखारी' फलाहारगृहात जाऊन गोल, चकलीसारखी परोटापोळी व मिसळीसारखी भाजी खाल्ली. उकाडा मी म्हणत होता. त्यामुळे झोप लागत नव्हती. रात्री १२ वाजता आम्ही काही जणांनी जवळच्या नळाखाली आंघोळी केल्या. पोलिसांनी रात्री येऊन उगाच अनेक चौकशा केल्या व जोराने बोलून झोपमोड केली.

‡‡‡‡‡‡+—

दि. २३ मे ६१ पहाटे ४ वा. उठून स्नानादि विधि आटोपले व लगेच योगी अरविंद बाबूंच्या आश्रमात पायी गेलो. तेथे माताजी सकाळी ठीक ६ वाजता सर्वांना दर्शन देतात. सडकेवर प्रवासी व स्थानिक लोकांची खूप गर्दी जमली होती. आमचेहि काही लोक रिक्षांनी तर काही पायी आले होते. माताजी जेव्हा गॅलरीत येऊन उभा राहिल्या, तेव्हा वातावरण एकदम शांत व गंभीर झाले. सर्वांनी त्यांना हात जोडले. माताजी १० मिनिटे सर्वांकडे पाहत राहिल्या व शेवटी स्मित करून आत गेल्या. त्या गौरवर्णी महत्तर महिलेने डोक्यावर झिरझिरीत शुभ्र कपडयाचे विशिष्ट आवरण बांधले होते.

त्यानंतर आम्ही श्री अरविंदबाबूंच्या समाधीचे दर्शन घेऊन तो संपूर्ण आश्रम पाहण्याचे ठरविले. समयाभावी तो पूर्ण पाहता आला नाही. जनसेवेच्या दृष्टीने अनेक विभाग या आश्रमाने चालविलेले आहेत. ध्यानयोगमंदिरात काही भक्त ध्यानार्थ बसले होते. ग्रंथप्रकाशन, कृषि, उद्योग आदि अनेक विभागांवर या आश्रमाने जोर दिलेला आहे.

नंतर आम्ही समुद्रावर गेलो. समुद्राच्या किनाऱ्याकिनाऱ्याने लाटांची गंमत बघत आम्ही फ्रेंच राज्यकालीन बागेत येऊन विसावलो. ही बाग विस्तृत व साफ आहे. पांडीचे रस्ते सुंदर वाटले. जवळच एक काचगृह आहे. पण ते अगदीच भुक्कड आहे. पांडीमधील पोलीस निराळ्या टोपीचे होते. फ्रेंचांच्या जुन्या राजवटीच्या त्या खाणाखुणा आहेत !

दुपारी १ वाजताच्या सुमारास आम्ही मेत्तूरडॅमसाठी सालेमला जायचे म्हणून गाडीने निघालो. विल्पीपुरमला गाडी बदलावी लागली. तेथे 'खास डबा' म्हणून एका डब्यात चढलो; तर तो रेल्वेच्या 'खजिन्या-साठी राखीव' असल्याचे समजल्यामुळे आमची तेथून उचलबांगडी झाली.

प्रयासाने दुसऱ्या डब्यात जागा शोधल्या. गाडी पुनः वृद्धाचलमला बदलावी लागली. प्रवास बराच लांबचा झाला. रात्री १२ वाजले तेव्हा आम्ही सालेमला पोहचलो व फलाटावर झोपलो.

++++ ++-

दि. २४ मे ६१ ला पहाटेच्या गाडीने आम्ही मेत्तूरसाठी निघालो. मेत्तूरकडे लाल माती व डोंगर यांचा भाग अधिक दिसू लागला. लोक कष्टाळू वाटले. ते जोडधंदे करून आपल्या उत्पन्नात भर घालीत असतात. या भागातच ( कुठे नक्की आठवत नाही ) 'पेद्दनायक्कलनपालयम' अशा लांबलचक नावाचे एक स्टेशन लागले. संपूर्ण पाटीभर एवढे लांबलचक नाव पाहून आम्हाला मौज वाटली.

मेत्तूर हे शेवटचे असे लहानसे स्टेशन आहे. येथे पाण्याची वा प्रतीक्षालयाची नीट व्यवस्था नाही. येथे उतरताक्षणी आम्ही बस केली व ३० न. पै. देऊन मेत्तूरधरणाला गेलो.

या धरणाची सुरुवात 'स्टॅनले पार्क' नामक बागेने होते. येथे बघण्यासाठी एक आण्याचे तिकीट काढावे लागते. हा बाग कावेरीच्या पाण्यावर सुंदर तऱ्हेने सजविला आहे. सुटसुटीत, मोकळा, रचनेत अकृत्रिम व स्वच्छतेत कमालीचा चांगला असा हा बाग आहे. या बागेला लागूनच शेकडो पायऱ्यांचे मधोमध चढण-रस्ते असलेला बांध आहे. तो उंच मान करून पाहतांना मान दुखते व पायऱ्यावर चढण्याचा प्रयत्न केला असतांना डोळे फिरतात !

बागेतून चालत आम्ही कोपऱ्याला येऊन धरणाच्या एका टोकावर चढलो व बांधावरून चालत चालत दुसऱ्या टोकाला आलो. धरण ५३०० फूट लांब आहे. या लांब सडकेवरून चालतांना एकीकडे स्टॅनले पार्कचे दृश्य आणखीच मनोहर व रेखीव दिसते;

तर दुसरीकडे कावेरीचे अडवलेले पाणीच पाणी आढळते. या बांधाची उंची ७५० फूट व रुंदी १७० फूट आहे. मद्रासच्या गव्हर्नराने या बांधाची कोनशिला २० जुलै १९२५ रोजी घातली व १९३४ मध्ये हे काम संपले. बांधाचे पाणी वाहत होते, तेथे एक पॉवरहाऊस आहे.

या भव्य धरणावरील एका नळावर आम्ही स्नाने उरकली व तेथून चालतच मुक्कामाला आलो. बसचा रस्ता डोंगरातून व नागमोडी वळणाचा असला तरी पायदळांसाठी मात्र हे धरण गावाच्या अगदी जवळच आहे, असे अनुभवाअंती कळून चुकले.

परतल्यावर जस्ताचा कारखाना, सुती कापडाची गिरणी, मेत्तूर चंदन कारखाना इत्यादि संस्था काही जणांनी जाऊन बघितल्या.

जेवणासाठी सालेमला थांबलेल्या 'सुषमे'तून पुरी-भाजीच्या व दही-भाताच्या पुड्या आणून वाटल्या गेल्या. फलाहारगृहांना ग्राहक मिळाले. न्हाव्याने जास्त पैसे उकळले व पानवाल्याने भाव वाढविले ! 'नॅशनल उपहारगृहा'ने मात्र स्त्रियांना स्नानगृह वापरण्याची परवानगी दिली.

मेत्तूर तसे म्हटले तर लहानसे गाव ! येथील अडाणी लोक आमची 'यात्रा' पाहायला आमच्याभोवती जमले. त्यांच्या दृष्टीने आम्ही 'प्रदर्शनीय वस्तु' होतो. ते आमच्यापैकी एखाद्याला विचारीत, "ती बाई त्या तरुणाची कोण ?" तो तरुण तिचा कोण ? मुलेमुली खेळीमेळीने एकत्र वावरत असल्यामुळे असले प्रश्न ऐकू येत.

सायंकाळी आम्ही परतीच्या रेल्वेने सेलम येथे आलो. सेलमची प्रसिद्धी स्थानिक साड्यांसाठी व हातमाग कापडासाठी असल्यामुळे रात्रीच दुकाने धुंडाळण्याची धडपड करावयाचे ठरविले. परंतु, जेवणात वेळ गेल्यामुळे व जंक्शनपासून सालेम-बाजार दूर असल्यामुळे जाण्याचे रहित केले. काही जणांनी मात्र, स्वस्त कापड, घोंगड्या व सतरंज्या आणल्या. आम्ही जंक्शन-प्लॅटफॉर्मवर सतरंज्या पसरून पडलो ! पण गाड्यांचा

३२६८० ३०५९ कृ. प्रवास २८।१०।६१

धडधडाटात झोप कमीच लागली. थकल्यामुळे त्या धडधडाटाचे स्वरूप सौम्य झाले, इतकेच !

दि. २५ मेच्या सकाळी 'याला घे त्याला घे' या गडबडीत स्त्रीवर्ग गुतलेला असल्याकारणाने मी घाई केली, तेव्हा कुठे बरेचजण बसवर चढले. सुमारे अर्ध्या तासाचा प्रवास करणारी १९ पैसेवाली बस जेव्हा स्टँडवर आली तेव्हा प्रथमच श्री. चव्हाण यांनी मार्केटाऐवजी येरकाडला चलण्याचा आग्रह केला. कारण मार्केट ९ वाजता उघडणार होते. तेव्हा, मार्केट राहिले बाजूला आणि येरकाडला जाण्याचे ठरले.

एरकाड (Yercaud) हे मद्रास राज्यातील एक उत्कृष्ट थंड हवेचे ठिकाण असल्याचे आधीच कळले होते व तेथे दुपारी आम्ही जाणारहि होतो. पण आताच ८–३० वाजता आम्ही तयारी केली व ९ च्या बसने जायचे ठरले. तत्पूर्वी हॉटेलात उबविलेली अंडी, हलवा, नानखटाई इत्यादि पदार्थांवर ताव मारला.

९ वाजता बस आमच्याच लोकांनी भरली. डॉ. अण्णासाहेब पडोळेहि आमच्या गाडीत होते. नंतरच्या मोटारींनी बाकीचे लोक आले.

येरकाडला चढतांना असीम आनंदाचे भांडार लुटायला मिळते. काश्मीरसारखी चढण, मसुरीसारखे उंचात्र, महाबळेश्वरप्रमाणे पॉईंटस्, चिखलड्याप्रमाणे वनश्री येथे पाहावयास मिळते. फोंडा, आंबोली, पोफळी, आजरा या घाटांची आठवण होते. डामरी सडक शेवटपर्यंत असून एकदम सरळ वळणाच्या जागा सिमेंट–कांक्रीटने मजबूत केल्या आहेत. वरवर चढतांना एका बाजूने खोल कपारींची भयाणता व दुसऱ्या बाजूने सहज कोमळतील अशी भीति दाखविणारे भव्य फत्तर व डोंगर यांच्या मधून

आपली गाडी जात असते. दोन गाड्यांची भेट झाली की ती पुढे नेण्याला अतिशय अडचण जाते. फार काय जात्या वा येत्या गाडीलाच वळणांच्या जागी गाडी मागे नेऊन पुढे काढावी लागते. पोंग्याशिवाय काम निभत नाही. अतिशय कठीण अशी २० वळणे घेत मोटार वर जाते.

उंच चढण चढतांना आपण विमानातून जात असल्याचा भास होतो. वरच्या बाजूला बघावे तर पेटणारे पर्वत दिसतात. वस्तुतः तो धूर नसतो, धुके असते. खालचे ऊन कुठेच दिसत नाही. उलट पावसाळी बादल जिकडेतिकडे संचरलेले वाटतात. अत्यंत वाकडी वळणे सुरू होतात तेव्हा हवेत गारवा वाढायला लागतो. गाडी वळणे फार घेते, म्हणून भय वाटते. आमच्या बसमध्ये God Bless असे लिहिलेले होते. त्याच्याकडे अशावेळी लक्ष जायचे. खालची वनश्री पाहण्यासाठी आम्ही बसमध्ये उठून उठून उभे होत होतो. त्या स्वर्गपुरीच्या मार्गावरून वर जाणारे काही सायकलस्वारहि आढळले. वरच्या बाजूचे डोंगर धुक्यात पार मिसळून गेलेले दिसत होते. ते ढगच होते. त्यामुळे डोंगर व ढग यात फरकच करता येईना. ढग अगदी जवळून जात होते. तुरळक अशी खालची शेते सतरंज्या पसरल्यासारखी दिसत होती.

१३ व्या वळणानंतर, सुमारे ३५०० फुटांवर काही घरे आढळली. एका ठिकाणी मुक्कामाचे एक गजांच्या खिडक्यांचे बंद घर भर जंगलात आढळले. वनपशूंपासून संरक्षण साधून स्वयंपाक वगैरे करण्याची व राहण्याची व्यवस्था तेथे होत असावी. बऱ्याच जागी डोंगरकडा बांधून काढावा लागला. रस्ता थोडा कमी रुंद असला तरी तो साहेबाच्या लहान मोटारींसाठी योग्यच होता. आता त्याचा उपयोग सर्रास होतो. रस्ता मोठा करणे आज तरी जिकरीचे ठरेल.

साडेतीन हजार फुटांवर पाईनसारख्या अति उंच वृक्षांच्या घनदाट बनातून रस्ता पुढे धावतो. त्यावेळी मंडपातूनच जात असल्यासारखे वाटते. गार सावली सर्वत्र आढळते. हवा शीतल व मंद भासते.

निलगिरी व कॉफीच्या झाडांची पैदास विपुलतेने आढळते. कॉफीची बनेच्या बने मोठ्या झाडांखाली वाढविलेली दिसतात.सातव्या वळणावर चढतांना खालील ७ वळणांची सडक सात जागी पायऱ्यांप्रमाणे दिसते. एका ठिकाणी छोटे गाव असून तेथे केळींच्या बागा आहेत. १९ व्या वळणावरून मेतूरडॅम दिसते.

या मनोरम दृश्यांना हृदयात साठवितांना राजा नामक विद्यार्थी म्हणाला, "आपले १८० रुपये फिटले." त्यावर मी म्हणालो, "आता उरलेल्या प्रवासासाठी आणखी पैसे द्या." डॉक्टर पडोळे म्हणाले,"आमचे मात्र सेलम ते अेरकाड प्रवासाचे एक रुपया दोन आणे फिटले !"

विसाव्या वळणानंतर अत्युच्च शिखरावरील सपाट भागात वर-खाल वसलेले अरकाड गाव लागते. प्रथमच एका तलावाचे दर्शन घडते. आजूबाजूच्या गवतावरील दवाने पाय ओले होतात. थंडीने अंगावर काटा उभा राहतो. या तलावात बोटींगची सोय आहे; पण मासे पकडण्यास तेथे बंदी आहे. तेथे एक बगिचा पण आहे.

बसस्टँडवर उतरून आम्ही प्रथम एका हॉटेलात गेलो. तेथे १० नव्या पैशांत चहा व ११ नव्या पैशांत ब्रेड मिळते हे पाहून नवल वाटले. या भागातील उतकमंड किंवा कोडाईकॅनॉल या दोन्ही थंड ठिकाणांपेक्षा येरकाड कितीतरी स्वस्त असून तसाच त्याचा लौकिकहि आहे. येथे स्वस्त दराची सरकारी घरे भाड्याने मिळू शकतात. सुमारे ४८०० फूट उंचीवर हे ठिकाण आहे.

हॉटेलाच्या जवळ पानाच्या ठेल्यावर इकडील पद्धतीप्रमाणे आम्ही १ नव्या पैशाची सुपारीची पुडी घेतली व तोंडात टाकली. तेथेच एका दुकानात नारळाच्या टोकरांचे चाटू विकायला ठेवले होते. ते मजबूत असून त्यांची किंमत एक–एक आणा होती.

आम्ही या स्थानी फिरायला सुरवात केली, त्यावेळी इतके ढग जमले होते की १५–२० यार्डांवरील माणूस ढगातून चालल्यासारखा

आपली गाडी जात असते. दोन गाड्यांची भेट झाली की तीं पुढे नेण्याला अतिशय अडचण जाते. फार काय जात्या वा येत्या गाडीलाच वळणांच्या जागी गाडी मागे नेऊन पुढे काढावी लागते. पोंग्याशिवाय काम निभत नाही. अतिशय कठीण अशी २० वळणे घेत मोटार वर जाते.

उंच चढण चढतांना आपण विमानातून जात असल्याचा भास होतो. वरच्या बाजूला बघावे तर पेटणारे पर्वत दिसतात. वस्तुतः तो धूर नसतो, धुके असते. खालचे ऊन कुठेच दिसत नाही. उलट पावसाळी बादल जिकडेतिकडे संचरलेले वाटतात. अत्यंत वाकडी वळणे सुरू होतात तेव्हा हवेत गारवा वाढायला लागतो. गाडी वळणे फार घेते, म्हणून भय वाटते. आमच्या बसमध्ये God Bless असे लिहिलेले होते. त्याच्याकडे अशावेळी लक्ष जायचे. खालची वनश्री पाहण्यासाठी आम्ही बसमध्ये उठून उठून उभे होत होतो. त्या स्वर्गपुरीच्या मार्गावरून वर जाणारे काही सायकलस्वारहि आढळले. वरच्या बाजूचे डोंगर धुक्यात पार मिसळून गेलेले दिसत होते. ते ढगच होते. त्यामुळे डोंगर व ढग यात फरकच करता येईना. ढग अगदी जवळून जात होते. तुरळक अशी खालची शेते सतरंज्या पसरल्यासारखी दिसत होती.

१३ व्या वळणानंतर, सुमारे ३५०० फुटांवर काही घरे आढळली. एका ठिकाणी मुक्कामाचे एक गजांच्या खिडक्यांचे बंद घर भर जंगलात आढळले. वनपशूंपासून संरक्षण साधून स्वयंपाक वगैरे करण्याची व राहण्याची व्यवस्था तेथे होत असावी. बऱ्याच जागी डोंगरकडा बांधून काढावा लागला. रस्ता थोडा कमी रुंद असला तरी तो साहेबाच्या लहान मोटारींसाठी योग्यच होता. आता त्याचा उपयोग सर्रास होतो. रस्ता मोठा करणे आज तरी जिकरीचे ठरेल.

साडेतीन हजार फुटांवर पाईनसारख्या अति उंच वृक्षांच्या घनदाट बनातून रस्ता पुढे जातो. त्यावेळी मंडपातूनच जात असल्या-सारखे वाटते. गार सावली सर्वत्र आढळते. हवा शीतल व मंद भासते.

निलगिरी व कॉफीच्या झाडांची पैदास विपुलतेने आढळते. कॉफीची बनेच्या बने मोठ्या झाडांखाली वाढविलेली दिसतात.सातव्या वळणावर चढतांना खालील ७ वळणांची सडक सात जागी पायऱ्यांप्रमाणे दिसते. एका ठिकाणी छोटे गाव असून तेथे केळींच्या बागा आहेत. १९ व्या वळणावरून मेतूरडॅम दिसते.

या मनोरम दृश्यांना हृदयात साठवितांना राजा नामक विद्यार्थी म्हणाला, "आपले १८० रुपये फिटले." त्यावर मी म्हणालो, "आता उरलेल्या प्रवासासाठी आणखी पैसे द्या." डॉक्टर पडोळे म्हणाले,"आमचे मात्र सेलम ते अेरकाड प्रवासाचे एक रुपया दोन आणे फिटले !"

विसाव्या वळणानंतर अत्युच्च शिखरावरील सपाट भागात वर-खाल वसलेले अरकाड गाव लागते. प्रथमच एका तलावाचे दर्शन घडते. आजूबाजूच्या गवतावरील दवाने पाय ओले होतात. थंडीने अंगावर काटा उभा राहतो. या तलावात बोटींगची सोय आहे; पण मासे पकडण्यास तेथे बंदी आहे. तेथे एक बगिचा पण आहे.

बसस्टॅंडवर उतरून आम्ही प्रथम एका हॉटेलात गेलो. तेथे १० नव्या पैशांत चहा व ११ नव्या पैशांत ब्रेड मिळते हे पाहून नवल वाटले. या भागातील उतकमंड किंवा कोडाईकॅनॉल या दोन्ही थंड ठिकाणांपेक्षा येरकाड कितीतरी स्वस्त असून तसाच त्याचा लौकिकहि आहे. येथे स्वस्त दराची सरकारी घरे भाड्याने मिळू शकतात. सुमारे ४८०० फूट उंचीवर हे ठिकाण आहे.

हॉटेलाच्या जवळ पानाच्या ठेल्यावर इकडील पद्धतीप्रमाणे आम्ही १ नव्या पैशाची सुपारीची पुडी घेतली व तोंडात टाकली. तेथेच एका दुकानात नारळाच्या टोकरांचे चाटू विकायला ठेवले होते. ते मजबूत असून त्यांची किंमत एक–एक आणा होती.

आम्ही या स्थानी फिरायला सुरुवात केली, त्यावेळी इतके ढग जमले होते की १५–२० यार्डांवरील माणूस ढगातून चालल्यासारखा

दिसत होता. जवळची पुष्करिणी तर अगदी आकाशच वाटत होती. तीमधील पाणी मुळीच दिसत नव्हते.

हे गाव शिखरावरील जंगलात असून तेथे मध्यावर तळे आहे. येर म्हणजे तळे आणि कॉड म्हणजे जंगल. जंगलातील तळे म्हणजे येरकाड !

येरकाडला बॅडमिंटन, व्हॉलीबॉल, फूटबॉल इत्यादि खेळांची मैदाने आहेत. एका जागी गुन्ह्याचा शोध लावणारी ४० कुत्री बाळगली होती. ही सरकारी मालकीची होती. अंतर्सालीवर प्रयोग करण्यासाठी सरकारी लागवडहि जवळच्या नागलूर गावी केली आहे. कुरुम चामडे वगैरेसाठी ह्याचा उपयोग होतो. पेपरमींटप्लँटस व युकॅलिप्टसचा छोटा कारखाना येरकाडला असून या सेंट-फॅक्टरीत निरनिराळी सुगंधी द्रव्ये तयार होतात. ती बाहेरदेशी व देशात पाठविली जातात. कॉफीचे कारखाने येथे आहेत. येरकाडला एकशेसाठ वर्षांचे एक जुने घड्याळ टॉवरवर टांगले असून त्याचा लोलक माणसापेक्षा लांब, आहे. भली मोठी घंटा असलेल्या या घड्याळाला काच नाही. ते आजवर कधीच बंद पडले नाही.

आम्ही येथील विस्तृत मैदानी जंगलात वसलेल्या 'रीट्रीट' भागाला (Retreat) परवानगी काढून भेट दिली. ह्या भागात बऱ्याच दूरवर आत गेल्यावर सुमारे आठ लाख रुपये खर्चून बांधलेले चर्च आढळले. चर्चचे सर्व लोक बाहेर वनभोजनासाठी गेले होते. एक इटालियन फादर भेटले. त्यांच्याशी डॉ. पडोळे बोलले. फादरसाहेब तरुण व अगत्यशील होते. खरे म्हणजे भारतीय लोकांपेक्षा मिशनचे लोक सज्जन, नम्र व सौजन्यशील असतात असा अनुभव आहे. या 'रीट्रीट'मध्ये आधी संत्री, कॉफी, लिंबू, शेप इत्यादींची बने दिसली; तर चर्चसमोर एक सुंदर खेळाचे मैदान मिळाले. मैदानाच्या काठावर उभे राहून खालील सौंदर्य पाहिल्यास त्यातील अवीट गोडी अविस्मरणीय अशी राहते.

आम्हाला चर्च दाखविण्यात आले. तेथे कमालीची शांतता होती. आम्हीहि काही वेळ थांबून त्या शांतीचा अनुभव घेतला. या प्रार्थनामंदिरात लांब बाक असून त्यांसमोर बायबल व तत्सम अभ्यासपुस्तके ठेवली होती. समोर मंचकावर येशूची करुणगंभीर मूर्ति असून सहासहा लहानमोठ्या मेणबत्त्यांच्या आकाराच्या कलात्मक रचनेमागे ती उभी टाकली आहे. हे प्रार्थनामंदिर वरच्या मजल्यावर असून त्याखालील दर्शनी भागी मेरीची अकृत्रिम मूर्ति लाल दगडांच्या एका गुहेत बसविलेली आहे. या प्रार्थनामंदिरात एकदोन हजार लोक सहज बसू शकतील.

अजून ११॥ वाजले तरी ऊन पडले नव्हते. ढग कमी झाले नव्हते. फार तर रीट्रीटमधल्या मैदानातून खालचे निसर्गसौंदर्य पाहतांना खाली ऊन, शिळाण वा काळा-पिवळा भाग मध्येमध्ये दिसत होता.

नंतर आम्ही बॉक्साईटचा कारखाना पाहण्यासाठी उतार–रस्त्याने गेलो. त्या लहाशा कारखान्याच्या व्यवस्थापकाने पद्धति नसूनहि अगत्याने परवानगी दिली. चिन्नू नावाच्या, थोडे हिंदी येणाऱ्या कामगाराने आम्हाला माहिती दिली. हा कामगार पूर्वी पुण्यात काही दिवस होता. बॉक्साईटचा लाल दगड या भागात मिळतो. त्यांचे ढीग पडलेले होते. बॉक्साईट व दगडी कोळसा भट्टीत टाकून ते मिश्रण गरम–लाल केले जाते. कडक विटकरी तयार होतात. त्यात लाल भाग राहिला तर तो शुद्धीकरणासाठी अलग काढला जातो. नंतर तीन चक्क्यांमधून त्या विटकरी बारीक बारीक करीत नेतात व शेवटी त्यांचे चाळणीतून चूर तयार करतात. नंतर त्या भुरक्यांच्या थैल्या बंद करतात व त्या बाहेर पाठवितात. त्याचा उपयोग धार लावण्याचे दगड बनविणे, मॅंडपेपर्स करणे इ. साठी करतात. ह्या कारखान्याचे मुख्य कार्यालय दिल्लीला असून त्याचे मालक श्री. दालमिया असल्याचे कळले.

हा कारखाना पाहून बाहेर पडलो तेव्हा तामीळ भाषेत कामगार काहीतरी बोलले. आमच्यापैकी काहीजण खादीधारी होते. एक काम-

गार म्हणाला "खाआदी !" डॉ. पडोळे म्हणाले, "खा आधी, हा खादीचा अभिनव अर्थ आपल्याला कळला."

तेथून आमची मंडळी पुढे मॉंटफोर्ट स्कूलकडे गेली. आम्ही दोघे-जण आभार मानण्यासाठी मॅनेजरकडे गेल्यामुळे आमचा रस्ता चुकला. त्या चुकामुकीत 'प्रेमिकांची गल्ली' आढळली व या लोकांना हाका देत देत ती पार करीत पुढे चालू लागलो. ती गल्ली जंगलातून जात होती. पुढे एका घरी शिरलो. तेथील फुले तोडली व रस्ताहि विचारला. नंतर एक उंच टेकाड–रस्ता चढून मॉंटफोर्टस्कूलजवळ आलो.

या शाळेत गेलो, तेव्हा १२ ला १० मिनिटे कमी होती. जेव-णाच्या टेबलांवर थाळ्या तयार होत्या. ५ मिनिटांनंतर घंटा वाजली व मुले जेवण–घराकडे पळाली. एका शिक्षकाला माहिती विचारली तर ते वेळ नसल्यामुळे आपल्या 'कर्तव्या'साठी जेवणाच्या जागी लगबगीने गेले. तेवढ्यातल्या तेवढ्यात एका छोट्या मुलाला माहिती विचारली तर त्याला त्याचे घर ती शाळाच असल्याचे फक्त सांगता आले. तो हसला व पळाला. आमच्यापैकी एकाने सयामी मुलाशी हस्तांदोलन केले, तर त्याला त्याचा हात गादीत घातला असेच वाटले.

या शाळेत केंब्रिज मॅट्रीकपर्यंतचे शिक्षण मिळते. इराक, इराण, चीन, जपान, सयाम इत्यादि देशातील लहानमोठी मुले शिकतात. अँग्लोइंडियन विद्यार्थ्यांसाठी शेकडा ४० जागा राखून ठेवल्या जातात. या शाळेतील विद्यार्थ्यांना खाकी पोशाख आवश्यक आहे. मुले वेळे-वर कामे करतात व चुकूनहि टंगळमंगळ करण्याची त्यांची इच्छा नसते. जबाबदारीची जाणीव अगदी लहान वयातच येथल्या मुलांना समजलेली असते. सारे व्यवहार कसे शान्त चुपचाप बिनबोभार आणि शिस्तबद्ध चाललेले असतात.

या शाळेतील दिवाणखान्यांच्या मधोमध उघडझाप होणारी दारे लावून दोन खोल्या केल्या जातात व तेथे स्वतंत्र वर्ग भरतात.

बाकांमध्ये कुलुपांची फडताळे असून त्यात विद्यार्थ्यांची पाठ्यपुस्तके असतात. पुस्तके वर पडली तरी चोरीला जात नाहीत. इतकी दानत आमच्या विद्यार्थ्यांत आहे काय ? आम्हालाहि अशा ह्या शाळांपासून व या विद्यार्थ्यांपासून बरेच शिकता येईल.

या शाळेला निरनिराळ्या खेळांची सुव्यवस्थित मैदाने असून येथील बोगनवेलीचे विविध रंग मोहविणारे आहेत. शाळेचा व्याप फार मोठा आहे. दुसऱ्या मजल्यावर लॅबोरेटरी आहे.

त्यानंतर आम्ही सुमारे एक मैल अंतरावरील 'लेडी-सीट-पॉईंट'वर गेलो. जातांना रातराणी, मधुमालती, गुलाब, चाफा याचे झुबके तोडून ते जवळ बाळगण्याची हौस कित्येकांनी भागवून घेतली. या फुलाना येथे वाण नाही. गुलाब मात्र कमी आहेत. चढउतारांचा रस्ता गर्ल्स स्कूलच्या पुढे वळणावळणाने जातो. मोटारचा रस्ता संपतो तेथे मोटार वळवण्यासाठी लहानसा चौका आहे. आम्ही पायीच गेलो होतो. या चौक्यानंतर निमुळता रस्ता पुढे सरकतो. नंतर भले मोठे दगड दिसतात. नंतर मात्र एकेकट्यानेच गेले पाहिजे ! शेवटच्या दगडावर जाताच डोळे फाटतात. तेथे झोपूनच समोर पाहावे लागते. खालच्या भागाचे दृश्य तर अलौकिक असे दिसते. ऊन खाली असले तरी वर मात्र वादळी वातावरणच दिसते. गार हवेचे झोत खाली गर्तेत ढकलतील की काय अशी भीती वाटते. पक्षांचे आवाज व झाडांचा सळसळाट चालू असतो. या पॉईंटवरून वर येणारी सडक १५ जागी पायऱ्याप्रमाणे दिसते. ते नागमोडी वळण बघत असतांना त्यावरून जाणारी एक बस अगदी लहानशा डब्याप्रमाणे दिसत होती. दुर्बिणीतून पाहिले तर सालेम शहर जवळच दिसते. दुर्बिणीशिवाय पाहिल्यास ते लहान दिसते. या पॉईंटवरून बाजूला किल्ल्याप्रमाणे तट असलेले विक्राळ डोंगर आव्हान देतांना आढळतात. हा पॉईंट महाबळेश्वरच्या विल्सन-पॉईंटपेक्षाहि चांगला आहे. येथील सृष्टिसौंदर्यदर्शनाचा आनंद मनमुराद लुटण्यातील स्वारस्य काही और आहे !

'शेरवान पीक' नावाचा एक सुंदर 'पॉईंट' येथे पाहण्यासारखा आहे. तो गावापासून ४ मैल अंतरावर आहे.

येतांना गाव पाहिले. केवडचाचे उंच झाड या गावात बघितले. येवढा उंच केवडा तत्पूर्वी मी पाहिला नव्हता. उंच दीपमाळेप्रमाणे मला तो भासला. गावातून जातांना पाऊस लागला. पण ती सर लगेच ओसरली, गावात एक प्राथमिक शाळा दिसली. ती मात्र अगदी 'भिक्कार' वाटली. एका ठिकाणी सार्वजनिक वाचनालयाची पाटी वाचली. एका घराला सुंदरसे लाकडी विमान टांगलेले होते. एका माडीवर लाल तोंडाचे वानर साखळीने बांधले होते.

या ठिकाणी फक्त मलेरियाचा काहीसा त्रास असावा. बाकीचे रोग येथे फारसे फिरकत नसावेत.

परतणाऱ्या बसची मात्र भानगड झाली. एकच खाजगी बस-कंपनी या रस्त्यावर असून तीमध्ये मनमाने कारभार असावा असे वाटते. जातांना २४ हि सीटस् आम्ही घेतल्या होत्या. पण येतांना कंडक्टर व ब्रोकर (स्टँड–एजंट) यांनी संगनमत करून ओळ लावायला सांगितले. 'ओळ लावली तर ५–५ तिकीटे देऊ' असे तो म्हणाला. आम्ही रांग केली तर त्यांनी तामीळी लोकांना तिकिटे दिली. नंतर एकएकच तिकीट आम्हा काहीजणांना दिले. आमच्यापैकी एकाने तर सरळच म्हटले, "तुम रुंडुगुंडू बोलनेवालेको टिकीट देते !"

आमच्या बसनंतरच्या बसमध्ये तर फारच भानगडी झाल्या. काहीजण पुढच्या नागलूर गावी जाऊन परत आले. बाकीच्या 'हिंदी' लोकाना त्या तामीळी बसवाल्यांनी तिकीटे देण्यास साफ विरोध दर्शविला. एकहि अधिक सीट घेतली नसली तरी मध्येमध्ये अनेकांना खाजगीरीत्या बस थांबवून तीत घेतले जाई. या भानगडीमुळे व खुल्लमखुल्ल्या गडबडी-मुळे आमची काही मुले चिडली, तेव्हा मारामारीचा प्रसंग आला व सुमारे ३०० लोकांनी आमच्या २०–२५ लोकांना अक्षरश: मारण्याचा

घाट घातला. राठी नामक विद्यार्थ्याने मात्र लुंगी असल्यामुळे 'इल्ले' म्हणताच त्याला वगळून २–३ जणांना चांगलाच मार बसला.

ही तक्रार घेऊन जेव्हा राठींसह काहीजण पोलीसस्टेशनकडे गेले, तेव्हा मात्र तमीळ लोक चाट पडले. तरीपण एकाधिकार असलेले अरबट बसवाले समोर गेले व त्यांची पोलीसांशी काहीतरी बोलणी तमीळमध्ये झाली. सबइन्स्पेक्टरने आमच्या लोकांना परत पाठविण्याची हमी दिली.

या बस–मोटारींमधून कुत्राहि स्वतंत्र सीटवर बसून जाऊ शकत होता !

या अनुभवांवरून काही जणांनी सेलमहून परतीची तिकिटे काढली व ते येरकाडला गेले. यामुळे येरकाडचे मोटार–एजंट चाटच झाले !

रात्री परतणारांना घाटातून व वरून सेलमची रोपणाई पाहावयास मिळाली. आकाशातून तारे दिसावेत, तसे दृश्य दिसायचे ! दिवसा परतणारे लोक वरचे पॉईंटस् खालून पाहू शकतात !

आम्ही निघेपर्यंत, म्हणजे दुपारी २। पर्यंत ऊन पडले नव्हते. २॥ वा. ऊन दिसू लागले. आम्ही ३। वा. सेलममध्ये आलो व बाजारात भटकून सायं. ५ वा. परत फिरलो.

सायंकाळी जेवणाच्या वेळी एक म्हातारा पंगतीत आला. तो मेत्तूरडॅमपासून सोबत होता. त्याला हिंदी व इंग्रजी येत असून मराठी गायन व भाषण तो करी. आपण तंजावरचे भिक्षुक असून १९१७ मध्ये आपल्याला वेड लागले असे तो सांगत असे. घरी जाताच बायको पायात साखळया अडकवून बांधून ठेवते, असे त्याचे म्हणणे होते. कोणी लफंगा ( की पंड्या ? ) वाटून त्याला आम्ही तंबी दिली. ( नोकरास हाका मारतांना तंबी असा शब्द इकडे वापरतात ! )

एक उत्साही कंडक्टरहि आज बसमध्ये भेटला होता. त्याला फक्कड इंग्रजी येत होते. तसेच एका व्हॉटेलात अगदी साखरभरलेले पान

खायला मिळाले ! जेवणानंतर आज प्लॅटफॉर्मवर लोक जवळजवळ झोपले. कारण पोलिसाने सांगितले होते, " सेलममध्ये हातमाग–कापड घ्या; पण उशाशी घेऊन झोपू नका. या व्यापारी गावात भुरटे चोर आहेत."

++++++-

दि. २६ मे च्या पहाटे ३ वाजताच सर्वांना उठवून देण्यात आले व सायडींगला पडलेल्या एरोड–गाडीत चढायला सांगण्यात आले. त्या-प्रमाणे घाईघाईने अनेकांनी त्या अंधाऱ्या गाडीत जागा पटकावल्या व ताणून दिली. त्यामुळे पहाटेला ५ वा. गाडी केव्हा निघाली ते फारसे कुणाला कळले नाही.

सकाळी ७ वा. ईरोडला गाडी आली. तेथून त्रिचीसाठी ९–१५ वा. दुपारी गाडी असल्यामुळे मधला वेळ फराळपाण्यात घालविला. या ईरोड शहरातून मद्रासला दूधपुरवठा होतो. सुमारे ३० चौ. मैल क्षेत्रा-तून गोळा केलेले दूध रात्री एक्स्प्रेसने मद्रासला रवाना होते. १० तासात दूध मद्रासला पोहचते.

गाडी तिरुचीला जात असतांना ११–११॥ च्या दरम्यान त्रिराक्किकयम स्टेशननावर एक अर्धवयीचा मिशीवाला माणूस गाडीत चढला. बऱ्याचशा जागा आम्ही अडवलेल्या होत्या.वस्तुत: ५२ च्या जागी ६० लोक होते परंतु बाहेरची गर्दी दारात शिरून उभी राहिली हे त्या माणसाला खपले नाही. आमच्या काही मुलांचे पत्ते रंगले होते. त्या माण-साने आरोप केला, "तुम्ही जुवा खेळता." एका मुलाने 'जिस देशमे गंगा बहती है' हे गीत म्हटले. त्या गीतात ' दक्षिण ' हा शद्ब आला. त्या माणसाला कसला राग आला कोण जाणे, तो एकदम भणकला, " तुम हमको गाली देते हो ! " त्याचीच काय, पण इतर दाक्षिणात्यांचीहि

समजूत अशी की, "उत्तरवाले आमच्यावर कुरघोडी करतात. उत्तरेचे लोक दक्षिणी लोकांना शिव्या देतात." वास्तविक त्या गीतात कोणालाच शिव्या नव्हत्या. त्याला हिंदी नीट येत नव्हते, त्याचा तो परिणाम होता. तो म्हणत होता, "हम १२ सालका था तब सब देश घूमा। हिंदी जानता है।" पण ही त्याची फुशारकी होती.त्याला हिंदी येत नव्हते. श्री.वानखडे गुरुजी म्हणालेहि, "आप गलत समझते हैं। हम महाराष्ट्रवाले दक्षिणीहीं हैं।" बरेच समजावल्यावर तो शांत झाला. तामीळ, मल्याळी, तेलगू व कानडी लोकांनाच तो प्रथम दक्षिणी समजत होता ! पण आता मात्र त्याला आमचे पटलेले दिसले. उतरतांना तो बोलला, "हमारा कमहिंदीसे हम समझा नहीं। हमारा गलती माफ करना जी !"

दुपारी २॥ वाजता गाडी त्रिचीफोर्ट स्टेशनला लागली. तेथे मी उतरलो. बाकी लोक जंक्शनला उतरले. धोब्याकडील अर्जंट कपड्यांच्या परतीची तारीख २० होती. मी एक आठवडा उशीर केला होता. मी त्या धोब्याला जाऊन उठवले. तो घाबरलेला दिसला. कारण त्याच्याकडे अनेकाचे कपडे पडले होते. ते परक्याचे ओझे वागवायचे कसे, या संभ्रमात तो होता. त्या सज्जन धोब्याने आमचे कपडे चिठ्ठीशिवाय दिले. तरीपण, लपेटायला दोरा व कागद देण्यासाठी तो कुरकुरला.

परततांना आम्ही जवळच्या कॉर्पोरेशन छात्रालयात गेलो. तेथे एका हॉलमध्ये 'कल्याणम्'चा म्हणजे लग्नाचा कार्यक्रम चालू होता. तेथून विमानतळ पाहण्यासाठी जायचा बेत होता. पण तो रद्द केला. येथून कोलंबो-मद्रास विमाने जा-ये करतात. त्रिचनापल्लीला न्हाव्याची दुकाने अत्यंत आकर्षक अशी आहेत. इतकी चांगली आरसे-सजावट मी नागपूर-अमरावतीकडील केशकर्तनालयात बघितली नाही.

त्रिची जंक्शनवर पडून असलेल्या आमच्या खास गाडीत, म्हणजे ४० दिवसांच्या आमच्या घरात, आम्ही पुन: ठाणे दिले. रात्री उघड्यावर झोपल्यामुळे खूप धूळ उडाली व बिछाने वालुकामय झाले !

++++ ++-

दि. २७–५–६१ रोजी मुक्काम त्रिचनापल्लीलाच होता. कापड पाहण्यासाठी बाजार धुंडाळला. कपडे धुतले. दुपारी व रात्री मनसोक्त झोपा काढल्या. पाहण्यासाठी काही उरले नव्हतेच. सायंकाळी स्टेशन–पुलाकडे फिरायला गेलो. मंद व शीतल वायु खात पुलाच्या कठड्यावर बसलो असतांना दोन मराठी तरुण आमचे मराठी बोलणे ऐकून थांबले व बोलले. ते स्टेशनमास्तरांच्या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्रातून आले होते.

++ ++ ++-

दि. २८ मे ६१ ला सकाळीं ९ वाजता जेवणे झाली- श्री. चव्हाण व श्री. एन्. एल्. पाटील यांच्याशिवाय वाढायला कुणी नव्हते. म्हणून वाढायला घेतले. प्रत्येकालाच तशी बांधाबांधीची घाई झाली होती. पूर्वी-प्रमाणेच याहि खेपेला आम्ही आपले सामान आमच्या खास गाडीच्या ब्रेकडब्यात टाकले व थोडेसे सामान घेऊन रामेश्वराला निघण्याची तयारी केली.

रामेश्वरसाठी पॅसेंजर–गाडीत आम्ही बसलो. ११–१५ ला गाडी सुटण्याची वेळ झाली, तरी आमचे स्वयंपाकाचे सामान अजून आले नव्हते. सामान घेऊन स्वयंपाकी दुसऱ्याच प्लॅटफॉर्मवर गेले होते. तेव्हा धांदल करून आमच्या ५० युवकांनी एकसाथ सर्व सामान १० मिनिटात आणले व निरनिराळ्या डब्यात कोंबले !

मानामदुराई स्टेशनावर आमच्यासाठी काही खास डब्बे गाडीला जोडण्यात आले. येथे आम्हाला गाडी बदलावी लागली. सपाटून भुका

लागल्या तेव्हा श्री. चव्हाणांचे फराळाचे डबे पूर्णतया रिकामे केले. पिण्याच्या चांगल्या पाण्याची मात्र या विभागात चणचण जाणवली. एरवी इकडे भरपूर पाणी मिळायचे. त्या पार्श्वभूमीवर ही चणचण जाणवणे सहाजिक होते. एका स्टेशनावर तर पाणी अगदीच खारट लागले.

मंडपम्‌कॅम्प स्टेशन सुटले. याच स्टेशनावरून सिलोनला निघायचे होते. नंतर पांबन पूल लागला. चालत्या गाडीतून आम्ही पांबन पुलाखालील सागराचे चांदण्यामध्ये दर्शन घेतले. रामेश्वर हे एक बेट असून या बेटाला जाण्यासाठी हा पूल बांधला आहे. हा पूल पार करण्यासाठी गाडीला सुमारे १० मिनिटे लागली. हा पूल पाहण्यासाठी पुनः यायचे असल्यामुळे आम्ही पांबन स्टेशनला उतरलो नाही.

रात्री ९ च्या दरम्यान आम्ही रामेश्वरला उतरलो. मदुरेपासून १०० मैलांवर असलेल्या या भारताच्या आग्नेय टोकाच्या धामाला स्टेशनाची मात्र तितकीशी चांगली सोय नाही. आता काहीशी नवरचना सुरू आहे. स्टेशनाजवळ प्रवाशांसाठी उतरण्याची सोय आहे. पण ती महाग आहे. रात्री आम्ही स्टेशनाबरील वाळूत झोपलो !

++++++--

दि. २९ मे ६१ ला सकाळी उठतांच आम्ही एक धर्मशाळा ताब्यात घेतली, स्टेशनावर पाण्याची मुळीच सोय नव्हती. नित्यविधि आटोपल्यावर पायीच रामेश्वरमंदिराकडे रवाना झालो.

रामेश्वरमंदिराची जुनी गोपुरे नवी केली जात आहेत. काही गोपुरांवरची चित्रकारी पाश्चात्यांच्या कलेशी तुळण्याजोगी आहे. हे मंदिर अतिशय विशाल आहे. श्रीरामचंद्राने रावणहत्येच्या पापशमनार्थ केलेल्या शिवस्थापनेमुळे या स्थळाची उत्पत्ति झाली, सीतेनेहि या लिंगप्रतिष्ठानात भाग घेतला; म्हणून येथे महादेवाला रामलिंग, रामनाथ

असे म्हटले जाते–अशा तऱ्हेच्या कथा आहेत ! एकदीड मैल लांबीरुंदीच्या रामेश्वर गावाच्या मध्यात समुद्रकाठी हे मंदिर वसले आहे. या मंदिराच्या चारी बाजूंनी बागा आहेत. त्यांना 'रामेश्वराचे नंदनवन' असे म्हणतात. देवळातील वीजपुरवठ्यासाठी देवळात एक स्वतंत्र वीजघर आहे. मंदिरात लांबरुंद असे दीर्घपथ असून त्यात हजारो खांब व मोठमोठे दिवाणखाने आहेत.

या मंदिरात माधवतीर्थ नावाची सरोवरवजा विहीर असून ती-मधल्या पाण्याने लोक आंघोळी करीत होते. तेथेच सेतुमाधवमंदिर आहे. तेथे एक मुलगा 'तीर्थस्नान घडवितो' म्हणून एक लहान बादली घेऊन आमच्याकडे आला. तोच मुलगा रात्री आम्हाला भेटून 'मला गाईड करा, तुम्हाला मी रामेश्वर दाखवितो' असे म्हणाला होता व १–१॥ तासापूर्वी भीकहि मागत होता. दुपारी तो अन्न मागत होता. तोच मुलगा दुसऱ्या दिवशी दूध विकतांना दिसला. अशा तऱ्हेने फुरसतीने भीक मागणारे धंदेवाईक लोक या भागात आढळले. रामेश्वरचे ते वैशिष्टय वाटले. त्या मुलाला 'शिकतोस का ?' असे विचारले असता तो म्हणाला, "हम पढेगा तो पेटको कौन खिलायेगा ?" हा मुलगा आता देवळात एका यात्रिकाला माधवतीर्थात स्नान घालून नंतर २४ तीर्थ म्हणविणाऱ्या लहानलहान २४ विहिरीवर फिरवून एकएक बादली त्याच्या अंगावर ओतत होता. हुडहुडी भरली तरी तो धार्मिक गृहस्थ ते पुण्यासाठी सहन करीत होता ! अशी अनेक माणसे येथे येतात. या २४ तीर्थांना सावित्री, सरस्वती, नील, नल, गवाक्ष अशी नावे आहेत. या प्रत्येक तीर्थाजवळ एकेक लहान मंदिर असून त्यात पुजारी बसलेला दिसला.

रामेश्वरमंदिरासमोर एक भव्य नंदीमंडप असून तंजावरच्या नंदीसारखाच मोठा नंदी तेथे आहे. तो रंगविल्यामुळे त्याचे मुळ सौंदर्य व सौष्ठव काहीसे नष्ट झाले आहे हे मंदिर लुटायला आलेल्या मुसलमानाचे डोळे गेले व ईशप्रार्थना केल्यावर ते पुन. आले, असे सांगतात !

या नंद्यासमोर आत जाण्यासाठी मुख्य मंदिराचा गाभारा आहे. किल्ल्याच्या भव्य द्वारासारखे द्वार आहे. सुवर्णस्तंभानंतर शिवपिंड आहे. हाच तो 'रामेश्वर' ! येथे पैसे देऊन दिवसभरात केव्हाहि पूजा करता येते. सकाळपासून ५, ७, १०, १२, ६, ९ व ९।। वाजता पूजेच्या वेळा येतात. अभिषेकासाठी पाणी येथूनच विकत घेतले पाहिजे असा दंडक आहे. तीर्थासाठी म्हणून आमच्यापैकी एकाने १२ आण्याचे भांडे घेतले. नंतर तीर्थ १ रुपयाचे व पूजेचे ३ रुपये द्यावे लागणार म्हणून त्याने ते भांडे खिशात घालून ठेवले !

या मंदिराच्या अनेक प्राकारांमध्ये जपशंकर, पार्वती, विश्वनाथ इत्यादि मूर्ति आहेत. वस्तुत: इतक्या मूर्तींची गोतावळ जागजागी उभी करण्याची गरज नव्हती. एके ठिकाणी तर ३ न. पै. चे तिकीट लावून रामसीतेने केलेल्या लिंगप्रतिष्ठेची रंगीन मूर्तिकला दाखविण्यात आली. ती अगदीच भिकार होती.

या विस्तृत मंदिराचे शिल्प पांड्यकालीन आहे. सध्याचे मंदिर मात्र १७ व्या शतकात बांधलेले आहे. सिलोनच्या कंडी राजाने वा रामनाथपूरच्या सेतुपतींनी या मंदिराची उभारणी केली आहे, असे म्हटले जाते; तर लंकेतील एका शिलालेखावरून राजा पराक्रमबाहूने हे बनविल्याचे दिसते. या राजाने पांड्य राजांना पराभूत करण्यात यश मिळविले व त्या आनंदाच्या भरात त्याने हे मंदिर बांधले ! मुख्य मंदिर उदयन सेतुपती राजाकडून बांधले गेले, असाहि एक अंदाज आहे. काहीहि असले तरी द्राविडी कलेचे हे एक आगर आहे. येथे उंच सोंडेचे कोरीव हत्ती अनेक जागी आहेत.अंतर्भागातील वक्रखांबांचा रस्ता व चौक हे येथील शिल्पाचे उत्कृष्ट उदाहरण होय. फर्ग्युसन नामक लेखकाच्या मते हे मंदिर शिल्पदृष्टया सर्वश्रेष्ठ आहे. उत्तरेत काशी पूज्य, तितकेच महत्त्व रामेश्वरला दक्षिणेत आहे. चार धामांपैकी एक धाम म्हणून याची ख्याती आहेच !

मंदिराच्या अंतर्भागात अनेक दुकाने असून टोपल्यांची व शिंपल्यांची कामे फार छान होतात. शंख–कवडयांवर नावे लिहिणे हे तर येथले प्रमुख आकर्षण आहे. शंखांचे टेबललँपस् सुंदर वाटले.

येथली घरे कच्ची बांधलेली असतात. कारण प्रदेशच मुळी वाळूचा आहे. देवळात महाराष्ट्रीय पुजारी बरेच आहेत. मंदिरात व मंदिराबाहेर पंडयांची गर्दी जमलेली असते. ते भाविकांना गाठतात. त्यांची मुंडने करून डोक्यावर चंदन थापतात. बायकाहि मुंडने करतात. (उलट, कित्येक माणसे इकडे वुचडे बांधतात !) या द्राविड भागात कानात जाड व वजनी अलंकार घातल्यामुळे कान फाटून ते वीतवीत लांबलेले आहेत, अशा अनेक बायका आढळल्या !

नंतर आम्ही सीतामंदिराजवळील समुद्रस्नानाच्या जागी गेलो. तेथे पाणी उथळ आहे. जवळच श्रीशंकराचार्यांकडून एका स्तूपवजा मंदिराच्या उभारणीचे काम सुरू झाले आहे. रामेश्वरचे सर्वतीर्थ श्रीशंकराचार्यांनी स्थापन केलेले आहे.

रामेश्वर–मंदिर पाहून आम्ही गंधमादन पर्वतावर गेलो. बरेच जण येथे जात नाहीत. आम्ही ४–५ जण त्या वैराण वाळवंटी वाटेने १॥ मैल हळूहळू चालत गेलो. रस्त्यात मधेमधे भिकारी, तुरळक पंडे व गावकरी यांच्याशिवाय कुणी आढळले नाही.

गंधमादन पर्वत म्हणजे एक वाळूची टेकडी असून तीवरील देवळात रामाची पावले आहेत. त्या देवळावर रामझरोका असून त्या उंचावरून आजूबाजूची दृश्ये विलोभनीय वाटतात. लांब समुद्र, खाडी व रामेश्वरमंदिराची गोपुरे उठून दिसतात. वरच्या भागात शांत व प्रसन्न वाटते आणि गार वारा अंगाला झोंबतो.

गंधमादन पर्वताला लागूनच रामनद राजाने बांधलेला एक पडका किल्ला आहे. तो आता आणखी जमीनदोस्त होत आहे. येथे ताकाचे पाणी फुकट प्यायला मिळाले.

एका विहिरीचे पाणी काढतांना आम्ही दोर–बादली विहिरीत पाडली. तरीपण त्याचा मालक रागावला नाही. त्याला आमची भाषा मुळीच समजत नव्हती. एका भिकारी–मुलाला आम्ही भीक दिली नाही, म्हणून तो रडत घरी गेला. त्यावेळी त्याची आई त्याच्यावर 'भीक न आणता परत कशाला आलास' म्हणून ओरडली. आमच्यातील एका वयस्क बाईला एका सेवानिवृत्त पोलीसअधिकाऱ्याने आपला स्वतःचा एक्का रिकामा करून दिला व दक्षिणेच्या सौजन्यशीलतेची चुणूक दाखवून दिली !

रामेश्वरपरिसरातील विविध स्थानांबद्दल निरनिराळ्या कथा आहेत–गंधमादन पर्वतावरून हनुमंताने लंकेसाठी उड्डाण केले होते.एकांतरामेश्वरमंदिरात रामाचा हात वर आहे; का तर, म्हणे युद्धचर्चा करण्याकरिता बैठक भरली तेव्हा धोधावणाऱ्या सागराला चूप राहण्यास सुचविण्यासाठी रामाने हात वर केला होता. अम्मनमंदिरातील देवी म्हणे सर्वांचे रोग दुरुस्त करते ! सीताकुंड म्हणजे सीतेच्या प्रथमावतारातील वेगवतीचे स्मरण ! सीतेची तहान भागविण्यासाठी रामाने धनुष्याच्या योगाने पाणी काढले, तेथे झाले विल्लुनितीर्थ ! कपितीर्थ हनुमानजीच्या चरणामुळे उत्पन्न झाले. कोदंडरामन मंदिराच्या जागी बिभीषणाचा राज्याभिषेक झाला होता. रामेश्वरमंदिराजवळील अग्नितीर्थाची उत्पत्ति सीतेच्या अग्निशुद्धिस्थळी झाली. येथेच शुचिऋषीला मारण्याचे पाप इंद्राने धुवून काढले. तपोनिष्ठ युधिष्ठिर शिवाचे वाहन झाला, गालव ऋषीने विष्णूला प्रसन्न केले, विष्णुचक्राने एका भुकेलेल्या राक्षसाचे रक्षण केले, ते स्थान चक्रतीर्थ ! दुर्गेने महिषासुराचा वध केला ते ठिकाण देविपतनमतीर्थ ! वैतालवरद तीर्थाच्या जागी गालवऋषीच्या कन्येशी व्यभिचार केल्यामुळे शापभ्रष्ट झालेल्या गंधर्वाला मुक्ति मिळाली होती. मंगलतीर्थात म्हणे सर्व देवता कष्टनिवारणार्थ येतात ! ब्रह्मकुंडाजवळ ब्रह्म्याने शिवशापविमोचनार्थ यज्ञ केला होता ! रामसेनेसाठी मारुतीने

तयार केले ते हनुमानकुंड ! अगस्त्यतीर्थाची निर्मिती अगस्ती–लोपामुद्रेच्या वास्तव्यामुळे झाली. रामतीर्थात रामाने रावण मारल्यावर जटा धुतल्या ! लक्ष्मीतीर्थात स्नान करून धर्माने राजसूर्ययज्ञासाठी धन मिळविले. चक्र-तीर्थात डुंबून सूर्याने आपले हात परत मिळविले ! ब्रह्मदेवाचे गर्वहरण करण्यासाठी शिवाने त्याचे एक शिर कापले. ते पाप घालविण्यासाठी शिवाने स्नान केले. ते शिवतीर्थ झाले !

सायं. चतुर्दशीचा पूर्णचंद्र वर आला,तेव्हा आम्ही समुद्रावर फिरा-यला गेलो. वाळूत किल्ले उभारणे वा विहिरी करून माशांच्या प्रकाशाची किमया पाहण्यात आम्ही गुंतलो होतो. एवढ्यात ५–६ लोक येऊन आमच्याशी हुज्जत घालू लागले. आम्ही नागपूरचे आहोत असे कळले तेव्हा मात्र त्यांचा आवाज एकदम थंडावला व ते आल्या वाटेने निघून गेले. ते दारूबिरूचा चोरटा व्यापार करणारे लोक असावेत !

रात्री रामेश्वरमंदिरासमोर शुभलक्ष्मीच्या गायनाचा कार्यक्रम होता. ऐकायला गेलो, पण १२ वाजेपर्यंत कार्यक्रम सुरूच झाला नाही. नंतर १ वा. तो कार्यक्रम सुरू झाला व त्यात शुभलक्ष्मीने तामीळ गाणी म्हटली.

++ ++ ++–

दि. ३० मे ६१ रोजी सकाळी काहीजण होड्यांमधून धनुष्को-टीला गेले. रामेश्वर ते धनुष्कोटी होडीतून १० मैल अंतर असून जाण्या-येण्याचा प्रत्येकी १ रुपया घेतात. जातांना हा रस्ता व येतांना रल्वेचा रस्ता पसंत करणे केव्हाहि उचित ठरेल ! आम्ही रेल्वेने दुपारी जायचे ठरविले असल्यामुळे रामेश्वरमंदिरातील नारळ–ताडाच्या पानांच्या टोपल्या, सूटकेसेस, शंखांच्या माळा इत्यादि वस्तु पाहण्यात व खरीदण्यात वेळ घालविला. एका दुकानदाराचा माल न खपल्यामुळे तो चिडून

म्हणून, "तुम्ही गेलात की तुमच्यासारखे छप्पन लोक दुसऱ्या गाडीने उतरतील!" आमचे लोक धंदा करतांना पाळावयाची पथ्ये कधी शिकतील?

केवड्याच्या पानांची तोरणे मंदिर व दुकाने यांच्यासमोर लावलेली होती. अकृत्रिम व बिनखर्ची अशी ही तोरणे पाहून चिमूरचांद्याकडे उत्सवप्रसंगी कुकुंभा व कमळे लटकवून तयार करण्यात येणाऱ्या तोरणांची आठवण झाली. सदाफुलीची बने या भागात बरीच आढळली. हिंदी भाषा रामेश्वरपुरती तरी बरीच समजली-बोलली जाते, याचा पडताळा जागोजाग आला.

दुपारी १२-४५ वा. आम्ही रामेश्वर-पांबन लोकलने धनुष्कोडीसाठी निघालो. आजूबाजूला वाळूचे प्रचंड ढिगारे पसरलेले दिसले. नारळे, बाभळी व केवडा यांची बनेहि विपुल आढळली. आपल्याकडे ज्या केवड्याची किंमत १ रु. पडते तोच येथे १ आण्याला मिळतो.

पांबनला गाडी बदलून धनुष्कोडीसाठी निघालो. संपूर्ण रेल्वेलाईन केवळ वाळूतून गेली आहे. रस्त्याने इतकी सुंदर वाळू सर्वत्र पसरलेली होती की चालत्या गाडीतून तीत उडी मारावी व मनमाने तिच्यात खेळून धसमुसळेपणा करावा असे वाटत होते. काही जागी समुद्रकाठाने रेल्वेमार्ग जात होता. त्यावेळी लाटा रुळांच्या पायाशी टिवल्याबावल्या करायच्या! जागजागी वाळूचे डोंगर उभे असलेले दिसत. कधीकधी त्यांच्या अवतीभवती सागरी जल पसरलेले असायचे! वाळूत वनस्पति उगवलेल्या नसल्या तरी ढिगाऱ्यांवर मात्र त्या दिसायच्या! पांबननंतर मधल्या एका जागी परत येणाऱ्या गाडीला वाट देण्यासाठी आमच्या गाडीने विश्रांती घेतली. तेथे सरकारी वनस्पति-संशोधन बाग आहे. तीमधील बरीच झाडे मरणोन्मुख असली तरी वाळवंटी वनस्पतींच्या अभ्यासासाठी या बागेचा चांगला उपयोग होत असावा!

धनुष्कोडी स्टेशन दुपारी ३-१५ वा. जवळ आले तेव्हा गाडी अगदी पाण्याच्या पोटात शिरत असल्याचा भास होत होता. खरोखर

झालेहि तसेच. सिलोनला जाणाऱ्या जहाजाच्या बंदराजवळ थेट गाडी पोहचली. तेथून पुढे बंदरावर जाण्याची परवानगी नव्हती. तेथे कस्टम-ऑफीस होते. जाणाऱ्या–येणाऱ्या प्रवाशांची झडती त्या ऑफिसात चालली होती. एक जहाज बंदरात उभे होते. ते अनेकांनी दुरून पाहिले.

नंतर आम्ही दृष्टीला थाक लावण्यास भाग पाडणाऱ्या समतल वालुकाप्रदेशावरून सुमारे १।। मैलाची वाटचाल करीत पुढे सरकलो. प्रथम दबलेल्या वाळूमुळे चालण्याचा त्रास झाला नाही. पण प्रचंड वेगाच्या वाहत्या वाऱ्यांमुळे वाळू उडत होती व अंगाला येऊन चटपट झोंबत होती. वाऱ्यांमुळे चालण्यास त्रास होत होता.

आम्ही चालण्यासाठी समुद्रकाठच पसंत केला. ५–१० फुटांवर समुद्राच्या लाटा धोधावत, दुग्धतुषार उडवीत होत्या. एके ठिकाणी वाळूच्या टेकडीवर बसून पाहिले. संपूर्ण वाळू अंगावर येऊन चिकट जल-तुषारांमध्ये चिकटून बसली. दूरवर फेसाळ पाण्याचे प्रचंड झोत हृदयंगम दृश्यचातुरी दावीत होते. पौर्णिमेचा दिवस असल्यामुळे सागराला भरतीचे उधाण आले होते. काठावरून चालत असतांना कधीकधी पाण्यातूनच जाऊन भिजावे लागे. असेच अखेर भारताच्या सर्वदूर आग्नेय टोकावरील निमुळत्या वालुकापट्टिकेवर आम्ही आलो. हिंदीमहासागर व बंगालसागर यांची भेट येथे होते. 'रत्नाकर' व 'महोदधी'चा येथे संगम आहे. लहानशी निमुळती जमीन व दूरवर पाणीच पाणी ! जमिनीवर २–४ झोपड्या व एकदोन फराळाची तात्पुरती दुकाने ! कोळी मासे पकडण्यात गुंतले होते. एका शेताएवढ्या जागेत सुकविण्यासाठी मासे पसरले होते.

भारताच्या सुदूर–तली असलेल्या या टोकावर बसून प्रचंड वायूचे झोत अंगावर घ्यावेत; लाटाचे अमाप उधाण दृष्टीच्या कवेत झाकोळण्याचे प्रयत्न करावेत व नीलाकाशाशी सागराचे मिलन झालेले न्याहाळावे ! जगातील अणूरेणूत परमेश्वर भरला असल्याचा प्रत्यय

येथे घ्यावा ! येथे मंदिर नाही. देव नाही. पण निसर्गातील ईशत्व येथे मनोमन पाहावे !

धनुष्कोडीपासून लंका अगदी जवळ, म्हणजे सुमारे २४ मैल आहे. येथूनच कुठूनतरी रामाचा पूल बांधला गेला असावा.तशी तर राम-नाथपांबननंतरची जमीनपट्टी हीच सेतुबंध म्हणविते. तेहि अशक्य नसावे. १०० वर्षांपूर्वीचा रामेश्वरजवळचा समुद्र आता ५ मैल मागे हटला असे सांगतात. नावातून प्रवास करतांना किनाऱ्याने मध्येमध्ये पडके भाग दिसतात. ते सेतुबंधाचे अवशेष असण्याची शक्यता आहे. रामाने बांधलेला सेतु दिसत नाही, या सत्यावर रचलेली एक कथा पद्मपुराणात आली आहे. बिभीषणाचे भय नष्ट व्हावे म्हणून व शत्रूचे आगमन टळावे म्हणून लंकेतून परतल्यावर रामाने धनुष्याच्या टोकाने हा पूल तोडून टाकला म्हणे ! या सेतूसंबंधी वाल्मिकींनी रामायणात लिहिले आहे- .

एतत्तु दृश्यते तीर्थं सागरस्य महात्मनः ।
सेतुबंध इति ख्यातं त्रैलोक्येनापि पूजितम् ।।

रामायणात सेतुविस्ताराबाबत लिहिलेलेहि खोटे नसावे. धनुष्कोडीपासून तलाईमिनारपर्यंत हा पूल असावा. वाल्मिकींनी रामायणामध्ये लंकेतील, पर्वतातील व रावणाच्या बागेतील नित्यप्रवाही निर्झरांची वर्णने केली आहेत.

धनुष्कोडीच्या या दोन सागरांच्या मिलनस्थानी स्नान करण्यात पुण्य मानले जाते. अश्वत्थाम्याने झोपेत सैनिकांना मारल्याचे पाप धुण्या-साठी येथेच स्नान केल्याची कथा आहे. राजा धर्मगुप्ताने आपल्या खऱ्या मित्राला धोका दिल्यामुळे तो वेडा झाला. त्याचे ते वेड येथील पाण्याचे तुषार अंगावर पडताच नष्ट झाले !

या निमुळत्या भारतभूभागातून परततांना विजय नामक विद्यार्थ्याला एक मजेदार अनुभव आला. समुद्राच्या लाटा पाहत एका काठाने हा विद्यार्थी चालला असतांना त्याची दोन रुपयांची नोट हातातून

पडली. ती उडतउडत वाऱ्याच्या प्रचंड वेगाने ५ मिनिटात २ फर्लांगावरील दुसऱ्या समुद्रकिनाऱ्याला गेली. ५ मिनिटात या नोटेने हिंदी महासागरापासून बंगालच्या सागरापर्यंत प्रवास केला. विजयने नोटेचा धावत पाठलाग केला. पण ती नोट बंगाल–सागराने आपल्या दाढेत कुठे लपवली तेहि कळले नाही. 'उंटाच्या मुखात जिरे' ते काय दिसणार ?

आम्ही परत वालुका–प्रवास करून धनुष्कोडी स्टेशनावर आलो. मघा आम्ही पोर्ट–स्टेशनला उतरलो होतो. धनुष्कोडी स्टेशन तेथून २ फर्लांग अलीकडे पडते. धनुष्कोडी स्टेशनाजवळ वाळूत ५–२५ झोपड्यांचे गाव वसले आहे. एका झोपडीत ५–१० मुलांची शाळा होती. ती खुराड्यासारखीच दिसत होती. त्या शाळेत शिरतांना अक्षरशः खाली वसूनच जावे लागे. वरून नारळीच्या पानांचा शाकार होता. ५–१० कोळ्यांची मुले शिकण्यासाठी कशीबशी धडपडत होती. शाळा खाजगी व मास्तरहि खाजगी ! भारतातील कित्येक आडवळणी खेड्यात प्राथमिक शिक्षणाची अशी ही दैना अजूनहि चालू आहे !

धनुष्कोडी स्टेशन म्हणजे फक्त रूळ ! रूळ नसते तर स्टेशन ओळखायला साधन नव्हते कधीकधी हे सांधे व रूळ वाळूत दबून जातात. त्यांना मारखे प्रयत्न करून उघडे ठेवावे लागते. दोन्ही बाजूंना लाटावणारा सागर व मधोमध प्रचंड वाऱ्यावेगे उडणारी बारीक वाळू याशिवाय स्टेशनवर काहीच नाही. छोटेसे स्टेशनऑफीस आहे तेवढेच ! बाकी प्लॅटफॉर्मसुद्धा वाळूचाच ! सारे वातावरणच विमनस्क वाटते ! वारा, वादळ आणि वाळूचे उडणे यांना येथे उणीव नाही.

५–३० वाजता गाडी सुटली. गाडीतून लंकेला जात असलेले आगबोट दिसली. सायंकाळी ६ वा. पांबन–पूल पाहायला गेलो. या पुलाचे हे दुसरे दर्शन ! या पुलाचे वैशिष्ट्य हे की, तो गाडीसाठी सरळ असतो व आडवे जहाज येते तेव्हा मात्र उभा होतो. त्या जागेतून जहाज पार होते व नंतर तो पुन्हा आडवा होतो. ह्या पुलाची

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३७६६० वि: प्रवास
क्रमांक २०८८ नों: दि: २८।१०।६९

उघडझाप कशी होते, ते पाहावयाची इच्छा होती. परंतु फक्त जहाज जायच्या वेळीच हा पूल उघडण्यात येत असल्यामुळे आमची इच्छा पूर्ण झाली नाही. एकपायी रस्ता रुळांच्या बाजूने आहे. पण त्यावरून जाण्याची अनुमती नाही. त्यामुळे आम्ही वाळवंटात बसून लाटांची, उगवत्या चंद्राची व येणाऱ्या गाडीची गंमत पाहत बसलो. पामवन पूल समुद्रावर असून त्याने रामेश्वरबेट इतर भूभागाशी जोडण्यात आले आहे. हा अरुंद जलपट्टा नदीसारखा आहे. म्हणून तो 'पांबन नदी' या नावाने ओळखला जातो. कदाचित पांबन नदी येथेच सागरात येऊन मिसळली असेल. नक्की माहिती आम्हाला मिळू शकली नाही. पांबनपुलाला प्रत्येकी ४० फूट अंतराचे १४३ तस्मे असून दोन तस्मे अनुक्रमे ३९।।। व ३८। फुटांचे आहेत. उघडला जातो तो लिफ्ट-पुलाचा तस्मा २१४ फुटांचा आहे. पुलाची एकंदर लांबी ६७४४ फूट आहे. हा पूल शिकागोच्या एका कंपनीने १९१३ साली बांधला. कौशल्यपूर्ण लिफ्ट-पूल बांधायला १८ महिने लागले.

पांबन पूल पाहून आल्यावर हॉटेलातील इडलीदोशावर झुंबड झाली. या हॉटेलच्या रेडिओवर हिंदी गाणी लागलेली होती. फक्त रामेश्वरपरिसरातच हिंदी गाणी कानांवर पडू लागली.

८-२० ला पांबनहून सुटलेल्या गाडीत बसून आम्ही रात्री ९ वा. रामेश्वरला पोहचलो. पांबनपासून रामेश्वर ७ मैल आहे.

++++++++

दि. ३१ मे ६१ रोजी पहाटे ४ ला उठलो व पायी रामेश्वर-मंदिरात गेलो. स्फटिकलिंगाची वैशिष्टयपूर्ण (?) पूजा पाहण्यासाठी तेथे रांगा लावून उभे राहिलो. ५ वा. पुजारी आला. त्याने रजिस्टरवर सह्या करून तिजोरीतील किल्ली काढली व देवाच्या गाभाऱ्याचे दार

उघडले. काही वेळाने मेण्यातून वाजतगाजत देव आले ! पलिते मेण्यावर प्रकाश टाकीत होते. आतल्या बाजूने पूजा आटोपली गेली, तेव्हा एक झिरझिरीत पडदा दूर सारला गेला व चार बोटे उंचीचे एक चकचकीत स्पटिक–लिंग उजेडात दिसले. फक्त ५ ते ५॥ या वेळातच या स्फटिक-लिंगाचे दर्शन होऊ शकते ! तसे पाहिले तर हे लिंग काही विशेष नाही. पण निराळेपणा म्हणून त्याचे पहिल्यावेळी आकर्षण !

तेथून आम्ही समुद्रावर गेलो व सागरातून उगवणाऱ्या सूर्याचे दर्शन घेतले. सागरातून वर येतांना सूर्य एखाद्या लोंबत्या चेंडूसारखा दिसत होता. मध्ये त्याच्यावर ढगाची एक आडवी काळी पट्टी आल्यामुळे तो गोळा किंचित् दुभंग, तर लगेच लांच्छित दिसत होता.

आम्हाला आजपासून खास गाडी मिळाली. तिची व्यवस्था कर-ण्यात श्री. चोरे, श्री. पंड्याबंधु, श्री. पिठे इ. लोक रमले. आमच्या जागा मुक्रर करून तशा पाट्या लावण्यात आल्या. येथील म्हातारे स्टेशनमास्तर स्वभावाने मनमिळाऊ व प्रेमळ वाटले. आम्ही आमच्या डब्यातील जागा दुपारी १२ वाजताच ताब्यात घेतल्या व झोपा काढण्यास सुरुवात केली. ४–४॥ वा. आमची खास गाडी त्रिवेंद्रमला जाण्याकरिता मानामदुरा-ईकडे निघाली. खास गाडी मिळाल्यामुळे गेल्या काही दिवसात या संदर्भात जो थोडाफार त्रास झाला होता त्याची आठवण आम्ही विसरून गेलो. पांबनला आलो तेव्हा आम्ही आमच्या डब्यांमधून डोकावून तेथील पाण्याची व पुलाची मौज पुन्हा एकवार पाहिली !

++ ++ ++—

दिनांक १ जून ६१ ला सकाळी ६ वा. चेंगोट्ट स्टेशन आले. केरळ राज्याचा प्रवास सुरू झाला. आमची गाडी या राज्याचे नैसर्गिक दर्शन आम्हाला घडवीत होती.

दा. क्र. १२१९५



चेंगोट्टनंतर अनुपम सृष्टिसौंदर्याची भव्यता वाढत गेली. केरळ म्हणजे पर्वतराजीतील निसर्गाचे पोर ! उंच उंच डोंगर, खोलखोल दऱ्या, उतरणीवरील केळी, माड, सुपारी, ताड व भातशेते यांची लागवड आणि पर्वतशिखरांना चाटून जाणाऱ्या ढगांची धाव–स्पर्धा यांमुळे मनाला येणारा उल्हास कमी होऊ इच्छीत नव्हता. गर्द वनराईतून वाट काढीत गाडी चालली होती. रात्री पाऊस पडून गेल्यामुळे हिरवळीवर मोत्यांचे पीक बहरले होते. खोलगट भागात साबुदाणा, फणस, भुईमूग, धान इ.ची शेती फोफावली होती. गाडी मिनिटामिनिटाने वळणे घेऊन नागिणीची किमया दाखवीत होती. तिच्या कर्कश किंकाळ्या रानात पडसाद उमटवीत होत्या. गाडी कधी नदीनिर्झरांच्या वरून जात होती, तर कधी डोंगरातून जाणाऱ्या सडकांच्या नागमोडी वळणांना ती वाकुल्या दाखवीत होती. मोठमोठ्या अखंड शिलाखंडांना दुभंगून जाणारी गाडी कधीमधी एकदम झाडीच्या झावळीत गडप होत होती. कधी ती काटेरी जाळ्यांना दोन्ही बगलेत घालून रस्ता पार करीत होती. लाल मातीची पखरण, १५–२० घरे बसू शकतील एवढाले डोंगरात फसलेले अखंड दगड, कधी उतरणीवर जास्वंदीच्या फुलांचे ताटवे मनाला मोह घालीत होते. कधी झाडे, कधी डोंगर पाण्याने थबथबत होते; तर कधी उंच वृक्षांवरूनच आपण जात असल्यासारखे वाटत होते. अनेक बोगदे व पूल लागायचे. बोगदे आले की अंधार व्हायचा व गाडीतील मुलांच्या आरोळ्या सुरू व्हायच्या ! धबधब्यासारखे नाले धोधावत असायचे. एके ठिकाणी तर ३०–४० फूट उंचीवरून पाणी धबधबत होते व ते पाणी अगदी दुधाळ होऊन वाहत होते. त्या ठिकाणी थोडे पुढे गाडी जाण्यासाठी दोन डोंगरांना जोडून पूल तयार केला होता. कारण त्या दोन डोंगरांच्या मध्ये खोल खाई होती. असे दोनतीन पूल आणखी पाहावयास मिळाले. कधीकधी गाडी डोंगरांना वेढा घालूनच पुढे जात होती. गाडीच्या खिडक्यातून वाकून काही मुले लगतच्या लतावेलींची फुले तोडीत होती व त्या छंदापायी काटेरी वेलींना ओरबाडून हात रक्ताळून घेत होती.

८ वाजता तेमलै स्टेशन आले. हे डोंगरी स्टेशन पर्वताच्या पायथ्याशी वसले आहे. चाऱ्ही बाजूंनी डोंगर पसरलेले आहेत. तेमलैनंतर एकीकडे ढगाळलेला डोंगर, तर दुसरीकडे उन्हात दिसणारा शिळाणीचा पर्वत असे परस्परविरुद्ध दृश्य दिसत होते. कधी एकीकडे डोंगरस्नान चाललेले होते, तर दुसरीकडे शिळाणीत त्याचे अर्धांग उन्हाळ दिसत असतांनाच वरचा शिरोभाग मात्र धुकाळ ढगांमध्ये लपलेला दिसत होता. क्वचित काही जागी कवडश्यांसारखा सूर्य दिसू लागला होता. भारतमातेच्या नैऋत्यकुशीतील या केरळबाळाला न्हाऊ घालावयास उत्सुकलेल्या मृगाचे अग्रदूत पुढे येऊन हलकारीत होते.

८–२० वा. एडमन स्टेशन आले. या डोंगरी स्टेशनावर सागवानी लाकडाच्या गंज्या लागलेल्या होत्या. लाकडांची रुंदी बरीच मोठी होती. एका एका लाकडाचा व्यास ७–८ तरी फूट होताच. शिवाय हा भाग लाकडाच्या मधला होता; मुळाकडील नव्हता. अशा लाकडांची नेआण करण्यासाठी बरेचदा पाळीव हत्तींचा उपयोग या भागात करतात. जंगली हत्तींचे कळप केरळ–म्हैसूरच्या डोंगरात वावरतात. या स्टेशनावर थंडीने काकडू पाहणाऱ्या आमच्या लोकांनी चहाकॉफी घेण्याकरिता एका गावठी हॉटेलात गर्दी केली. तेथे एक हिंदी शिक्षिका मशीन–सिलाईचे काम करीत होती. स्वच्छता, नीटनेटकेपणा व सौजन्यशीलता हे इकडील लोकांचे गुण प्रकर्षाने प्रत्ययाला येऊ लागले. शिक्षणाचे प्रमाण बरेच दिसले.

पुनालूर स्टेशनावर आमची गाडी ९–२० वा. आली. येथे मला एक पत्र टाकावयाचे होते. पेटी दाखविण्याचे काम एका सद्‌गृहस्थाने न विचारताच केले. पुनालूर येथे कागदाचा एक कारखाना आहे.

केरळ राज्यात तामीळ भाषा कुठेकुठे समजू शकते. पण राज्यभाषा मल्यालम आहे. स्टेशनावर मल्याळी व तामीळ या दोन्ही स्थानिक भाषांमध्ये सूचना व पाट्या लिहिलेल्या असतात. इकडील लोकांचा रंग

उजळ असून ते पाहायलाहि सुंदर दिसतात.

कोकणी फळे व रबर यांची लागवड डोंगर व उतरणीवर बरीच दिसू लागली.४० मैल लांबीचा एक रबरी सडक-पट्टा या भागात असल्याचे कळले. पुढेपुढे डोंगर कमी झाले तरी फळझाडे व भातशेते यांचे प्रमाण कमी न होता उलट वाढले. नारळी बने व समुद्री वातावरण यांचा आढळ अधिक होऊ लागला. सृष्टिसौंदर्यात खंडहि पडत नव्हता.

क्विलन (कोल्लम) जंक्शन १२–३० वा. आले. हे केरळतील सुधारलेले एक मोठे शहर आहे. या स्टेशनावर फराळपाण्यासाठी बराच वेळ गेला. गाडीचे गार्ड एक उमदे तरुण होते. ते नेहमी टाय लावून स्वच्छ कपड्यात वावरत असतात.

स्टेशनवरील रेस्टॉरंटमध्ये जाऊन आम्ही दूध मागितले. ते घेतांना मी हसत विचारले, "हे पाण्याचे आहे काय ?" त्यावर तोहि हसत म्हणाला, 'होय !" मी पुन्हा विनोदाने प्रश्न केला, " मग बिनापाण्याचे दूध तुम्ही काय भावाने विकाल ?" त्यानेहि तसेच उत्तर दिले, "दीडरुपया ग्लास !"

क्विलननंतर त्रिवेंद्रमपर्यंत या प्रांताची पिकाऊपणा व सुंदरता ही वैशिष्टये पुनश्च डोळ्यात भरली. हिवाळी हवामान या प्रांतात नेहमीच असते. भाजीपाला फार पिकतो. सिलोनप्रमाणे बागायती परिसर सर्वत्र आढळतो. खेडीपाडी लहानलहान कालवे व तळी यांनी युक्त आहेत. फुलाफळांनी बहरलेले केरळ खरेच मोह घालते. टुमदार बंगली–घरे सर्वत्र दिसतात. त्रिवेंद्रमपर्यंत घरे सडकेकाठीच आहेत.तुटक गावे नाहीत. इकडील शेतमालक शेताजवळ घर करतात. सडकांवर घरे व त्यामागे त्यांची शेती असते. क्विलन ते त्रिवेंद्रम घरेचघरे आहेत. वस्तुत: या दोन शहरातील अंतर सुमारे २० मैलांचे आहे. काही अंतरानंतर दुसरे गाव सुरू होते. तशी पाटी लिहिलेली असते. म्हणूनच दुसरे गाव ओळखता येते. अन्यथा ओळखायला अडचण पडली असती.

केरळातील घरांच्या भिंतींचे डाळवण म्हणजे नारळीच्या पानांचे तट्टे ! घरांची कुंपणेहि काही जागी याच तट्ट्यांनी बंद केलेली ! कित्येक जागी डाळीव अशा लांब भिंतींनी घेरलेल्या अंतर्भागात केळी, फणस, नारळी यांच्या बागा केलेल्या आहेत. अशा बागांचे कुंपण म्हणजे भिंती !

कडक्कावुर स्टेशनावर दोनतीन मुले, आम्ही खाल्लेल्या केळांच्या साली झटपट गोळा करीत होती. त्यामुळे स्टेशन स्वच्छ होत होते. त्या सालींचा उपयोग बकऱ्यांकरिता व भाज्यांकरिता केला जातो, असे कळले. तद्वतच नारळे सोलून काढलेली हिरवी टरफले बैलगाड्यात भरभरून वाहून नेली जात होती. नारळीच्या एका झाडास वर्षाकाठी दोनअडीचशे नारळ येतात फणसांच्या झाडावरील फणस जमिनीपर्यंत लोंबकळलेले होते. पाणीभरल्या शेतात असंख्य केळी पेरल्यासारख्या दिसत होत्या. अशा झाडांना आळे तयार करण्याची गरज नसते. नारळापासून चवऱ्या व काथ्या करण्याची कामे सगळीकडे चालू असलेली दिसत होती.

कडक्कावुर स्टेशनावर आम्ही आलो. सुपारी खाऊन पाहिली. ती कडू लागली. 'चाया' विकायला मल्याळी मुले आली होती. या स्टेशनावर इंग्रजीत फाडफाड बोलणारी ए. डी. एस्. प्रसाद व चिदंबरम् नावाची दोन गोंडस मुले आम्हाला भेटली. मलयालम् भाषेतील काही व्यावहारिक शब्द त्यांनी आम्हाला शिकविले.

केरळात कामे फार चालनात. मजूर मिळतात, पण त्यांना भरपूर मजुरी द्यावी लागते. कधीकधी १॥ ते २ रु. रोज व वरून जेवण द्यावे लागते. जेवण देण्याचे कारण, त्या मजुराला कामामुळे घरी जायला वेळ मिळत नाही, असे सांगितले जाते. मजूर रोज ७॥ ते ८ तास काम करतात.

सायंकाळी ५ वाजता आम्ही त्रिवेंद्रम स्थानकावर येऊन थांबलो. स्नानादि कार्यक्रमासाठी काहीजण धावले. आम्ही त्रिवेंद्रम शहरात

फेरफटका मारण्यासाठी बाहेर पडलो. स्थानकाच्या समोरील गोलबागे-जवळून बसेस जातात. दुमजली बसमोटारी येथे आहेत. आम्ही जवळच्या हस्तीदंती वस्तूंच्या दुकानात गेलो. हस्तीदंत-वस्तूंच्या बाबतीत त्रिवेंद्रमची ख्याती आहे. एका गुंजेत सूक्ष्मा- कारी १०० हत्तीघोडे मावतील अशाहि कौशल्यपूर्ण हस्तीदंती वस्तु विकत मिळतात. त्यांच्या निर्मितीचा धंदा केरळात फार मोठ्या प्रमाणात चालतो.

त्या हस्तीदंती वस्तूंच्या दुकानातून बाहेर पडत नाही, तोच एक माणूस भेटला व म्हणाला, " ते बघा, हस्तीदंती सामानाचे दुसरे मोठे दुकान आहे ! " आम्ही त्या दुकानात गेलो, तेव्हा लक्षात आले की नवे दुकान सुचविणारा तो माणूस असल्या दुकानाचा प्रचार करून कमीशन मिळवीत असतो. काश्मीरात असे कमीशन–एजंट बरेच आढळतात.

या दुसऱ्या दुकानात खेळण्यांचे नमुनेहि ठेवले होते. साध्या नार-ळाचे दाढीवाले बुवा खेळणे म्हणून या दुकानात विक्रीस होते. तो बुवा मजेशीर दिसत होता. डोळे, टोपी, चिरूट व दाढी नारळाचीच केलेली होती ! एका कापडाच्या दुकानात आलमारीत फसविलेली घड्याळे अभिनव वाटली. त्यात तारखेचीहि व्यवस्था होती. कापडांचे भाव मात्र त्रिचनापल्ली विभागापेक्षा महाग वाटले !

‡‡‡‡‡‡-

दिनांक २ जून १९६१ रोजी पहाटे ५ वाजता ढगाळ वातावरणात आम्ही स्टेशनवरून पायीच पद्मनाभमंदिराकडे गेलो. हवामान थंडाव्याचे व प्रसन्न असे होते.

हे मंदिर राजा बालवर्म्याच्या मालकीचे आहे.दारावर संगीनधारी पहारेकरी होते. प्रथमदर्शनी एक भव्य द्वार आढळते. त्यावरची गच्ची

व तिच्या पायऱ्या यांची पडझड झाली आहे. बाजूला एक तलाव आहे.

या मंदिरात जातांना एक नियम पाळावा लागतो. फक्त हिंदूंनाच आत जाता येते, असा तो नियम असून मराठी, हिंदी, तमीळ इत्यादि अनेक भाषांमध्ये तो लिहून ठेवलेला होता. हिंदीतील पाटी 'केवल हिंदू धर्मावलम्बियोंको प्रवेश दिया जाता है' अशी असून तिचे मराठीकरण असे आहे– 'हिंदुधर्मियांना मात्र आत जाण्यास परवानगी आहे.' अर्थात या नियमाचे विकृतीकरण येथे करण्यात येते. हिंदूधर्माची खूण म्हणून धोतर वा लुंगी नेसून आणि बाकीचे सर्व कपडे उतरवून उघड्या अंगाने या देवळात जावे लागते. या नियमामुळे आम्ही आमच्या फुलपँटी दारावर सोडल्या व पाळीपाळीने एकमेकाची धोतरे नेसून आत गेलो ! जातांना वैष्णवांचे उभे गंध कपाळाला चोपडायला विसरलो नाही. गंमत ही की, धोतर नेसून या मंदिरात परधर्मीय गेला तरी खपतो असे दिसून आले ! धोतर ही हिंदुधर्माची खूण !

या मंदिरात दर्शनाला जाण्यासाठी ६ ते ६॥, ८॥। ते ९॥, ५ ते ७। ह्या वेळा निश्चित केल्या आहेत. ठीक ६ वाजता आम्हाला मंदिरात सोडण्यात आले. पद्मनाभाची झोपलेली मूर्ति इतकी लांब की, ती तीन खोल्यांमधून पाहावी लागते. एकीतून मुख, दुसरीतून पोट व एक बोट उंच केलेला हात आणि तिसरीतून पावले दिसतात. शेषशायी भगवानाची ही मूर्ति १८ फूट लांब आहे.

या मुख्य मूर्तीच्या बाजूला भूदेवी, श्रीदेवी, नारसिंह आणि गणेश यांच्या मूर्ति आहेत. समयांची येथली भव्यता, त्या समया पितळी कासवांच्या पाठीवर असल्यामुळे डोळ्यात भरते. या मंदिरावर कौले नसून पितळी पत्रे आहेत. शिसे ओतून खालची फरशी पक्की केली आहे. देवळासमोर एक चौक व त्यानंतर लांबोळा सभामंडप आहे. या मंडपात तंबोरेवाले तीन भजनकरी जोराने चालत व मल्याळी गीत म्हणत होते.

राजे बालवर्मा या देवळात सकाळी ८ वा. दर्शनास येतात व ९॥ ला निघून जातात. तेव्हा लोकांना त्यांचे दुरून दर्शन घेता येते.

तिरुवनन्तपुरम् ( त्रिवेंद्रम ) या शहरातील हे अनंताचे पवित्र मंदिर पाहिल्यावर शहरात भटकलो. हे गाव समुद्रकाठच्या (२ मैल दूर) उंच पण लहानशा टेकाडावर वसले असून येथील सडका, बागा व इमारती सुंदर, स्वच्छ व टुमदार आहेत. इतके स्वच्छ व नीटनेटके शहर आमच्या दौऱ्यात आम्ही पाहिले नाही. संपूर्ण भारतात इतके स्वच्छ शहर दुसरे नाही !

७–१० च्या बसने 'वॉटरवर्क्स' पाहण्यासाठी गेलो. येथे सरकारी बस–व्यवस्थेचे बोधचिन्ह हत्तींचेच आहे. हत्तीरोगाचे भिकारीहि या भागात जास्त आहेत. जातांना टुमदार सचिवालय, आयुर्वेद कॉलेज, टाऊनहॉल, सार्वजनिक वाचनालय, मेडिकल कॉलेज, इत्यादि संस्थांच्या इमारती मोटारीतून दिसल्या. केळी व ताड यांच्या मिश्रणातून तयार केलेले कलात्मक असे नवीन प्रकारचे झाड सेक्रेटरीएटमध्ये दिसले. हे प्रयोग मुंबईत आधीच झाल्याचे कळले. या भागात ख्रिश्चनांची संख्या बरीच असून अडीचशे वर्षापूर्वीचे एक गिरजाघर त्रिवेंद्रमला आहे.

कौडीयार–पॅलेस नामक एका आलीशान राजवाड्याजवळ 'वॉटरवर्क्स'-इमारत आहे. ६० मैलांवरील करोना नदीच्या धरणाचे पाणी येथे आणून मजलाभर उंचीच्या खंदकांमध्ये ते शुद्ध केले जाते. त्यासाठी प्रथम ते पाणी क्लोराईड व सल्फेट यांच्या मदतीने हलके करण्यात येते. त्यानतर नळांमध्ये पाठविण्यासाठी ब्लीचींग वगैरे संस्कार करून ते पाणी योग्य असे बनवितात.

येथील कोणत्याहि इमारतीचा परिसर वनराईंनी वेष्टिलेला आढळला. आम्ही जी वेधशाळा नंतर पाहिली, तेथेहि हाच अनुभव आला. ही वेधशाळा एका उंच टेकडीवर आहे. येथून सारे त्रिवेंद्रम शहर झाडोळ्यात लपलेले आहे, असे वाटते. फक्त झाडीच तेवढी दिसते. घरे

क्वचितच दिसतात. या वेधशाळेत कॉस्मिक किरणांची लॅबोरेटरी व इतर विभाग पाहिले. लॅब्रोरेटरीच्या उंच गच्चीवर सूर्योदयवेळा, सूर्यास्तववेळा, वाऱ्याची दिशा दाखविणारी यंत्रे होती. आकाशातील तारे दुर्बिणीतून पाहण्यासाठी लावलेली यंत्रेहि येथे पाहिली. खालच्या मजल्यावर भारतीय प्रमाणवेळ दाखविणारे जुने घड्याळ टांगलेले होते.

या वेधशाळेजवळ १९३५ मध्ये तयार केलेले त्रिवेंद्रमच्या वापराच्या पाण्याचे वॉटरवर्क्स आहे. ५४६ हजार गॅलन पाणी साठविण्याची आज योजना येथे आहे. हे पाणी दोन टाक्यांमधून साठविता येऊ शकते. या टाकींचा दर्शनी भाग एका जलदेवतेचे दगडी चित्रांकन करून सजविलेला आहे.

त्रिवेंद्रमचे प्राणीसंग्रहालय बरेच मोठे आहे. झाडाझुडुपात लपलेले प्राणी वनात असल्यासारखे वाटत होते. सापाचे अनेक प्रकार व पांढरे उंदीर आढळले. हिरव्या फांदीवरील हिरवा साप अगदी फांदीसारखाच दिसत होता. येथील मैदानात गवत कापणारा एक माणूस तलवारीने डोके उडवावे तसा गवत कापत होता. गवत काढण्याची ही अभिनव रीत येथेच पाहावयास मिळाली.

लगतच वस्तुसंग्रहालय आहे. येथे दक्षिणी कलेचे अनेक नमुने आहेत. नृत्यप्रकारांच्या, मूर्तिकलेने प्रेक्षक स्तंभित होतात. दिवे व दागिने यांचे असंख्य प्रकार या म्युझियममध्ये ठेवण्यात आले आहेत. १४ व्या शतकातील ध्यानीबुद्धांचा एक मूर्तिसंच या म्युझियममध्ये आहे. मेलेला कासव, हत्ती, मगर, कासव इत्यादिकांचे मोठमोठे सांगाडे येथे आहेत. येथे १७ व्या शतकातील काचेच्या बाटलीवरील पेंटिंग व १६ हजार वर्षापूर्वीची भांडी पाहावयास मिळाली. विशेष हे की अनेक जागी गणपति दिसला. कित्येक जागी त्याला उजवी सोंड होती. आज चतुर्थीहि होती. आमच्यातील महिलांची श्रद्धा अशा सर्व गणपतींना नमस्कार केल्याशिवाय कशी राहील ?

श्रीचित्रालय हे त्रिवेंद्रमचे व केरळचे एक भूषण आहे. म्युझियम-जवळच १८ खोल्यांमधून ते थाटण्यात आले आहे. सकाळी ८ पासून सायंकाळी ६ पर्यंत ते उघडे असते. भारतातील व भारताबाहेरील विभिन्न चित्रकारी येथे पाहावयास मिळते. चित्रकार राजा रविवर्म्याचा हा मातृप्रदेश आहे. या चित्रालयातील अनेक चित्रे मोह घालतात. 'सायंकाळी परतणारा पथिक' हे चित्र वर्णनातीत मोहक असे होते. ह्यूएन्त्संग व बाजीप्रभू यांची चित्रे, स्कंदपुराणाची ताडपत्रावर लिहिलेली सचित्र कथा, उर्दूतील महाभारत, प्रख्यात देवळांमधील शिल्पांची चित्रे व अजिंठ्याच्या लेण्यांमधील चित्रे आकर्षक आहेत. मुंबईचे श्री.एम्.एस्.जोशी यांचे 'नाशिकघाटा'चे बक्षीसपात्र चित्र अत्यंत विलोभनीय वाटले. एका दिवाणखान्यात राजा रविवर्मा (१८४८–१९०६) यांची भव्य चित्रकला पूर्णपणे प्रदर्शित करण्यात आली आहे. रविवर्म्यांची चित्रे पाहण्यासाठी तरी त्रिवेंद्रमला एकदा जाऊन यावेच इतके मनोहर हे दालन आहे. रविवर्म्यांच्या पुतण्याची व बहिणीची पण चित्रे येथे आहेत. राजराजवर्मांची १९०४ मधील पेन्सिल–चित्रकारी हृद्य वाटली; तर रामवर्मांच्या 'नवोढे'ने चुटपूट लावली ! रविवर्म्यांचे गुरु फ्रेंच ब्रुक्स यांची चित्रे एका खोलीत लावली असून ती पूर्णत: भारतीय आहेत.

सकाळी १० वा. पाऊस सुरू झाला. प्रवासात प्रत्यक्षत: लागलेला हा पाऊस त्रिवेंद्रमला त्रासदायक व्हावा इतका झाला. गेल्या मेमध्ये १६ इंच पाऊस झाला, असे वेधशाळेत कळले होते.

दक्षिणेत बसव्यवस्था अनेक शहरांमध्ये आहे. ती चांगली आहे. मद्रास, सालेम, तंजावर, त्रिची इत्यादि शहरांमधील बसमोटारींमध्ये बायकांची खास जागा ठरलेली असते. बाईमाणूस आल्यास पुरुष उठून जागा देतात; किंबहुना ती जागा द्यावीच असा संकेत इच्छेने वा अनिच्छेने पाळावा लागतो. परंतु केरळ याबाबतीत प्रगत वाटले. शिक्षण व नागरिकत्वाची भावना यात प्रगति साधलेल्या केरळातील स्त्रिया कामा-

दिकासाठी घराबाहेर सर्रास वावरतांना दिसल्या. दक्षिणेत महाराष्ट्रासारखे हे दृश्य फक्त केरळलाच दिसले. बसमोटारींमध्ये या बायका मागाहून आल्या तर त्या उभ्या राहत व जेथे जागा रिकामी होईल तेथे क्रमाने बसत. इकडील बायकांची पेहराव–पद्धती पण अलग आहे. शहरात ती सुधारलेली असली तरी खेड्यांमधून परकर, वर कुडत्यासारखे वस्त्र व खांद्यावर टॉवेल असा बऱ्याच बायकांचा स्वच्छ व पांढरा पोशाख आढळला. चपला वापरणारे लोक द्राविडदेशात फार कमी दिसले.

मद्रासकडील सर्व शहरांमधील बसमध्ये कंडक्टर गाडी सुरू करण्यासाठी 'राईट' म्हणायचा. मद्रासला त्याशिवाय शिटी वाजविली जाई. त्रिवेंद्रमलाहि राईट कायम आहे. फक्त शिटीऐवजी दोरीची घंटी लावलेली असते. खास त्रिवेंद्रमला, व इतर दक्षिणी शहरांतील बसमध्ये चिल्लर पैसे नसल्यास कंडक्टरकडून तावडतोब रुपयाची मोड मिळत नाही. आधी तो रुपया घेतो व नंतर तिकिटे देऊन संपल्यावर तो मोड परत देतो. बसमध्ये अरेरावी करणारे लोक वा कर्मचारी कधी आढळले नाहीत.

दुपारी गाडीत विश्रांती घेऊन सायंकाळी समुद्रकिनाऱ्याला जाण्यासाठी प्रथम बसकरिता पद्मनाभममंदिराकडे पायी गेलो. तेथून गर्दीच्या बसवर चढलो. ऑफीस सुटलेल्या मुली घराकडे जाण्यासाठी बसमध्ये बऱ्याच होत्या. बसमधून एक शिक्षित म्हातारा नाराळाचा काथ्या घेऊन चालला होता. त्रिवेंद्रमच्या लोकांचे कपडे पांढऱ्या रंगाचे असूनहि स्वच्छ असतात. पण त्रिवेंद्रम शहरात धोब्याची दुकाने मात्र फारच कमी आहेत. स्वावलंबी लोक घरीच कपडे धूत असावेत.

समुद्रावर जाणाऱ्या बसने बराच वेळ घेतला. अंतर मोठे होते. म्हणूनच २० न. पै. तिकीट पडले. समुद्रकिनाऱ्याच्या अलीकडे उतरून आम्ही आरंभी येथील मत्स्यालय बघितले. हे मत्स्यालय अगदीच लहान आहे. त्यात माशांचे फारच थोडे प्रकार ठेवलेले आहेत. खाजवल्यानंतर

मोठे होणारे मासे व सामुदायिक रीतीने ओळीत फिरणारे मासे पाहणे मौजेचे वाटले. हिंदी महासागरात सापडलेली तपकिरी कासवी हे येथील वैशिष्टय असून ती एका वेळी १५० अंडी घालते. अशी कासवी अन्यत्र पाहण्यात आली नाही.

या मत्स्यालयाजवळच एक लहानसे विमानतळ आहे. ते पाहून आम्ही समुद्रकिनाऱ्यावर जाऊन बसलो. तेथील लाटांचे तांडव पाहून चित्त पण तांडवले. एवढया मोठया लाटा विस्तारश: कोठे पाहिल्या नाहीत. सारा किनारा दुधाळला अन् फेसाळला होता. प्रचंड लाटांवर होडया हेलकावे खात चालल्या होत्या. कोळयांची काही मुले लाटांवर 'सर्कस' करून दाखवीत होती व लोकांना पैसे मागत होती. या किनाऱ्यावर आम्ही केळी घेतली. येथील केळी गोडीत विशेप होती. मद्रास-कडची केळी इतकी चांगली लागत नाहीत.

त्रिवेंद्रमच्या समुद्री वाळूत काळया वाळूचा एक थर आहे. या वाळूत इल्मेनेट व मॅग्नेट असून इल्मेनेटपासून टिटॅनियम होते. क्विलन येथे हे टिटॅनियम अलग करण्याचे काम चालते. त्रिवेंद्रमलाहि टिटॅनियम–फॅक्टरी आहे. पक्का रंग देण्यासाठी टिटॅनियम वापरले जाते. पिवळया वाळूपासून युरेनियम व थोरीयम होत असून त्याची कामे करणारे कारखाने अर्नाकुलमजवळ अलवाई येथे आहेत. त्रिवेंद्रमला रबर–कारखाना आहे. तो पाहण्यासाठी पूर्वानुमति आवश्यक असते.

रात्र होत आली, म्हणून बसने आम्ही परत आलो. फलाटावर जेवण करतांना बाजूला काढलेली चप्पल मी विसरलो व तिची आठवण दुसऱ्या दिवशी १२ वाजता आली. अर्थात् तेव्हा शोधूनहि ती मिळणार नव्हतीच !

\#\#\#--

३ जून ६१ ला त्रिवेंद्रमला सकाळपासून सारखा पाऊस पडत होता. डब्यातच बसून १ वाजेपर्यंतचा वेळ काढला. स्वयंपाक डब्यात करण्याचा प्रयत्न झाला. जेवण आटोपून आम्ही आमच्या डब्यांना कुलुपे लावली व २ वा. बसमोटारीने कन्याकुमारीसाठी निघालो.

त्यापूर्वी त्रिवेंद्रम स्टेशनावर एका ज्येष्ठ कर्मचाऱ्याला निरोप देण्यासाठी रेल्वेचे कितीतरी कर्मचारी जमले होते. जयघोष करीत गाडी निघून गेली व सुमारे १ हजार लोक परतले. त्या सर्व लोकांजवळ प्लॅट-फॉर्मची तिकिटे होती. नागरिकत्वाच्या भावनेचा एवढा विकास देशातील प्रत्येक भागात आढळला तर ?

क्विलन ते त्रिवेंद्रम सडकेप्रमाणेच कन्याकुमारी सडकहि अखंड घरांची असून गावे तुटली, असे वाटतच नाही. एकाच गावातून आपण चाललो असे वाटते. वस्तुतः अनेक गावे त्या सडकेने आहेत.

बलरायपुरमला 'हिंदी महाविद्यालया'ची पाटी वाचली. इकडील हिंदी उच्चार गमतीदार वाटतील. मेलऑफीसवर लिहिलेले दिसले— 'मेयिलऑफीस' ! बऱ्याच गावी मद्रासच्या 'बुहारी' हॉटेलची नावाच्या बाबतीत नक्कल केलेली दिसली. पण या हॉटेलामधली व्यवस्था अगदीच 'बोहारी' असायची ! इकडील हॉटेलात खोबरेल तेलाचा उपयोग तळणासाठी करतात.

डोंगर, वनराई व उंच टेकड्यांचा परिसर यांमधून जाणाऱ्या आमच्या ६ बसमोटारी सुपारीची झाडे, नारळी, भातशेती, फळ-बागा यांना मागे टाकीत पळत होत्या. म्युनिसिपालटीच्या एका गावी (अमरविला ?) कर घेण्यासाठी आडवा बांबू लावून सडक बंद केली होती. नाक्यावरील दोरी ओढताच तो बांबू वर जाऊन तिरपा होई व

रस्ता मोकळा होऊन जाई. ही कमखर्ची योजना ग्रामोद्योगी–प्रेमियांनी ध्यानात ठेवायला हरकत नाही. गावात घरासमोर धान कांडण्याची मोठमोठी दगडी उखळे मांडलेली होती. ताडांच्या पानांच्या बादलीने पाणी ओढणाऱ्या बाया काही खेड्यातून आढळल्या. काही भागात दगडावर दगड रचल्याप्रमाणे डोंगर दिसले.

कन्याकुमारीपर्यंत सडक चांगली असून दोन्ही बाजूंनी जलाशये व भातशेती काठाकाठाने बहुतेक दिसली. नहरांमुळे पाणी सर्वत्र खेळवलेले आहे. मातीचा लालभडकपणा कन्याकुमारीजवळ वाढत गेला आहे. त्रिवेंद्रमपासून कन्याकुमारी ४४ मैल आहे.

त्रिवेंद्रम ते कन्याकुमारी सडक सरळ समुद्रकाठी गेली असून उतरताक्षणीच हिंदीमहासागर (भारतीसागर), अरबी समुद्र (सिंधुसागर) व बंगालचा उपसागर (गंगासागर) यांच्या मिलनाचे मधुर दर्शन घडते. या निमुळत्या भूप्रदेशाला तिन्ही बाजूंनी येऊन भिडणाऱ्या तिन्ही सागरांचे पाणी अलगअलग ओलखता येऊ शकते. ज्या अंतिम भूभागावरून हे दर्शन घडते, तेथे एक १६ स्तंभांचा मंडप उभारला असून जवळच स्नान करणाऱ्या स्त्रियांना कपडे बदलविता यावेत, म्हणून ४–५ खोल्या बांधलेल्या आहेत. मंडपापुढे पायऱ्या आहेत. त्या उतरून तिन्ही समुद्रांच्या संगमाचे पाणी अंगावर घेता येते. या संगमस्थानी येणाऱ्या सागरी लाटांमध्ये आम्ही अक्षरश: भिजलो. समुद्रातील खडकाळ उंचवटयांना ठेचाळत येणारा महोदधि (हिंदी महासागर) व बाजूंनी कल्लोळत येणारे सिंधुसागर व गंगासागर या तिन्हींच्या लाटा या स्थानी घोटाळत खेळत असतात. भारतमातेच्या या पादतीर्थात सुस्नात होण्याचे भाग्य ज्यांना लाभते, ते खरोखरी धन्य होत !

येथून ४०–५० यार्डांवरच समुद्रात 'श्रीपादशिला' नामक टेकडी आहे. हिचे आधुनिक नाव विवेकानंद–टेकडी असे आहे. ह्या टेकडीवर गोड्या पाण्याचा झरा आहे. येथे इ. स. १८९२ साली स्वामी विवेकानंद

आले होते व त्यांनी तीन दिवस तप केले होते. सध्या गावात श्रीरामकृष्ण-आश्रम असून त्याचे ग्रंथालय सुस्थितीत चालू आहे. या ग्रंथालयाला म. गांधींनी भेट दिल्याचा उल्लेख शेरेपुस्तकात नमूद आहे.

कन्याकुमारी हे जगातील प्रेक्षणीय स्थानांमध्ये स्वत:चे वैशिष्टय राखणारे एक स्थळ आहे. भारताच्या दक्षिणभागावरील या अंतिम अग्रावर सकाळी बंगाली उपसागरातून सूर्योदय झाल्याचे व सायंकाळी अरबी समुद्रात सूर्यास्त झाल्याचे दृश्य दिसते. परंतु हे दृश्य पाहण्याचे आमच्या भाग्यात नव्हते. दिवसभरात १–२ तास असलेले ऊन एकदम लोपले व सूर्यास्तापूर्वीच आकाश बादळले आणि ढगाळले. जोराने पाऊस सुरू झाला: म्हणून सूर्यास्त बघायला मिळाला नाही. दुसऱ्या दिवशीचा सूर्योदय पाहावा असे वाटले. पण येथील नित्याच्या वादळी वातावरणा-मुळे फार कमी वेळा सूर्योदय व सूर्यास्त बघता येण्याचा संभव असतो, म्हणून रात्री राहण्याचे टाळले. दररोजचा सूर्योदय व सूर्यास्त पाहण्यासाठी कन्याकुमारीला रसिकांची झुंबड उडते. कन्याकुमारीचे अनन्यसाधारण महत्त्व सूर्यदर्शनाच्या दृष्टीने आहे. चैत्री व शारदीय पौर्णिमेला सायंकाळी गंगासागरातून उदय पावणारा चंद्र व त्याच वेळी अरबसागरात मावळ-णारा सूर्य यांचे दर्शन कृतकृत्यतेला पोहचवते. कन्याकुमारीला १२ हि महिने कमीजास्त प्रमाणात यात्रा असते.

कन्याकुमारीच्या या भारतसागरपदतीर्थात सर्वतीर्थांचें पुण्य साठविले आहे असे समजले जाते. महाभारतातहि या तीर्थाचा महिमा वर्णिला आहे. येथील पुष्करिणीला काशीस्नानाचे महत्त्व आहे. इंद्राला पडलेली सहस्त्रभंगे या तीर्थात स्नान केल्याने नष्ट झाल्याची एक कथा येथेहि चिकटवली आहे. येथे इंद्राने (!) स्थापलेल्या विनायकाची एक मूर्ति आहे ! (वस्तुत: ही कथा वऱ्हाडातील कळंब गावची असून गणेश-पुराणात तसा स्पष्ट उल्लेख आहे.)

कन्याकुमारीला 'कन्या कुमारी'चे मंदिर असून ते समुद्रालगतच

१६ खांबी मंडपाच्या मागे परकोटात आहे. आत गेल्यावर दिव्यांच्या प्रकाशात कुमारीदेवीची करुणगंभीर व सुंदर मूर्ति दिसते. अंतर्गाभाऱ्यातील या मूर्तीच्या अंगावर बरेच दागिने असतात. डोळे आणि नाक यांना चढविलेले अलंकार हिऱ्यांचे असावेत. नाकातील हिऱ्याची बेसर चमकत होती.बाकीचे दागिने दिव्यांच्या योगाने चमकत असावेत. कन्याकुमारीच्या मंदिरातसुद्धा लुंगी-धोतरातच जावे लागते. हे कपडे चढवून उघडाबोडखा आत जाणाराच फक्त हिंदु ठरतो ! धोतरे न नेसणारांना २–४ आणे घेऊन ती भाडयाने देणारे पंडेहि असतात. ( संपूर्ण केरळात मंदिरांच्या बाबतीत हा लुंगीधोतरांचा नियम आहे की काय, नकळे ! सध्या कन्याकुमारी केरळात न मोडता मद्रास राज्यात मोडते. कन्याकुमारी हा एक जिल्हा आहे.)

शिल्पात सुंदर असलेल्या या मंदिरात सूर्य व गणपति यांची एकच मूर्ति एके जागी आहे. पुजाऱ्याला पूजेचा त्रास होत होता, म्हणून सूर्याला गणेशाजवळ आणले ! हे कुमारीमंदिर प्रथम परशुरामाने बांधले (?) व नंतर अनेक राजांनी ह्या मंदिराच्या बांधणीत भर टाकली. मंदिरातील विविध कारागिरी निरनिराळ्या काळातील आहे.

विष्णूचा सहावा अवतार परशुराम ह्याने गोव्यापासून कन्याकुमारीपर्यंतच्या भूभागावर अधिपत्य गाजविल्याची कथा आहे. हा भूभाग ऐतिहासिकदृष्टया 'नांजीनाड' या नावाने पांड्य राजांच्या ताब्यात काही शतके होता. पांड्यांनी तामीळनाड भागावर बरीच वर्षे राज्य केले. गावात पांड्यकालीन तामिळ धर्तीची शिल्पे आहेत. पांड्य राजांची कुमारीदेवी ही गृहदेवता असावी असा एक तर्क आहे. अनेक वर्षापूर्वीपासूनच्या या 'कुमारी'ला इतिहास आहे, हे निश्चित ! ग्रीक लेखक टॉलेमीच्या मते कन्याकुमारी हे एक उत्कृष्ट बंदर प्राचीनकाळी होते.

धार्मिकदृष्टया कन्याकुमारीचे महात्म्य अपार असून स्कंदपुराणात

तत्संबंधी कथा आल्या आहेत. भरताने सर्व आर्यावर्तावर राज्य केले व या देशाचे नाव तेव्हापासून भारतवर्ष वा भारतखंड पडले. या राजाला ८ मुले व १ मुलगी होती. मुलीचे नाव कुमारी असे होते. भारताचे ९ विभाग करून या ९ जणांना भरताने ते वाटून दिले. दक्षिणप्रांत कुमारीला मिळाला. तेव्हापासून या प्रदेशाला 'कुमारीनाडु' हे नाव मिळाले व या नगरीला 'कुमारियमपदि' म्हणजे 'कुमारीनिवास' असे नाव पडले. परमेश्वराची पराशक्ति या कन्येच्या रूपाने येथे वास करते असे म्हणतात. कन्याकुमारीचे महात्म्य यजुर्वेदात असल्याचे पुराणाभिमानी सांगतात.

शोणितपूरचा राक्षस राजा दक्षप्रजापति ह्याला बाण, मूक, शुभ व महिष या नावांचे चार पुत्र होते. बाणासुर तपोबलाने अमर झाला. त्याला फक्त 'कन्या'च मारू शकत होती.'ती मला मारू शकत नाही' असा त्याला गर्व झाला होता. बाणासुराने सज्जनांचा फार छळ केला. तेव्हा विष्णूला लोक शरण गेले. विष्णूच्या आदेशाप्रमाणे लोकांनी ज्योतिःस्वरूप पराशक्तीची आराधना केली. यज्ञवेदीतून विद्युल्लता कडाडली. ती कन्यारूपाने येऊन या दक्षिणसागरतीरावर तप करू लागली.

तिचे लग्न मातापित्यांनी ठरविले. तेव्हा, तसे झाल्यास राक्षस मरणार नाही म्हणून नारदांनी युक्ति केली. नारद कुमारीकडे गेले. त्यांच्या कथनाप्रमाणे कुमारीने अट घातली, "डोळा नसलेला नारळ, शिरा नसलेले विडयाचे पान व डोळा नसलेला ऊस सूर्योदयापूर्वी जो आणून देईल त्याला मी वरीन !"

इंद्राने ह्या वस्तु पैदा केल्या. पण रस्त्यातच कोंबडा आरवला. ते स्थळ 'वपुक्कापारै' होय. दिवस निघाला म्हणून इंद्र तेथेच थांबला. ते स्थान झाले 'स्थाणुतीर्थ' !

कुणीहि वर सूर्योदयापूर्वी आला नाही. कुमारी कुमारीच राहिली. ती अजूनहि योग्य वराची वाट पाहत अखंड उभी आहे ! लग्नाच्या तया-

रीचे दागिने, कपडे वगैरेंची वाळू झाली व शिलारूपाने काही अलंकार कन्याकुमारीच्या पदतली पसरले. रंगीबेरंगी वाळू आजहि आपल्याला या समुद्रात दिसते. हिंदी महासागराची पांढरी, अरबी समुद्राची लाल व बंगाली उपसागराची काळी वाळू यांचे थर एकमेकावर तयार होतात व पुन्हा ते बदलतात. पुन्हापुन्हा हे रंग पालटतात. या वाळूत हे तिन्ही रंग मिसळलेले असतात. पांढरी वाळू हे कुमारीचे तांदूळ, काळी वाळू हे काजळ व लाल वाळू हे कुंकू समजले जाते.

या कुमारीला बाणासुराने लग्नाची मागणी घातली. ती रागावली व तिने युद्धाचे आव्हान दिले. दोघांची लढाई झाली. मूकासुर बाणाच्या मदतीस धावला. तेव्हा देवीने मूकासुराला मारले. तेथेच आता मूकांबिका-स्थान आहे ! मूकासुराला मारण्यासाठी देवीने भद्रकाली निर्माण केली, अशी कथा आहे !

बाणाला कुमारीदेवीने मारले त्या जागी बाणतीर्थ आहे. नंतर ती जपमाळ घेऊन तपाराधान करीत बसली. जग नष्ट होण्याच्या वेळी भगवान शंकर कुमारीशी विवाह करणार आहेत असे म्हणतात !

प्रकाशवती देवीच्या नावानेहि कन्याकुमारीची प्रसिद्धी आहे. प्रकाशदर्शनाची देवी येथे पूजली जाणे साहजिक आहे ! या गावात आणखी काही स्थाने पाहण्यासारखी आहेत. स्थाणुतीर्थातील अभिषेकाचे पाणी समुद्राला मिळते असे म्हणतात. कन्याकुमारीपासून ८ मैलांवर असलेल्या नागरकोईलच्या रस्त्यावर शुचींद्रम–नगर आहे. तेथील शिव-मंदिराला 'ज्ञानवनक्षेत्र' असे म्हणतात. येथे एक सुंदर तलाव आहे. कन्याकुमारी गावात अनसूयेची परीक्षा ब्रह्मा, विष्णु व महेश यांनी घेतली अशीहि कथा सांगतात ! हनुमंताची एक प्रचंड मूर्ति येथे असून त्या पहाडाला 'मरुत्वामलै' असे नाव आहे. या पहाडावर औषधी-वनस्पती सापडतात.

कन्याकुमारीचे सर्वांत आकर्षक स्थळ म्हणजे संगमाकाठचे

गांधीस्मारकमंदिर ! गांधीजींच्या मृत्यूनंतर १२ फेब्रुवारी १९४८ या तेरवीच्या दिवशी येथे त्यांच्या रक्षेचा काही अंश शिरविला. त्या स्मरणार्थ ( त्यावेळच्या ) त्रावणकोर–कोचीन सरकारने राष्ट्रपित्याच्या स्मारकाची योजना आखली. आचार्य कृपलानी यांनी २० जून १९५४ रोजी कोनशिला बसविलेल्या या स्मारकाचे काम ऑक्टोबर १९५६ मध्ये पूर्ण झाले. एकूण ३ लाख रुपये या स्मारकावर खर्च झाले. हे गांधीमंदिर सर्वांना मुक्त असून या मंदिराला दारे नाहीत व मूर्तिहि नाही. स्वच्छता व पावित्र्य यांचा वास येथे प्रकर्षाने आहे. हे मंदिर तीनमजली असून वरून समुद्रदर्शन घेण्यात काही और मजा असते. विशेष हे की या मंदिराच्या वरच्या बाजूला एक छिद्र असून त्यातून येणारे सूर्यकिरण फक्त गांधीजींच्या जन्मतिथीला, म्हणजे २ ऑक्टोबरलाच गांधीस्मृतीच्या खास शिलेवर पडतात !

या गांधीमंदिराजवळ आमचे काही लोक कवड्याशंख विकत घेत असतांना आम्हाला सुब्रमणियम नावाचा प्राथमिक चौथ्या वर्गात शिकणारा मुलगा आंबे विकतांना आढळला. त्याला हिंदी छान येत होते. त्याचे सर्व आंबे त्याच्या गोड बोलण्यामुळे खपले व त्याला ते पुन्हा आणावे लागले. हा मुलगा शनिवारी, रविवारी व सुटीच्या वेळी यात्रिकांना असल्या वस्तु विकून घरातील दारिद्र्याला ठिगळे जोडण्याचा प्रयत्न करतो. त्या मुलाने आपल्या शेंडीवाल्या हिंदी गुरुजींची नक्कल करून सांगितले, "हमारा मास्टर बोलता है- टेबुलपर पुस्तका हईऽऽन!" 'हैं'च्या लांब व नाकातील उच्चारावर त्याचा जोर होता.

कन्याकुमारी ह्या गावाची लोकसंख्या सुमारे ६ हजार असून येथे रोमनकॅथॉलिकांची संख्या अधिक आहे. पूर्वकिनाऱ्यावर कोळ्यांची घरे असून या लोकात सेंट फ्रांसिस झेवियर हा पाद्री राहिला होता. मोठ्यांपैकी गणले गेलेले एक गिरजाघर येथे असून त्यात २ हजार प्रार्थी एकाच वेळी बसू शकनात.

कन्याकुमारीचा आमचा बराचसा कार्यक्रम पावसातच उरकावा लागला. अंगात वादळवाऱ्यामुळे चांगलीच हुडहुडी भरली. सायंकाळी ७ वाजता परतलेल्या बसमोटारी त्रिवेंद्रमला रात्री १० वाजता पोहचल्या.

++ ++ ++-

रविवार दि. ४ जून ६१ रोजी पाऊस सारखा पडत होता. त्यामुळे बाहेर जाण्याची सोय नव्हती. पावसामुळे स्थानकावरील उपहार-गृहाच्या मालकाने आपले स्वयंपाकघर सहलीच्या स्वयंपाकासाठी वापरू दिले. या उपहारगृहात रेल्वेचे स्थानिक वेळापत्रक लावले असून गाडी सुटण्याला ५ मिनिटे अवधी असतांना वाजणाऱ्या घंटच्या येथे आहेत. या स्थानकावरील पहिल्या श्रेणीच्या स्नानगृहातील शॉवरबाथची अनेकांना पर्वणी वाटली ! रात्री ११ वाजता आमची खास गाडी त्रिवेंद्रमहून निघाली.

++ ++ ++-

दि. ५ जून ६१ ला सकाळी ११ वा. आमची गाडी मदुराई मुक्कामाला आली. दुपारी पायी चालत जाऊन मीनाक्षी–मंदिरात गेलो. जातांना पाय भाजत होते म्हणून साडेतीन रुपयात एक साधी चप्पल घेऊन हरवलेल्या चपलांची जागा भरून काढली. चपलांच्याच दुकानात चपला काढून ठेवून आम्ही २–३ जण मदुरामंदिरात गेलो.

(दक्षिणेतील अतिप्राचीन अशा या शहराला अडीच हजार वर्षांचा इतिहास आहे. परदेशी प्रवाशांनी जुन्या काळापासून या शहराचे वर्णन लिहून ठेवले आहे.)

'मदुरा' हा शब्द 'मधुरा' असा आहे. मधुरेचा इतिहास म्हणजेच दक्षिण भारताचा इतिहास होय. पांड्य राजे येथे प्रथमपासून राज्य करीत होते. लंकेचा विजय नामक राजा (इ. स. ५००) हा पांड्य राजाचा जावई होता. हे शहर ग्रीक आणि रोमन लोकांनाहि परिचित होते. भारताची अथेन्सनगरी म्हणून मदुरेचा उल्लेख होतो.

मेगॅस्थेनिस हा चंद्रगुप्त मौर्याकडे परराष्ट्रवकील म्हणून काम करीत असता (इ. स. पू. चवथे शतक) ह्या शहराला भेट देऊन गेला. टालेमीने देखील ह्या शहराचा उल्लेख केलेला आहे. पांड्य राजाकडून रोमनराजांकडे वकील पाठविले जात असत. मार्कोपोलो ह्या तत्कालीन प्रवाशाच्या मताप्रमाणे मदुराई प्रांत जगात शानदार ठरला होता. ह्या शहराचे वर्णन चिनी प्रवाशांनीहि लिहून ठेवले आहे. मदुराई हे पांड्यकालीन समुद्रीव्यापाराचे महत्त्वाचे केंद्र होते. पांड्यराजांनी ह्या शहरात शैक्षणिक प्रवृत्तींना फार मोठ्या प्रमाणात उत्तेजन दिले होते. तामीळसंगम नावाची शिक्षणसंस्था पांड्यराजांच्या वेळी चालू होती. १३१० मध्ये हे शहर मुस्लीमांच्या ताब्यात गेले. तदनंतर विजयनगरच्या हिंदुसाम्राज्यात त्याचा समावेश झाला. विजयनगर साम्राज्याच्या अंतर्गत नाईकांनी मदुराईला २०० वर्षे राज्य केले. विश्वनाथ नाईक हा त्यांपैकी पहिला राजा होय. तिरूमलाई नाईकाची प्रसिद्धी त्याने बांधलेल्या प्रख्यात राजवाड्यामुळे आहे. (इ. स. १६२३ ते १६५९). हा राजवाडा अजूनहि चांगल्या स्थितीत पाहावयास मिळतो. नाईकांच्या अमलात दक्षिणभारतातील शहरांना सर्वदूर जोडणारे रस्ते तयार झाले होते. मदुरेच्या इतिहासात नाईकांचा काळ सुवर्णयुग म्हणून ओळखला जातो. इ. स. १७८१ मध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने मदुराप्रांत ताब्यात घेतला. सध्या मदुराई शहर लोकसंख्येच्या दृष्टीने (सुमारे ६ लाख) मद्रास राज्यात दुसऱ्या क्रमांकाचे असून ९ चौ. मैलात ते वसले आहे.

मदुराई—शहर सणोत्सवांचे शहर म्हणून प्रसिद्ध आहे. बाराहि

महिने येथे देवदेवतांचे उत्सव चालू असतात. मीनाक्षीमंदिरासाठी भारतभर मदुरेचा लौकिक आहे. धर्मकलेच्या क्षेत्रात पूर्णत्वाला गेलेले हे पुराण–प्रसिद्ध शहर आहे.

( मीनाक्षीमंदिरात मीनाक्षीची मूर्ति व शिवलिंग आहे. मीनाक्षी ही पांड्य राजकुमारी असून तिने सुंदर–शिवाशी लग्न केल्याची दंतकथा आहे. मीनाक्षीमंदिर ८४७×७९२ फुटांच्या क्षेत्रात वसले असून सुमारे सव्वाकोटीच्या खर्चात तयार झालेले हे मंदिर १२० वर्षांत पूर्ण झाले. या मंदिराच्या छतांवर व भिंतींवर जुनी चित्रकला चितारलेली आहे. ती आता पुसट होत चालली आहे. नाईक राजांनी हरिहरात अभेदत्व कल्पिल्यामुळेच की काय येथे वैष्णवांच्याहि बऱ्याच कोरीव मूर्ति आहेत. मीनाक्षीची लहानशीच पण रेखीव मूर्ति अंतर्गाभाऱ्यात असून दुसऱ्या एका भागात शिवलिंग आहे. अनेक द्वारांमधून या मूर्तींच्या जवळ जावे लागते. मंदिरात एक सुंदर पुष्करिणी आहे. 'तामीळसंगम' या मूर्तिकलेद्वारा २२०० वर्षांपूर्वीपासूनच्या साहित्यकार्याची कल्पना येऊ शकते.

सोन्याचांदीचे अलंकार, दारांचे पत्रे व सुवर्णकळस यांना मंदिरात वाण नाही. या मंदिरात मीनाक्षीलग्नमंडप व चित्रमंडप आहे. हजारखांबी-मंडप हे या मंदिराचे खास आकर्षण आहे. 'भारतातील व पौर्वात्यातील उत्कृष्ट शिल्प' म्हणून या सहस्त्रस्तंभी मंडपाचा उल्लेख फर्ग्युसनने केला आहे. या हजार खांबांवर हजार मूर्तिचित्रे आहेत. त्यातली बरीचशी भाव-चित्रे हृद्य आहेत. एके ठिकाणी प्रेमदेवतेचे मधुर चित्रण आहे. या मंडपातील स्थापत्याची स्तुति आजच्या विज्ञानयुगातहि करावी लागेल.

मीनाक्षीमंदिरात एक सामूहिकप्रार्थनामंदिर आहे. या मंदिरात १५८ दिवस उत्सव चालू असतात. मीनाक्षीमंदिराच्या एका गोपुराशेजारी आतील बाजूस 'सारेगम'चे सुंदर आवाज काढणारे लहानलहान खांब आहेत. निरनिराळ्या पोकळीच्या दगडी नळ्यांची विशिष्ट रचना असल्यामुळे हे आवाज निघू शकतात ! या खांबांचे आवाज नभोवाणीने

अलीकडे ध्वनिक्षेपित करण्यात यश मिळविले आहे. या संगीत–स्तंभांच्या आवाजाची परीक्षा करीत असतांना एक चपराशी रागावून मनाई करीत होता. मात्र एक आणा दिला की तो स्तंभ वाजवू देत असे.

हे विशालव्यापी मंदिर पाहून आम्ही पायीच तिरुमलाई नाईकांच्या इतिहासप्रसिद्ध वाड्याकडे गेलो. हा भव्य राजवाडा आजच्यापेक्षा पूर्वी विस्तीर्ण होता. पण तिरुमल नाईकाचा नातू चोखनाथ (१६६२-८२) ह्याने त्याचा बराच भाग पाडला. कारण त्याने आपले मुख्य ठाणे तिरुचारीपल्ली येथे नेले होते.

या वाड्यात तिरुमलाई नायकांचा एक पुतळा असून तो नमस्कार करीत असलेल्या अवस्थेत आहे. वाड्यात २५२×१५१ फुटांचे आवार आहे. ४० फूट उंचीचे स्तंभ येथे असून एकेक खांब चार माणसांच्या आवातहि मावू शकत नाही. मध्यभागी दरबारहॉल असून त्याची वरची गोल बाजू सुंदर रंगचित्रांनी सजविली आहे. दुसऱ्या बाजूला राणीची कोठी आहे. ह्या वाड्याचा सध्या सदुपयोग होत आहे. केवळ प्रदर्शनीय वस्तु म्हणून हा वाडा ठेवलेला नसून आता येथे जिल्हान्यायालयाच्या कचेऱ्या आहेत.

नंतर आम्ही बसने गांधीस्मारकभवनाला गेलो. मदुरेतील हे एक अत्यंत आकर्षक स्थळ आहे. स्वच्छ, शितल व नेटक्या बागेच्या परिसरात गांधी–चित्रगृह उभारले असून गांधीजींच्या जीवनचित्रावलीचा संपूर्ण पट येथे मांडण्यात आला आहे. एक खुले रंगमंदिर व पुस्तकालय या भवनात आहे. ग्रंथालयाचा बालविभाग शांत व नीटस असा वाटला.

हे गांधी–म्युझियम पाहून बसने रात्री ८ वा. स्टेशनावर आलो. कंडक्टर किंवा चेकर यांना हिंदी, इंग्रजी कळत नव्हते. स्टेशनात आमच्या खास गाडीच्या समोर ५–५ रुपयांच्या सुती साड्या विकायला आल्या होत्या. मदुरेची प्रसिद्धी सुती कापडासाठीसुद्धा आहे. आमची खास गाडी रात्री ११ वाजता मदुरेहून निघाली.

卄卄卄+–

दि. ६ जून १९६१ ला सकाळी ६ वा. आमची खास गाडी त्रिचनापल्लीला आली. रामेश्वरपासून आम्हाला मिळालेली ही मीटर-गेजची गाडी त्रिचीला सोडावी लागली. जवळचे सामान घेऊन गाडी रिकामी केली व आम्ही आपल्या पूर्वीच्या खास गाडीतील आपापल्या डब्यातील जागा घेतल्या. अमरावतीहून मिळालेली ही गाडी आता परत अमरावतीला जाईपर्यंत आमच्यासोबत राहायची होती. यावेळी बसण्या-झोपण्याची अडचण जाणवू लागली. कारण प्रत्येकाने सालेम, रामेश्वर, त्रिवेंद्रम इत्यादि ठिकाणी घोंगड्या, कपडे, सतरंज्या, टोपल्या अशाप्रकारचे जागा गुंतविणारे सामान बरेच घेतले होते.

त्रिचनापल्ली हे दक्षिणेतील प्रवाशांच्या गाड्यांचे विश्रामकेंद्र आहे. त्रिचीला रेल्वेने या दृष्टींनी व्यवस्थाहि केलेली आहे. दिवसभर आम्ही गाडीत आराम केला. रात्री ९ वाजता आमची गाडी त्रिचीहून कोईमतूरसाठी निघाली. त्रिचीला आम्ही अनेकदा आलो व थांबलो. आमचे त्रिची हे येतेजाते विश्रामस्थानच होऊन बसले होते ! आता त्या स्थानी पुन्हा यावयाचे नसल्यामुळे त्रिची सोडतांना निराळ्याच संवेदना प्रत्येकाच्या अंत:करणात निर्माण झाल्या होत्या.

卄卄卄+–


दि. ७ जून ६१ रोजी, गतरात्रीचा प्रवास संपवून पहाटे ४ वा. आमची गाडी कोईमतूरला येऊन थांबली. पावसामुळे १ वाजेपर्यंत कोठे जाता आले नाही. तरीपण, १॥–२ वा. रस्ता चिकचिक असूनहि पायीच ब्लेडम् आणि रेडिओ बनविण्याचा कारखाना पाहावयाला गेलो. या

कारखान्यात रेडिओचे निरनिराळे सुटे भाग तयार करण्यात येतात. काही सुटे भाग परदेशातून आणतात. तेहि लवकरच येथे तयार होऊ लागतील. रेडिओ तयार करण्याचे शिक्षण घेणारे विद्यार्थी व विद्यार्थिनी येथे असून त्यांनीहि रेडिओचे काही नमुने तयार केलेले होते. या शाळेत १॥ महिना, ६ महिने, १ वर्ष, १॥ वर्ष व ३ वर्षे अशा मुदतीचे अभ्यासक्रम असून विद्यार्थ्यांना आपल्या पायावर उभे राहण्याचे शिक्षण दिले जाते. येथे एका दिवसात ५ रेडिओ तयार केले जाऊ शकतात.

नंतर याच कारखान्यातील ब्लेडस् तयार करणारा विभाग पाहिला. लहान जागेतसुद्धा हा कारखाना चालविला जाऊ शकतो. प्रथम तकटाच्या चकत्या कापून त्यांना आकार आणला जातो व नंतर धार लावण्यात येते. प्रथम ब्लेडांचा एक सलग पट्टा तयार होतो व नंतर तो तोडून एकेक ब्लेड अलग करून त्यांची उभी चळत मांडली जाते. धार दिलेल्या ब्लेडांना एका गोलयंत्रावर कागदी आवरण चढविले जाते. एकाच वेळी वरचे लेबल व पांढरा पातळ कागद एकेका ब्लेडवर चढविला जातो. अशातऱ्हेने या कारखान्यात एका दिवशी दीड लाख ब्लेडस् तयार होतात. साधारणत: नव्या तीन पैशात १ ब्लेड या दरात बाजारात हा माल विक्रीस येतो.

कोईमतूर येथे 'बॉटॅनिकल गार्डन' पाहण्यालायक आहे. ॲग्रीकल्चर कॉलेजचा तो विभाग आहे. कोईमतूरला बरीच महाविद्यालये आहेत. एके ठिकाणी मराठी पाटी लावली होती– 'मुर्ती कापडाचे दुकान !' महाराष्ट्रातून तिकडे गेलेल्या लोकांसाठी कुणा मराठी माणसाने हे दुकान चालविले असावे. कोईमतुरी कापड प्रसिद्ध आहेच !

खून, माऱ्यामाऱ्या आदीत दक्षिणी लोक मागे आहेत. या लोकांची शांतिप्रियता प्रशंसनीय आहे. एका खेड्यात हिंदी समजेना. हवी होती चटई. ते समजावून देण्यासाठी झोपून दाखवावे लागले ! खेड्यातून तयार झालेल्या चटया चांगल्या असतात. प्रवासात ह्या चटया बऱ्याच जणांनी विकत घेतल्या.



म्हैसूरचा ललितामहाल.
[पृ. १३७]



म्हैसूरच्या जगप्रसिद्ध वृंदावनबागेतील कारंजांचे रात्री उडणारे जलतुषार. [पृ. १३९-१४०]

++ ++ ++—

दि. ८ जून ६१ रोजी आम्हाला उतकमंड येथे जावयाचे होते. पहाटे ३॥ ला उठून आम्ही आमची तयारी केली.सामान आपापल्या डब्यात ठेवून डब्यांना कुलुपे लावली. खास गाडी कोईमतूर स्टेशनावर राहिली व उटी (उटकमंड) करिता पॅसेंजरगाडीने ५॥ वा. निघालो. मेट्टूपलायम येथे ७ वा. गाडी बदलली. तेथून उटीकरिता विशिष्ट प्रकारची 'डोंगरी आगगाडी' निघाली. मेत्तूपलायम कोईमतूरपासून ३३ किलोमीटर असून उटी ४६ किलोमीटर आहे. मेत्तूपलायमनंतर गाडी भव्य व उंच डोंगर चढू लागते. वर चढतांना ही गाडी मागे सरकू नये म्हणून अडकत्या साखळयांची योजना या रूळांमध्ये आहे. या गाडीला दिवे नाहीत. साखळीची सोय नाही. संडास नाहीत. दारे आहेत, ती बाहेरून उघडता येण्यासारखी आहेत. सामानासाठी झोळीवजा जाळया आहेत. ५ लहान डब्यांच्या वर गाडीला डबे नसतात. प्रत्येक डब्याला एक गार्ड असतो. कारण समोरील डबा वळणांमुळे बरेचदा मागे दिसतसुद्धा नाही. धोका अधिक, ह्याची जाणीव रेल्वेकर्मचाऱ्यांना नेहमी असते. गाडीत गर्दी फार असते. अशा गाडीची ही खास व्यवस्था इंग्रजी जमान्यात सुमारे ५०–६० वर्षांपूर्वी राज्यकर्त्यांनी स्वतःच्या सोयीसाठी केली असून अजूनतागायत सुस्थितीत आहे.

कोईमतूर–मेत्तूपलायम हा विभाग सुपारीसाठी प्रसिद्ध आहे. सुपारीच्या लागवडीचा विस्तार एकदम डोळयात भरतो. कोईमतूरला कापूस–ज्वारी पण भरपूर होते. कापूसवेचाईचे कार्यक्रम जून महिन्यात सुरू असलेले पाहिले ! सुपारीची एवढी मोठी लागवड असूनहि पांढरी सुपारी क्वचितच विकत मिळू शकते ! खप नसल्यामुळे असे होणे संभवते. इकडे कापीव अशी चिकणी व भरडी सुपारी विकत

मिळते व अंशत: खाण्यात वापरली जाते.

रानफुलांच्या ताटव्यांमधून वाट काढीत अगदी माणसाच्या पद-चालीप्रमाणे चालणारी गाडी ८ किलोमीटर अंतर मागे पडल्यावर कमालीची वळणे घेत, डोंगरकडा पोखरून वरवर सरकू लागली. खालून वरचे पूल व रेलमार्ग दिसत; तर वरून खालचे रेलमार्ग, पूल व मोटार-मार्ग दिसत. पहिला बोगदा तर केवळ वरील टेकडी रूळांवर कोसळू नये म्हणूनच तयार केलेला आहे ! इतक्या उंच व दाट डोंगरातून गाडी जायची की गाडीत अंधारच पडायचा ! एका बाजूने विशाल झाडीचे निलगिरीडोंगर व दुसरीकडे खोल दऱ्या आणि भयाण नद्या-ओहळ यांनी डोळे फाटायचे ! गाडीचे इंजिन हळूहळू मागून गाडीस पुढे सरकवीत होते. बरेचदा गाडीतून आजूबाजूच्या दगडांना हात लावता येत होता, इतके ते अंतर कमी होते. गाडी दुसऱ्या बोगद्याजवळ आली तेव्हा खालच्या काही डोंगरांवर पाऊस, तर त्यापुढील चुणीदार डोंगरांवर ऊन पडलेले दिसायचे. दुसऱ्या बोगद्याजवळ टिनाची काही घरे असलेले एक अबोध आणि निर्व्याज खेडे वनराईत जीवन व्यतीत करीत आहे ! सुमारे ८ वाजेपर्यंत म्हणजे १ तासात आमची ही 'पर्वतीय गाडी' १२ किलोमीटर चालली !

अट्टरल्लि स्टेशनावर थांबलेली गाडी अर्धी तिसऱ्या बोगद्यातच होती. हे गाव २३९८ फूट उंचीवर आहे. स्टेशनच्या लगत उभे राहिल्या-वर खोल दऱ्याखोऱ्यातील ऊनपाऊस मोठा मोहक वाटत होता. येथून चहाची व कॉफीची लागवड बरीच आढळली. चौथ्या बोगद्यानंतरची कठीण चढण पाहून तर डोके भणाणायचे ! बराच उंचाव आता आला होता.एका बाजूने उंच पर्वतावरून ओहळ वाहत येत होता, तर दुसरीकडील खोल भागाला वळसा घालून गाडी चढत होती. वरून पाहतांना खालची गावे व शेते बुटुकली दिसत होती. काळेपांढरे ढग डोंगरमाथ्यांना झाका-ळून टाकीत होते. एके ठिकाणी गाडी दगड कापून त्याखालून जात होती.

जणू काय, सापाने आपला फणा गाडीवर धरला आहे, असे दृश्य दिसत होते. नंतरच्या २–३ बोगद्यांमध्ये डोंगरांना कोरून केलेल्या खिडक्यांमुळे उजेडाची सोय झाली आहे. एका बाजूने भिंतीसारखे पर्वत दिसू लागले. फणसासारखी फळझाडे, पाईन व युकॅलिप्टस( निलगिरी )ची झाडेहि वैपुल्याने आढळली. खालचे जे डोंगर फार उंच दिसत होते ते आम्ही आता उंच आल्यामुळे ठेंगणे दिसू लागले. ३५८० फूट उंचीवरील हिलग्रोव्ह स्टेशनावरून वरच्या बाजूस पाहिले असता पर्वत ठीक डोक्यावर दिसतो; तर खालील जागा मृत्यूची गुहाच वाटते ! अति उंच वृक्ष व मोठमोठे फत्तर यांनी येथला परिसर मनोरम झाला आहे. आणखी काही बोगदे पुढे लागत गेले. ४६१२ फूट उंचीवरील रन्निमेट्ट स्टेशनावर फुलेच फुले फुललेली होती. या स्टेशनालगतच एक नाला धबधब्यासारखा धोधो उड्या मारीत खाली जातो. ते दृश्य पाहत राहावेसे वाटते. चहाचे मळे व फुलांचे ताटवे यानंतर बरेच वाढू लागले. ५०७२ फूट उंचीवरील काटेरीरोड हे स्टेशन बरेच मोठे आहे.

कुन्नूर हे वाटेवरील ५६१६ फूट उंचीचे स्टेशन एक थंड हवेचे ठिकाण आहे. एकापेक्षा एक उंच अशा टेकड्यांवर गावातील घरांची रचना झाली आहे. कुन्नूरनंतर रस्ता डोंगरांपेक्षा सरळ असाच जास्त होता. तरीपण चढण होतीच. चढणीचे प्रमाण कमी, एवढेच ! सिंकोनाची झाडे या भागात फार आहेत. यानंतर रुळांच्या बाजूंनी सलग अशी घरे व गावे बरीच आढळली आरवंकाडु स्टेशनालगत गनपॉवडरफॅक्टरी आहे. अशा जंगली भागात ती असण्यात औचित्य आहे. पुढेपुढे झाडीमुळे सूर्यदर्शन होईनासे झाले. थंडी जाणवू लागली. उटी हे अतिथंड असे ठिकाण आहे. हिवाळयात लोक खालीच येतात. कुन्नूनंतरच्या पठारी भागात रबर, बटाटे, चहा, कॉफी, सिंकोना यांचे मळेच मळे सर्वत्र विखुरले आहेत. पायऱ्यापायऱ्यांचे डोंगरी तुकडे म्हणजे हे मळे !

उटी ७५०० फूट उंचीवरील एक टुमदार गोल शहर आहे. मध्ये खोल भाग, म्हणून 'उदकमंडलम्' हे या गावाचे नाव सार्थ वाटते. येथील रस्तेहि गोलगोल आहेत. महागाई येथे फार असून अतिश्रीमंत व लक्षाधीश लोकांची ही नगरी आहे. येथे घोडयांच्या शर्यती दर बुधवारी होतात. उटीला बटाटयांची लावण वरीच होते.

स्टेशनावर उतरताच आम्ही १५–२० जण पायदळ एग्मूर–पॅलेसला जायला निघालो. थंड हवेच्या उंच ठिकाणी पायी फिरणे प्रसन्नता वाढविणारे असते ! या पॅलेसला जातांना २–३ जागी नक्षीदार गवतांची सुंदर भित दिसली. ती सत्यभितीसारखीच हुबेहूब दिसत होती. अत्युच्च निलगिरीवृक्ष व वृक्षाच्छादित टेकडया यांनी वातावरण मनोरम वाटायचे. घराघरात बागा फुललेल्या दिसायच्या. रस्त्यावर योग्य मार्ग व दिशा दाखविणाऱ्या पाटया मात्र पर्याप्त नाहीत. त्यामुळे नव्या प्रवाशांना अडचण जाणवते.

आर्. एग्मूर पॅलेस म्हणजे जोधपूरच्या राजांचा राजवाडा. तो आता राज्यसरकारच्या ताब्यात आहे. एका शिखरावर बागेच्या परिसरात हा राजवाडा आहे. येथील सनगार्डनची रौनक पाहतांना माणूस स्वत:ला विसरून जातो. या बंगल्यात राहण्याची, जेवणाची, टबबाथची आलीशान सोय आहे. फर्निचर, रेडिओ, इंग्रजी शेगडया इत्यादि वस्तु पाहतांना वेळ कसा निघून जातो ! सर्वभर मलमली गालीचे व झुंबरे यांची रेलचेल आहे. वेल्वेटच्या पायघडयांवर पावडर पसरलेली होती. या वाडयातील गव्हर्नरची गच्ची व मंत्रीशयनगृह बादशाही आहे. या राजवाडयालगत बंद ग्लासहाऊसमध्ये खासखास फुलांची निगा राखली जाते. राजवाडयाच्या कारंजाजवळ ( ज्यातून पाणी येत नव्हते ! ) आम्ही सोबत नेलेल्या आपल्या शिदोऱ्या खाल्ल्या !

या वैभवशाली राजवाडयाचे निरीक्षण करून मी टाचणे घेत असतांना तेथील म्हाताऱ्या जोधपुरी चपराशाने हटकले, "क्या लिखते

हो बाबा ? ईश्वरका नाम लिखो !" गतवैभवाचे सारे संस्मरण त्याच्या डोळ्यात त्यावेळी जणू सामावले होते !

या एग्मूर-पॅलेसप्रमाणेच बडोदा, नवानगर, निजाम, म्हैसूर इ. राजवाडे पाहण्यासारखे आहेत. याशिवाय अनेक पॉईंटस् उटीत पाहण्यासारखे असून हेस्कल या सर्वोच्च ठिकाणावरून संपूर्ण उटीचे दृश्य दिसते. उटीतील बोटॅनिकल गार्डन व्यवस्थित व सुंदर आहे. आम्ही उटीत अधिक थांबू शकलो नाही. पाऊस सुरू झाला होता व वेळहि कमी पडत होता.

उटी स्टेशन बऱ्यापैकी असले तरी येथील प्रथमश्रेणी-प्रतीक्षालयाच्या नळांना पाणी मुळीच नव्हते. रेस्टॉरंटमध्ये चहा अति महाग मिळाला. उटी हे दक्षिणेतील सर्वात उंच असलेले थंड हवेचे ठिकाण असून येथील नेहमीचे हवामान इंग्लंडच्या उन्हाळ्याप्रमाणे असते. येथून म्हैसूर मोटारमार्गे १०० मैल लांब आहे. नळ व वीज उटीपर्यंत पोहचविली गेली आहे.

३॥ वा. च्या परतगाडीने आम्ही निघालो. विशिष्ट अशा त्या गाडीतून प्रवास करतांना पुन्हा मौज वाटली. परततांनाहि मनोहर दृश्ये दिसत होती. डोंगरांवर बरेचदा ढगांच्या घनतेमुळे काहीच दिसत नव्हते. डोंगर व आकाश एक होऊन गेलेले दिसायचे. बऱ्याच जागी खालून जाणाऱ्या सडका पायऱ्यांप्रमाणे दिसत होत्या; तर पावसाचे पाणी धोधो वाहून नेणारे नाले आसमंतात मंजुळ, झुळझुळ प्रतिसाद उमटवीत होते.

सायंकाळी ७॥ वा. मेत्तूपलायम येथे ही विशिष्ट गाडी सुटली. नंतर आम्ही दुसऱ्या गाडीने निघून रात्री ९॥ वा. कोईमतूरला परत आलो. रात्रभर पाऊस सारखा सुरू होता.

卄卄卄+—

दि. ९ जून ६१ रोजी सकाळी दक्षिणीधर्तीच्या पेरूमंदिराला बरेच लोक गेले. तेथील चित्रकारी सुंदर आहे. सकाळी १० वा. प्राध्यापक व शिक्षक ११ मैलांवरील पेरीनायकपलायम येथील रूरल इंस्टीटयूटला भेट देण्यासाठी पॅसेंजरगाडीने गेले. भारताचे कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांची खास पत्र लिहून ही संस्था पाहण्याची शिफारस केली होती. ही संस्था श्रीरामकृष्णमिशनने चालविलेली आहे. अशा रूरल इंस्टीटयूट भारतात अकरा ठिकाणी असून अमरावतीच्या श्रीशिवाजी शिक्षणसंस्थेने चालविलेली रूरल इंस्टीटयूट त्यात प्रमुख आहे.

गाडीतून उतरून स्टेशनालगतच्या भव्य दगडी इमारतींच्या श्रीरामकृष्ण मिशन–क्षेत्रात आम्ही शिरलो. प्रथम प्राचार्यांनी परस्परपरिचय करून घेतला. नंतर आमच्या तुकडया केल्या. प्रत्येक तुकडीवर एक प्राध्यापक देऊन आम्हाला ही संस्था मोठया आस्थेवाईकपणे दाखविण्यात आली. या संस्थेच्या ग्रंथालयात १५ हजार पुस्तके आहेत. ग्रामशिक्षणविभागात निरनिराळी ग्रामयंत्रे ठेवलेली होती. खेळांची मैदाने वरीच असली तरी एकंदरीत खेळांची आवड कमीच दिसली. या संस्थेच्या विज्ञानमंदिरात सामान्यज्ञानाच्या सोयी उपलब्ध आहेत. स्वतंत्र डाकघर संस्थेला मिळाले आहे. १९३० मध्ये स्थापन झालेल्या या शिक्षणसंस्थेला श्रीरामकृष्ण आश्रमाने १९३४ मध्ये ताब्यात घेतले. त्यावेळी महात्मागांधींनी इमारतीचा शिलान्यास केला. १९३७ मध्ये संस्थेने हायस्कूल काढले. बेसिक ट्रेनिंग कॉलेज व बी. टी. कॉलेज अनुक्रमे १९४२ व १९५० साली सुरू केले. ह्या सर्व शिक्षणसंस्था ग्रामीण विभागात व हवेशीर वातावरणात असल्यामुळे वैशिष्टयपूर्ण वाटतात. जवळच एक डोंगर असून आजूबाजूला दूरवर सपाट जमीन पसरलेली आहे. संस्थेच्या प्रत्येक हॉल-

मध्ये स्वामी विवेकानंदांची प्रतिमा आहे. खोलीत शिरतांना जोडे काढून ठेवण्याचा नियम कटाक्षाने पाळावा लागतो. या संस्थेतील प्राध्यापक, प्राचार्य सारेच लोक खादीची लुंगी व एक कुडते याशिवाय दुसरा पोशाख करीत नाहीत. साधी राहणी व उच्च विचारसरणी म्हणतात ती हीच ! येथे हिंदी फार चांगले बोलले व समजले जाते.

येथील श्रीरामकृष्ण विद्यालयाला लागून प्रशांत प्रार्थनाभवन आहे. भावपूर्ण बुद्धमूर्तीचे प्रथमदर्शन माणसाच्या चित्तवृत्तींना पवित्रतेत नेऊन सोडते. प्रार्थनाभवनाचा उपयोग नाट्यगृहासारखा व व्याख्यान-भवनासारखाहि होतो. या हॉलमध्ये श्रीरामकृष्णांची सुंदर छवि मांडलेली आहे. समोर नटराजमूर्ति असून बाजूला महात्मा गांधींचे ७–२–१९३४ रोजी शिलान्यास करतांना घेतलेले छायाचित्र लावलेले आहे.

चित्तवृत्ति शांतविणारे हे प्रार्थनाभवन पाहून आम्ही तळमजल्यावरील रूरलच्या डायरेक्टरांच्या खोलीत 'जलपान' केले. त्यावेळी डायरेक्टर श्री. अविनाशलिंगम यांचे भाषण झाले. श्री. अविनाशलिंगम हे अमरावतीला येऊन गेलेले असल्यामुळे त्यांनी मा. भाऊसाहेब देशमुखांच्या शिक्षणकार्याचा गौरव केला. स्वामी विवेकानंदांचा आदर्श ठेवून प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचा उपदेश त्यांनी शेवटी दिला. या खोलीत महात्माजींचा एक डोकीवर फडकी लपेटलेला फोटो असून त्या-खाली त्याचा संदेश व स्वाक्षरी आहे. या कार्यक्रमात सेवयांची खीर व मुखशुद्धीसाठी पेपरमींट यांची व्यवस्था होती. सर्व विद्यार्थ्यांची सोय तेथे केलेली होती. डायरेक्टरांनी सर्व लोक न आल्याबद्दल खंत प्रकट केली !

कोईमतूरला आम्ही दुपारी १ च्या दरम्यान परत आलो. जेवणानंतर लगेच २॥ वा. श्री. अविनाशलिंगम यांनी आपल्या संस्थेच्या बसमोटारीमधून स्थानिक कापडगिरणी दाखविण्याची सोय केली. त्यानंतर श्रीरामकृष्ण मिशनच्या गृहशास्त्राचे महाविद्यालय दाखविण्यात आले.

या महाविद्यालयात गृहशास्त्राचे एम्. ए.पर्यंत शिक्षण दिले जाते. संस्थेतर्फे आमच्या सुमारे ३०० लोकांना चहा देण्यात आला. कमालीची शांतता व भावविवशता हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य होते. येथेहि श्रीरामकृष्ण विद्यालयाच्या धर्तीचे प्रार्थनाभवन आहे. डॉ. पडोळे व श्री. अविनाशलिंगम यांची भाषणे झाली. डायरेक्टरांच्या इंग्रजी भाषणाचा अनुवाद प्रा. तट्टे यांनी केला. वेणूताईंनी 'या भारतात बंधुभाव नित्य वसू दे' हे श्री तुकडोजी महाराजांचे मराठी भजन म्हटले.आमच्या विद्यार्थ्यांचे नेतृत्व कु. सरलाताईंनी कुशलतेने केले, याबद्दल डायरेक्टरांनी त्याचे कौतुक केले !

श्रीरामकृष्ण आश्रमाच्या बसमधून पतरलेले आमचे लोक जेवल्यानंतर आमच्या खास गाडीने सायंकाळी ७ वाजता पावसाची रिमझिम सुरू असतांना बंगलोरकडे निघाले.

++ ++ ++-—

दि. १० जून ६१ ची सकाळ झाली ती जलारपेट स्टेशनावर ! म्हैसूर राज्याचा भाग लागल्यावर तेथील हलकी, खडकाळ व टेकड्यांची शेती दिसली. शेतकरी पारध्याप्रमाणे कमरेला दोन बोटांची पट्टी लावतात व खुशाल वावरतात. आपल्याकडे असे राहणे लज्जास्पद समजले जाते. अशी मंडळी वावरतांना आपल्याकडे प्राय: दिसतच नाही !

एका शेतातील विहिरीतून लाकडांच्या साह्याने पाणी काढण्यासाठी एक बाई व माणूस लाकडी पट्टीवर मागेपुढे चालत होते व त्यानुसार पोहरा विहिरीत खालीवर जात होता. पोहरा वर आला की एक माणूस ते पाणी दांडात ओतून शेतीला देत होता.

बंगलोरला आम्ही सकाळी १० वा. आलो. स्टेशनचे नाव हिंदीत बेंगलुरु सीटी असे लिहिले होते. जुन्या मराठीत हे नाव बेंगरूळ

असे असल्याचे उल्लेख आढळतात. गाडी स्थानकात येताच आम्ही आधीच कपडे करून तयार असल्यामुळे भारतात प्रसिद्ध असलेला येथील रेशमी कापडांचा बाजार जाऊन धुंडाळला. किमती रेशमी साड्या व इतर कापड काहीसे माफक मिळते व कधीकधी फसविलेहि जाते. शहर मुंबईप्रमाणे बहुमेळ असे असून येथे मद्रासी वातावरण एकदम कमी झालेले प्रत्ययास आले शहर नेटके व बहुभाषी वाटले. हिंदी, मराठी, इंग्रजी व राज्यभाषा कानडी यांचा वापर सर्रास होतो. बराच मराठी प्रदेश म्हैसूर राज्यात असल्यामुळे मराठी भाषा व मराठी माणसे यांचा आढळ महाराष्ट्राच्या सीमाप्रांताच्या या राजधानीत होणे साहजिक आहे. गावात एकमजली व दुमजली बसमोटारींची सरकारी सोय असली तरी ती पर्याप्त नाही. बऱ्याच डबलडेकर बसमोटारींच्या वरील मजल्यावर लेडीकंडक्टर बंगलोरला आहेत. मद्रासकडील 'राईटस्' सुटून कंडक्टर गाडी सुरू करण्यासाठी 'पमपम' म्हणायचा ! बसेसवर इंग्रजी व कानडीत पाट्या असतात. येथे भाषेवाचून कोणतेच काम अडत नाही. हिंदी बोलपट बरेचसे चालू असतात. खेळाचे नाव थिएटरच्या प्रवेशद्वारावर थिएटरच्या नावाप्रमाणेच कोरून ठेवण्याची पद्धत त्रिवेंद्रमप्रमाणे येथेहि आहे. बंगलोर शहराने नीट सडका व योजनाबद्ध घरे बांधण्यात बरेच यश मिळविले आहे ६–६ रस्ते एकत्र येऊन मिळणारे काही चौक येथे आहेत. या शहराचे क्षेत्रफळ ३५ चौ. मैल व लोकसंख्या १२ लाख आहे. येथे लुंग्या लावलेले लोक क्वचितच दिसू शकतात. उलट दक्षिणेत लुंग्याच-लुंग्या दिसत. मग तो कितीहि शिकलासवरला साहेब का असेना !

मार्केटमधून शिवाजीनगरच्या बसने आम्ही कबनपार्कविभागासाठी गेलो. लेडीकंडक्टरला कबनपार्कस्टॉपला उतरवून देण्यास सुचविले होते. परंतु ती विसरली.आम्हीच चौकशी करून पुढच्या स्टॉपवर उतरलो, तेव्हा तिने आपली जीभ चावली !

कबनपार्क ही बागेसारखी वस्ती असून सेक्रेटरीएट व असेंब्ली-

हॉल तिच्यातच आहे. येथील विधानसभागृह अशोकचक्रांकित सिंहांची प्रतिमा असलेल्या घुमटाने दुरून दिसते. दिल्लीच्या संसदभवनासारखी वेधक रचना या विधानसभेची असून हे भवन सायंकाळी ६ ते ६।। या वेळात सर्वांना पाहण्यासाठी खुले असते. कवनपार्कात महात्मा गांधी, ८ वे एडवर्ड, महाराणी एलिझाबेथ यांचे भव्य पुतळे विभिन्न जागी असल्यामुळे या विभागाची शान वाढली आहे. जवळच सरकारी वस्तुसंग्रहालय आहे. ते इ. स. १८६६ साली स्थापन झालेले असून भारतातील जुन्या म्युझियमपैकी ते एक आहे. हा विभाग पाहून आम्ही बस न मिळाल्यामुळे बरेचसे अंतर पायी चालून आलो व आमच्या खास गाडीतील आमच्या डब्यात दुपार घालवली ! सायंकाळी स्टेशनासमोरच्या मैदानात ताजी हवा खात बसलो.

रात्री १०–४५ वा. म्हैसूरसाठी छोटया गाडीने निघालो. आमच्या गाडीचे डबे आम्ही कुलुपे लावून बंद केले. सोबत फारसे काहीच घेतले नाही. म्हैसूरच्या गाडीत आयुष्यात कधी झाला नव्हता इतका त्रास झाला. प्रत्येक डबा पक्का ठासठासून भरला होता. अधिक डबे लावूनहि पाय ठेवायलासुद्धा जागा मिळणे मूश्कील झाले. एका जणाने आधीच सायडींगला पडलेल्या डब्यात जाऊन जागा पकडून ठेवल्यामुळे ४–६ मुलींना जागा मिळू शकली. आम्ही प्रथम उभे राहिलो. नंतर कसेतरी फक्त बसलो. पण रात्रभर ठक्क जागावे लागले. गरमी फार, पंखे नाहीत व उठताहि यावयाचे नाही. हालअपेष्टांच्या दृष्टीने रात्रभर घडलेली ही शिक्षा होती. म्हैसूर रहित करावे असे वाटून मी दुसऱ्या स्टेशनावर उतरण्याची तयारी केली. पण परतण्यासाठी रात्री दुसरी गाडी नसल्यामुळे तो बेत रद्द केला. रात्रभर बंगलोर ते म्हैसूर अक्षरशः चेचून आणि शिजून निघालो !

दि. ११ जून ६१ च्या पहाटे म्हैसूरगाडीतून उतरून काही जणांनी म्हैसूरजवळील श्रीरंगपट्टण पाहिले. द्विभाजित कावेरीच्या बेटावर हे स्थळ वसले असून गौतमाचे मंदिर येथे आहे. कावेरी येथे पश्चिमवाहिनी असून कावेरीवरील येथील पुलाला पश्चिमवाहिनी असेच नाव आहे. गंगराज्यकाळात हे मंदिर इ. स. ८९४ साली बांधले. मूळचे श्रीरंगपट्टण ११२० साली उदयादित्य या होयसाळ राजाने वसविले. १४९५ साली विजयनगरची राजसत्ता येथे आली. श्रीरंगपट्टण ही म्हैसूर राज्याची टिपू व हैदरअली यांच्या जमान्यात राजधानी होती.

जलद्वार आणि श्रीरंगनाथाचे मंदिर श्रीरंगपट्टणला असून टिपूचा राजवाडा व मशीद पण आहे. टिपूने बांधलेला हत्तीदरवाजा पाहण्याजोगा असून श्रीरंगनाथमंदिराची बांधणी एक हजार वर्षांपूर्वीची ( होयसाळकालीन ) आहे. द्राविडियन शिल्पात हे मंदिर मागे नाही. 'दरियादौलत'मधील शिल्प व बांधणी चांगली आहे.

सकाळी ७–७॥ वा. म्हैसूर पाहण्याकरिता खाजगी बसमोटारी करण्यात आल्या. पण फक्त दोन बसमोटारी दुपारी १–१॥ वा. आल्या. एकीने तर अर्ध्यातच मुलांना उतरवून दिले. या भानगडींमुळे आमच्याकरिता टॅक्सींचे भाव वाढले. मुले कशीबशी बसेस, टॅक्सी व एक्के करून गाव पाहावयास गेली. गावातील पाहण्याजोगी स्थळे दूरदूर असल्यामुळे व काही स्थळे गावच्या बाहेर बऱ्याच अंतरावर असल्यामुळे वाहनांची फारच गैरसोय झाली. त्यामुळे मुलांना फार त्रास झाला. इतकेच नव्हे, तर वृंदावनगार्डनपर्यंत पोहचलेल्या काही विद्यार्थ्यांना परतीसाठी वाहने मिळण्याची शक्यता नसल्यामुळे त्यांना तेथील स्टेशनावर गाडीसाठी व बसस्टॉपवर बसमाठी फारच धावपळ करावी लागली.

म्हैसूरची प्रसिद्धी बागांसाठी, रेशमासाठी व चंदनासाठी आहे. चंदनतेलाचा कारखाना वेळाच्या अभावी पाहता आला नाही. सुंदर इमारती व सुंदर रस्ते यांनी हे शहर सजले आहे. येथील दसरा प्रसिद्ध आहे. दसऱ्याचे उत्पन्न लाखो रुपयांचे होते. त्यावेळी शहर नुसते बाया-माणसांनी फुलून निघते. राजाच्या राजवाड्यातील गाड्या, रथ इ. वैभव पाहून आजहि डोळे दिपतात. म्हैसूरचे वाडियार राजे आता म्हैसूर राज्याचे राज्यपाल आहेत.

एका राजवाड्यात आर्ट गॅलरी आहे. या जागी जुन्या राजेरज-वाड्यांच्या व त्यांना भेट आलेल्या अनेक वस्तु ठेवलेल्या आहेत. येथील मोठमोठ्या काचेच्या वस्तु वेड लावतात. तिकिटे काढून ही आर्ट गॅलरी पाहावी लागते.

बंगलोरहून म्हैसूरसाठी खास अशा 'प्रवाशी–मोटारी' मिळतात. रेडिओसारख्या सुखसोयी या मोटारींमध्ये आहेत. सूज्ञ व हौशी प्रवाशी आधीच असलेल्या बसेस आपल्यासाठी राखून ठेवतात. दक्षिणेत प्रवाशा-साठी अशा अनेक सोयी उपलब्ध होऊ शकतात.

टॅक्सीने आम्ही म्हैसूरचे प्राणीसंग्रहालय पाहावयास गेलो. प्रवेश-द्वारावरच एक मियाजी प्राणीसंग्रहालयातील प्राण्यासारखे विचित्र अवतारात बसून तिकिटे काढणारांवर वसवस करीत होते. जनावरांची ही बाग नीट ओळीत व व्यवस्थित अशी आहे. तरस, वाघ, लांडगे, अस्वले, पोपट इत्यादि विविध प्राणी खास पिंजऱ्यात दूरदूर ठेवले आहेत. नेटके-पणाने या 'झू'ला व्यवस्थित रूप आले आहे. मार्गदर्शक पाट्या, गावात व या बागेत प्रवाशाच्या सोयीसाठी लावल्या आहेत. येथील हिमालयीन अस्वल करड्या रंगाचे होते. नीलगाय व आफ्रिकी हत्ती या संग्रहालयात आहेत. एक पाणघोडा पाण्याच्या बाहेर चरत होता; तर गेंडा झोपलेला दिसला. अमेरिकन बैल, ताशी १०० मैल वेगाने चालणारा ८ फूट उंचीचा शहामृग, जर्मनीतील पांढरी डुकरे, रोही, झेब्रे, जिराफ, कांगारू

इत्यादि प्राणी येथे चांगल्या अवस्थेत ठेवले आहेत. आफ्रिकन सेक्रेटरी-बर्ड, लाल पोपट व जमीनीवरील कासव ही येथली वैशिष्टये आहेत. या संग्रहालयात मृत प्राण्यांचे सांगाडे एका दिवाणखान्यात ठेवले आहेत. येथे चार आरसे ठेवले असून त्यात भदाडे, उलटे व चित्रविचित्र असे आपलेच्च चेहरे दिसतात. संपूर्ण प्रवासात इतके नेटके, समृद्ध व व्यवस्थित प्राणीसंग्रहालय म्हैसूरचेचे वाटले. ते पाहून आम्ही ललिता महालाकडे गेलो. रस्त्याने 'थंडी सडक' दिसली. बाकदार वेलीवृक्षांच्या मधून ही सडक जाते. तीमधून जाताना थंड-थंड वाटते.

ललिता पॅलेस सध्या सरकारी मालकीचा असला तरी तो मूळचा राजभगिनीच्या नावाने बांधलेला आहे. चामुंडा टेकडीच्या पायथ्याशी याची भव्य रचना आहे. नृत्यशाळा, शयनशाळा इत्यादि अनेक विभाग असलेल्या या महालाचा दुसरा मजला इटालियन संगमरवराचा असून चित्रकारागिरी खास अशी आहे. या राजवाड्यातील अनेक दालने आज वैभवविहीन आणि ठेवणीतल्या स्वरूपात आहेत. हा वाडा पाहण्यासाठी काही चिरीमिरी तेथल्या दारवानाने घेतल्याचे कळले. याच राजवाड्यात श्रीरंगपट्टणच्या टिपू सुलतानाच्या वाड्याचा नकाशा आहे. इ. स. १८०० साली तो वाडा ज्या अवस्थेत होता, त्याची कल्पना या नकाशावरून येते.

नंतर आम्ही चामुंडा-हिलवर गेलो. या चामुंडा टेकडीवर टॅक्सी चढत असतांना गावाचे दृश्य सुंदर दिसते. वर समरपॅलेस दिसतो, तर खाली घोड्यांच्या शर्यतीचे मैदान स्पष्ट उठून दिसते. चामुंडा हिलवर चढतांना अनेक वळणे घ्यावी लागतात. त्या वळणानंतर महिषासुराचा भव्य रंगी-पुतळा वाटेत लागतो. महिषासुरावरून तर म्हैसूर नाव या गावाला पडले नाही ना ? चामुंडेचे देऊळ टेकड-माथ्यावर आहे. चामुंडा अंतर्भागात तीन दारांच्या आत होती. ती झोपली होती ! दुपारनंतर उठणार म्हणून दर्शन घडले नाही. तिच्या अंगावरील दागदागीन्यांच्या

विपुलतेमुळे दारावर सील लावले होते. आमच्या ड्रायव्हरला आम्ही म्हटले, "तुम्हारे इश्वर देव सोतेही रहते हैं।" तो चटकन म्हणाला, "पुजारी ही सुस्त हैं, उनकी नींद याने ईश्वरकी नींद है। यह तो पुजारी की सुविधा है।"

चामुंडा हिलला जाण्यासाठी आता सडक झाली असली तरी पूर्वीचा सुमारे ७०० पायऱ्यांचा चढणीचा एक रस्ता आहे. त्याच्या आरंभी एक दगडी नंदी असून तो अखंड दगडाचा आहे. तो एकाच टेकडीत कोरला आहे. तंजावरच्या बृहदेश्वरमंदिरातील नंद्यापेक्षा तो थोडा लहान आहे पण उघडयावरील हा नंदी अति विशाल आणि महाकाय असा दिसतो. त्याच्या गळयात शंकराची मूर्ति आहे. चामुंडाटेकडी सुमारे १३०० फूट उंच असावी.

म्हैसूरला असतांना याच दिवशी आम्ही सकाळी प्रामुख्याने एक आदर्श संस्था पाहिली. ती संस्था म्हणजे श्रीरामकृष्ण विद्यालय. श्रीरामकृष्ण आश्रम पाहावयास आम्ही गेलो. रामकृष्णांचा मोठा फोटो ठेवलेले सुंदर व मोकळे व्याख्यानमंदिर असून तेथे एक स्वामी नरेंद्रकथा कानडी भाषेत काही विद्यार्थ्यांना समजावून देत होते. तेथे आश्रमाची एक लायब्ररी आहे.

आश्रमापासून जवळच श्रीरामकृष्ण विद्यालय आहे. हे विद्यालय आदर्श असे असून रेसिडेंशियल असे त्याचे स्वरूप आहे. मिडल्स्कूल आणि हायस्कूल मिळून १८० विद्यार्थी येथे राहतात. वसतिगृहाच्या चार मोठया खोल्या आहेत. प्रत्येकासाठी लोखंडी पलंग असून त्यात दोन पेटया आहेत. एक उशाला व एक पायथ्याला दोन्हीत पुस्तके, साबू, कपडे वगैरे ठेवण्याची जागा आहे. मच्छरदाणी लावण्याची व्यवस्था प्रत्येक पलंगाला आहे. जागा कमी पडते म्हणून दुमजली पलंग पण आहेत. जोडे ठेवण्याची एक आलमारी असून तेथे आपापल्या नंबरप्रमाणे जोडे ठेवण्याची व्यवस्था आहे. या संस्थेत एका

जणाला एकच नंबर देतात व वर्षभर त्या नंबरला धरून त्या मुलाचे सर्व व्यवहार चालतात. या संस्थेत सकाळी ५ पासून रात्रीपर्यंत विद्यार्थ्यांची दिनचर्या अगदी आदर्श अशी असते. या शाळेचे रंगभवन अत्याधुनिक असे आहे. शाळेचा एक दवाखाना आहे. वाचनालयाची सुंदर व्यवस्था आहे. मुलांचे कपडे येथेच शिवण्याची सोय आहे. एक विशिष्ट युनिफॉर्म सर्वांसाठी आहे. सुतारकामहि येथे शिकविण्याची व्यवस्था आहे. येथे ताटे ठेवणे व जेवणे यांची सोय मोठी कमखर्ची व सोयीची वाटली. स्नानानंतर एकाच विशिष्ट जागी खोबरेल तेल सर्वांनी लावले पाहिजे. इतर तेले व इतर जागी ते लावता येत नाही. ब्रेड तयार करण्याची खास जागा वसतिगृहात आहे. प्रत्येक वर्गात ३० मुलाच्या वर मुले नाहीत. त्यांची बाके बसण्याच्या दृष्टीने सोयीस्कर आहेत. इमारतीला ३ मजले आहेत. एका मजल्यावर सुंदर प्रार्थनामंदिर आहे. रेडिओ ऐकण्याची व सर्वदूर वार्ता देण्याची ध्वनिक्षेपण-व्यवस्था आहे. बँडरूम आणि प्रॅक्टिकलहॉल आहे. स्वतःची अशी फोनव्यवस्था शाळेला आहे. कपडे धुण्यासाठी दगड तयार केलेली खास जागा असून शिवाय धोब्याचीहि योजना आहे. संस्थेत एक सुंदर स्वीमींगपूल आहे.

आम्हाला संपूर्ण शाळा दाखविण्याचे काम मुख्याध्यापक श्री. जगन्नाथ यांनी केले. त्यांनी शेवटी आम्हाला फराळ व चहा दिला. माझ्यासाठी मुद्दाम दूध तयार करविले. अगत्य व आतिथ्य इतके की, ते आम्हाला आमच्या गाडीपर्यंत पोहचवावयाला आले.

म्हैसूरची जागतिक स्वरूपाची कीर्ति झाली, ती वृंदावनबागेमुळेच ! वृंदावनबाग म्हणजे भारताचेच नव्हे तर, आशियाचे एक खास सौंदर्याकर्षण आहे. हा बाग म्हैसूरच्या मिर्झा इस्माईल दिवाणाने राजा-वाडियार यांच्यासाठी तयार करविला व राजाने तो प्रजेसाठी खुला ठेवला. कावेरी नदीला अडवून लांब असे कृष्णसागर-धरण बांधण्याचे व त्यावरच हा बाग तयार करण्याचे यशस्वी व अघटित कार्य श्री. विश्वे-

स्वरय्या या स्थापत्यविशारदाने केल्याचे सर्वविख्यात आहेच. काही मराठी इंजिनियरांचेहि हातभार या कार्याला लागले आहेत. कावेरी धरणाचा लांब पूल हा कधीहि न झिजू शकणारा व आत्यंतिक मजबूत स्वरूपाचा आहे. एके ठिकाणी तस्म्यातून पाणी सोडले होते. ते इतके मनोहर व वेगवान होते की पाणी वरवर येत असून आपणच वाहत असल्याचा भास होत होता.

मध्यभागी पाणी व दक्षिण–उत्तर भागी सुंदर बाग, अशा या बागेत विद्युत्–रोषणाई कमालीच्या कौशल्याने केलेली आहे. आठवड्यातून दोन दिवस ही रोषणाई फक्त १॥ तास, रात्री ८ पर्यंत असते. रविवार म्हणून आम्हाला हा अनुपम सौंदर्यसोहळा बघता आला पांढऱ्या फवाऱ्यांच्या इमारती व झाडबागाच जणू तयार व्हायच्या. दक्षिण–भागी तर विविधरंगी फुलोऱ्यात जणू सारी बाग न्हाऊन निघत होती. 'नवरंग' व 'झनक झनक पायल बाजे' यासारख्या अनेक खेळात येथीलच दृश्ये घेतलेली आहेत ! होळीच्या विविधरंगच्छटांची आठवण येथे व्हावी ! काश्मीरातील निशातबाग, चश्मशाही व शालीमार या ख्यातनाम तिन्ही बागांची वैशिष्ट्ये या एकट्या बागेत एकवटली आहेत. काश्मीरपेक्षाहि येथले सौंदर्य अनुपम आहे व तेहि रात्रीच्या या विशिष्ट विविधरंगी रोषणाईतच ! विशाल अशा या बागेत निरनिराळ्या जागी अत्यंत आकर्षक रीतीने पाणी सोडले असून व कारंजी उडविली असून पाण्यातील नानारंगी वीज–दिव्यांमुळे ते पाणी मुलखाचे मोहक दिसते.

आम्ही दोन्ही भागातील मनोहर दृश्ये डोळ्यात साठवून, बोटींगची मौज पाहिली व श्रीकावेरी–मूर्तीचे दर्शन घेतले. येथील सौंदर्यसोहळा बघतांना स्वतःच्या मंत्रमुग्धतेला आकळण्याचा प्रयत्न केला; पण व्यर्थ ! त्या एका मुग्धसौंदर्यात भावलुब्ध अवस्थेत रेंगाळणाऱ्या मनाला कोण आवरणार ? येथील रोषणाईतील रंग–किमया ही अनुभवण्यातच मौज आहे. त्या सौंदर्याचे आस्वादनहि अपुरेअपुरेच वाटावे. पामरलेखणी विचारी कुठवर धावणार ?

आम्ही रात्री ८। ला परत फिरलो, तेव्हा एक विचित्र घटना रस्त्यावर नजीकच्या खेडयात घडल्याचे कळले. आमची काही मुले ज्या टॅक्सीतून येत होती, त्या टॅक्सीमागून एक टॅक्सी पुढे गेली व खटकन् आवाज झाला. तो आवाज एका म्हाताऱ्याच्या मरणाचा होता. पुढे गेलेली टॅक्सी घेऊन ड्रायव्हर भरधाव गेला व राहिलेल्या टॅक्सीवाल्याला गावकऱ्यांनी बेदम मारले. आमच्या मुलांना 'त्याच टॅक्सीने तो म्हातारा मेला असे लिहून द्या' म्हणून गावकऱ्यानी आग्रह केला. पण ही 'जबरदस्ती' असल्याचे आमच्या लोकांनी सांगितले.२ तासांनी पोलीस व सबइन्स्पेक्टर आले. या हातघाईत मुले अडकली. आम्ही परत गेलो तेव्हा डॉ. पडोळे यानी त्या मुलाना लवकर सोडण्याची व्यवस्था केली ! अशा वेळी श्री शिवाजी शिक्षणसंस्थेचे प्रचारपत्र व डॉ. पंजाबराव देशमुख यांची पुण्याई नेहमीच कामाला यायची !

आम्ही रात्री ९॥–१० च्या दरम्यान बंगलोरच्या गाडीसाठी म्हैसूरस्टेशनावर आमच्या टॅक्सीगाडयांनी परत आलो. काहीजण श्रवण-बेळगोळला जाण्यासाठी व्यक्तिशः थांबले. श्रवणबेळगोळ येथे जैनांची गोमतेश्वरमूर्ति ६० फूट उंचीची असून ती जगात सर्वात मोठी मूर्ति आहे.येथे चद्रगुप्त मौर्याने आयुष्याचे शेवटचे दिवस व्यतीत केले. आम्ही रात्रीच्या गाडीने पुन्हा रात्रभर त्रास सहन करीत बंगलोरला परत आलो.

\# # #—

दि. १२ जून ६१ रोजी सकाळी बंगलोरला पडून असलेल्या आमच्या खास गाडीत येऊन आम्ही झोपलो दिवसभर झोपा काढल्या. आज डब्यातून एका जणाचे १०० रुपये चोरीला गेले. मद्रासलाहि असेच ६०–७० रुपये दुसऱ्या एकाचे चोरीला गेले होते. सायंकाळी ४ वा. मिष्टान्नाचे भोजन झाले.

+++++++-

दि. १३ जून ६१ ला सकाळी १० वाजता आम्ही टंगळमंगळ करीतच लालबागेत गेलो. लालबागेचा विस्तार २४० एकरांचा असून एवढी मोठी विस्तृत बाग मी पाहिलेली नाही. या बागेत एक लहानसे पक्षीसंग्रहालय आहे. कापलेल्या गवताचे मोर, कोंबडद्या, हत्ती, उंट, वाघ आदि प्राणी फार छान तयार केलेले आहेत. या बागेतील माती व भिंती लाल आहेत. येथे एक काच-गृह असून ते मोकळे, हवेशीर व एखाद्या लग्नमंडपामारखे वाटते. या बागेत एक उंच टेकडी आहे. तीवर चढून सारे बंगलोर शहर न्याहाळण्यात काही और मौज वाटते. असेंब्ली-हॉलचे शिखर येथून दिसते.

लालबागेतून पायीच गांधी-बाजाराला आलो. हा बाजार विशेष नाही; पण त्याचा गवगवा मात्र उगाच ऐकला होता. रस्त्यावर मराठी मुलींचे विद्यालय बघितले. गांधीबाजाराजवळच श्रीरामकृष्ण आश्रमहि पाहून घेतला. हा आश्रम बागेसारख्या एका जागेत असून तेथील वातावरण प्रसन्न असे वाटले.

परत आलो तेव्हा जेवणे आटोपली होती. आम्ही जेवून विश्रांती घेतली. काही जणानी परवानगी काढून चंदनाच्या साबणाचा कारखाना पाहिला. हा कारखाना बुधवारी दुपारी व गुरुवारी बंद असतो, असे कळले.

+++++++-

दि. १४ जून ६१ रोजी दुपारपर्यंतचा वेळ कसाबसा घालविला. २ वा. श्री. राठी यानी २-३ कारखान्यांची परवानगी काढून आणली.

आम्ही ३०–४० जण कारखाना–विभागातील 'म्हैसूरलँप–वर्क्स'ला गेलो. या कारखान्याचे स्वरूप फार मोठे नाही. बल्बाचे काचेचे फुगे, नळया व कच्चे सामान बाहेरून बोलावले जाते. नळयांना उष्णता देऊन त्यांना विशिष्ट आकार देतात व त्यात यंत्रावर तारा फसविल्या जातात. दुसऱ्या जागी त्या नळीला छिद्र पाडले जाते, जेणेकरून वाताविहीन ती नळी व्हावी. त्या नळीवर टंग्स्टन तार अडकवण्यासाठी काही बायका कामाला लावलेल्या दिमल्या. ती बारीक तार त्या कुशलतेने अडकवीत होत्या. ही तार जड, चिवट असून ती बरीच लांबायची. नंतर ही आतील पुंगळी बल्बमध्ये पक्की बसविली जाई. निरनिराळ्या यंत्रांवर हे काम होत होते.

या कारखान्याच्या उभारणीला २० लाख रुपये भांडवल लागले. एका दिवसात १० हजार बल्ब बनतात. त्यात ५०० बल्ब मोठे म्हणजे १ हजार पॉवरचे होते. एकाच पाळीमध्ये ८ तास काम या कारखान्यात चालते. ३०० लोक कामाला असून त्यातील ५० स्त्रिया आहेत.

त्यानंतर आम्ही परत आलो. येतांना बसमध्ये हिंदी बोलपटांचे शौकीन लोक भेटले. हिंदी नटनटींच्या गोष्टी त्या लोकात मोठ्या आस्थेने चालल्या होत्या. मॅजेस्टिकला उतरून आम्ही स्टेशनपर्यंत पायी आलो. सायंकाळी जेवणानंतर पत्ते खेळायला बसलो, तर दिवेच गेले ! दिवे जाण्याचा व रात्री अंधारात काढण्याचा आम्हाला आता चांगलाच सराव झाला होता !

गुरुवार दि. १५ जून ६१ रोजी सकाळी पुन्हा फॅक्टरीएरीया-कडे बसने गेलो. प्रथम आम्ही 'गव्हर्न्मेंट पोर्सलीन फॅक्टरी' बघितली. ही फॅक्टरी दररोज ७॥ ते १२ व १ ते ५ आणि शनिवारी ७॥ ते १ या वेळात पाहता येऊ शकते.

तीन प्रकारची खनिज द्रव्ये प्रथम एकत्र केली जातात. त्यात चिनी माती, गारगोटीसारखा एक दगड व एक खरपीसारखा दगड हे तीन प्रकार असतात. त्या तिन्हींचे मिश्रण एका मोठया चक्कीत केले जाते. तिहींचे मिळून जे मिश्रण तयार होते, ते पाण्यासह असते. ते पातळ मिश्रण दुसऱ्या विभागात नेऊन त्यातून पिळून पाणी निचोडले जाते व उरलेल्या पिंगट लगद्याच्या निरनिराळया वस्तु साच्यावर केल्या जातात. कुंभारासारख्या गोल यंत्रावर अनेक चिनीमातीच्या वस्तु कापून-सवारून साफ करून तयार होतात. कुंडया, चंबू, चहाचे सामान, मूर्ति, वाटया कितीतरी वस्तु तयार झालेल्या दिसल्या. त्या सर्व वस्तूंना यांत्रिक गतीने रंग देतात. त्या विभागात काम करणाऱ्यांमध्ये बायकांची संख्या अधिक होती. महिलांचा दरमहा पगार ७५ रुपये असल्याचे कळले. चिनी-मातीला चमक येण्यासाठी खोबरेल व रॉकेल यांच्या मिश्रणाचे पॉलीश दिले जाते. सफाईसाठी स्पंज व सँडपेपर यांचा उपयोग होतो. या सर्व भाडयांना शेवटी गरम करून भाजून काढतात. विजेचे गुटके (इन्शूलेटर्स) हजारोंच्या संख्येत येथे तयार झालेले दिसले. ८-८ तासांच्या तीन पाळया या कारखान्यात चालतात.

या कारखान्यात वाया जाणाऱ्या फुटक्या चिनीभांडयांचा उपयोग रस्त्याच्या कडेला व कडेच्या झाडांना आळी करणे व कुंपण घालणे वगैरे-साठी केलेला दिसला. तो औचित्यपूर्ण वाटला.

यानंतर १० ते ११ च्या दरम्यान काचकारखाना पाहिला. वाळू आणि गारगोटी यांचे (मँगनीजच्या साह्याने ?) मिश्रण केले जाते. या भुकटीला गरम केल्यावर तप्तरस तयार होतो. तो लगद्यालगद्याने सळईवर घेऊन साचेपणा आकारयुक्त यंत्रात भरून थंड केला जातो. त्यातून बाटल्या, ग्लास वगैरे वस्तु तयार होतात. कंदीलाच्या पायल्या (काचा) तयार करण्यासाठी एक–दोन माणसे तप्त लगद्याला आकार देण्याकरिता गाल फुगवून हवा भरीत होते. त्या नेहमीच्या कामामुळे त्या

माणसांच्या गालावर जिभेसारखे एक कातडे तयार झालेले दिसले. त्यांची कीव करावीशी वाटली. कोण जाणे, त्यांच्या या 'शरीरहानी'चा त्यांना मोबदला अधिक काय मिळतो ते ! अशी कामे वगळून यंत्रावर केली जावी ! यंत्रांचा वापर गैर समजू नये. अशा यंत्रांची निर्मिती अजून झाली नाही काय ?

हे कारखाने पाहण्यासाठी जातांना आमच्या बसमध्ये कान्व्हेंटची लहानलहान मुले बरीच आली. प्रत्येक स्टॉपवर मुले वर चढत होती. आम्हीच सारी बस अडवल्यामुळे त्यांची आज अडचण झाली. पण आम्ही आपल्या मांडीवर एकेक छबकड्याला घेतले. ती मुले लाजत गमतीदार नावे सांगत. एकाने आपले नाव 'जवानी', तर दुसऱ्याने 'सीना' सांगितले. त्यातच दोन मुली कोकणी बोलणाऱ्या होत्या. त्यांच्या बरोबरची एक तरुणी शिक्षिका असावी हा आमचा अंदाच चुकीचा ठरला. ती बाई त्या मुलींची आई होती त्यांचे आडनाव सिरूरकर असे होते. त्या आमच्याशी मराठीत बऱ्याच बोलल्या. बंगलोरला एका मराठी माणसाचे दुकानहि आम्ही पाहिले होते व त्याच्याशी मराठी गप्पा केल्या होत्या.

कारखाना विभागातच 'हिंदुस्थान मशीन टूल्स' कारखाना आहे. येथे भारतीय कामगारांकडून निरनिराळी लहानमोठी यंत्रे तयार होतात. पं. जवाहरलाल नेहरू यांनी एवढ्यातच या कारखान्यात तयार झालेल्या घड्याळांच्या कामांची प्रशंसा केल्याचे सर्वविदित आहेच. याच भागात विमानांचा कारखाना आहे. पण तो पाहण्यासाठी परवानगी देण्याची पद्धति नाही.

परत येतांना ड्रेसमध्ये नसलेले दोन चेकर गाडीत चढले. 'कानडी येत नाही' असे आम्ही सांगूनहि पुन:पुन्हा चेकर व कंडक्टर कानडीत बोलले आणि उलट त्यांनीच सुनावले, "ये महारास्ट नही है। ह्याँ मरेटी नही चलेगी !" त्यावर आम्हीहि त्यांना सांगितले, "मराठीचा नव्हे, तर आम्ही हिंदीचा आग्रह अवश्य धरू ! राष्ट्रभाषेस तरी तुम्ही विरोध करू

नये. शिवाय, म्हैसूर राज्यात मराठीभाषी लोक व त्यांचा भूभाग आहे, म्हणून मराठी येथे चालू नयेच, असेहि तुम्ही म्हणू शकणार नाही !"

दुपारच्या जेवणानंतर आम्ही 'बेनहर' बोलपट पाहायला गेलो. साऱ्या प्रवासात फक्त एवढाच बोलपट मी पाहिला. ( अनेकांनी प्रत्येक शहरात बोलपट पाहिला, म्हणून ही तुलना ! )

बसगाडीत काही निग्रो मुलेमुली बसल्या होत्या. मुलामुलीत फारसा फरक दिसला नाही. या बसने आम्ही सिटीमार्केटला उतरून इंद्रभवन हॉटेलात गेलो. तेथे मालकाकडून किल्ली घेऊन संडास, स्नानगृह यांचा उपयोग गिऱ्हाईकांना करता येतो. या हॉटेलाची व्यवस्थाहि छान आहे.

तेथून आम्ही सरळ रस्त्याने पायीपायी स्टेशनवर आलो. इतक्या जवळचा पायदळ रस्ता सिटीमार्केटला असेल, हे आम्हाला त्यापूर्वी फेऱ्याच्या बसमार्गाने जात असल्यामुळे कळले नाही. परत येत असताना रस्त्यात आम्हाला एक दाढीमिशा विकणारा माणूस दिसला. तोसुद्धा त्याच कृत्रिम वेशात उभा होता.

रात्री १२ वा. आमची गाडी बंगलोरहून निघाली. सिकंदराबाद हा आमचा यानंतरचा मुक्काम होता व प्रवास सुमारे ५२ तासांचा होता. अर्थात् आमची गाडी आम्ही मद्रासजवळील मार्गाने घेतल्यामुळे हे अंतर वाढले. एरवी इतके अंतर वा इतका अवधि याची आवश्यकता नव्हती. ह्या असल्या कमीअधिक अंतराच्या मार्गामुळे आम्हाला एकाच स्टेशना-वरून एकापेक्षा अधिक वेळा जाण्याचा प्रसंग बरेचदा आला.

रात्री अंधारी गाडी गुटी स्टेशनावर आली तेव्हा तेथील काही लोक हसून म्हणत होते— "स्टुडेंटस्पेशल आणि अंधार ! गंमत आहे !!"

+++ +++ +++-

दि. १६ जून ६१ ची सकाळ जलारपेठ स्टेशनावर झाली. संपूर्ण सोळा तारीख प्रवासात गेली. काटपाडी स्टेशनावर सकाळी ९ वा. दोन मुली फराळ करीत बसल्यामुळे गाडी सुटल्यावर त्या मागे राहतात असे वाटले. परंतु धावत येऊन त्या गार्डाच्या डब्यात बसल्या. असे प्रसंग बरेचदा आले. एकदा श्री. चव्हाण एका मित्रासह केवळ बनियनवर मागे राहिले. तेव्हा दुसऱ्या गाडीने येतांना एका मद्रासी महिलेने त्याच्या जेवणाची व्यवस्था केली. एकदा श्री. झोटींग मागे राहिले होते.

+++ +++ +++-

दि. १७ जून ६१ रोजी सकाळी आमची खास गाडी रायचूरला काही वेळ थांबली. नंतर गाडी वाडीला १० वा. थांबली. म्हैसूर राज्यात वाडी मोडते, पण गावाची भाषा मात्र मराठी व वातावरणहि मराठीच आढळले. वाडीला आमची गाडी ५ तास थांबली. तेवढ्या अवधीत या लहानशा खेड्यातील शहाबादी फरशी साफ करण्याची यंत्रशाळा पाहिली. गोलाकार साध्या अशा तीन यंत्रांवर शेकडो फरशा ठेवून फिरत्या यंत्रांवर त्या साफ व गुळगुळीत केल्या जात होत्या.

वाडी गावाचे वैशिष्ट्य हे की विहिरीला पाणी अगदी जवळ लागते. या गावात संपूर्ण रस्ते व घरे फरशीची असून घरांवरहि फरशीच टाकलेली आहे फरशीची ती कवले अभिनव व मजबूत होती. स्टेशन, गाव, घरे, सर्व काही फरशीमय होते.

दुपारी ३। वाजता आमची खास गाडी सिकंदराबादच्या दिशेने निघाली. कानडी वातावरण गेले. मध्ये काहीसे मराठी वातावरण आढळले.

महाराष्ट्राचा हा सीमाप्रदेशच ! आंध्रराज्य सुरू झाले व तेलगू-उर्दू वातावरणाचे प्राबल्य वाढू लागले !

रात्री १० वाजता सिकंदराबाद स्टेशनावर आमची गाडी येऊन मुक्कामाला थांबली. उतारूंसाठी स्वच्छ व खास प्लॅटफॉर्म पाहून बहुतेक जण त्यावर, आपापल्या डब्यांसमोर झोपले. आम्ही काहीजण हैद्राबाद पाहण्यासाठी मोटारी ठरविण्याकरिता गेलो व रात्री १ वाजता परत आलो. थोडी झोप लागते न लागते तोच पावसाचा शिरवा आला. त्यामुळे आम्ही डब्यात येऊन झोपलो.

+++ +++ +++—

रविवार दि. १८ जून ६१ रोजी सकाळी आम्ही आपल्या शिदोऱ्या सोबत घेतल्या व ५० रु.स एक याप्रमाणे खाजगी मोटारी करून हैद्राबादेचा ५० मैलांचा विभाग पाहण्याचे ठरविले. त्याप्रमाणे आमच्या मोटारी गोलकोंड्याच्या दिशेने धावू लागल्या. रस्त्याने जुने नबाबी वाडे व एकावर एक गडग्याप्रमाणे रचलेले दगडी माथे ह्या गोष्टी दिसल्या. किल्ला जवळ आला, तेव्हा १ मैल वाकडी वळणे घेत मोटार चालत राहिली. गोळकोंडा गावातून जाऊन किल्ल्याच्या मुख्य दरवाजापाशी आमच्या मोटारी थांबल्या. नंतर पायी वाकडीतिकडी वळणे घेऊन एकामागचे एक बुरुज चुकवीत आम्ही किल्ल्याच्या मुख्यद्वारात शिरलो. शत्रूला एकदम आत जाता येऊ नये व मारा करून पाडाव करता येऊ नये म्हणून अशी विशिष्ट द्वाररचना पूर्वी केली जात असे.

या गोवळकोंड्याला बराच जुना इतिहास आहे. आंध्रातील वरंगळ या शहरी हिंदूंची राजधानी असतांना इ. स. १२९२ मध्ये मार्कोपोलो हा जगाचा प्रवास करणारा गृहस्थ तेथे आला होता. त्यावेळी राणी रुद्रमादेवी राज्य करीत होती. मार्को पोलोने 'गोवळकोंडा ही रत्नांची

खाण ' असल्याचे लिहून ठेवले आहे. १६ व्या व १७ व्या शतकात हिऱ्यांची बाजारपेठ म्हणून गोवळकोंड्याची प्रसिद्धी होती. कोहिनूर, दी ग्रेट टेबल, दी निझाम, ओरलोक दी रिजेंट इ. जगात प्रसिद्धी पावलेले हिरे याच गोळकोंडाखाणीतील आहेत. कोहिनूर–हिरा इ स. १७३९ मध्ये नादिरशहाकडे होता. इ. स. १८५०मध्ये तो महाराणी व्हिक्टोरियाकडे गेला. हा कोहिनूर पूर्वी ११६ कॅरेट वजनाचा होता. आता १०६ कॅरेट वजनाचा तो आहे.

कुतुबशाहीत गोवळकोंड्याच्या किल्ल्याचा इतिहास सुरू होतो. अनेक कुतुब-राजांनी हा किल्ला चांगल्या तऱ्हेने बांधून मजबूत केला. त्यासाठी अमाप द्रव्य खर्च केले. या किल्ल्यात राण्या आणि राजा यांचे महाल व इतर इमारती–बुरूज यांचे भक्कम बांधकाम इब्राहीम कुतुबशहा ह्याने केले. चौथा सुलतान महंमद कुली कुतुबशहा (१५८०-१६१२) ह्याने हल्लीचे हैद्राबाद शहर वसविले. भाग्यवती नामक हिंदु राणीच्या नावावरून त्याने या शहराचे नाव प्रथम भाग्यनगर ठेवले पण त्यानेच तिच्या पश्चात ते बदलवून 'हैद्राबाद' केले. महंमद कुली बांधकामांचा शौकीन होता. प्रतिवर्षाला ३ लाख मोहरा बांध-कामावर खर्च करण्यासाठी तो अलग काढून ठेवीत असे. हैद्राबादेला वैभवाने नटविणाऱ्या चारमिनार, जुम्मामशीद यासारख्या सुंदर इमा-रती कुलीनेच बांधल्या.

१७ व्या शतकात टरव्हीनर नामक फ्रेंच भारतात प्रवासास आला होता. त्याने गोवळकोंड्याच्या वैभवाचे वर्णन लिहून ठेवले आहे. त्यावेळी अब्दुल्ला कुतुबशहा ( १६२६–७२ ) गादीवर होता. तो गणितज्ञ होता. अब्दुल्लाचे त्याचा दिवाण मीर जुमला याच्याशी न पटल्यामुळे दिवाणाने औरंगजेबाची मदत मागितली. औरंगजेबाने मदतीच्या नावावर गोवळकोंड्यावर हमला केला. २ महिने औरंग-जेबाने किल्ल्यास वेढा दिला. पण तो किल्ला अभेद्य राहिला.

दिल्लीहून तहाचे ठरल्यामुळे औरंगजेब परत गेला. जातांना त्याने भरमसाट खंडणी उपटली. शिवाजी महाराजांनीसुद्धा इ. स. १६६७ मध्ये गोवळकोंड्याच्या बादशहाकडून खंडणी घेतली.

अब्दुल्ला कुतुबशहानंतर अबुलहसन तानाशहा गादीवर आला. तो विलासी व उधळ्या होता. त्याची कारकीर्द १६७२ ते १६८७ इ. ही आहे. औरंगजेबाने गोवळकोंड्याची कुतुबशाही नष्ट करावी म्हणून पुन्हा १६८६ मध्ये गोवळकोंड्यावर स्वारी केली. तानाशहा व सेनापतींनी किल्ला ७ महिने लढविला. औरंगजेबसुद्धा चिवटपणे ७ महिने वेढा देऊन बसला. अखेर फितुरीमुळे किल्ल्याचा पाडाव झाला. फितुराने फत्तेदरवाजा खुला केल्यामुळे रात्रीच्या वेळी औरंगजेबाचे सैन्य आत घुसले.

मोगलशाही मोडल्यावर निजामाने कब्जा केलेल्या या भागाची राजधानी हैद्राबादला केली. १९४९ पर्यंत निझामाची राजधानी असलेले हे शहर आता आंध्र राज्याच्या राजधानीचे ठिकाण आहे.

हैद्राबादपासून ६ मैलांवरील एका उंच टेकडीवर असलेला हा किल्ला तीनशे फूट उंचीचा आहे. पहिला मुख्य दरवाजा बालहिमार किंवा फत्तेदरवाजा या नावाचा असून त्याची उंची ५३ फूट आहे. या दरवाजाच्या आत जाताच एक मोठा दिवाणखाना लागतो. या दिवाणखान्याचे वैशिष्टच हे की, येथे छतास वरच्या बाजूला मध्यभागी एक छेद आहे. तेथील रचना अशी आहे की, त्याखाली जमिनीवर उभे राहून टाळी वाजविली असता तो आवाज किल्ल्याच्या वरल्या बाजूस असलेल्या दरबारहॉलमध्ये ऐकू जातो ! हे आम्ही प्रत्यक्ष अनुभवले आहे. दूरच्या अंतरावर वार्ता पोहचविण्यासाठी अशी दूरध्वनीची व्यवस्था पूर्वीच्या काळी केली जात असे ! घोड्यांच्या टापांवरून सैनिकांचे आगमन सहज कळत असे. या किल्ल्याचा व्यापहि फार मोठा, म्हणजे ५ चौरस मैलाचा आहे.

या मुख्यद्वाराच्या म्हणजे आरंभीच्या दिवाणखान्याच्या उजव्या बाजूला एक बाग आहे. ही जुनी 'नगीनाबाग' अजूनहि अवशेषावस्थेत आहे. डाव्या बाजूला एक शस्त्रागर आहे. त्याची तीनमजली इमारत आजदेखील मौजूद आहे. जुन्या शस्त्रास्त्रांचे साठे व २५० तोफा या किल्ल्यात अजून आहेत

पुढे आणखी थोडे दूर गेल्यावर 'मध्य-बुरुज' लागतो. नंतर काहीसा चढ लागतो. दगडी भिंती दिसू लागतात. या चढणीजवळ 'रामदास-बंदीखाना' आहे. शेवटच्या सुलतानाच्या पदरी रामदास नावाचा निधी-प्रमुख होता. तो भद्राचलमला राहत होता. त्याने राम-मंदिराच्या बांधणीसाठी सरकारी पैसा वापरला. म्हणून बादशहाने त्याला येथे बंदिस्त करून ठेवले होते. या जागी आज हनुमान, लक्ष्मी इत्यादींच्या मूर्ति खडकात कोरलेल्या असून तेथे एक पुजारी असतो ! या रामदास-बंदीखान्याजवळच अंबरखाना (भांडारगृह) आहे. त्याच्या समोर एक शिलालेख असून त्यावर इ. स. १६४२ चा काल लिहिलेला आहे.

इब्राहिम कुतुबशहाने बांधलेली एक मशीद किल्ल्यात असून येथील नैसर्गिक अशा मोठमोठ्या खडकांनी एक तिसरा तट वरील किल्ल्याच्या रक्षणार्थ बांधला आहे. पायऱ्यांवरून वरपर्यंत हत्ती जाऊ शकत होता. काही जागी बंदुकीच्या बारुदीच्या खोल्या असून तेथे अजूनही मातीला काहीसा तसा वास येतो ! या किल्ल्यात उत्तम अवस्थेत असलेले महाकालीचे मंदिर अकन्ना व मादन्ना या नावाच्या तानाशहाच्या दोन दिवाणांनी बांधले. या कालीमंदिरावर एक खडकाचा कडा असून त्याचा एक भाग तुटलेला दिसतो. त्यावर अनेक कथा रचल्या गेल्या आहेत. औरंगजेबालाहि ह्या देवीने काही चमत्कारिक दाखले दाखविल्याच्या दंतकथा तोंडोतोंडी आहेत. या मंदिरावरील जागेत काही तोफा ठेवलेल्या आहेत. किल्ल्यात काही जागा राजराण्यांच्या बसण्याच्या म्हणून दाखविल्या जातात.

पाण्याचा साठा किल्ल्यात सतत राहावा म्हणून मोठ्या विहिरींची सोय आत आहे. येथील एक भव्य भिंत वीज पडून खचली आहे. याशिवाय १।। मैल दूरच्या दुर्गतलावातून नळाने पाणी आणण्याची व्यवस्था केली असल्याचे या किल्ल्यातील अवशेषावरून स्पष्ट दिसते. पूर्वीची ही पाणीपुरवठा-योजना पाहून नवल वाटल्याशिवाय राहत नाही. कुंभारी–खापरांचे नळ व हौद अजूनहि किल्यात आहेत. काही नळ तटांवरून नेल्याचे स्पष्ट दिसते: इतक्या कठीण जागेत पाणी चढविण्याचे तंत्र इतिहासकाळी लोकांना माहीत होते याचे हे प्रत्यंतर होय. यांत्रिक पद्धतीने हे पाणी किल्ल्यावर आणून सर्वत्र खेळविले जाई. कोणत्याहि मजल्यावर पाणी बरोबर चढत असे.

सर्वात वरच्या बाजूला दरबारीहॉल अथवा बारादरी नामक इमारत आहे. असेम्ब्लीहॉल वा दीवानेआम म्हणून संबोधल्या जाणाऱ्या ह्या इमारतीत एका बाजूला वातानुकूल अशी जागा आढळली. विशिष्ट गृहरचनेमुळे थंड हवा नेहमी येथे खेळत असते. चारमिनारला येथून भुयार असल्याचे सांगितले जाते. येथे राजा वा राणी हवा खाण्यासाठी येत असत, असे म्हणतात. शहानसीम तर येथे बसून हवा खात असेच ! या दरबारगृहाच्या वर गच्ची असून तेथेहि पायऱ्यापायऱ्या करून आणखी एक उंच खुली बैठक केली आहे. या स्थानीच दर्शनी द्वारातील दूरध्वनी-जागेत वाजविलेली टाळी बरोबर ऐकू येते. इतर ठिकाणी तो आवाज मुळीच ऐकू येत नाही. या गच्चीवरून समोर पाहिले असता अब्दुल्ला कुतुबशहाच्या तारामती व प्रेममती या दोन पट्टराण्याचे महाल दिसतात. त्यांच्या महालातील गायन येथून बादशहा ऐकत असे व ते अंतर जास्त असूनसुद्धा ऐकू येत असे. 'गोलकोंडा' बोलपटात अशा तऱ्हेचे चित्रण करण्यात आले असून नटनटींचे असे कार्यक्रम झाले व आपणहि त्यात भाग घेतला असे तेथील हवालदार फैयाजखान याने आम्हाला मार्गदर्शन करतांना सांगितले.

बारादरीच्या दुसऱ्या बाजूने उतरल्यावर जनानखान्याच्या इमारती आहेत. त्यांची पडझड झाली आहे. मंत्रीगृहादि अनेक इमारती किल्ल्यात आहेत. रेकॉर्ड ठेवण्याच्या सेक्रेटरीएटसारख्या जागाहि या किल्ल्यात चांगल्या अवस्थेत आहेत. एका जागी जुन्या काळीच पूल बांधून उतरण साधली आहे. स्त्रियांचे केशभूषामंदिर एका भागात आहे. मंत्री व राजा यांचेहि अलगअलग बंगले आहेत. किल्ला सुस्थितीत असून कित्येक बुरुज, तट, विहिरी व इमारती स्वतंत्र लेखनविषय व्हाव्यात, इतक्या महत्त्वाच्या आहेत !

या किल्ल्याच्या उत्तरेस अर्धा मैल लांब अंतरावर कुतुबशाहीतील राजे, राण्या, युवराज इत्यादिकांच्या कबरी चांगल्या अवस्थेत आहेत. त्या पाहण्याजोग्या आहेत. सुलतान कुली कुतुबशहाची कबर प्रेक्षणीय आहे.

किल्ला पाहून आम्ही उसमानसागर नामक तलाव पाहायला गेलो. मुसा नदीचे पाणी अडवून या तलावाचा उपयोग केला आहे. गंडीपेठेतील हिमायतसागर हाहि तलाव पाहण्यासारखा असून तो मोठा आहे.

हैद्राबादेतील उस्मानिया विद्यापीठ, डेअरीफार्म इत्यादि स्थळांपेक्षाहि सर्वात आकर्षण सालाझार म्युझियमचे आहे. म्युझियमला जातांना आम्ही आपल्या बसमोटारी चारमिनारजवळ थांबवून फराळपाणी आटोपले. जवळच्या नळावरचे पाणी पिऊन आम्ही जवळची जुम्मामशीद पाहिली. ती आलीशान मशीद चारकमानीप्रमाणेच हैद्राबादचे एक वैभव म्हटले पाहिजे. आम्ही चारमिनारवर चढून त्या उंच जागेवरून खाली पाहत असतांना भीतीने डोळे कसे फाटतात याचा अनुभव घेतला. चारमिनार महंमद कुली (१५८०–१६१२) या बादशहाने बांधला आहे.

हैद्राबादचे सालारजंग म्युझियम हैद्राबादचे व देशाचे एक भूषण असून जगातील श्रेष्ठ वस्तुसंग्रहालयांमध्ये त्याचा समावेश होतो. जगातील

प्रवासी हैद्राबादेचे हे म्युझियम पाहायचे बहुधा टाळत नाहीत. हैद्राबादेच्या निझामाने एका नबाबाला सालरजंग हा किताब दिला होता. या घराण्यातील निरनिराळया ३ 'सालारजंगां'नी जगातील भिन्नभिन्न व उत्तमोत्तम वस्तु जमविल्या. अभिरुचिसंपन्न व कलात्मक अशा सालारजंगांनी जमविलेल्या त्या वस्तूंची मांडणी, सजावट व कलात्मकता वाखाणण्याजोगी आहे. जगात केवळ एकटयाच्या कर्तृत्व-शक्तीवर व साधनसंपत्तीवर उभारलेले दोनच म्युझियम आहेत. एक इटालीतील ट्रीस्ट येथे असून ते हेन्री क्वेझ याने तयार केलेले आहे. त्यात हत्यारे आहेत. दुसरे म्युझियम भारतातील हैद्राबादचे आहे. हे म्युझियम सुमारे दोनशे वर्षापूर्वी बांधलेल्या एका दुमजली इमारतीत थाटण्यात आले आहे. ७७ खोल्यात त्याचे विविध विभाग सजविले आहेत. ३ ऱ्या सालारजंगाला मरून एक तप लोटले. हे म्युझियम भारत सरकार लवकरच ताब्यात घेणार आहे. दरवर्षी लक्षावधी रुपये खर्च करून हे म्युझियम चालविण्यात येत आहे. माणशी दीड रुपया तिकीट येथे लागते. विद्यार्थ्यांना अर्ध्या तिकीटात जाता येते. शुक्रवारी हे म्युझियम बंद असते. सकाळी १०॥ ते सायंकाळी ५ पर्यंत ते उघडे असते.

आम्ही सर्वप्रथम 'मुलांचा विभाग' पाहिला. मुलांना मोह पाडणारे हे दालन अपूर्व असे वाटले. पण ही अपूर्वाई पुढेपुढे वाढतच गेल्याचे प्रत्ययास आले. लहान मुलानाच काय पण मोठमोठया लोकांनाहि येथे निश्चितच भुरळ पडते.

या म्युझियममध्ये वस्तूंची पुनरावृत्ति नाही. वस्तूंच्या विविधतेची कमाल येथे आढळते. संपूर्ण म्यूझियम पाहायला ५ तास तरी लागतात. तसे पाहिले तर शांतपणे पाहण्यासाठी २–३ दिवसहि लागतील ! पाहतांना कुठेच कंटाळा येत नाही किंवा उत्साहाच्या भरात थकवाहि येत नाही. या म्युझियमच्या व्यवस्थित रचनेमुळे न घोटाळता माणूस एकएक दालन पाहत पुढे जातो व शेवटी बाहेर पडतो.

क्रमांक १ ते ७ या दालनांमध्ये चिनी, जपानी इ. पौर्वात्य देशांच्या कलांचे असामान्य नमुने ठेवले आहेत. १३६८ सालचे लाकडी सामान व १६४४ मधील चिनी वस्तूंचे नमुने येथे आहेत. इ. स. १३०० मधील काचेत पक्का केलेला कशीदा पाहतांना नवल वाटते ! जपानातील हस्तीदंती वस्तु अपूर्व वाटल्या. हस्तीदंताच्या बारीक काड्यांनी काढलेल्या धबधब्याचे चित्र चित्रकाराने आयुष्यात तेवढेच काढले म्हणतात. त्या चित्राची किंमत एक लाख रुपये आहे ! कला असावी ती अशी !

१४ व्या क्रमांकाच्या दालनात इजिप्तमधील व १५ व्यात ब्रह्मदेशातील कला आहे. १६ व्यात फारस देशाची कारागिरी आहे. १७ व्यात मोगलांचे वैभव झळकते.सोन्याच्या अक्षरांच्या लेखनाची कला येथे दिसली. मोगलकालीन हस्तलिखितांचे कितीतरी आकर्षक प्रकार येथे आहेत. एकइंची कुराण असून त्यात संपूर्ण कुराण येऊन गेले आहे. मोगलांचे कपडे व डाक्याची मलमल येथे पाहावयास मिळाली. तत्कालीन जरीचे खण, झुली, शालू व भरजरी कापड येथे ठेवण्यात आले आहे. एका भागात काश्मीरी कारागिरी आढळते. ४४ व्या दालनात हत्तीघोडे यांचे खास लढाऊ अलंकार ठेवलेले आहेत.

निरनिराळ्या विभागातील धातूचे काम, लाकडी काम, गालिचे, भरतकाम, चित्रसंग्रह, हत्यारे व विविध जनरीती यांचे प्रदर्शन पाहून चित्त प्रसन्न होते. अक्रोड, ब्रांझ, संगमरवर इत्यादिकांच्या मनोहर मूर्ति, पुतळे, गणेश, पार्श्वनाथ व नटराज ह्या देवता, नसाच्या कोरीव डब्या, देशाविदेशातील चित्रकारांनी काढलेली अपूर्व व असामान्य चित्रे ही येथली वैशिष्ट्ये डोळ्यात भरतात. एका दालनात आरसे-महाल असून भिंती, छत इत्यादि जागा आरशांनी सजविलेल्या आहेत. द्राक्षांच्या रंगांच्या व पांढऱ्या रंगाच्या रत्नांचा संग्रह या म्युझियममध्ये आहे. जहांगीर, नूरजहान, शहाजहान,औरंगजेब इ. राजांनी वापरलेल्या तलवारीच्या रत्नजडित मुठी, तलवारी, म्याना, कटयारी इ. वस्तु तेथेच ठेवलेल्या

आढळतात. टिपू सुलतानाची हतीदंती खुर्ची, लहान मुलांचे नाना खेळ, अंबारी, विविध हत्यारे, इंग्लंडातील कवींचे अर्धपुतळे, मुले व बायका यांच्या शरीरसौष्ठवाची कल्पना देणारे शुभ्ररंगी व काळे पुतळे नयन-मनोहर आहेत.

दातावर काढलेली चित्रकारी विलोभनीय वाटली. भारतीय व फ्रेंच चिलखते पाहून नवल वाटले. संगमरवरी जाळीदार कापड आश्चर्य-चकित करते झाले ! एक आंग्लयुवती एका चित्रामध्ये अगदी आपल्या-कडेच पाहते असे वाटते. एका चित्रात एका बाजूने गाढव दिसतो व ते चित्र समोरून पाहिले असता तेथे माणूस दिसतो ! एका तांदळाच्या दाण्यावर मोर व एक किल्ला चित्रिण्यात आला आहे. सालारजंगाची भव्य छायाचित्रे म्युझियममध्ये आहेत.

सालारजंग–म्युझियमची सर्वात आकर्षणे म्हणजे येथील दोन अजब व आश्चर्यकारक पुतळे ! एका दालनात पाच फूट उंचीचा एका स्त्रीचा शुभ्ररंगी संगमरवरी पुतळा आहे. ही स्त्री 'ओलेती' दाखविलेली आहे. तिच्या अंगाला कापड अगदी चिकटले असल्याचे स्पष्ट दिसते. अवयव व वस्त्राचे बारकावे रेखीव झाल्यामुळेच हा पुतळा अत्याकर्षक ठरला आहे. बिझोनी नामक इटालियन शिल्पकाराची ही अपूर्व किमया असून ती १८७६ मधील आहे. या पुतळ्याची किंमत ७ लाख रुपये आहे.

दुसरे अपूर्व शिल्प केवळ लाकडाचे आहे. या पुतळ्यात एक रुबाबदार वीरपुरुष दिसतो व त्याच्यामागे सलज्ज विनयशील युवती दिसते. वस्तुत: ती युवती आरशात दिसत असून वीरपुरुषाच्या पुतळ्याची पाठ ज्या आकृतीची आहे तिचे प्रतिबिंब म्हणजे आरशातील त्या युवतीचे प्रतिबिंब होय ! अशा कलाकाराच्या कलेचे कौतुक करावे तितके थोडेच !

हे अभूतपूर्व म्युझियम पाहुन भारताचे राष्ट्रपति डॉ. राजेंद्र-प्रसाद, सरसेनापति थिमय्या व अनेक थोर लोक यांनी प्रशंसोद्गार

अनुक्रम 39660 … २०६ … २८।१०।६

काढले आहेत. सर्व विभाग पाहूनहि समाधान होत नाहीच याची जाणीव सतत मनात वागवीत सर्व भाग पाहतपाहत आम्ही घड्याळांच्या विभागात आलो. ५०–६० लहानमोठी घड्याळे या दालनात ठेवली आहेत. एका घड्याळात लंबकाच्या जागी पाळणा आहे व त्यात एक जोडपे झोका घेत आहे ! येथे सर्वात आकर्षक असे एक गमतीदार घड्याळ आहे. ते घड्याळ पाहण्यासाठी म्युझियम पाहणारे लोक बहुसंख्येने हजर असतात. १, २, ३, ४, ५ अशा पूर्ण आकड्यांइतके वाजले असता या घड्याळाच्या बाजूला असलेल्या लहानशा झोपडीतून एक यांत्रिक माणूस बाहेर येतो व जवळच्या घंटिकेवर वाजले असतील तितके ठोके मारून लगेच झोपडीच्या आत जातो. ठोक्यांचा आवाज नीट ऐकू येतो. तो माणूस बाहेर येतांना दार उघडले जाते व आत गेल्यावर ते दार लावून घेतले जाते ! या घड्याळाची ही गंमत पाहण्यासाठी आम्ही १० मिनिटे उत्सुकतेने वाट पाहत बसलो होतो. त्यावेळी पाऊस सुरू झाल्यामुळे समोरील अंगणात पाणी पडत होते. तरी पाहणारांनी त्याची पर्वा मुळीच केली नाही.

पाऊस सुरू असतांनाच ५ वाजता आम्ही म्युझियमच्या बाहेर पडलो व बसमोटारींनी पब्लिकगार्डन मध्ये आलो. 'बागयाम' या नावाने या बागेची कीर्ति आहे. या बागेत विभिन्न वनस्पति व विभिन्न प्राणी ठेवण्यात आले आहेत.जवळच हेल्थ-म्युझियम आहे. आरोग्याच्या क्षेत्रातील विविधज्ञानात्मक चित्रे आणि वस्तु यांचा संग्रह त्या म्युझियममध्ये आहे.

आमच्या बसमोटारी सुमारे ६ वाजता परत शिकंदराबाद स्थानकावर आल्या. जेवण तयार होते. जेवण केल्यावर विश्रांती घेणे आवश्यकच होते. कारण संपूर्ण दिवस पाहण्यात व फिरण्यात निघून गेला होता.

++ ++ ++—

दि. १९ जून ६१ रोजी अजंता–म्युझियम पाहण्यासाठी पब्लिक-गार्डनवर बरेच जण गेले. अजंता–म्युझियमसुद्धा बऱ्यापैकी आहे. ५ हजार वर्षांपूर्वीचा मृतदेह ( ममी=शवपेटिका ) येथे संरक्षून ठेवला आहे. ही इजिप्शियन ममी काहीशी ओळखता येऊ शकते. नाकडोळे यांना पट्ट्या गुंडाळलेल्या अवस्थेत आज तो मृतदेह ठेवलेला आहे.

काहीजणांनी नेहमीप्रमाणेच हैद्राबादलाहि खरेदीत हा संपूर्ण दिवस घालविला. 'खरेदी आणि खरेदी' एवढाच आमच्यातील काही-जणांचा तरी प्रवासहेतु होता की काय, कोण जाणे !

प्रवास संपत आल्यामुळे, जवळजवळ संपल्यामुळे दि. १९ ला शिकंदराबाद–स्थानकाच्या फलाटावर सर्वांची एक निरोप–सभा झाली. ४० दिवस एका घरकुलात राहिल्यामुळे निर्माण झालेले संबंध तोडणे संवेदनेला कुठेतरी जाणवून देणारे होते. सहलीचे संघटक डॉ. आ. पां. पडोळे या सभेत बोलले. कमीअधिक झाले असल्यास सावरून घेण्यास त्यांनी सुचविले, तर सभेतील प्रा. तट्टे, प्रा. बेलगे, श्री. चोरे इत्यादि वक्त्यांनी सहलीच्या यशापयशाची मीमांसा करून काही उपयुक्त सूचना दिल्या. एकंदरीत कार्यक्रम गोड झाला आणि तो हृद्य पण ठरला ! प्रत्येकाचीच मने त्या कार्यक्रमाने जड झाली; भारावली !

रात्री ९ वाजता सहलीच्या खास गाडीने शिकंदराबाद सोडले आणि ती अमरावतीच्या दिशेने निघाली.

++ ++ ++—

दि. २० जून ६१ रोजी सकाळी चांद्यास ही खास गाडी आली. तेथील मुले उतरली व निरोप घेऊन घरी गेली. दुपारी वर्ध्याला काही

वेळ गाडी थांबली. तेथे नागपूर–वर्धेकडील मंडळी उतरली. गाडी सुटेपर्यंत त्यांनाहि गाडीच्या इतर प्रवाशांना सोडवत नव्हते. पुलगाव, धामणगाव इ. ठिकाणी काही विद्यार्थी उतरले. ४॥ वाजता बडनेऱ्याला गाडी आली व आकोल्याकडील लोक तेथे उतरून गेले. उतरलेल्या लोकांना घेऊन ठीक ६॥ वाजता ही खास गाडी अमरावती स्थानकावर आली. बरेच लोक घ्यायला आले होते. घरी आल्याचा आनंद सर्व सहलकऱ्यांच्या चेहऱ्यावर विलसत होता; तर भेटणारांच्या मुखावर आपली माणसे सुखरूप परतल्याचे समाधान दृगोचर होत होते. कित्येकांनी डॉ. पडोळे यांचे हारतुऱ्यांनी स्वागत केले व निरोप घेताघेता आणि निरोप देतादेता प्रत्येकाचा जीव कसा गुदमरून गेला! मंगळवारीच निघालेली व मंगळवारीच परतलेली ही सहल मंगल ठरली होती व अपघातादिक अमंगलतेचा स्पर्श न होता आपल्या घरकुलाकडे विसावण्याकरिता येऊन थांबली होती!

सुमारे ४२ दिवसांची आमची ही सहल कुठल्याहि अपघाताशिवाय पार पडली, याचा आनंद आहे. ३०० विद्यार्थ्यांत कित्येकजण मागे राहत, गाडी पुढे जाई, मनमाने कुणीहि कुठे भटकत राही. तरीहि धोक्याने आपली चुणूक कुठेच दाखविली नाही. सहलीला असले गालबोट योगायोगाने वा संचितानेसुद्धा लागले नाही हे संघटकांचे व आमचे शिकंदर नशीबच म्हटले पाहिजे!

या सहलीत कमी वेळात अनेक स्थळे पाहिल्यामुळे ही सहल अधिक लाभप्रद ठरली. सुमारे ५ हजार मैलाचा प्रवास घडला व त्यामानाने आलेला खर्च तोकडाच वाटला! दक्षिणभारताच्या वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीचे जवळून दर्शन घडले. दक्षिणेची सज्जनता व मार्दवता यांचा अनुभव आला. किल्लेवजा तट, पुष्करिणी, जुने शिल्प, चित्रांकन अणि उत्तुंग गोपुरे यांनी

युक्त असलेली कितीतरी देवळे पाहिली. तंजावर, रामेश्वर व म्हैसूर येथील विशाल नंदींची आठवण कधी विसरता यायची नाही. मद्रास, रामेश्वर, पांदेचरी, धनुष्कोडी, कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, येथील समुद्रदर्शनाची स्मृति वुजायची नाही. म्हैसूरचा वृंदावनबाग, हैद्राबादचे सालारजंग म्युझियम, भिलईचा व पेरांबूरचा कारखाना, मद्रासचा किनारा ह्या जगप्रसिद्ध गोष्टी स्मरणातून कधीच नष्ट व्हायच्या नाहीत. प्रतिक्षणाला, प्रतिपळाला, पावलोपावली ज्ञानसंचय करीत आम्ही प्रवास केला. दृष्टीत विशालता आली व भारतीयांच्या मनाचा कानोसा घेण्याची संधी साधून घेतली! खटकले ते विसरून गेलो. पाहिलेले व चांगले वाटलेलेच आठवू लागलो. गौण गोष्टींना गौणत्व आले व महत्त्वाचे होते त्याचे महत्त्व मनाला पटत राहिले! जे एकट्याला एकलकोंड्याने जाऊन साधता आले नसते ते अनेकांच्या मेळाव्यात जाऊन साधले व विविधतेतील एकतेचे दर्शन देणाऱ्या भारतमातेला सविनय नमन करण्याचा अपूर्व योग आला! कन्याकुमारीने भारताचे चरणतीर्थ सेवन करण्याचा शुभसमय प्राप्त करून दिला. हनुमंताच्या उंच उडीचा वालुकामय गंधमादन पर्वत चढायला मिळाला! उतकमंड व येरकाडसारख्या थंड हवेच्या ठिकाणी जाऊन तेथली प्रशान्तता मनाच्या खणात साठविता आली! जे मिळाले ते अमाप आहे, अथांग आहे, अविस्मरणीय आहे. जे जे भेटले ते ते जिवलग झाले, स्वभावधर्माची ओळख झाली व वैचित्र्यपूर्ण ईशसृष्टीचे नटनाट्य अंतर्दृष्टीला पाहण्याचे धडे मिळाले.

पाच राज्यातील प्रवासात पाच राजधान्या पाहिल्या. नागपूर ही महाराष्ट्राची उपराजधानी, मद्रास राज्याची राजधानी मद्रास, केरळची राजधानी त्रिवेंद्रम, म्हैसूर राज्याची राजधानी बंगलोर व आंध्रराज्याची राजधानी हैद्राबाद ह्या पाचहि राजधान्यांची आगळी आगळी विशेषता समजली. मराठी (महाराष्ट्र), हिंदी (मध्यप्रदेश), तेलगू (आंध्र), तामीळ (मद्रास), मलयालम (केरळ), व कन्नड (म्हैसूर) अशा महा भाषांच्या संपर्कात येऊन भारतभारतीच्या संम्मेलनाचे सोहळे कळले. साहित्य, संगीत, कला,

अनुक्रम ३१६००... दि: ...प्रवार
क्रमांक ...२८+२०१६१ नों दि: ...२०६

उद्यम, विज्ञान इत्यादि नानाविध शाखांमधील विहरण घडले व ते जीवनाला पूरक आणि पोषक ठरले.

प्रवासात राबणारे राबले; पिचणारे पिचले व इतरांना प्रसन्नतेचे, ज्ञानाचे अन् आनंदाचे घबाड देणारे ते महाभाग ठरले. अनेक लोक व्यवस्थेसाठी खपले आणि डॉ. पडोळे यांच्यासह शिव्या, टीका यांचे वार झेलून हसतहसत सर्वांना घरी आणण्यासाठी मदतीचा हात देत राहिले ! नावे तरी किती घ्यावी ? अनेकांच्या दृश्यादृश्य कृतींचे, सद्भावनाचे व सहकार्याचे यशदायी फल म्हणजे ही श्री शिवाजी लोकविद्यापीठाची सहल ! या सहलीत काय मिळाले, त्याचा साक्षात्कार ज्यालात्याला अलगअलग होऊ शकेल ! मला झालेला साक्षात्कार हा असा आहे ! ३०० लोकांची ३०० मने, ६०० डोळे व ६०० कान यांनी हा साक्षात्कार अनुभवलेला आहे. त्यांच्याहि श्रमातून ह्या सहलीच्या यशाची बीजे निश्चितच शोधता येतील !

**समाप्त**

ग्रं. क्र. १२१९५

## सेवा प्रकाशनाची साहित्यसेवा

१. राष्ट्रसंतकी जीवनझाँकी (हिंदी)– १९५४. ले. भाऊ मांडवकर
२. ए वंडर मॅन ऑफ इंडिया (इंग्रजी)–१९५५. ले. पु. य. देशपांडे
३. राष्ट्रसंताच्या आठवणी, भाग १ ला–१९५५. ले. भाऊ मांडवकर
४. पानोळचा (कवितासंग्रह)–१९५६. कवि–भाऊ मांडवकर
५. माझी चाळीस भावंडं (कादंबरी)–१९५६. ले. भाऊ मांडवकर
६. सृजन (कवितासंग्रह)–१९५८. कवि–वसंत गिरटकर
७. राष्ट्रसंताच्या आठवणी, भाग २ रा–१९५८. ले. मांडवकर–सेलूकर
८. नव्हाळी (कवितासंग्रह)–१९५९. संकलन–संपादन
९. सेंगी (लघुकथासंग्रह)–१९६०. ले. भाऊ मांडवकर
१०. निर्मलराणी (बालकादंबरी) १९६१. ले. न. रा. निमजे
११. दक्षिण–दर्शन (प्रवासवर्णन) ले. भाऊ मांडवकर

## वऱ्हाडी वातावरणावरील ढंगदार लघुकथांचा संग्रह

# * मेंगी *

लेखक– प्रा. भाऊ मांडवकर. * किमत २। रुपये

## –: काही अभिप्राय :–

**युगवाणी:–** "हा कथासंग्रह म्हणजे नागर व ग्रामीण जीवनावरील कथांचा सुंदर संगम आहे."

**अमृत:–** "या संग्रहाचे वैशिष्टय म्हणजे प्रा. मांडवकरांनी अनेक कथात प्रादेशिक भाषेचा केलेला मुक्त उपयोग !"

**गावकरी:–** "मांडवकरांच्या काही कथातून उत्कृष्ट कथा–बीजे निश्चितच आहेत."

**तरुणभारत:–** "...या कथा दीर्घकाळ वाचकांच्या स्मरणात राहाव्यात इतक्या रमणीय आहेत."

**नागपूर नभोवाणी:–** "दिल्लीची वारी आणि पाहुणपना ह्या कथा चांगलीच करमणूक करतात."

**महाराष्ट्र साहित्यपत्रिका:–** "...मांडवकरानी सर्वत्र वऱ्हाडी भाषा वापरण्याचा प्रयोग केला आहे."

**श्रीगुरुदेव:–** "मांडवकरांनी ग्रामीणांच्या भावजीवनाचे विश्व साकार केले. त्यातील वारकावे 'मेंगी'त प्रकट झाले आहेत."

**नवयुग:–** "वऱ्हाडी बोली उपेक्षितासारखी वावरत आहे. मांडवकरांनी 'मेंगी'च्या रूपाने तिचे ऋण फेडण्याचा प्रयत्न केला आहे."

**स्वदेश:–** "'मेंगी'ने मराठी लघुकथासृष्टीत भर टाकली आहे."

**शिवशक्ती:–** "ह्या कथा म्हणजे वैदर्भीयांच्या सामाजिक जीवनाचे दर्शन घडविणारी भावचित्रे आहेत."

**श्री. वा. ना. देशपांडे:–** "वऱ्हाडी भाषा व वऱ्हाडी वातावरण ही या संग्रहाची मला वैशिष्टये वाटतात."

**मातृभूमि:–** "एकंदरीने 'मेंगी'तील दहाहि कथा मोठ्या 'मस्त आहेत. त्यांची गोडी 'वेज्याच वाहाडली' आहे."

REFBK-0012196